# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र १ :** Major Mandatory

# विशेष वाङ्‍मयकृतींचा अभ्यास

**सत्र २ :** Major Mandatory

# विशेष साहित्यकृतींचा अभ्यास

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग १ : मराठी**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
एम. ए. भाग-१ मराठी करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89345-78-0

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : मराठी ■


अध्यक्ष : **डॉ. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शितल सचिन गोरडे–पाटील**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली.

- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

- **डॉ. गोमटेश्वर एस. पाटील**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. संदिप मारुती दळवी**
  श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.

- **डॉ. सागर अशोक पाटील**
  कन्या महाविद्यालय, मिरज, जि. सांगली.

- **डॉ. सुनिल वामन चंदनशिवे**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश महादेव दुकळे**
  देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस ॲण्ड
  सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.

- **डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव**
  यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. गोविंद गंगाराम काजरेकर**
  गोगटे–वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी,
  जि. सिंधुदुर्ग

- **डॉ. रमेश महादेव साळुंखे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर

- **डॉ. अशोक सदाशिव तवर**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स
  ॲण्ड कॉमर्स, सातारा.

- **डॉ. तातोबा कल्लाप्पा बदामे**
  पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
  तासगांव, जि. सांगली.

## प्रास्ताविक

विद्यार्थ्यांच्या जीवन जाणीवा प्रगल्भ व व्यापक होण्याच्या हेतूने प्राचीन आणि अर्वाचीन काळातील अनेक ग्रंथ सहाय्यभूत होत असतात. अशाच निवडक ग्रंथांची ही अभ्यासपत्रिका मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी निश्चितच पूरक ठरेल. या अभ्यासपत्रिकेत म्हाइंभट यांचे 'गोविंदप्रभू चरित्र', सुधाकर पवार यांनी संपादित केलेले 'मराठीशाहीतील पत्ररूप गद्य', 'नदिष्ट' ही मनोज बोरगावकर यांची कादंबरी आणि मकरंद साठे यांचे 'सूर्य पाहिलेला माणूस' हे नाटक समाविष्ट केले आहे. तसेच या वर्गाच्या दुसऱ्या सत्राकरिता भालचंद्र नेमाडे यांनी संपादित केलेली 'तुकारामगाथा' (तुकारामांचे निवडक अभंग) हे पुस्तक, मा.पं.मंगुडकर यांनी संपादित केलेले 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रवासवर्णन', वसंत आबाजी डहाके यांचा 'चित्रलिपी' हा काव्यसंग्रह आणि 'पिवळा पिवळा पाचोळा' हा अनिल साबळे यांचा कथासंग्रह ही वैविध्यपूर्ण पण काहीएक समानसूत्र असलेल्या अभ्यासपत्रिकेची बांधणी करण्यात आली आहे. या अभ्यापत्रिकेच्या माध्यमातून मराठीतल्या महत्त्वाच्या ग्रंथांचा परिचय होण्याबरोबरच या अभ्यासपत्रिकेद्वारे तत्कालीन साहित्य, समाज आणि संस्कृतीचा परिचयही होणे अभिप्रेत आहे.

अभ्यासक्रमास नेमलेल्या या सर्वच पुस्तकांच्या अभ्यासांती विद्यार्थ्यांना आपल्या एकूणच समाजजीवनातील सामाजिक, राजकीय, धार्मिक व ऐतिहासिक परिस्थिती आणि समाजधार्जीणे तत्त्वज्ञान समजून घेण्यास निश्चितच मदत होईल. मराठीत पत्र वाङ्मयाला प्रदीर्घ अशी परंपरा आहे. पत्रलेखन हे तत्कालीन चलनवलनाचे एक महत्त्वाचे माध्यम होते. पत्रलेखनाच्या माध्यमातून सामाजिक-राजकीय स्थितीगतीच्या आकलनाबरोबरच मानवी नातेसंबंधही चांगल्याप्रकारे अभिव्यक्त झाले आहेत. ते विद्यार्थ्यांना समजावेत या उद्देशाने अशा पत्ररूप गद्याचा समावेश या अभ्यासपत्रिकेत करण्यात आला आहे. 'नदिष्ट' या कादंबरीच्या अभ्यासातून मानवी जीवनातील नदीचे महत्त्व समजून घेण्याबरोबरच मानवी जीवनातील आदीम भावनांचा शोधही विद्यार्थ्यांना घेता येईल. नीतीभ्रष्ट आणि तत्त्वशून्य ठरत चाललेल्या काळखंडात सूर्य पाहिलेला माणूस हे नाटक मराठी रंगभूमीवर येणे ही सुखावणी बाब आहे. थोर तत्त्ववेत्ता सॉक्रेटिसच्या जीवनकार्यावरचे मराठीतले हे एक अत्यंत महत्त्वाचे नाटक असून प्रतिकूल सामाजिक-राजकीय परिस्थितीतही व्यक्तिगत तत्त्वाकरिता करावा लागलेला संघर्ष आणि समाजधार्जिण्या शाश्वत मूल्यांकरिता प्रसंगी प्राणाचे बलिदान करणाऱ्या सॉक्रेटिसचे व्यक्तिमत्त्व खचितच प्रेरणादायी आहे, या नाटकाच्या अनुषंगाने विद्यार्थांना तेही समजून घेता येईल.

या अभ्यासपत्रिकेच्या दुसऱ्या सत्रातही विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण साहित्यकृतींचा अभ्यास करता येईल. संत तुकाराम यांच्या निवडक अभंगांच्याद्वारे संत तुकाराम यांची विरक्ती, भक्ती, कवित्वशक्ती इत्यादी अनेक घटकांचा तपशीलवार परिचय होईल. तसेच लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्यकृती यातील परस्परसंबंधी समजून घेता येईल. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाच्या अभ्यासातून महर्षींच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांनी केलेल्या सर्वदूर प्रवासातून त्यांचे समाजसन्मुख असणारे उत्तम अवलोकन आणि त्यांनी केलेल्या प्रबोधन विचाराचे स्वरूपही समजून घेता येईल. आपल्या समाजव्यवस्थेत १९९० नंतर शिरकाव केलेले खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे सर्वच क्षेत्रात प्रचंड उलथापालथीचे ठरले आहे. या सर्वांचे प्रतिबिंब अर्थातच 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहातही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पडल्याचे स्पष्टपणे दिसून येते. वसंत आबाजी डहाके यांच्या या काव्यसंग्रहातील कवितेतून दिसणारा संवेदनशील माणूस आणि प्राप्त परिस्थितीत त्याची हतबलता, परात्मता आणि एकूणच मानवी आयुष्यातील निरर्थकता याचा शोध विद्यार्थांना घेता येईल. शिवाय पिवळा पिवळा पाचोळा या कथासंग्रहाच्या अभ्यासांती ग्रामवास्तवात धडपडणाऱ्या एका निष्पाप मुलाची निसर्गाविषयीची अपरंपार ओढ जशी दिसून येईल तशीच त्याची वास्तवाशी संघर्ष करत जगताना जगण्याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करणारी आगळी वेगळी कथा विद्यार्थ्यांना समजून घेता येईल. या पुस्तकातील सर्वच लेखन अत्यंत अभ्यासपूर्ण झाले असून या लेखनासोबतच विद्यार्थ्यांनी इतरही संदर्भग्रंथांचे अवश्य वाचन करावे आणि ही अभ्यापत्रिका सखोलपणे समजून घ्यावी.

**■ संपादक ■**


**प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे**
मराठी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. रमेश साळुंखे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**विशेष वाङ्‌मयकृतींचा अभ्यास/**
**विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**
**एम. ए. भाग–१ (मराठी)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : विशेष वाङ्‌मयकृतींचा अभ्यास** | |
| **डॉ. हंसराज जाधव**<br>प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण | १ |
| **डॉ. अप्पा बुडके**<br>आजरा महाविद्यालय, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर | २ |
| **डॉ. सुस्मिता खुटाळे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. नागनाथ बळते**<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, जि. पुणे | ४ |
| **सत्र–२ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास** | |
| **डॉ. नामदेव गपाटे**<br>बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी, राज्य उत्तर प्रदेश | १ |
| **श्री. सुशिल धस्कटे**<br>सोलापूर | २ |
| **श्री. गोविंद काजरेकर**<br>रावसाहेब गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स सरस्वतीबाई गणशेत<br>वाळके कॉलेज ऑफ आर्टस, बांदा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग | ३ |
| **डॉ. सर्जेराव पद्‌माकर**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे**
मराठी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) रमेश साळुंखे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


सत्र–१ : विशेष वाङ्मयकृतींचा अभ्यास

घटक १ श्रीगोविंदप्रभु चरित्र १

घटक २ मराठेशाहीतील पत्ररूप गद्य (इ.स. १६५० ते १७५०) ११

घटक ३ नदीष्ट – मनोज बोरगावकर ४९

घटक ४ सूर्य पाहिलेला माणूस ६५

सत्र–२ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास

घटक १ तुकाराम गाथा (निवडक अभंग) ९७

घटक २ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे लिखित 'प्रवासवर्णन' ११३

घटक ३ चित्रलिपी – वसंत आबाजी डहाके १३६

घटक ४ पिवळा पिवळा पाचोळा – अनिल साबळे १५३

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १
# श्रीगोविंदप्रभु चरित्र

## १.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो या घटकाच्या अभ्यासानंतर,

१. महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्रीचक्रधरांचे गुरू आणि पंचावतारांपैकी चौथे अवतार श्रीगोविंदप्रभु यांचा जीवनपट माहिती होईल.

२. यादवकालीन मराठी गद्याचे आकलन होईल.

३. 'गोविंदप्रभु चरित्रा'तील आशयसूत्रे आणि आविष्कारशैली सांगता येईल.

४. 'गोविंदप्रभु चरित्रा'तील यादवकालीन वऱ्हाडी भाषा आणि त्याची आविष्काररुपे स्पष्ट होतील.

५. 'गोविंदप्रभु चरित्रा'च्या अभ्यासाने महाराष्ट्रातील तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक जीवन समजण्यास मदत होईल.

## १.२ प्रास्ताविक

महानुभाव पंथ हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा संप्रदाय आहे. अकराव्या शतकात सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी स्थापन केलेला हा पंथ संपूर्ण महाराष्ट्रात पुढे प्रसारित झाला. श्रीचक्रधरांची शिकवण ही सर्वसमावेशक अशी होती. त्यांच्या शिष्य परिवारात सर्व स्तरातील, वर्णातील लोकांबरोबरच स्त्रियांनाही स्थान होते. म्हाइंभट, भटोबासांसारख्या विद्वान ब्राह्मणांबरोबरच कोथळोबा, साधाईसा सारखे सामान्य भक्तही होते. बाइसा, महदाइसासारख्या जिज्ञासू स्त्रियांही होत्या. महानुभाव पंथातील विद्वानांनी विपुल वाङ्मयनिर्मिती करून मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. पंचावतारांचे चरित्र, सातीग्रंथ याबरोबरच सूत्रपाठ, दृष्टांतपाठ यासारख्या अनेक ग्रंथांनी मध्ययुगीन मराठी भाषेचे गद्य दालन समृद्ध केले आहे. म्हाइंभट या विद्वान शिष्याने सुरुवातीला श्रीचक्रधरांचा जीवनपट उलगडणारे 'लीळाचरित्र' आणि त्यानंतर 'गोविंदप्रभु चरित्र' लिहिले. हा ग्रंथ यादवकालीन भाषा, समाज आणि संस्कृती या चोहोअंगाने अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत घटकात आपण 'गोविंदप्रभु चरित्रा' चा सखोल अभ्यास करणार आहोत.

## १.३ विषय विवेचन

### १.३.१ म्हाइंभटांचा जीवनपट

'गोविंदप्रभु चरित्रा'चे निर्माते म्हाइंभट यांचा जन्म सराळे या गावी झाला. महाराष्ट्रात पाच शास्त्राचा अभ्यास पूर्ण करून ते 'प्रभाकर' नावाचे सहावे शास्त्र शिकण्यासाठी तेलंगणात गेले. तिथे अतिशय खडतर परीक्षा देऊन ते त्यात पारंगत झाले. महाराष्ट्रात परत आल्यानंतर त्यांना आपल्या विद्वत्तेचा प्रचंड गर्व झाला.

आपल्या इतका विद्वान कोणी नाही असा अहंभाव त्याच्या ठाई निर्माण होऊन तो आपल्या हाती मशाल घेऊन चाले आणि पायात गवताची वाकी बांधे. 'आकाशातला तो एक सूर्य आणि भूतलावरचा मी एक ज्ञान सूर्य' आणि 'बाकीचे विद्वान माझ्यासमोर पायातील गवताच्या वाकीप्रमाणे' अशा गर्वाने तो वागू लागला. त्याचे गुरू आणि सासरे गणपत आपयो यांनी त्याचा गर्व पाहून त्याला गोदावरी काठावर असलेल्या श्रीचक्रधरांची भेट घेण्याचा सल्ला दिला. तेव्हा त्याने गणपत आपयोला 'ते संस्कृत जाणतिः?' असा संस्कृत भाषेच्या अहंगंडाचा प्रश्न विचारला. गणपत आपयोने 'ते नेणेः पण मराठी तव अनावर बोलतीः' असा अभिप्राय दिला. गुरूच्या सुचनेप्रमाणे त्याने डोमेग्राम या ठिकाणी श्रीचक्रधरांची भेट घेतली. चर्चेसंदर्भाने मनात खूप तयारी करूनही श्रीचक्रधरांपुढे तो निरुत्तर झाला. स्वामींनी संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषेतून केलेल्या निरुपणाने त्याचा अहंकार गळून पडला. म्हाइंभटाला बोध होऊन तो स्वामींच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षित झाला. तो स्वगृही परतला तरी त्याचे संपूर्ण अवधान स्वामींकडे वेधले गेले. साधारण वर्षभरानंतर त्याने रिद्धपुर याठिकाणी श्रीगोविंदप्रभुंकडून अनुसरण स्वीकारले. सुरुवातीच्या काळात ते तिथेच श्रीगोविंदप्रभुंच्या सान्निध्यात राहू लागले.

त्यांची श्रीगोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर या दोहोंवरही प्रचंड निष्ठा होती. ते घरंदाज श्रीमंत असल्याकारणाने त्यांच्याकडची संपत्ती आणि द्रव्य त्यांनी श्रीगोविंदप्रभुंच्या आणि मार्गाच्या सेवेकरिता अर्पण केले होते. त्यांच्या ठिकाणी श्रीप्रभुंविषयी निष्ठा निर्माण झाली. ते सतत त्यांच्या सेवेत मग्न असायचे. त्यांचा तो भाव पाहूनच भटोबास 'म्हाइंभटातें श्रीप्रभूदास्यावेगळें जो दाखवीः तयासि मी वाखानीन' अशी होड (पैज) लावली होती. आउसेने म्हाइंभटाविषयी 'तुम्ही माझेया चक्रस्वामींचा धुराः' असे गौरवोद्गार काढले होते.

म्हाइंभट हे विद्वान आणि संस्कृत पंडित असल्याकारणाने इतर विद्वानांसोबत चर्चेसाठी नेहमी तत्पर आणि उत्सुक असत. या विद्वत्तेमुळेच त्यांच्या ठिकाणी शीघ्रकवित्वही होते. त्यांनी 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभु चरित्र' या मुख्य ग्रंथाबरोबरच 'जतीचा दशकू' या काही आरत्या लिहिल्या. स्मृतिस्थळातल्या 'म्हाइंभटी रुख्मिणी स्वयंवर करणेः' या उल्लेखावरून म्हाइंभटाने धवळ्याचा उत्तरार्धही केल्याचे मानले जाते.

असे असले तरी त्यांचे लेखन कौशल्य आपल्याला त्यांच्या उपरोक्त गद्य लेखनावरूनच कळते हे खरे. म्हाइंभट हे आपल्याला खरेतर चरित्रकार म्हणूनच पसंतीस उतरतात. ते जसे आद्य मराठी गद्यकार आहेत तसेच ते आद्य चरित्रकारही आहेत. त्यांनी श्रीचक्रधर आणि श्रीगोविंदप्रभु यांचे चरित्र लिहिताना लीळा गोळा करण्यासाठी घेतलेले कष्ट आणि त्या लीळांची शहानिशा करताना स्वीकारलेली संशोधकवृत्ती आजही आदर्शवत अशी आहे.

उपरोक्त दोन चरित्रग्रंथांच्या माध्यमातून म्हाइंभटांनी श्रीचक्रधर स्वामी आणि श्रीगोविंदप्रभु या दोन महापुरूषांच्या अमर अशा वाङ्मयीन मूर्तीच निर्माण केल्या आहेत असे म्हणावे लागेल.

### १.३.२ ग्रंथाचे नाव

वस्तुतः प्रस्तुत ग्रंथ महानुभाव पंथात 'ऋद्धिपुर लीळा' अथवा 'ऋद्धिपुर चरित्र' या नावाने प्रसिद्ध आहे. ज्याठिकाणी चरित्रनायक राहिले त्यावरून त्या ग्रंथाला नाव द्यायचे अशी महानुभाव पंथीय लेखकांमध्ये पद्धत

आहे. जसे की श्रीचक्रपाणींच्या चरित्राला 'द्वारावतीचिया लीळा' आणि श्रीकृष्ण चरित्राला 'द्वापारीच्या लीळा' संबोधले जाते. आधुनिक काळातही आचार्य महंतांचा उल्लेख करताना त्यांच्या नावाचा थेट उल्लेख न करता त्या महंताच्या रहिवासाच्या ठिकाणाचा उल्लेख करत 'आदरणिय, श्रद्धेय पैठणचे बाबा... किंवा अमरावतीचे बाबा..' असा उल्लेख केला जातो. तद्वतच श्रीगोविंदप्रभु चरित्राला म्हाइंभटाने 'ऋद्धिपुर चरित्र' असे म्हटले असावे.

परंतु वि. भि. कोलते यांनी ग्रंथातील विषयाला अनुलक्षून 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' हे नाव इष्ट समजून तेच निश्चित केले आणि पुढे तेच रुढ झाल्याचे दिसते.

### १.३.३ श्रीगोविंदप्रभु चरित्र : लेखक, लेखनकाल आणि रचना

'श्रीगोविंदप्रभु चरित्रा' च्या लेखकाविषयी खुद्द महानुभाव ग्रंथात दोन उल्लेख आढळतात. महानुभावांच्या 'इतिहास प्रकरणा' वरून ते म्हाइंभटाचे तर वृद्धाचारातील चार अन्वयस्थळावरून ते केशोबासाचे वाटते. परंतु डॉ. वि. भि. कोलते यांनी संशोधनाअंती म्हाइंभट हेच 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चे निर्माते आहेत हे सिद्ध केले आहे.

'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'ची रचना ही साधारणतः श्री गोविंदप्रभुंच्या निधनानंतर सहा महिन्यांनी झाली असावी, असे 'स्मृतिस्थळा'तील नोंदीवरून वाटते. म्हणजेच शके १२१० पर्यंत किंवा तत्पूर्वी प्रस्तुत चरित्रग्रंथाचा पाठ तयार झाला असावा.

प्रस्तुत ग्रंथात श्रीगोविंदप्रभुंचे चरित्र आले असले तरी ते परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. श्रीगोविंदप्रभुंविषयींच्या अनेक आख्यायिका आणि स्मृतिस्थळातील काही प्रसंग यात आलेच नाहीत. 'लीळाचरित्रा'त अंतर्भूत झालेल्या त्यांच्याविषयीच्या आठवणी विशेषतः हरिपाळदेव आणि गोविंदप्रभुंची पहिली भेट आणि अवतार स्वीकार लीळा यात आली नाही. कदाचित दोन्ही ग्रंथाचा लेखक एकच आणि काळही जवळपास सारखा असल्याकारणाने म्हाइंभटाने पुनरुक्ती टाळली असावी. श्रीचक्रधरांच्या पश्चात त्यांचा सर्व मार्ग स्वामींच्या सूचनेप्रमाणे गोविंदप्रभुजवळ येऊन राहिला. मुख्यतः तेव्हापासूनच्या त्यांच्या लीळा यात आल्या आहेत. लीळाचरित्राप्रमाणे यात कोणतेही भाग केलेले नाहीत.

सर्वज्ञ श्रीचक्रधर असो की श्रीगोविंदप्रभु हे महानुभावांसाठी 'ईश्वर अवतार'. त्यामुळे त्यांच्याविषयीची पुज्य बुद्धी ठेऊनच म्हाइंभटाने या ग्रंथांची रचना केली असणार हे उघड आहे. श्रीगोविंदप्रभुंच्या संबंधीत अनेक आख्यायिका त्याही गुणवर्णन करणाऱ्या यात आल्या आहेत. इतरांच्या गाठीभेटी, दैनंदिन चमत्कार, हास्यविनोद, श्रीप्रभुंची भटकंती, भक्तांबरोबरचा वार्तालाप, वेगवेगळ्या ठिकाणची स्थलवर्णने यात आली आहेत. हा ग्रंथ म्हणजे एकप्रकारची श्रीगोविंदप्रभुंची दैनंदिनीच होय. चरित्रनायकाचा गौरव करणे हा उद्देश असल्याकारणाने या ग्रथांतून आजच्या चरित्रग्रंथाच्या नायकासारखे दोषदर्शन यात आलेले नाहीत हे वाचकांनी लक्षात घेतले पाहिजे.

डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादित केलेल्या 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'त एकूण ३२३ लीळा आहेत.

### १.३.४ 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चा आशय

'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'त महानुभाव पंथाचे चौथे अवतार श्रीगोविंदप्रभु यांचे जीवनचरित्र वर्णिले आहे. डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात एकुण ३२३ लीळा आहेत. लीळाचरित्राप्रमाणे याची पूर्वार्ध – उत्तरार्ध अशी रचना नाही. परंतु माधवराज पंजाबी यांनी संपादित केलेल्या 'सातैरुप चरित्राचा भाग २ रा श्री गोविंद प्रभु चरीत्र' यात मात्र पूर्वार्ध – उत्तरार्ध अशी विभागणी केली असून तिथे लीळा संख्याही अधिकची म्हणजे पूर्वार्धात १८१ आणि उत्तरार्धात १९४ एवढी आहे. श्रीगोविंदप्रभुंच्या जन्मापासून ते त्यांच्या प्रयाणापर्यंतचे जीवनचरित्र यात आले आहे.

श्रीगोविंदप्रभुंचा जन्म रिद्धपुर प्रांतातील काटसरे (ता. मोर्शी जि.अमरावती) या गावी काण्व शाखेच्या ब्राह्मण कटुंबात अनंतनायक आणि माता नेमाइसा यांच्या पोटी झाला. माता नेमाइसा यांच्या पोटी जन्मलेली काही लेकरें जन्मतःच वारल्यामुळे नेमाइसेने पुढे जन्मलेल्या बाळाचे नाव 'गुंडो' असे ठेविले. पण वर्षभरातच त्यांचे मातापिता वारले. तेव्हा त्याचा सांभाळ मामा–मावश्यांनी केला. सातव्या वर्षी मौजीबंधन झाल्यानंतर मामांनी छोट्या गुंडोला वेद अध्ययनासाठी रिद्धपुरला आणून बोपोद उपाध्य यांच्याकडे ठेवले. गुंडोंची बुद्धिमत्ता अचाट होती. इतर विद्यार्थ्यांना जो अभ्यास करण्यासाठी एक महिना लागायचा तो अभ्यास गुंडो एक दिवसात आणि एक वर्ष लागणारा अभ्यास तो एक महिन्यात पूर्ण करू लागला. गुंडोची बुद्धिमत्ता पाहून उपाध्ये 'गुंडो सामान्य नव्हेः हा इस्वर अवतारू होईलः' असे म्हणायचे.

आपल्या चरित्रनायकाचे मूळ नाव हे 'गुंडो' असे होते. त्याचेच पुढे 'श्री गुंडम राउळ' असे झाले. महानुभावांच्या पंचकृष्ण नामावलीत 'जैसे ऋद्धपुरी श्री गुंडम राउळ' असे म्हटले आहे. लोकांत प्रचलित असलेल्या 'राउळ मायःराउळ बापः' यावरून 'राउळ' हे उपपद प्रसिद्धच झाले होते असे दिसते. महानुभावांच्या इतर वाङ्मयात आणि महानुभाव मार्गव्यवस्थेत आजही त्यांचा उल्लेख 'श्रीप्रभु' असा करतात. मग हे गोविंद कुठून आले? गोविंद हा उल्लेख ग्रंथात कोठेही आढळत नाही. केवळ साधा ही शिष्या मात्र त्यांचा ध्यास करीत निघाल्यावर तिच्या तोंडी 'गोविंदु वोःगोविंदु वोः' असे उच्चार येतात. ती ओव्या गात असतानाही तिच्या तोंडी 'गोविंदु आइः गोविंदु बाइः गोविंदु माझी बाळवेशीः' असे नाव आलेले आहे. म्हणजेच त्यांच्या हयातीतच त्यांना 'गोविंद' असेही म्हणत असावेत असे दिसते.

श्रीगोविंदप्रभुंच्या ईश्वर अवतारत्वाची प्रचिती सोबतच्या विद्यार्थ्यांना अनेकदा आल्याची नोंद या चरित्रात आली आहे. जेव्हा सर्व मुले मिळून उपाध्यांच्या गुरांना, वासरांना वैरण म्हणून गवताच्या पेंड्या डोक्यावर ठेवून आणत होते तेव्हा गुंडोच्या डोक्यावरील पेंड्यातून प्रकाश पडत असल्याचे मुलांनी सांगितले. एकदा रात्री गुंडो मुलांच्या मध्ये झोपल्यांनतर त्याच्या डोक्यातून प्रकाश पडत असल्याचे आणि तो झोपेत कोणाला तरी बोलत असल्याचे मुलांनी सांगितले. या अनुभवावरून उपाध्याची गुंडो 'इश्वरु' असल्याची भावना दृढ झाली.

गुंडम राउळ हे दिसायला आणि वागायला वेडेपिसे होते. त्यांचा अवतार हा दवडण्याच्या प्रकारातला असल्याने श्रीगोविंदप्रभुंच्या अवताराने ज्याला दवडले होते तो जीव वेडापिसा होता. त्याचे देहधर्म स्वीकारावे

लागल्यामुळेच गोविंदप्रभुंचा अवतार वेड्यापिशाचा झाला. त्यांच्या केसाच्या जटा आणि दाढी खूप वाढलेली असे. ते कुठेही खात, कुठेही बसत. कुणाशीही बोलताना त्यांच्या तोंडी 'आवो मेली जायः जाय ना म्हणेः' असे वाक्य सदैव असायचे. कुणी काही म्हटले आणि काही विचारले तर फक्त हास्य करायचे. खेळ खेळायचे. बाजाराला विकायला निघालेल्या गवळणीचे दुध-दही खायचे. एखाद्या दिवशी ज्या गवळणीने श्रीप्रभुंना दहीदुध दिले नाही त्या दिवशी तिचे दूध विकलेच जायचे नाही. जेव्हा ती श्रीप्रभुंना दूध दाखवून न्यायची तेव्हा मात्र मग ते विकले जायचे.

रिद्धपुरात श्री गोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर (पुर्वाश्रमीचे हरिपाळदेव) यांची भेट झाली. ती त्यांची पहिली भेट. श्रीगोविंदप्रभु हातातील शेंगुळे खात बाजारतळावर फिरत होते. श्रीप्रभुंनी भेटीला आलेल्या हरिपाळदेवाकडे पाहिले आणि 'घे घे मेला चक्रा होय म्हणेः' असे म्हणत हातातील शेंगुळे फेकले. तिथेच हरिपाळदेवाने श्रीगोविंदप्रभुंकडून 'परावर शक्ती' चा आणि 'चक्रधर' या नावाचा स्वीकार केला. हरिपाळदेव पुढे श्रीचक्रधर झाले. श्रीगोविंदप्रभुंकडून ईश्वरी शक्तीचा स्विकार केल्यामुळे श्रीचक्रधर त्यांना आपले गुरू मानत. पुढच्या काळात अनेकदा श्रीचक्रधर कुठेही असले तरी रिद्धपुरला येऊन श्रीगोविंदप्रभुंची भेट घेत, दर्शन घेत. आपल्या संन्निधानातील म्हाइंभट, भटोबास, महदाइसा, साधा, आबाइसा यासह अनेकांना ते भेटीलाही पाठवत. ते भक्तजण श्रीप्रभुंच्या सेवेत काही काळ राहत आणि पुन्हा श्रीचक्रधरांकडे येत. श्रीचक्रधरांच्या प्रयाणानंतर त्यांचा सर्व मार्ग (शिष्य परिवार) गोविंदप्रभुंच्या सहवासात रिद्धपुरला येऊन राहिला होता.

गुंडम राउळ रिद्धपुरात सर्वांच्या घरी जात. ब्राह्मण, मातंग, महार, कुणबी, सामान्य स्त्रिया या सर्वांच्या घरी गेल्याच्या लीळा या ग्रंथात आहेत. रिद्धपुरातील लेकुरवाळ्या माता लेकराला गुंडोच्या हवाली करून कामाला जात आणि गुंडोही त्यांची लेकरे आनंदाने सांभाळत, काळजी घेत त्यांना निजवत. त्यामुळे त्या परिसरातील सर्व स्त्रिया त्यांना 'राउळ माय, राउळ बाप' असे म्हणत. रिद्धपुरातील काही मातंगांनी श्रीप्रभुंना पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याचे सांगितले. तेव्हा एका जागेचा निर्देश करीत श्रीप्रभुंनी त्यांना विहीर खोदण्याचा सल्ला दिला. त्या विहिरीला मुबलक पाणी लागले. अशापद्धतीने त्यांची पाणी टंचाई दूर झाली. श्रीप्रभुंच्या अशा लोकोपयोगी कामांमुळे त्या परिसरातील सर्व लहानथोर, स्त्रिया-पुरूष 'राउळ माय, राउळ बाप' असे म्हणत असत.

त्यांना एकदा विवाहाची प्रवृत्ती झाली. ती लीळा 'विव्हावो स्विकारो' या नावाने आली आहे. बाशिंग घेऊन जाणाऱ्या तेलिणीला पाहून महदाइसेने गोविंदप्रभुंसाठी तिच्याकडे बाशिंगाची मागणी केली. डोक्याला बाशिंग बांधून श्रीप्रभुंना नवरदेव म्हणून तयार केले. सान्निध्यात असलेल्या महदाइसेने लग्नाची सर्व तयारी केली. कांकण बांधले, हळद लावली, वाजंत्री वाजली. लग्नाचा तो थाट पाहून ईश्वरनायक त्याची मुलगी द्यायला तयार झाला. पण ते ऐकून गोसावी कोपले. नंतर श्रीप्रभुंची ती प्रवृत्ती भंगली.

साधारणपणे शके ११०८-०९ हा श्रीगोविंदप्रभुंचा निधनशक सांगितला जातो. शेवटच्या काळात श्रीप्रभुंना बाहीरितीचा (हगवणीचा) त्रास सुरू झाला. ते सारखं काही ना काही खात रहायचे. त्यातूनच त्यांना

हा त्रास सुरू झाला. हा त्रास तेरा दिवस होता. सेवेत आबाइसा होती. सर्वांनी विनंती केली की हे दुःख तुम्ही निराकारा म्हणून पण श्रीप्रभुंनी स्पष्ट सांगितले की, 'हे आता ऐथौनि जाईजैलः' त्यातच त्यांचे निधन झाले.

## १.३.५ 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा' तील श्रीगोविंदप्रभुंचे व्यक्तिमत्व

श्रीगोविंदप्रभुंचा अवतार हा वेडापिसा होता हे आपण पाहिले आहेच. त्यांचे बाह्य व्यक्तिमत्त्वही तसेच होते. त्याचे सविस्तर वर्णन 'विचार बंद' या ग्रंथात आले आहे. दाढी बेंबीपर्यंत वाढलेली, केसाच्या जटाची वेणी घातलेली. सोळा हात वस्त्र नेसणे आणि तेच पांघरणे. कुठेही स्थिर रहायचे नाही. बसले की लगेच उठणार. दुडूदुडू धावणार. आभाळाकडे पाहत चालणार. हातात शेंगुळे, बुडुडे घेणार. कुणालाही बोलताना 'आवो मेली जायः' असा शिवीवजा शब्दप्रयोग करणार आणि एकच शब्द पुन्हा पुन्हा म्हणणार. अशी त्यांची सवय होती. एखादी गोष्ट मनासारखी झाली की मग त्याला लगेच 'एया माझाः आता होय म्हणेः' असा आनंदोद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडणार.

इतरांच्या पाठीवर थापटा मारण्याची श्रीप्रभुंना सवय होती. इतरांना वाकुल्या दाखवणे, हातवारे करणे, गरगरा हात फिरवणे ह्याही सवयी त्यांना होत्या. श्रीचक्रधर आणि श्रीप्रभु या दोहोंनाही आपल्या सहवासातील भक्तांना टोपणनावे ठेवण्याची सवय होती.

त्यांची खाण्यापिण्याची सवयही अघळपघळ अशी होती. गूळ खाण्याचे वर्णन चरित्रात आले आहे. हाताच्या कोपरापर्यंत ओघळ येईपर्यंत आणि दाढीला लागेपर्यंत ते गूळ खात होते. खाण्यात त्यांच्या असा अव्यवस्थितपणा आसल्याकारणानेच त्यांना वृद्धापकाळात हगवणीचा (बाहीरितीचा उपद्रो) त्रास सुरू झाला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. एकंदरीतच त्यांचे खाणेपिणे, चालणे, बसणे उठणे, बोलणे हे सर्व वेड्यापिशाला शोभण्यासारखेच होते एवढे खरे.

बाह्यव्यक्तिमत्त्वातल्या अशा वेड्यापिशा गुणांखेरीज त्यांच्या ठिकाणी असलेली मानवता, दयाबुद्धी, समानता या गोष्टी आपल्याला भावण्यासारख्या आहेत. त्यांच्या अंगी कडक वैराग्य होते. त्यामुळे लग्नाची प्रवृत्ती स्वीकारत त्यांनी लग्नाचा खेळ केला तरी इश्वरनायकाने देऊ केलेली मुलगी त्यांनी नाकारली आणि त्याला ते रागे भरले. जन्मभर ते अनासक्त वृत्तीनेच राहिले. त्यांना पैशाअडक्याचा मोह नव्हता. त्यांच्या ठायी सर्वांभूती समानबुद्धी होती. उच्च-नीच, स्त्री-पुरूष, ब्राह्मण-अंत्यज असा भेदभाव न करता सर्वांच्या घरी त्यांचा वावर असे. ब्राह्मण, कुणबी, महार, मातंग, वेश्या यांच्या घरी ते जात आणि त्यांच्यासोबत खाणपाण करीत. त्यामुळे बाकीचे ब्राह्मण त्यांच्याविषयी 'राउळ मातांगां महारांचा घरोघरी वीचरतातीः आणि तैसेचि दीक्षीतां ब्राह्मणांच्या घरी वीचरतातिः' असे म्हणत.

कोणाच्याही कामाला धावून जाण्याची त्यांची वृत्ती आपल्या दृष्टीस पडते. मातंगांना त्यांनी विहीर खोदून दिली. असहाय, अनाथ स्त्रियांचे ते जणू 'माहेर'च होते. म्हणूनच रिद्धपुरातल्या अनेक स्त्रिया त्यांना लेकरु सांभाळण्याचं काम हक्कानं सांगत. त्या सर्व त्यांना 'राउळ मायःराउळ बापः' असं म्हणत. त्यामुळेच सावळापुरची एक मानलेली लेक त्यांच्या निधनाची वार्ता कळताच धाय मोकलून रडत येते.

श्रीप्रभुंच्या ठिकाणी कलेची जाणही होती. एका देऊळी बसल्यानंतर तिथे सुरू असलेल्या नाचणारीच्या नृत्यातील चूक श्रीप्रभु काढतात. 'आवो मेली जाएः चुकली म्हणेः' असे म्हणतात. त्यामुळे ती आज माझ्या कलेचा जाणकार भेटला 'माझेया दैव-भाग्यासि उदो आलाः' असे उद्गार काढते.

त्यांच्या ठायी विनोदबुद्धीही होती. त्यामुळे आपल्या शिष्यपरिवारातील भक्तांना टोपणनाव ठेवण्याची त्यांना सवय होती. कुणाचा होत मोडला असेल तर त्याला 'खोड' म्हणावे, ढेरपोट्या असेल कुणी तर त्याला 'कोथळा' म्हणावे. आपल्या मठात एखाद्याची फारच सोय होत असेल तर त्याला 'जावई' म्हणावे असे प्रकार ते करीत. (ही प्रवृत्ती श्रीचक्रधरांच्या ठायीही होती.)

### १.३.६ 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'तून आलेली सामाजिक परिस्थिती

श्रीगोविंदप्रभु चरित्रांत तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे सुंदर प्रतिबिंब पडलेले आढळते. वऱ्हाडात साजरे होणारे सण-उत्सव, आहारातील पदार्थ, लग्नविधी, लोकांमधील संबंध या सर्व बाबी विस्तृतपणे आल्या आहेत. शिमगा, श्रावणी, पोळा, भावे सण व दमनकपर्व (दवणापर्व) इत्यादी सणांची वर्णने यात आली आहेत. त्याकाळच्या अंत्यविधीचे स्वरूप काही लीळांमधून स्पष्ट होते. श्रावण महिन्यात झाडाला येणारे आंबे झाडांवरच वस्त्रांनी गुंडाळून ठेवीत. ती पद्धत आता पुन्हा नव्याने आली आहे.

काही आजार आणि त्यावरचे उपचार मनोरंजक आहेत. श्रीप्रभुंना मुतखडा झाल्यावर त्यांना सात वेळा उंबरा ओलांडायला सांगितले गेले आणि शेवटी वाजेश्वराला नवस करून खीर पुरीचा नैवेद्य केला गेला.

अकराव्या शतकापर्यंत महारांची घरे वेशीच्या आतच असत असे 'माहाजनीं नीर्बंधु करणे' या लीळेवरून दिसते. मग ते गावकुसाबाहेर कधीपासून गेले असतील? श्रीप्रभुंच्या सर्व घरी विहरणाने तंग होऊन महारांची घरे गावाबाहेर घालण्याची सूचना महाजन करतात. मातंगांना वेगळा पाणवठा किंवा विहिरी होत्या असे दिसते. त्या बऱ्याचदा कोरड्या पडत असल्याकारणाने मातंगांनी श्रीप्रभुंकडे 'पाणीयेंवीण मरते असोः' असे दुःख मांडले होते आणि त्यांनी ते निराकारले होते.

अळजपुर, रितपुर यासारख्या मोठमोठ्या गावी वेश्या असायच्या याच्या नोंदी काही लीळांमधून आलेल्या आहेत. त्या परिसरात रामटेकची रामयात्रा मोठी असायची असे दिसते.

### १.३.७ 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चे भौगोलिक महत्त्व

'श्रीगोविंदप्रभु चरित्र' हे मराठी भाषकांसाठी आणि अभ्यासकांसाठी अनेक अर्थांने महत्त्वपूर्ण आहे. ते ऐतिहासिक, भाषिक, भौगोलिक या सर्व पातळीवरून अभ्यासनीय आहे.

'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चे भौगोलिक महत्त्वही अबाधित आहे. अमरावती जिल्ह्यातील अनेक छोट्यामोठ्या गावांची नावे यात आलेली आहेत. आजच्या ऋद्धिपुरची जुनी किती आणि कोणकोणती नावे होती याचाही धांडोळा आपल्याला या ग्रंथाच्या माध्यमातून घेता येईल. औरंगजेबाच्या आक्रमणाने खुद्द चरित्रनायक श्रीगोविंदप्रभुंच्या मालकीच्या राजमठाचे मशिदीत कसे रुपांतर झाले याचा अंदाज आपल्याला येईल. विदर्भातील जुन्या बाजारहाट, पेठ यांचे वर्णन यातून वाचता येईल. विदर्भातील राजघराणे, त्यांची

आडनावे, राजधान्या या ऐतिहासिक गोष्टींचा संदर्भही आपल्याला मिळतो. एकंदरीतच 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'च्या अभ्यासाने आपल्याला विदर्भाच्या प्राचीन वैभवाची कल्पना आपल्याला येईल.

### १.३.८ 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चे भाषिक महत्त्व

महानुभाव ग्रंथदालनातील सर्वच ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत. मराठीच्या अगदी सुरूवातीच्या काळातील आणि यादवकालीन भाषेचा उत्तम नमुना असणारे हे ग्रंथ आहेत. लीळाचरित्रासारखा आद्यगद्य ग्रंथ यादवकालीन मराठीचे रुपडे आपल्यापुढे घेऊन येतो. परंतु 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'चे भाषिक वेगळेपण ते काही औरच आहे. 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'ची भाषा ही वऱ्हाडी आहे. लीळाचरित्रातील भाषेपेक्षा 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'ची भाषा अस्सल म्हटली पाहिजे. कारण सर्वज्ञ श्रीचक्रधर हे मुळचे गुजराती होते आणि त्यांचे परिभ्रमणही महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र या प्रांताबरोबरच तेलंगणा, कन्नडला ते जाऊन आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या भाषेवर नाही म्हटले तरी या प्रदेशातील भाषांचा प्रभाव पडणे साहजिक आहे. याउलट श्रीगोविंदप्रभु अमरावती जिल्ह्यातील रिद्धपुर आणि परिसराच्या बाहेर फारसे कुठे गेल्याचे आढळत नाही. त्यामुळे त्यांच्या भाषेवर दुसऱ्या भाषेचा प्रभाव पडणे शक्य नाही. त्यामुळे 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'त आलेली यादवकालीन वऱ्हाडी भाषा ही अस्सल आहे असे म्हणता येईल.

या ग्रंथात वऱ्हाडातील घरगुती प्रादेशिक शब्द विपुल प्रमाणात आले आहेत. कारण श्रीप्रभुंचा वावर हा रिद्धपुरातील अनेकांच्या घरात राहिलेला आहे. त्यामुळे तात्विक निरुपणातले बोजड शब्द यात येत नाहीत. स्वयंपाकघरातील अनेक खाद्यपदार्थ, धान्य, भाज्या, सण, उत्सव यात येतात.

यात आलेल्या काही शिव्या ह्या ग्रंथाचे वेगळे वैशिष्ट्येच म्हटले पाहिजे. काही सुंदर वाक्प्रचार, म्हणीही यात अंगभूतपणे आल्या आहेत. वि. भि. कोलत्यांनी वाक्प्रचाराचा उल्लेख करताना 'पान लागणे - सर्पदंश होणे' हा जो वाक्प्रचार दिला आहे तो देताना त्यांनी 'हे वाक्प्रचार मुळापासून वऱ्हाडी असावेत.' असे म्हटले आहेत. पण उपरोक्त वाक्प्रचार मराठवाड्यातील काही भागात आजही वापरला जातो हे आपणास दिसते.

## १.४ वाचनासाठी काही लीळा

### लीळा क्र. १ रीधपुर प्रांती अवतारू स्वीकारुः ।।

रीधपुर प्रांती दौढा गाउवा कांटसरेः एकी वासनाः माउरेः काणवां ब्राह्मणांचा घरी गर्भी अवतार स्विकरीलाः अनंतनायकु पीताः नेमाइसें माताः  गोसावियांचीये मातेसि बहुतें लेंकरुवें जालीः तीये जीतीचि नाः तेणें दुखें थोर आरंबळलीः मग गोसावी नीपटनेयांचे जालेः गुंडो ऐसें नांव ठेविलेः वरीखा दीसा माता-पीता अपरोक्ष जालीः मग मामेनि माउसीयां वाढविलेः साता वरिखां मुंजिबंधन जालेः सीका-सुत्र कासोटी दीधलीः पळसुलाः ऐसे च्याऱ्ही दीस जालेः चौथां दीसीं उपाधी म्हणीतलेः 'गुंडो! वों भवति भीक्षां देही यणे शब्दें भीक्षा मागः' म्हणति 'भीक्षां देही' ऐसे म्हणतिः परि वोंकारु न म्हणतिः ऐसें मुंजीव्रत जालेः मग रीधपुरासि घेउनि आलीः।।

**लीळा क्र. २ मातांग पव्हेचे उदकपानः ।।**

गोसांवी मातांग-पव्हेसि बीजें केलेः तेथ एक आंडोर बैसले होतेः तेथ सींगटें दोंनि ठेविलीं होतीः ते एक सींगट गोसावी श्रीकरीं घेतलेः आणि आंडोरापाठी लागलेः तें पळालेः करा श्रीकरी घेतलाः मग उदकपान केलेः रांजणीचे अवघे पांणीं सांडीलेः रांजणाचीए बुढी उरलें पांणी तया आंतु गोसावी श्रीकर श्रीमुख प्रक्षाळीलेः श्रीचरण प्रक्षाळीलेः रांजणा आंतुचिः गोसांवी बीजें केलेः ।।

**लीळा क्र. ३ मातांग वीनवणीं स्वीकारूः ।।**

एकु दी मातांगी वीनवीलेः 'राउळो ! आंम्ही पाणियेवींन मरते असोः तरि काइ करूं जी?' राउळासि अनुकंपा उपजलीः मग गोसांवी म्हणीतलें 'मेला जाए नां म्हणेः' म्हणौनि तेथ बीजे केलेः 'आवो ! येथ खाणावे म्हणेः आवो येथ खाणावेंचि म्हणेः' म्हणौनि श्रीचरणीचेनि आंगठेनि दाखविलेः तेथ तीहीं खाणितलेः तवं अमर्याद पांणी लागलेः मग म्हणेति 'राउळ मायः राउळ बापुः राउळाचेनि प्रसादें आम्हीं पाणीं पीत असोः'।।

**लीळा क्र. ४ पेखणें अवलोकीतां नाचणीं चुकी सागणेः ।।**

गोसांवियासि नरसींहाचा चौकी आसन जालेः पेखणे होत असेः नाचणीं नाचतां ताल चुकलीः ते कव्हणीचि नेणेः ते गोसांवी जाणतीलेः मग म्हणीतलेः 'आवों मेली जाएः चुकली म्हणेः एथ चुकलीः' ते म्हणे 'जी जी ! चुकलींये जी ! माझीए कळे प्रमाण कव्हणीचि नेणे जी ! ते गोसांवी जाणीतलें जी ! माझेया दैव-भाग्यासि उदो आलाः जें गोसांवी माझीय कळेसि रुप केलेः' मग गेलीः ।।

## १.५. समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' या महानुभाव गद्य ग्रंथाचे स्वरूप आणि त्याचे वाङ्मयीन महत्त्व याचा सविस्तर परामर्श घेतला. महानुभाव पंथाचे चौथे अवतार श्रीगोविंदप्रभु हे वेडेपिसे अवतार असले तरी त्यांच्या ठायी असलेली वंचित आणि पीडितांविषयीची अनुकंपा सर्वसामान्यांना भावण्यासारखी आहे. त्यांच्या या वृत्तीमुळेच त्यांचा रिद्धपुर परिसरात झालेला 'राउळ मायः राउळ बापुः' हा लौकिक या ग्रंथातून पदोपदी जाणवतो. म्हाइंभटाने श्रीप्रभुंचे उभे केलेले हे चरित्र आजही वाचकांना आदर्शवत वाटते हे विशेष आहे. या ग्रंथाच्या निमित्ताने यादवकालीन मराठीचे वैदर्भिय रुप यथार्थपणे वाचकांपुढे आले आहे. वऱ्हाडी भाषेचा आणि वऱ्हाडी संस्कृतीचा अस्सल नमुना म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय.

## १.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' या ग्रंथाचे कर्ते कोण आहेत?

अ) नागदेवाचार्य ब) म्हाइंभट क) महदाइसा ड) केसोबास

२) श्रीगोविंदप्रभुंचा रहिवास कोणत्या ठिकाणी होता ?

अ) पैठण ब) मेहकर क) रिद्धपुर ड) फलटण

३) श्रीगोविंदप्रभुंचे मूळ नाव काय होते ?

अ) गुंडो ब) वामन क) गोविंद ड) हरिपाळ

४) 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' या ग्रंथातून कोणत्या बोलीभाषेचे दर्शन होते ?

अ) मराठवाडी ब) अहिराणी क) आदिवासी ड) वऱ्हाडी

५) श्रीगोविंदप्रभुंच्या आईचे नाव काय होते ?

अ) नेमाइसा ब) माल्हण क) अनुसया ड) देवकी

**उत्तरे:** १) म्हाइंभट २) रिद्धपुर ३) गुंडो ४) वऱ्हाडी ५) नेमाइसा

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१) 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' या ग्रंथाचे वाङ्मयीन महत्त्व स्पष्ट करा.

२) म्हाइंभटाचे ग्रंथकर्तृत्व अधोरेखित करा.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) 'श्रीगोविंदप्रभु चरित्र' या ग्रंथाचे सामाजिक आणि भाषिक महत्त्व स्पष्ट करा.

२) 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा' च्या आधारे श्रीगोविंदप्रभुंच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष सांगा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१) वि. भि. कोलते – श्रीगोविंदप्रभु चरित्र

२) माधवराज पंजाबी – श्रीगोविंदप्रभु चरित्र

३) शं. गो. तुळपुळे – महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय

४) मुरलीधर कोळपकर – महानुभावांचा इतिहास

५) हंसराज जाधव – महानुभावांची आख्यानकाव्ये

## १.८ उपक्रम

रिद्धपुर (ता. मोर्शी, जि. अमरावती) येथील श्रीगोविंदप्रभु चरणांकित स्थानांस भेट देऊन त्याविषयीची माहिती गोळा करावी.

❑❑❑

घटक २

# मराठेशाहीतील पत्ररूप गद्य

(इ.स. १६५० ते १७५०)

## २.० उद्दिष्ट्ये

- मराठेशाहीतील पत्ररूप गद्याचे स्वरूप समजून घेणे.
- मराठेशाहीतील पत्ररूप गद्यलेखनाच्या प्रेरणा समजून घेणे.
- मराठेशाहीतील पत्रलेखनाची पद्धती समजून घेणे.
- ऐतिहासिक पत्रसंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास करणे.
- मराठेशाहीतील पत्ररूप गद्याची भाषा समजून घेणे.

## २.१ प्रास्ताविक

मराठी गद्याची परंपरा फार समृद्ध आहे. गोष्ट, लोककथा, बोधकथा, नीतिकथा, शृंखलाकथा, प्राणिकथा, चूर्णीकथा, आख्यायिका, आख्यान, वग इत्यादी मौखिक परंपरेपासून ते शिलालेख, ताम्रपट, टीकाभाष्य, चरित्रगद्य, बखरगद्य, पत्ररूप गद्य, निबंध, ललितगद्य, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, रोजनिशी इत्यादी प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक वाङ्मयप्रकारांमधील वेगवेगळे रूपबंध स्वीकारत ही परंपरा अधिक बळकट होत आली आहे. खरं तर लेखनाचे गद्यरूप विचारभाषेला अनुरूप असते. 'बौद्धिक संगती साधण्याच्या उद्देशाने शब्द, वाक्यखंड, वाक्य आणि वाक्यमालिका यांचा विस्तार करणारी भाषा म्हणजेच गद्य होय.' अशी गद्याची व्याख्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केली आहे. त्यांच्या मते, ''गद्य हे विद्यांचे आकलन करून देण्याचे मुख्य साधन होय. पद्यापेक्षा गद्याचे कार्यक्षेत्र हे विविध व विस्तृत असते. मननपरतेशी आणि मानवी सफल कृतींशी गद्य अत्यंत निगडित असते.'' ब्रिटिश कालखंडात लोकभाषेला विचारभाषेचे विकसित स्वरूप प्राप्त झाले असले, तरी मराठीत गद्यलेखनाची परंपरा अकराव्या शतकाच्या पूर्वार्धापासून विकसित होत आली आहे.

यादवकालीन महानुभावीय गद्य, शिवकालीन व पेशवेकालीन बखर व पत्ररूप गद्य आणि इंग्रज राजवटीतील मराठी गद्याचा इंग्रजी अवतार अशा काळाच्या विविध टप्प्यांतून आणि त्या त्या काळातील विविध राजवटींमधून मराठी गद्याचा हा प्रवाह विकसित होत आला आहे. मराठी गद्यलेखनाचा प्रारंभ शिलालेख, ताम्रपट यासारख्या कोरीव लेखांपासून झाला आहे. गद्यलेखनाच्या प्रारंभकाळातील या कोरीव लेखांमध्ये धार्मिक भावनेने दिलेली दानपत्रे, पंडितांच्या योगक्षेमासाठी दिलेले ताम्रपट, विजयाचे स्मारक स्तंभ किंवा धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या स्मृतीशिला यांचा समावेश होतो. दगड आणि तांब्यावरील हे लेख समग्र समाजजीवनाचे दर्शन घडवू शकत नसले तरी त्यामधून सांस्कृतिक चिन्हे आणि तत्कालीन भाषेचे विश्वसनीय

स्वरूप यांचा बोध करून घेण्यास उपयुक्त ठरणारे आहेत. शके ९६१ च्या सुमारास श्रीपतीभट्टाने ‘ज्योतिषरत्नमाला’ हा मराठीतील पहिला टीकात्मक गद्यग्रंथ लिहिला. दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणारे शास्त्र लोकांना त्यांच्या भाषेत समजून घेता यावे ही सुरुवातीच्या मराठी टीकात्मक गद्यलेखनामागील एक महत्त्वाची प्रेरणा होती. हा टीकाग्रंथ प्राचीन मराठी साहित्यात विकास पावलेल्या १. टीकाभाष्यपद्धतीचे गद्यग्रंथ २. आध्यात्मपर स्वतंत्र ग्रंथ-गद्य आणि पद्य ३. कथाप्रधान साहित्य या तीन गद्यलेखनप्रवृत्तींच्या उगगमस्थानी असल्याचे श्री. रं. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. यापैकी टीकाभाष्यात्मक गद्यास ते ‘मराठी गद्याची पंडिती परंपरा’ असे संबोधतात. कोरीव लेखांपासून सुरू झालेली ही गद्यरूप लेखनप्रवाहाची गंगोत्री अनेक लहानमोठ्या प्रवाहांना सामावून घेत अनेकविध रूपांमधून आविष्कारित होत आली आहे. यापैकीच एक प्रवाह असलेल्या मराठेशाहीतील पत्ररूप गद्याचा अभ्यास प्रस्तुत ग्रंथाच्या आधारे करावयाचा आहे.

## २.२ विषय विवेचन

ऐतिहासिक पत्रांचा विचार आजवर केवळ इतिहासाची अस्सल आणि विश्वसनीय साधने म्हणूनच अधिक केला गेला आहे. त्यातील गद्याकडे वाङ्मयीन आणि भाषिक दृष्टिकोनातून फारसे पाहिलेले दिसत नाही. सुधाकर पवार यांनी इ. स. १६५० ते १७५० या एका शतकातील ‘मराठेशाहीतील पत्ररूप गद्य’ या ग्रंथाधारे ऐतिहासिक पत्ररूप गद्याचा केलेला वाङ्मयीन व भाषिक अभ्यास अत्यंत उल्लेखनीय आहे. भाषेच्या तसेच साहित्याच्या विद्यार्थ्यांना हा अभ्यास संशोधनाची वाट दाखविणारा आहे.

प्रस्तुत कालखंडातील ऐतिहासिक घटना घडामोडींचा मुख्य केंद्र छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तित्व आणि कार्यकर्तृत्व होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बुद्धी-युक्ती-सहिष्णुता आणि शक्तिसामर्थ्याने यवनी सत्ता उद्ध्वस्त करून आर्यसंस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. हा अद्वितीय पराक्रम हिंदुस्थानातील सामाजिक आणि राजकीय क्रांतीचा एक आदर्श नमुना म्हणून इतिहासात कायमस्वरूपी स्थिर झाला. त्यांच्या पश्चात जवळपास दीडशे वर्षे छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, छत्रपती शाहू व पेशवे यांनी अखंड हिंदुस्थानभर हा लौकिक इंग्रज काळापर्यंत कायम ठेवला. हा संपूर्ण काळ म्हणजे मराठेशाहीचा काळ. या काळातील इतिहासपुरुषांनी राज्यकारभार करताना केलेला पत्रव्यवहार हा इतिहासाची विश्वसनीय साधने म्हणून महत्त्वाचा असला तरी भाषिक आणि वाङ्मयीन दृष्टीनेही तो महत्त्वाचा ठरतो. ऐतिहासिक पत्ररूप गद्यातील भाषा हा घटक विचारात घेऊन अभ्यास करत गेल्यास काळाच्या विविध टप्प्यावर भाषेचा होत आलेला विकास आपल्या ध्यानात येण्यास मदत होते. कारण, सामाजिक जीवनव्यवहाराच्या विकासाबरोबरच समाजाची भाषिक वृद्धी आणि भाषिक व्यवहाराचा विकास घडून येत असतो.

ऐतिहासिक पत्ररूप गद्याच्या अभ्यासातून इतिहासाव्यतिरिक्त भाषा आणि वाङ्मयाच्या अंगाने काय हाती लागेल, हा प्रश्न अगोदर सोडविल्याशिवाय आपणास या पत्ररूप गद्याचा अभ्यास करण्याचा हेतू स्पष्टपणे ध्यानात येणार नाही. खरे तर ही सर्व पत्रे वाङ्मयीन हेतू समोर ठेवून लिहिलेली नाहीत परंतु, त्या पत्रातून तत्कालीन भाषा, वाक्यरचना, सुभाषिते, म्हणी, वाक्प्रयोग, शब्दयोजना, परभाषा संपर्क इत्यादी भाषिक घटक

समजून घेण्यास मदत होते. याबरोबरच आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विचार केल्यास तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, कौटुंबिक जीवनाचा आशय प्रामुख्याने अभिव्यक्त होतो. तसेच युद्धपूर्व घटना-घडामोडी, स्त्रीजीवन, सांप्रदायिकता, न्यायनिवाडे, महसूलव्यवस्था, पर्यावरण-निसर्ग-ऋतूमान, अन्नधान्य व पीकपद्धती इत्यादींचा उपाशयही अभिव्यक्त होतो. वाङ्मयीन अभिव्यक्तीच्या अनुषंगाने पाहता पत्र लिहिणाऱ्या माणसाचे स्वभावदर्शन, व्यक्तिदर्शन, विचारसौंदर्य, चिंतनशीलता, भावनासौंदर्य, रसाभिव्यक्ती, पत्रलेखनपद्धती आणि भाषासौंदर्य, एकूणच गद्यवैभवाला प्राप्त झालेला राजेशाही थाट यांची अभिव्यक्ती होते. ऐतिहासिक पत्ररूप गद्य हे जरी इतिहास अभ्यासाचे अस्सल साधन असले तरी ते सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक जीवनव्यवहाराचेही दस्तऐवज ठरते. त्यातून वरीलप्रमाणे भाषिक आणि वाङ्मयीन घटकांची अभिव्यक्ती होत असते. 'काव्येतिहास-संग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे-लेख' या गो. स. सरदेसाई, या. मा. काळे व वि. स. वाकस्कर या संपादक त्रयींनी संपादित केलेल्या ग्रंथाच्या उपोद्‌घातामध्ये ऐतिहासिक पत्रे प्रकाशित करण्याचा जो हेतू सांगितला आहे तो यादृष्टीने महत्त्वाचा वाटतो. ''या पत्रांचा व किरकोळ लेखांचा इतिहासाच्या कामी बारीक बारीक गोष्टींचा निर्णय करण्यांत व इतिहासाच्या खांचा खोंचा भरून काढण्यात मोठा उपयोग होईल. पत्रे लिहिण्याची पद्धती, लिहिणारांचा स्वभाव, तेव्हाची लोकस्थिति इत्यादी प्रकारच्या माहितीचेहि हे लेख द्योतक होतील.'' या हेतूचा अर्थ लक्षात घेता इतिहासातील खांचा खोंचा भरून काढण्यासाठी ही पत्रे उपयोगी ठरतीलच; परंतु, पत्रलेखनपद्धती, पत्र लिहिणाऱ्या माणसाचा स्वभाव, व्यक्तिदर्शन आणि तेव्हाची लोकस्थिती म्हणजेच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनव्यवहाराबरोबरच रूढी, प्रथा, परंपरा, लोकरीती, लोकनीती समजून घेण्यासही मदतगार ठरतात.

### २.२.१ ऐतिहासिक पत्ररूप गद्याचा शोध, प्रकाशन व संशोधन

इ. स. १८१८ साली मराठेशाहीचा अस्त झाला. अटकेपार झेंडा रोवणाऱ्या साम्राज्याचा असा आकस्मित अंत होणे शक्य नव्हते. अंतर्गत गृहकलह, बेबनाव आणि इंग्रजांनी त्याचा घेतलेला पद्धतशीर फायदा याचे संदर्भ तत्कालीन ऐतिहासिक पत्रे व बखरींमध्ये आले आहेत. इंग्रजांची सत्ता अस्तित्वात आल्यानंतर त्यांनी नवे राजकीय व शैक्षणिक धोरण अंमलात आणले. इथल्या समाजाचे परिवर्तन व्हायचे असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे, या धोरणातून त्यांनी शाळा काढल्या. पेशवाईचा नुकताच पराभव करून सत्ता स्थापन केल्यामुळे सुरुवातीला संस्कृतच्या उपशाखा असणारे वेद, पुराणे, तर्क, न्याय, अलंकार, वैद्यक इत्यादी विषयांना प्राधान्य दिले. पुढे नव्या व्यावहारिक शिक्षणाचा अवलंब करून इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्रे, व्यावहारिक नीती यांचे शिक्षण सुरू झाले. यातून इतिहास हा विषय शिक्षणात आला. परंतु, इतिहासाचे ग्रंथच आपल्याकडे नव्हते. रामायण, महाभारत, पुराणे, आख्यायिका हाच आपला इतिहास अशी भावना होती. जो काही इतिहास लिहिला होता तो परकीयांनी. तोही सत्ता टिकवायची असेल तर येथील इतिहास, भाषा, चालीरीती कंपनी सरकारला समजून देणे या भावनेतून लिहिला होता. त्यामुळे या इतिहासाला मर्यादा होत्या. त्यांनी लिहिलेल्या इतिहासात व्यावसायिक दृष्टिकोण होता. इथल्या लोकभावना

समजून घेण्याची मानसिकता होती. इथल्या लोकांशी व्यापार करायचा असेल, इथे सत्ता चालवायची असेल तर इथल्या लोकांची भाषा कळली पाहिजे. अशा भावनेतून हा इतिहास लिहिला गेला होता.

या काळातील मराठ्यांचे जीवन हे धावपळीचे, चालचढाईचे, तहाचे, सततच्या मोहिमांचे असे होते. त्यामुळे इतिहासाच्या साधनांची जोपासना होणे कठीण काम होते. बऱ्याचदा जाळपोळ, वेढा पडणे अशा वेळी शत्रूच्या हाताला काही महत्त्वाची माहिती लागू नये म्हणून नष्टही केली जायची. त्यामुळे मराठ्यांचा इतिहास लिहिणे हे आव्हानात्मक काम होते. हे आव्हान इतिहासकार ग्रँट डफने स्वीकारले. ग्रँट डफ इ. स. १८०५ साली भारतात आला. त्यावेळी त्याचे वय सोळा वर्षे होते. त्याला फारसी भाषा येत होती व इतिहासाची आवड होती. तो सरकारमध्ये दुभाषीचे काम करत होता. पुढे एलफिस्टनसाहेब पुण्याचे रेसिडेन्ट झाल्यावर डफची त्यांच्याशी ओळख झाली. विद्येचा भोक्ता असणारा डफ हा राजकारणात तरबेज होता. इ. स. १८१८ साली त्याची पॉलिटिकल एजंट म्हणून सातारा येथे नेमणूक झाली. त्याला मराठ्यांचा पहिला इतिहासकार मानले जाते. त्याने मराठ्यांच्या इतिहासाची अस्सल कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु, लोकांच्या मनात इंग्रजांविषयी असणाऱ्या भीतीमुळे त्यांना ती मिळू शकली नाहीत. त्यामुळे अपुऱ्या साधनांच्या आधारेच त्याने इतिहास लेखनाचे धाडस केले. हे त्याने कबूलही केले आहे. या अपुऱ्या साधनांच्या आधारे इतिहास लिहिताना मराठ्यांच्या इतिहासातील एकापाठोपाठ येणाऱ्या घटनांनी तो पुरता हादरून गेला होता. त्यामुळे नेमकं काय सांगायचं आहे? याविषयी तो पुरता गोंधळून गेला होता.

अशा अवस्थेतच त्याने 'History of the Mahrattas' या नावाचा ग्रंथ लिहिला. त्याचे मराठी भाषांतर १८२९ साली कॅप्टन डेव्हीड केपन यांनी केले. या भाषांतरास 'मराठ्यांची बखर' असे नाव दिले. इंग्रजांनी सुरुवात केलेल्या या शाळांमध्ये त्यावेळी महाराष्ट्राच्या इतिहासाचे साधनग्रंथ नसल्यामुळे ग्रँट डफची ही बखर इतिहासाच्या अभ्यासक्रमात संक्षिप्त रूपाने समाविष्ट करण्यात आली.

इ. स. १८६८ साली ग्रँट डफच्या इतिहासावर टीका व्हायला सुरुवात झाली. डेक्कन कॉलेजमध्ये बी. ए. च्या वर्गात शिकत असताना निळकंठ जनार्दन कीर्तने याने 'यंग मेन्स असोशिएशन' समोर 'मराठ्यांच्या बखरी'वर सडेतोड टीका करणारा निबंध वाचला. ग्रँट डफने देखील इतिहासाची साधने गोळा करताना चिटणीसांकडून बखरींची देवाण घेवाण केली होती.

मराठ्यांचा इतिहास लिहिताना मराठ्यांच्या इतिहासाची साधनेच वापरली पाहिजेत, असा वि. का. राजवाडे यांचा असणारा दृष्टिकोण कीर्तने यांच्या विचारात होता. त्यामुळे ग्रँट डफने अशा साधनांचा पुरेसा वापर केलेला नाही, असा त्यांच्या टीकेचा रोख होता. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनीही कीर्तने यांच्या या निबंधाची उत्कृष्ट निबंध म्हणून भलावण केली. ग्रँट डफला कितीही मराठ्यांच्या इतिहासाविषयी आस्था असली तरी तो परकीय असल्यामुळे आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे असा स्वाभिमानी बाणा निर्माण झाला. पुढे इ. स. १८८२ साली कीर्तने यांनीच 'विविध ज्ञानविस्तार' मधून मराठ्यांच्या इतिहासाची साधने प्रकाशित करण्याच्या हेतूने मल्हार रामराव चिटणीस यांची 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' प्रकाशित करण्यास सुरुवात केली. इ. स. १८७८ साली का. ना. साने यांनी ऐतिहासिक जुने लेख प्रसिद्ध

करण्यासाठी स्वतंत्र मासिक काढायचे ठरवले. त्यानुसार त्यांनी ज. ना. मोडक, 'निबंधमाला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या मदतीने १ जानेवारी, १८७८ रोजी 'काव्येतिहाससंग्रह' सुरू केले. हे मासिक दहा वर्षे चालले आणि १ डिसेंबर, १८८८ रोजी बंद पडले. या मासिकाचा मूळ हेतूच ऐतिहासिक साधने प्रसिद्ध करण्याचा असल्याने या दहा वर्षातील कालखंडात या मासिकातून प्राधान्याने ऐतिहासिक कागदपत्रे व बखरीच प्रसिद्ध झाल्या. 'काव्येतिहाससंग्रहा'नंतर श्री. द. ब. पारसनीस व ह. ना. आपटे यांनी इ. स. १८८६ 'भारतवर्ष' सुरू केले. या मासिकाचे वैशिष्ट्य असे की, मासिकातील चोवीस पाने ऐतिहासिक कागदपत्रे व जुन्या बखरींच्या प्रकाशनासाठी राखीव होती. त्यामुळे 'भारतवर्ष'मधून दोन-ते अडीच वर्षात जवळपास दहा ते पंधरा बखरी प्रकाशित झाल्या. इ. स. १८९४ मध्ये वि. गो. विजापूरकर यांच्या संपादकत्वाखाली श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या आश्रयाने कोल्हापूर येथे 'ग्रंथमाला' सुरू केली. या ग्रंथमालेत पुष्कळ ग्रंथ व ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झाली. पुढे 'भारतवर्ष' बंद पडले तरी पारसनीसांनी निर्णयसागर छापखान्यातून इ. स. १९०८ साली 'इतिहाससंग्रह' हे मासिक सुरू केले व ऐतिहासिक कागदपत्रे आणि बखरींच्या प्रकाशनाचा प्रवाह सुरू ठेवला. दुर्दैवाने ही सर्व नियतकालिके अल्पायुषी ठरली असली तरी इतिहासाच्या साधनांच्या प्रकाशनाचे बहुमोल कार्य त्यांनीच केले आहे. इ.स. १९०९ साली मिरज येथील इतिहास संशोधक श्री. वासुदेवशास्त्री खरे यांना मिरज मळ्यातील कागदपत्रे धुंडाळताना सापडलेली पटवर्धन घराण्याची माहिती देणारी 'हरिवंशाची बखर' प्रकाशित केली.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे २२ खंड प्रकाशित केले. इ. स. १८६९ मध्ये 'विविधज्ञानविस्तार'मधून सुरू झालेले हे कार्य इ. स. १९५० पर्यंत अव्याहतपणे सुरू राहिले. पुढे अभ्यासकांची आणि विद्यापीठांच्या अभ्यासमंडळांची याकडे नजर गेली आणि या गद्यरूप लेखनाचा भाषिक आणि वाङ्मयीन अभ्यास करण्याला हळूहळू चालना मिळत गेली. ऐतिहासिक कागदपत्रे व बखरींचा वाङ्मयीनदृष्ट्या अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांमध्ये आणि संपादकांमध्ये वि. का. राजवाडे, गो. स. सरदेसाई, द. वि. आपटे, रा. वि. ओतूरकर, शं. गो. तुळपुळे, यु. म. पठाण, भवानीशंकर श्रीधर पंडित, श्री. रं. कुलकर्णी, अ. रा. कुलकर्णी, प्र. न. जोशी, रा. रा. वामन दाजी ओक, अ. म. सोवनी, र. वि. हेरवाडकर, वि. स. वाकसकर, बापूजी संकपाळ, सुधाकर पवार इत्यादी अभ्यासकांची नावे नंतरच्या काळात पुढे आली.

### २.२.२ मराठेशाहीतील पत्ररूप गद्याच्या प्रेरणा

कोणत्याही वाङ्मय प्रकाराच्या प्रेरणा या त्या काळातील समाजजीवन, संस्कृती, धर्मव्यवस्था, रूढी, प्रथा, परंपरा, राजकारण, सत्ताकारण यांच्यामध्येच असतात. वाङ्मयनिर्मितीला अनेकविध कारणे असतात, असे वामन मल्हार जोशी यांनी सांगितले आहे. या कारणांमध्ये त्यांनी ''त्या समाजाचा पूर्वेतिहास, तत्कालीन धर्म, चालीरीती, सांस्कृतिक दर्जा, इतर लोकांशी आलेला संबंध, नैतिक आचारविचार, धार्मिक भावना, आर्थिक आकांक्षांना मिळत असलेला वाव, किंवा त्याचा अभाव, त्या त्या वाङ्मयसेवकाच्या मनाची ठेवण, त्याचे शिक्षण, त्याचा सामाजिक दर्जा, त्याच्या इच्छा-आकांक्षा, त्याच्या सहज-प्रेरणांचे सापेक्ष बलाबल, त्याच्या जाणीवयुक्त भावभावना, त्याच्या नेणिवेतील मनोगंड'' इत्यादी कारणे सांगितली आहेत. या दृष्टीने

मराठेशाहीतील पत्ररूप गद्यलेखनाच्या प्रेरणांचा विचार करताना आपणास पत्रलेखनाच्या कारणांचा विचार करावा लागतो. नवी माहिती, नव्या ज्ञानाचे साधन, व्यापार-उद्योग वृद्धिंगत करणे, परस्पर स्नेह वाढविणे, सहानुभूतीचा निरोप देणे, दुरावलेली मने सांधणे, एकाकी जीवनातील दिलासा, प्रादेशिक स्नेहभाव टिकवणे, सामाजिक शांती आणि सदिच्छा वृद्धिंगत करणे इत्यादी पत्रलेखनाची कारणपरंपरा सांगता येते.

मराठेशाहीतील पत्ररूप गद्याच्या प्रेरणांचा विचार करताना खाजगी आणि राजकीय पत्रव्यवहार अशा दोन्ही प्रकारातील पत्रलेखनाचा विचार करावा लागतो. त्याबरोबरच तत्कालीन काळ, राजकीय जीवन, सामाजिक जीवन, कौटुंबिक जीवन, धार्मिक जीवन यांचा विचार करावा लागतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी तत्कालीन सरकारी पत्रलेखनाचे ७८ प्रकार मानले आहेत. त्या प्रकारांचा बारकाईने विचार केल्यास पत्ररूप गद्यलेखनाच्या प्रेरणा समजून घेण्यास मदत होते. काही मूलभूत पत्रांच्या प्रकारावरून पुढीलप्रमाणे मराठेशाहीतील पत्ररूप गद्यलेखनाच्या प्रेरणा सांगता येतील. यामध्ये प्रामुख्याने क्षेम-कुशल कळविणे, विधीविधानांची माहिती देणे, बोलावणे धाडणे, अभय देणे, आज्ञा देणे, इनाम देणे, कबजा देणे, ताकीद देणे, निवाडा करणे, जकात माफ करणे, जाबसाल लिहून आणणे, वसाहत करणे, पंचायत करणे, समज देणे, एकदिल होणे किंवा वतनात मिळवून घेणे, बातमी देणे, जाबता काढून कामाची वर्गवारी करणे, खंडणी देणे-घेणे इत्यादी मराठेशाहीतील पत्ररूप गद्यलेखनाच्या प्रेरणा मानता येतील.

### २.२.३ ऐतिहासिक पत्रलेखनपद्धती

ऐतिहासिक पत्रांच्या लेखनपद्धतीचा विचार करताना पत्राचा मायना, तो लिहिण्याची ऐतिहासिक संकेत पंरपरा, पत्रलेखनाची सुरुवात किंवा पत्रारंभ, शिक्कामोर्तब किंवा मुद्रा व मद्रा उठविण्याचे संकेत यांचा स्थूलमानाने विचार करावा लागतो. वा. सी. बेंद्रे यांनी त्यांच्या 'साधन चिकित्सा' या ग्रंथात ऐतिहासिक पत्रलेखनपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यांनी कागद, शाई, रेषा, अक्षरांचे वळण, पत्रप्रकार, शके व शिक्के यांची सविस्तर चर्चा केलेली आहे. ती इतिहासाच्या दृष्टीने जितकी महत्त्वाची आहे तितकीच वाङ्मयीन अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरणारी आहे. यापूर्वी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'ऐतिहासिक प्रस्तावनां'मधून प्रसंगोत्पात स्वरूपाची 'शिवशाहीकालीन लेखनप्रशस्ती'च्या अनुषंगाने चर्चा केलेली आहे.

प्रस्तुत ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी लिहिलेल्या पत्रांच्या आधारे ऐतिहासिक पत्रलेखनाची पद्धती समजून घ्यावयाची आहे. कोणतेही पत्र लिहिण्यापूर्वी शुभसूचक चिन्ह वा अक्षर लिहिणे, ज्या व्यक्तीला पत्र लिहावयाचे आहे त्याच्या दर्जा आणि मानानुसार लिहावयाचा मायना, प्रास्ताविकाचा भाग, मजकूर, अखरेची समाप्तीदर्शक वाक्ये किंवा मर्यादा, त्यामधील सूचक संदेश, मुद्रा इत्यादी मुद्द्यांच्या आधारे छत्रपती शिवरायांनी पत्रलेखनातून वापरलेले मायने, पत्रारंभ व शिक्कामार्तबाची पद्धत यांचा विचार करता येऊ शकतो.

पत्र मोडी भाषेत लिहावे लागत असल्याने प्रथम रेघ ओढावी लागे. रेघ पत्रावर कशी व कोणत्या ठिकाणी काढावी याविषयीचे विवेचन वि. का. राजवाडे यांनी शिवशाहीकालीन लेखनप्रशस्ती वरील चर्चेमध्ये

केले आहे. कोणाला पत्र लिहावयाचे आहे त्या मनुष्याच्या दर्जावरून मायन्यात किती रेषा काढून मान द्यावा याचा तपशील आहे. श्रीकाराच्या खालील पहिली ओळ १५ प्रकारे काढली जाई. कागदाची घडी घालून पाडल्या जाणाऱ्या रकान्यांवरून हे प्रकार ठरतात ते पुढीलप्रमाणे, १. सबंध रेघ २. दफे रेघ (पहिल्या रकान्यात एक अक्षराची कोरी जागा) ३. दफाते (दोन अक्षरांची कोरी जागा) ४. कते रेघ (तीन अक्षरांची कोरी जागा) ५. महजर (चार अक्षरांची कोरी जागा) ६. जिल्हे (पहिल्या दोन रकान्यांपुरती रेघ, पुढे कोरी जागा) ७. दुसरी जिल्हे (तिसऱ्या व चौथ्या रकान्यांपुरती रेघ) ८. बित (प्रारंभी व शेवटी एकेक अक्षराची कोरी जागा) ९. अज् (बित रेघेत अकार लावणे) १०. एकूणहत् (बित रेघेस एकार लावणे) ११. वासलात (बित रेघेस बाक देऊन प्रारंभ करणे) १२. दकारी रेघ (रेघेच्या प्रारंभी दकार) १३. खं रेषा (प्रारंभी शून्य काढणे) १४. दुरेषी (प्रारंभी दोन उभ्या रेषा) १५. दुरेघी दकार (दकार व दुरेघी काढणे) इत्यादी माहिती लेखनप्रशस्तीवरून मिळते.

तत्कालीन लेखनासाठी शाई कशी तयार केली जात होती हा औत्सुक्याचा विषय आहे. नाचण्याचे शिरे करून त्यात काजळाने घोटून शाई तयार केली जात असे तर, बोरूची लेखणी असे. कागदाच्या बाबतीत देखील ठराविक पत्रव्यवहारासाठी ठराविक कागद वापरीत असत. मुसलमानी सरदार, पातशहा वगैरे रूपेरी अगर सोनेरी बेगडीने मढविलेले व वेलबुट्टी काढलेले भारी कागद वापरत असत. कागदाचा आकार लहान असल्यामुळे एक कागद न पुरल्यास दुसरा, तिसरा असे कागदाचे तुकडे वापरीत व त्यावर एकूण बंद किती ते लिहिलेले असे. खाजगी व सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या पत्रांच्या कॉपी तयार करून ठेवल्या जात. विशेष सजवून पाठवल्या जाणाऱ्या बादशाही फर्मानांमधील काही महत्त्वाच्या फर्मानांवर पातशहा आपला केशरी पंजा उठवित असे अशी फर्माने 'पंजाची फर्माने' म्हणून प्रसिद्ध आहेत. सरदार स्वारीवर गेल्यावर त्यांना स्थानिक कर्तृत्ववान लोकांची मदत घ्यावी लागे. अशा लोकांना मदतीच्या बदल्यात सरंजाम वगैरे इनामे द्यावी लागत. अशा वेळी त्या त्या वेळी फर्माने आणून त्या लोकांची समजूत घालणे शक्य नसे. म्हणून पातशहा आपल्या शिक्क्याचे कोरे फर्मानाचे कागद सरदारांकडे दिलेले असायचे. वेळ पडेल तसे ही फर्माने पातशहाच्या नावाने दिली जात. अशा फर्मानांना 'डौलाची पत्रे' असे म्हटले जाते.

छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाच्यावेळी एक कानुजाबता काढला होता. या जाबत्यामध्ये कामाची वाटणी करून दिलेली होती. पत्रलेखनाच्या दृष्टीने हा जाबता महत्त्वाचा आहे. या पत्रलेखनाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उल्लेख येतो.

*''मुख्यप्रधान याणी राजकार्य करावे. राजपत्रांवरी शिक्का करावा... अमात्य याणी फडनिशी, चिटनिशी पत्रांवर निशाण करावे... सचिव यांणी राजपत्रे शोध करून अधिकउणे अक्षरे मजकूर शुद्ध करावी... राजपत्रांवर चिन्ह संमत करावे... पंडितराव याणी... आचार, व्यवहार, प्रायश्चित पत्रे होतील त्याजवर संमत चिन्ह करावे.. न्यायाधिश याणी... न्यायाची पत्रे निवाडपत्रे याजवर संमत चिन्ह करावे... चिटणीस याणी सर्व राज्यातील राजपत्रे ल्याहावी. राजकारणपत्रे उत्तरे ल्याहावी. सनदी, दानपत्रे वगैरे महाली हुकमी याचा जाबता, फडनिशी, चिटनिशी, अलाहिदा त्याप्रमाणे ल्याहावे. हातरोखा नाजूकपत्रे याजवर मोर्तब अथवा खासदस्तक मात्र वरकडचा दाखला चिन्ह नाही, चिटनिसानीच करावे.''*

यापुढे या कानुजाबत्यामध्ये चिटनिशी व फडनिशी पत्रे कोणती व कोणी लिहावयाची याची बत्तीस कलमे दिली आहेत. त्यावरून तत्कालीन पत्रलेखनपद्धती आणि शिवकालीन राज्यकारभारातील शिस्तीचा बोध होतो.

ऐतिहासिक पत्रांचा अभ्यास करताना पत्राची ओळख पटविण्यासाठी, सत्यता पडताळणीसाठी त्यावरील 'शिक्का' व 'मोर्तब' या दोन घटकांना विशेष महत्त्व असते. 'शिक्का' म्हणजे 'नाममुद्रा' आणि 'मोर्तब' म्हणजे 'मर्यादा मुद्रा' असे प्रतिशब्द शं. ना. जोशी यांनी वापरले आहेत. पत्र संपले तेथेच मोर्तबाचा ठसा उमटविला जात असे. त्याचा अर्थ 'पत्र पुरे झाले' असा होय. काही वेळा 'शिक्का' शब्दातच मोर्तबाचा अर्थ धरल्याचे आढळते. छत्रपतींप्रमाणेच तत्कालीन सरंजामी सरदार, सरकारकून, देशाधिकारी वगैरेंचेही शिक्के असत. राजघराण्यातील स्त्रियांचेही शिक्के असत. गोतसभेतील मानकऱ्यांचेही शिक्के असत, त्यास 'निशाणी' असे म्हणत. सही, शिक्का, निशाणी, मोर्तब यांची विशिष्ट पद्धत ठरलेली असे. शिक्के हे धातूवर कोरून तयार केले जात. याविषयीची अधिक माहिती 'साधन चिकित्सा' या ग्रंथात वा. सी. बेंद्रे यांनी दिली आहे. इतिहासाच्या दृष्टीने कागदाचा अस्सलपणा ठरविण्यासाठी सही, शिक्का, निशाणी, मोर्तब महत्त्वाचे असले तरी पत्रलेखनपद्धती समजून घेण्याच्या दृष्टीनेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**२.२.३.१ छत्रपतींची नाममुद्रा**

छत्रपती शिवरायांच्या पत्रांचा विचार करताना त्यांच्या नाममुद्रेचा मराठेशाहीच्या इतिहासात एकूण १२ छत्रपती होऊन गेले त्यांच्या एकूण चौदा मुद्रा आहेत. याचा अर्थ काही छत्रपतींनी एकापेक्षा अधिक मुद्रा वापरलेल्या आहेत. यापैकी सात मुद्रा या स्वतंत्र असून बाकीच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुद्रेचे अनुकरण करणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची मुद्रा ही अष्टकोनी, एक वलयी, पाच ओळींची व संस्कृत भाषेत आहे.

*प्रतिपच्चंद्र*
*लेखेवर्धिष्णु र्वि।*
*श्ववंदिता।। शाहस् ।*
*नो : शिवस्यैषा मुद्रा।*
*भद्राय राजते।*

प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणाऱ्या, अखिल विश्वास वंद्य असणाऱ्या शाहजीचा पुत्र शिवाजी त्याची ही मुद्रा कल्याणार्थ शोभायमान झाली आहे.

छत्रपती संभाजी महाराजांची नाममुद्रा उभट, पिंपळपानी, ७ ओळींची व षोडस बुरुजी व दुवलयी आहे.

*श्री शंभो : शिवजातस्य मुद्रा योरिव राजते।।*
*यदंकसेविनी लेखा। वर्तते कस्य नोपरि।।*

असा मजकूर त्यावर असून त्याचा अर्थ, संभाजीची ही मुद्रा सूर्यप्रभेप्रमाणे शोभते व चालविते, ती ही शिवपुत्र शंभूची मुद्रा प्रकाशित होत आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या दोन मुद्रा आहेत. त्यापैकी एक चंद्र सूर्य सोडून सहा ओळींची, त्रिवलयी व मध्ये नक्षी काढलेली पूर्ण वर्तूळाकृती आहे.

*श्री धर्मप्रद्योदिताशेष वर्णा दाशरथेरिव*
*राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते*

दशरथ राजाप्रमाणे राजारामाची ही विश्ववंद्य मुद्रा, धर्माच्या योगाने प्रज्वलित केले आहेत. सर्व वर्ण जिने, अशी प्रकाशित होत आहे.

राजाराम महाराजांची दुसरी मुद्रा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुद्रेचे अनुकरण करणारी आहे.

*श्री पतिपत् चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।*
*शिवसूनोरियं मुद्रा राजारामस्यं राजते।।*

पत्राच्या शिरोभागी येणारी नाममुद्रा म्हणजे त्या पत्राची एकप्रकारे ओळख पटविणारी खूण होय. ही नाममुद्रादेखील कोणत्या प्रकारच्या पत्रावर उठवायची याचे नियम ठरलेले असावेत. वडीलधाऱ्या माणसाला किंवा साधू संतांना पत्र लिहिले असेल तर पत्राच्या मागच्या बाजूस मुद्रा उठवून आदरभाव दर्शविला जाई.

काही पत्रांच्या शिरोभागी पूज्य श्रद्धेय गुरू किंवा संत अथवा वडीलधाऱ्या व्यक्तीचे नाव मुद्दाम लिहिलेले दिसते. अशा पूज्य व्यक्तीस पत्र लिहिताना पत्राच्या वरच्या बाजूला कोपऱ्यात एकदा त्या व्यक्तीचे नाव लिहून ठेवले जाई व पुढे ज्या ज्या वेळी पत्रामध्ये त्या व्यक्तीचा उल्लेख येई तेथे कोरी जागा सोडली जाई. पूज्यभाव दर्शविण्याची ही एक तऱ्हा यामधून लक्षात येते. पत्राच्या प्रारंभी मंगलसूचक 'श्री' काराचा उपयोग केला जाई. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमध्ये सुरुवातीला हा 'श्री'कार आलेला आढळतो. कोणत्याही लेखनाला प्रारंभ करण्यापूर्वी कागदावर 'श्री' लिहिण्याची तत्कालीन प्रथाच होती. 'श्री'कारासोबत एखाद्या देवतेचे नाव जोडून लिहिले जाई. उदा. 'श्री तुळजाभवानी', 'श्री कुलस्वामिनी', 'श्री महादेव' इत्यादी.

### २.२.३.२ पत्रांचा कालनिर्देश

ऐतिहासिक पत्रांचा कालनिर्देश समजून घेण्यासाठी सुरुवातीला सुहूर सन, राज्याभिषेक शक आणि तिथीमिती या गोष्टी समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण, पत्राच्या सुरुवातीला कालनिर्देश देताना सुहूर सन किंवा राज्याभिषेक शक अथवा तिथीमिती व शक यांचा उल्लेख करून नंतर मजकुरास सुरुवात होते. नवीन संशोधक, अभ्यासक किंवा विद्यार्थ्यांना ऐतिहासिक पत्रांचा अभ्यास करताना कालनिर्देशाच्या अनुषंगाने सुहूर सन, राज्याभिषेक शक, तिथीमिती समजून घेण्यासाठी 'जंत्री' उपयोगी पडते. सध्या महाराष्ट्रात सर्वत्र कालनिर्देश करताना इसवी सन किंवा इंग्रजी महिन्यांचाच वापर करण्याची पद्धती रूढ झाल्यामुळे जुन्या ऐतिहासिक पत्रांमधील कालनिर्देशाचा बोध होण्यास कठीण जाते. 'जंत्री'मुळे या गोष्टी सुलभ होतात.

'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' या ग्रंथात संपा. द. वि. आपटे व रा. वि. ओतुरकर यांनी जंत्रीविषयीची थोडक्यात माहिती दिलेली माहिती पुढीलप्रमाणे, ''जुन्या पत्रातले चैत्रादी अगर मोहरमादि कालांचे उल्लेख इसवी सन व तारखा या रूपांत समजून घेणे आवश्यक असतें. ही सोय ज्या ग्रंथात केलेली असते त्याला 'जंत्री' म्हणतात. उदाहरणार्थ, 'खरे जंत्री', 'मोडक जंत्री', संशोधकांची छोटी जंत्री इत्यादी. शब्दकोशांत ज्याप्रमाणें एका भाषेतल्या शब्दाला दुसऱ्या भाषेंतला प्रतिशब्द दिलेला असतो त्याप्रमाणें जंत्रीत शालिवाहन शक, महिना व तिथी किंवा सुहूर सन, मोहरमादि महिना व चंद्र यांना प्रत्येक वर्षी इंग्रजी सन, महिना व तारीख कोणती असते हें दिलेले असतें. जुन्या पत्रांतील तिथि किंवा चंद्र पाहून त्याची इंग्रजी तारीख जंत्रीच्या साह्याने ठरवावी लागते.'' शिवकालापूर्वी किंवा शिवशाहीतील पूर्वार्धापर्यंत मराठी पत्रलेखनामध्ये सुहूर सन, मुसलमानी तारीख व महिना देण्याची चाल रूढ होती. राज्याभिषेक शक रूढ व्हावा अशी छत्रपती शिवाजी महाराजांची इच्छा होती असे वा. सी. बेंद्रे यांनी त्यांच्या 'साधन चिकित्सा' या ग्रंथामध्ये नोंद केली आहे. त्याप्रमाणे वार, तिथी, मिती, शक, संवत् व राजशक इत्यादींचा कालनिर्देश पत्रांवर घालण्याची पद्धत छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केली. म्हणून या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांना 'शककर्ता' असेही म्हटले जाते. छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर पत्रांमध्ये राज्याभिषेक शक येऊ लागला. परंतु, सर्वच पत्रे ही राज्याभिषेक शकाची नाहीत. जवळपास निम्मी पत्रे राज्याभिषेक शक नसलेली आहेत. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचा अभ्यास करण्यासाठी 'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' या ग्रंथात मुसलमानी व मराठी महिने, सनाचे प्रकार, शालिवाहन शक व राज्याभिषेक शक याविषयीची दिलेली माहिती अभ्यासाच्या सोयीसाठी येथे विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. ती खालीलप्रमाणे,

### २.२.३.२ मुसलमानी व मराठी महिने

**मुसलमानी महिने** - १. मोहरम, २. सफर, ३. रबिलावल, ४. रबिलाखर, ५. जमादिलावल, ६. जमादिलाखर, ७. रजब, ८. साबान, ९. रमजान, १०. सवाल, ११. जिल्काद, १२. जिल्हेज.

**मराठी महिने –** १. चैत्र, २. वैशाख, ३, ज्येष्ठ, ४. आषाढ, ५. श्रावण, ६. भाद्रपद, ७. आश्विन, ८. कार्तिक, ९. मार्गशीर्ष, १०. पौष, ११. माघ, १२. फाल्गुन.

मराठी महिन्यांत दोन पंधरवडे असतात; पहिल्यास 'शुद्ध' पक्ष व दुसऱ्यास वद्य किंवा 'बहुल' पक्ष म्हणतात. प्रत्येक पक्षांत १५ तिथी असतात. शुद्ध १५ व्या तिथीस पौर्णिमा व वद्य १५ स अमावास्या म्हणतात. मुसलमानी महिन्याच्या तारखांना 'चंद्र' म्हणतात. मराठी महिन्याच्या शुद्ध द्वितीयेस मुसलमानी महिन्याचा पहिला चंद्र येतो.

### २.२.३.४ सनाचे प्रकार

सुहूर सनाचे आंकडे शब्दांत लिहीत. ते असे - इहिदे = १, इसने = २, सलास = ३, अर्बा = ४, खमस = ५, सीत = ६, सबा = ७, समान = ८, तिसा = ९, अशर = १०, अशरीन = २०, सलासीन = ३०, आर्बैन = ४०, खमसैन = ५०, सितैन = ६०, सबैन = ७०, समानीन = ८०, तिसैन = ९०, मया = १००, मयातैन २००, अलफ = १०००.

उदाहरणार्थ : अर्बा सबैन व अलफ = १०७४ सुहूर सनांत ५९९ किंवा ६०० मिळविल्याने इसवी सन येतो.

वरील मजकुरावरून लक्षांत येईल की, जुन्या पत्रांत वर्षाच्या उल्लेखांत **'अलफ'** शब्द असल्यास ते पत्र इ. स. १६०० ते १७०० या कालांतले म्हणजे शिवकालीन; **मया व अलफ** (= ११०० म्हणजे १७०० इ. स.) हे शब्द असल्यास तें पत्र पेशवाईतले आणि **मयातैन व अलफ** हे शब्द असल्यास इ. स. १८०० नंतरचे असते हे समजेल. वर सुहूर सनांत ५९९ किंवा ६०० मिळवावे म्हणजे इ. स. येईल असा विकल्प लिहिण्याचे कारण सुहूर सनाचा प्रारंभ सूर्य मृग नक्षत्रांत प्रवेश करतो त्या दिवशी करीत. ही तारीख मे २४ किंवा जून ५ अशी असे.

मुसलमानी बादशाहाच्या राज्याभिषेकदिनापासून सुरू होणाऱ्या सनास 'जुलूस' म्हणतात. हा जुलूस त्या त्या बादशाहाच्या मृत्यूने संपे. कालगणना सुहर वा फसली वा जुलूस असो. महिने मोहरम सफर इत्यादी मुसलमानीच असत.

शिवाजी महाराजांना शके १५९६ च्या (इ. स. १६७४) ज्येष्ठ शु. १३ या तिथीस राज्याभिषेक झाला. त्या दिवशी जी गणना सुरू झाली तिला 'राज्याभिषेक शक' म्हणतात.

शालिवाहन शक + ७८ = इसवी सन.

सुहूर सन (शब्दांत लिहिलेला ) + ९ = फसली सन (आंकड्यांत लिहिलेला).

**२.२.३.५ वारांची जुनीं नांवें**

रविवार – आदित्यवार

सोमवार – चंद्रवार, इंदुवार

मंगळवार – भौमवार

बुधवार – सौम्यवार

गुरुवार – बृहस्पतवार

शुक्रवार – भृगुवार

शनवार – मंदवार, स्थिरवासर

वरील मजकूर हा ऐतिहासिक पत्रांचा कालनिर्देश समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. पत्र कुणी, कुणाला व केव्हा लिहिले हे पत्राच्या सुरुवातीलाच देणे आवश्यक असते. परंतु, पुष्कळ ठिकाणी तो दिलेला आढळत नाही. त्यामुळे पत्राची ओळख पटविणे अवघड होते. कित्येक पत्रांत तारखाही नसतात त्यामुळे पत्राचा काल नेमकेपणाने समजून घेणे कठीण जाते. अशा वेळी पत्र कुणी कुणाला लिहिले आहे? त्यातील मजकूर काय आहे? हे पाहून ज्या व्यक्तीस पत्र लिहिले आहे किंवा ज्या व्यक्तीने लिहिले आहे

त्यांच्या जीवनचरित्रातील घटना घडामोडींशी पत्रातील मजकूर तपासून पाहावा लागतो. त्यावरून आपणास त्या पत्राचा काळ समजून घेता येऊ शकतो.

### २.२.३.६ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचे मायने

पत्रांना मायना कसा वापरावा हे ज्या व्यक्तीस पत्र पाठवायचे त्या व्यक्तीशी पाठवणाऱ्या व्यक्तीचा सहसंबंध, दोघांमधील वयाचे अंतर या गोष्टींबरोबरच ज्या व्यक्तीस पत्र पाठवायचे आहे त्याचा सामाजिक दर्जा, ज्ञान, अनुभव, व्यवसाय, पद इत्यादी गोष्टींवर अवलंबून असते. याचे एक प्राचीन उदाहरण सुप्रसिद्ध आहे ते म्हणजे चांगदेवाने संत ज्ञानेश्वरांना पाठवलेले पत्र. चांगदेव पत्र पाठवताना पत्राचा मायना काय वापरावा या विचारात गोंधळून जातो. संत ज्ञानेश्वर वयाने लहान आहेत म्हणून त्यांना आशीर्वाद द्यावे तर ते ज्ञानाने आपल्यापेक्षा मोठे आहेत. मग मायना काय वापरावा या गोंधळात ते कोरेच पत्र पाठवतात आणि त्या कोऱ्या पत्राला लिहिलेले पासष्ट ओव्यांचे उत्तर म्हणजे 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ होय. हे उदाहरण सर्वांना माहीत आहे. यावरून पत्राचा मायना हा लिहिणाऱ्याच्या आणि ज्याला उद्देशून लिहीणार या दोहोंच्या सहसंबंधाबरोबरच, व्यक्तिमत्त्व, नाते, सामाजिक, राजकीय दर्जा, वय, ज्ञान, अनुभव, पद इत्यादी घटकांशी अतिशय अन्योन्य संबंध दर्शविणारा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील मायने वाचले तर या घटकांचा प्रत्यय येतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी पत्रव्यवहारात फारसी ऐवजी मराठी मायन्यांचा वापर करण्याची पद्धत सुरू केली. आदिलशाही-निजामशाही-शिवशाही-पेशवाई अशा काळाच्या प्रत्येक टप्प्यावर पत्रलेखन पद्धतीत बदल होत आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीच्या सुरुवातीच्या काळात ''अजख्तरखाने शिवाजीराजे दामदौलत हु'' असा मायना वापरून पत्रलेखनाची सुरुवात केली जाई. त्याचा अर्थ ''ज्याचे राज्य चिरायू होवो (अशी ईश्वरास प्रार्थना करावयाची त्या) शिवाजी राजाच्या कचेरीपासून'' असा होतो. हा मायन्याचा पूर्वार्ध असून उत्तरार्ध ''बजानीबु कारकुनानि हाल व इस्तकबील देशमुखानी प॥ पुणे बिदानद ई'' असा आहे. त्याचा अर्थ, ''परगणे पुण्याच्या देशमुखांना आणि हल्ली असलेल्या पुढे येणाऱ्या कारकुनांना, त्यांनी (जाणावे)'' असा आहे. 'मशुरल हुजरत' म्हणजे 'ख्यातनाम किंवा मशहूर' असा मायना असणारी पत्रे वरिष्ठ अधिकारी वर्गाला लिहिलेल्या पत्रांसाठी वापरलेला दिसून येतो. कारकून, हुद्देदार इत्यादींना पाठवलेल्या पत्राचा मायना 'अजख्तरखाने' असा असलेला दिसतो. 'इजतबाब' असा मायना असलेले पत्रही आढळते. 'इजतबाब' किंवा 'इजतमाहा' म्हणजे 'सुप्रतिष्ठित' असा त्याचा अर्थ होतो. अशी फारसी पद्धतीचा पत्राचा मायना वापरण्याची प्रथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर म्हणजे इ.स.१६७४ नंतर बंद झाली. त्यानंतर मराठी धर्तीचे व संस्कृतप्रचुर मायने वापरले जाऊ लागले. 'राजश्री शिवाजी राजे' असा साधा उल्लेख करून पत्रारंभ करण्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचा साधेपणाही अधोरेखित होतो. आचार्य, गुरु, साधूजनांना पत्र लिहिताना छत्रपती शिवराय स्वतः शिष्यत्व घेऊन 'विद्यार्थी' असा स्वतःचा उल्लेख करतात.

बऱ्याचदा पत्रलेखनामध्ये औपचारिक भाषेचा वापर करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांच्या मायन्यामध्ये 'दंडवत', 'जोहार' हे शब्द अगदी क्वचित आले आहेत. 'चरणावरी मस्तक ठेवून' असा उल्लेख येतो परंतु, काही वेळा अशा शब्दांचा शब्दशः अर्थ घ्यायचा नसतो. औपचारिकता म्हणून असा उल्लेख

आलेला असतो. पत्रलेखन करणाऱ्याची विशिष्ट भावना समजून घेण्यास मदत होते. काही वेळा सहेतूक विशिष्ट शब्दांचा मायना वापरला जातो. उदाहरणार्थ, निळकंठराव किंवा मालोजीराव घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी 'दंडवत' किंवा 'जोहार' या शब्दांचा उल्लेख सहेतुकपणे केला असावा.

**२.२.३.७ पत्राचा शेवट**

पत्राच्या आरंभाप्रमाणेच पत्रसमाप्तीचेही तंत्र ठरलेले होते. पत्राचा मुख्य मजकूर सांगून झाला की समारोपादाखल एखादे वाक्य सांगून पत्राचा शेवट केला जाई. बहुतेक वेळा पत्रलेखनाची मर्यादा सांभाळून हे शेवटचे वाक्य सूचक, सांकेतिक अर्थ व्यक्त करणारे असायचे. पत्र पूर्ण झाल्यानंतर शेवटी उठवावयाच्या मर्यादामुद्रा (मोर्तब) यांचेही ठराविक प्रकार होते. त्याला विशिष्ट महत्त्व असायचे. पत्राचा मजकूर संपल्यानंतर त्याला चिकटून हे मोर्तब केले जाई. 'मोर्तब सूद' असा हा ठसा असे. बऱ्याचदा हातानेही लिहिले जाई. 'मोर्तबखुद' असे असले म्हणजे स्वहस्ते पत्रसमाप्ती केली असा त्याचा अर्थ त्याचा अर्थ होई. संपूर्ण पत्र लेखनिकाकडून लिहून घेऊन शेवटी समाप्तीचे वाक्य स्वतः लिहिले जाई. 'शिवशाहीचा लेखनालंकार' या पुस्तकात चांदोरकर म्हणतात, ''अष्टप्रधान किंवा अत्यंत घरोब्यातील व्यक्ती यांना पाठवायच्या पत्राच्या शेवटी 'बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा' हे समाप्तीदर्शक वाक्य छत्रपती स्वहस्ते लिहित असत.'' छत्रपती शिवाजी पत्रामध्ये 'बहुत काय लिहिणे', 'बहुत लिहिणे नलगे', 'कोण गोष्टी चिंता न करणे', 'कौल असे', 'ऐसे समजून वर्तणूक करणे', 'जाणिजे', 'हे बरे म्हणून वर्तणूक करणे', 'ताकीद असे', 'बहुत लिहिणे तरी तुम्ही सर्वज्ञ असा', 'उजूर न करणे', 'एक जरियाची तसवीस न देणे' अशी पत्रसमाप्तीची वाक्ये आढळतात. ही सर्व वाक्ये छत्रपतींनी स्वहस्ते लिहिली असे मात्र म्हणता येत नाही.

या सर्व पत्रसमाप्तीच्या वाक्यांमधून पत्र पाल्हाळीक न करता जे सांगायचे आहे ते संपल्यावर अजून काही स्पष्ट करण्याची गरज नाही किंवा काय म्हणायचे आहे ते पूर्ण उलगडून सांगण्याची गरज नाही, असा अर्थ स्पष्ट होतो. म्हणजेच ज्याला पत्र लिहिले त्याला छत्रपतींना काय सांगायचे किंवा सूचवायचे आहे त्याचे सूचन करणारी ही वाक्ये आहेत. मर्यादामुद्रा किंवा मोर्तब ही पत्रसमाप्तीची दुसरी खूण होय. इतिहास संशोधकास पत्राचा अस्सलपणा ठरविताना या नाममुद्रा व मर्यादामुद्रा यांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

'मर्या

देयं विरा

जते'

ही तीन ओळींची, एकवलयी लंब षट्कोनी मर्यादामुद्रा म्हणजेच मोर्तब छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रावर असे. या सर्व पत्रलेखनपद्धतीचा विचार केल्यानंतर छत्रपती शिवाजीमहाराजांच्या राज्यकारभारातील शिस्तशीरपणा लक्षात येतो. ही पत्रलेखनपद्धती छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील गद्यरूप लेखनपरंपरेची समृद्धी दर्शविणारी आहे.

## २.२.४ पत्रलेखक व पत्रलेखनिक

इतिहासकाळात सर्व पत्रव्यवहार लेखनिक करत असत. पत्रलेखनाची पद्धती समजून घेतल्यास 'छत्रपतींची पत्रे' या संज्ञेचे नीट आकलन होईल. छत्रपती तोंडी पत्राच्या मजकुराचा मसुदा सांगत. चिटणीस त्याप्रमाणे लेखन करी व नंतर त्या लिहिलेल्या पत्रात छत्रपती पुस्तरदुरुस्ती करून मोर्तब करीत असत. थोडक्यात पत्राचा आशय छत्रपतींनी सांगायचा व त्याप्रमाणे लेखनिकाने लिहायचे. त्यामुळे पत्रातील सगळीच भाषा छत्रपतींची नसून लेखनिकाचीही असे. हे लेखनिक छत्रपतींच्या सहवासात वाढलेले असल्यामुळे छत्रपतींच्या बोलण्यातील विशिष्ट लकबा त्याने उचलल्या असाव्यात. त्यामुळे छत्रपतींना काय म्हणायचं असावं, त्यांच्या मनात काय आशय असावा हे ओळखून तो पत्रातून व्यक्त करण्याचे कसब लेखनिकांकडे असल्यामुळे पत्र स्वतः छत्रपतींनीच लिहिलेले आहे, असे स्वरूप त्यास प्राप्त होते.

गद्यलेखनाची शैली म्हणजे मूळ तोंडी भाषेचीच शैली आहे. त्यामुळे स्वतः पत्रलेखन करणे व तोंडी मजकूर सांगून लेखनिकाकडून लिहून घेणे यात गद्यशैलीच्या दृष्टीने फारसा फरक पडत नाही. म्हणजेच छत्रपतींची पत्रे म्हणजे छत्रपतींनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेली पत्रे असा त्याचा अर्थ होत नाही. 'शिवाजी राजे' हे नाव ज्या पत्रात आहे याचा अर्थ छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने पाठवली गेलेली पत्रे म्हणजे 'छत्रपतींची पत्रे' होय.

छत्रपती शिवाजी महाराजांचे लेखनिक कोण होते याविषयी इतिहासात फारशी माहिती उपलब्ध नाही. बाळाजी आवजी चिटणीस हा छत्रपतींची मराठी पत्रे लिहिणारा प्रमुख होता तर, नील प्रभू हा फारसी पत्रे लिहित असे, अशी माहिती मिळते. यांच्याशिवाय आणखीही पत्रलेखनिक असावेत. इतिहासकाळात पत्रलेखनिकाचे काम वंशपरंपरेने केले जायचे. पत्रलेखन करण्यासाठी पत्रलेखकांचे तीन 'फड' राजदरबारात असत. कौटुंबिक मंडळी, साधुपुरुष, स्नेही मंडळी यांना पत्रे लिहिण्याचे काम एक फड करीत असे. राज्यकारभारविषयक मराठी पत्रव्यवहार करण्याचे काम दुसरा फड करीत असे तर, परकीय राजदरबाराशी फारसी पत्रव्यवहार करण्याचे काम तिसरा फड करीत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी साधुपुरुष व देवधर्मस्थाने यांना पाठविलेल्या पत्रातील भाषा आणि इतर पत्रव्यवहारातील भाषा यामध्ये वेगळेपण यामुळेच आले असावे. श्री. रं. कुलकर्णी यांनी पत्रसाहित्याच्या भाषेच्या स्वरूपाबाबत लिहिताना असे म्हटले आहे की, ''पत्रसाहित्याच्या भाषेच्या स्वरूपात एक मनोरंजक संगती आढळते. राज्यकारभारविषयक पत्रे फारसीबहुल आहेत, तर इतर पत्रे भाषेच्या दृष्टीने वेगळी पडतात. शिवकालापासून पेशवेकालापर्यंतच्या कालावधित मराठी भाषेच्या स्वरूपासंबंधी विद्वानांनी व्यक्त केलेल्या मतांचा पुनर्विचार त्यामुळे आवश्यक ठरतो. एकच पत्रलेखक राजकारणासंबंधी लिहितो तेव्हा त्याची भाषा निराळ्या वळणांनी धावते, तर तोच लेखक प्रापंचिक वा अन्य बाबींसंबंधी कथन करतो तेव्हा त्याची भाषा संस्कृताचे वळण घेऊन प्रकट होते.'' श्री. रं. कुलकर्णी यांनी पत्राच्या भाषेसंबंधी हे विवेचन करताना वरीलप्रमाणे राजदरबारात असणारे पत्रलेखकांचे तीन 'फड' विचारात घेतले नसावेत असे वाटते. त्यामुळे राजदरबारातील पत्रव्यवहार आणि खाजगी किंवा कौटुंबिक पत्रव्यवहार छत्रपतींच्या नावेच झालेला असला तरी लेखनिक मात्र वेगवेगळे असावेत हे ध्यानात घेणे आवश्यक आहे.

### २.२.५ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील आशय आणि अभिव्यक्ती

काळ आणि आशय यांचा सबंध हा अतिशय घनिष्ठ स्वरूपाचा असतो. पत्रलेखनाच्या काळाचा आशयावर परिणाम होत असतो. पत्रलेखन ज्या काळात झाले त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, भाषिक पर्यावरण त्या पत्राच्या आशयावर दाब टाकत असते. हा दाब इतका प्रचंड असतो की काही वेळा संपूर्ण आशयच या पर्यावरणाचा भाग बनून जातो. पत्रलेखनाचे मध्यवर्ती आशयबीज त्याच्या भोवतालाचे संदर्भ घेऊन कथनप्रक्रियेत रुजते. त्यामुळे आशयाला अनेककेंद्रीत्व प्राप्त होते. मध्यवर्ती कल्पनेच्या मांडणीतील अपरिहार्यता म्हणून समाज जीवन, मानवी वृत्तीप्रवृत्ती, संस्कृती, धर्म, इतिहास, भूगोल, राजकारण, अर्थकारण इत्यादी घटक अप्रत्यक्षपणे पत्रलेखनाचा भाग होतात.

तत्कालीन पत्रव्यवहाराचा अभिव्यक्तीच्या बाजूने विचार करताना जाणवते की, पत्रव्यवहारामध्ये शासकीय पत्रव्यवहार, निवाडे, महजर, कौलनामे, वाटपपत्रे, शुद्धिपत्रे, दानपत्रे, बक्षीसपत्रे, कौटुंबिक पत्रव्यवहार, आश्रितांनी लिहिलेली पत्रे, युद्धाची वार्तापत्रे, राजकीय डावपेचांचे दिग्दर्शन करणारी पत्रे, ऐतिहासिक व्यक्ती आणि त्यांचे स्वभाव वर्णन करणारी पत्रे, सांप्रदायिकांचा पत्रव्यवहार इत्यादी प्रकारच्या पत्रव्यवहारांचा समावेश होतो. यांच्या आशयाचा विचार करताना यामध्ये विविधता आढळते. निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेली ही पत्रे असल्याने भाषा, शैली आणि घाट यांच्या बाबतीत कमालीची वैविध्यता दिसते. यासंदर्भात श्री. रं. कुलकर्णी यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, ''यात पत्रलेखकाचे मनोगत आहे, राजकीय डावपेचांची चर्चा आहे, क्रूरनीतीचे पवित्रे आहेत, प्रसंगांची वर्णने आहेत तशीच युद्धांचीही. या साधनात मानवी स्वभावाचे अनेक नमुने आढळतील. वैयक्तिक जीवनातील आणि रणांगणावरील संघर्षातील पेचप्रसंग निदर्शनास येतील. प्रसंगपरत्वे अध्यात्म विवरण आले आहे तसेच क्रिया-शपथ आणि प्रतिज्ञा यांच्या घोषणाही आढळतील.'' श्री. रं. कुलकर्णी यांच्या या विवेचनावरून पत्रव्यवहाराच्या आशयाचे स्वरूप स्पष्ट होते. पत्रव्यवहाराकडे इतिहासाचे अस्सल साधन म्हणून पाहिले जाते. परंतु, त्यातून केवळ इतिहास येत नाही तर, पत्रलेखकाचे स्वभावही प्रकट होत असतात. उदाहरणार्थ, अहिल्याबाई होळकर यांनी नानासाहेब फडणीस यांना लिहिलेले पत्र प्रसिद्ध आहे. प्रस्तुत ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील आशय आणि अभिव्यक्तीचा विचार करावयाचा आहे.

#### २.२.५.१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील आशय

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रलेखनाला एक कौटुंबिक आणि दुसरी राजकीय अशी पार्श्वभूमी आहे. राजकीय सत्ता, सत्ताधीश आणि त्यांचा राज्यकारभार यांच्याभोवती पत्रलेखनाचा आशय फिरताना दिसतो, तसा तो तत्कालीन मानवी जीवनाभोवतीही फिरतो. तत्कालीन लोकजीवन, लोकमानस, रूढी, प्रथा, परंपरा, संस्कृती, धर्म यांचाही आशयाविष्कार या पत्रलेखनात झाला आहे. हा आविष्कार जाणीवपूर्वक केला नसला तरी, पत्रलेखनाच्या मुख्य उद्देशाला चिकटून आलेले हे मानवी जीवनाचे संदर्भ आहेत. वास्तविक पत्रलेखन हा एक कथनप्रकार आहे. त्यामधून आलेल्या आशयाचा खालीलप्रमाणे विचार करता येईल.

### २.२.५.१.१ राजकीय जीवन

राजकीय जीवन हा पत्रलेखनाच्या आशयातील महत्त्वाचा घटक ठरतो. कारण, ऐतिहासिक व राजकीय जीवन यांचा आशय प्रामुख्याने पत्रांमधून आहे. राजसत्ता, राजवटी, राज्याभिषेक, वतने, जहागिरी, त्यांचा कारभार, सनदा, जाहीरनामे, मोहिमा, लढाई जिंकण्यासाठी केले जाणारे राजकारण, राजकीय घडामोडी, शत्रूत्व, मित्रत्व, पगडीभाई, फितुरी, हेरगिरी, समझोता, तह, आमिषे, बक्षिसे, कारभार मंडळी, अष्टप्रधानमंडळ, त्यांची पदे, कारकूनी, वकीली, बादशाही, निजामशाही, मुद्रा, शिक्के, महसूलव्यवस्था, खंडणी इत्यादी पत्रांमधून आलेल्या राजकीय घटकांमधून तत्कालीन राजकीय जीवनाचे दर्शन घडते. छत्रपती शिवाजी महाराजांनी बाळाजी आवजी प्रभू चिटणीस यांना लिहिलेल्या पत्रातील ''तुम्ही स्वामिसेवा निष्ठेने श्रमसाहस पुरे केले. राज्यवृद्धीचे कामी आला, यावरून तुम्हावर कृपाळू होऊन अष्टप्रधानातील पद द्यावें मनी धरलें असता, तुम्ही विनंती (केली) कीं, आपणाकडे चिटणीसीचा दरक चालू आहे हा अक्षय वतनी वंशपरंपरेने संनिध व सर्व राज्यांतील चालवावा. कारखानिसी व जमनिसी दोन धंदे राज्यांतील आपल्याकडे दिले ते अक्षय्य असावे. यावरून तसे तुम्हांकडे दिले असे.'' (पत्र क्र. १६५४) सदर मजकुरावरून बाळाजी आवजी प्रभू चिटणीस यांची निष्ठा पाहून त्यांना अष्टप्रधानमंडळातील पद देण्याची इच्छा व्यक्त करतात पण चिटणीस त्यांना आपणाकडे असलेली वंशपरेपरेने चालत आलेली चिटणीसी कायम ठेवण्याची विनंती करतात. तरी त्यांच्या निष्ठेचे फळ म्हणून कारखानिसी आणि जमनिसी छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना दिल्याचे या पत्रातून सांगितले आहे. अशा पद्धतीने कारखानिसी, चिटणीसी, जमनिसी, कारकुनी, सरकारकुनी, देशमुखी, वतनदारी, सरदारी, पाटीलकी, इनामदारी, सुभेदारी, कारभारकी दिल्याचा आशय कित्येक पत्रांमधून आल्याचे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मालोजी राजे घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रात निजामशाही, आदिलशाही, कुतूबशाही यांचे वर्णन आले आहे ते असे, ''सांप्रति राजकारण वर्तमान तरी दक्षिणेचे पातशहा तीन, निजामशहा, आदिलशहा, कुतूबशहा, त्यामध्ये निजामशाही पादशाही बुडाली ते समई निजामशाही उमदे वजीर होते त्यांणी आदिलशाही दरगाहासी रुजुवाती करून आपणास रोजगारास जागा केला. हालीं आदिलशाही बहलोलखान पठाणीं घेतली. पादशहा लहान लेकरूं. नाव मात्र. ते आपले कैदेत ठेविले आहेत. आणि तख्त आणि छत्र विजापूरचा कोट पठाणाने कबज केला आहे. काही गुरबान मिळाला नाही. ऐशियास दक्षिणेचे पादशाहीस पठाण जाला हे गोष्टी बरी नव्हे! पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांची घरे बुडवील. कोणास तगों देणार नाही. ऐसे आम्ही समजोन हजरत कुतुबशहा पातशहा यांसी पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशहांनी मेहरबानी करून हुजूर भेटीस येणे, म्हणून दस्तखत मुबारक दस्तखत मुबारक व दस्तपंजियानिसीफर्मान सादर केला.त्यावरून आम्ही येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पादशाही आदब आहे की शिरभोई धरावी, तसलीम करावी. परंतु आम्ही आपणावरी छत्र धरिले असे. ही गोष्ट कुतुबशहास मान्य होऊन शिरभाई धरणे व तसलीम करणे हे माफ केले.'' (पत्र क्र. १९०१, पृष्ठ क्र. २०६-२०७) यावरून तत्कालीन राजकीय संस्कृती समजून घेण्यास

मदत होते. आपला राजकीय फायदा लक्षात घेऊन डावपेच आखले जात असत. परंतु, आपल्या जवळच्या माणसाला त्याचा त्रास होऊ नये याची काळजीही घेतली जायची.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रातून तत्कालीन राजकीय जीवनातील छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय नैतिकताही समजून घेण्यास मदत होते. राजश्री रामाजी अनंत सुबेदार यांना लिहिलेल्या पत्रातील ''साहेब मेहेरबान होऊन सुभात फर्माविला आहे येसियासी चोरी न करावी, इमाने इतबारे साहेबकाम करावे. ऐसी तू क्रियाच केलीच आहेस, तेणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरुस्त वर्तणे, या उपरि कमाविस कारभारास बरे दरतुरोज लावणी, संचवणी, उगवणी जेसी जेसी जे जे वेलेस जे करू येते ते करीत जाणे. हर भातेने साहेबाची वतु... होये ते करीत जाणे. मुलकात बढाईचा तह चालत आहे परंतु रयेतीवर जाल रयेतीचा वाटा रयेतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे. रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे. दुसरी गोष्ट की रयेतीपासून यैन जिनसाचे नक्ष घ्यावे येसा येकंदर हुकूम नाही. सर्वथा येन जिनसाचे नख्त घेत घेत नव जाणे. येन जिनसाचे येन जिनसच उसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेलचे वेलेस विकीत जाणे की ज्या ज्या हुनरेने माहाग विकेल आणि फायदा होये ते करीत जाणे.'' (पृष्ठ क्र. १८४-१८५) सदर मजकुरावरून महसूल गोळा करताना रयतेवर कोणत्याही प्रकारचा अधिकचा कर लादू नये. तसे जो भाग रयतेचा तो रयतेला मिळावा आणि जो भाग राजाचा तो राजाला मिळावा याप्रमाणे महसूल गोळा करावा. जो महसूल ठरला आहे तोच घ्यावा. त्याच्या मोबदल्यात इतर जिनस घेऊ नयेत, अन्यथा आपली नाराजी होईल अशी स्पष्ट ताकीद दिल्याचे दिसते. यावरून राज्यकारभार करताना छत्रपती शिवाजी महाराज राजकीय नैतिकता कशी पाळत होते याचे दर्शन घडते. राज्यकारभाराविषयी पत्रव्यवहार करताना महसूल व्यवस्थेचा आशयही त्यामधून अपरिहार्यपणे येतो. राज्य चालविणे म्हणजे महसूल गोळा करणे आले. युद्धाचा खर्च, राज्याची शासनव्यवस्था, शिपायांचे वेतन, किल्ल्यांची दुरुस्ती, सैन्याची व्यवस्था, हत्ती, घोडे, उंट यांची व्यवस्था इत्यादी खर्चासाठी महसूल गोळा करणे ही आवश्यक गोष्ट असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरुवातीला स्वराज्याची स्थापना केल्यांतर महसूलविषयक धोरण तयार केले. त्यानुसार पुढे मराठ्यांची महसूलव्यवस्था चाललेली दिसते.

छत्रपती शिवाजी महाराज राज्यकारभार करताना आपल्या रयतेच्या सुरक्षिततेची काळजी घेत होते, याचाही आशय या पत्रांमधून आल्याचे दिसते. सर्जाराऊ जेधे देशमुख यांना लिहिलेल्या पत्रातून याविषयीचा मजकूर आला आहे. ''तपियाती धावणीस येताती म्हणौन जासुदानी समाचार आणिला आहे. तरी तुम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियांत गावचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळे समत (समेत) तमाम रयेती लोकांस घांटाखाले बांका जागा असेल तेथे पाठवणे. जेथे गनिमाचा अजार पहुचेना ऐशा जागियासी त्यास पाठविणे, ये कामास हैगै न करणे-रोखा अहडताच सदरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे-ऐसियासि तुम्हापासून अंतर पडलियावरी मागेल जे बांद धरून नेतील त्याचे पाय तुमचे माथा बैसेल. ऐसे समजोन गावचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे. या कामास एक घडीचा दिरंग न करणे. तुम्ही आपले जागा हुषार असणे. गावगनाहि सेडकडील सेतपोत जतन करावया जे असतील त्यासहि तुम्ही सांगणे की, डोंगरावर असिरा कुबल जागा आसरे ऐसे त्यासि सांगणे व

गनीम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीचा वाट चुकवून पलोन जाणे.''(पत्र क्र. ९०५, पृष्ठ क्र. १८९-१९०) जासुदानी गनीम आपल्या रोखावर आहेत असा समाचार आणल्यामुळे सर्जाराऊ जेधे देशमुख या आपल्या सरदारास रोहिरखोऱ्यातील आपल्या अखत्यारित येणाऱ्या गावातील लोकांना घाटाखाली सुरक्षित स्थळी नेण्यास सांगणारे हे पत्र आहे. आपल्या शेतीवाडीवर राहणाऱ्या लोकांनाही डोंगरकपारीत जिथं शत्रूच्या वाटेपासून दूरची जागा आहे अशा ठिकाणी राहण्यास सांगण्याची सूचना राजांनी दिलेली दिसते.

पत्रातील अशा मजकुरातून छत्रपती शिवाजी महाराज आपल्या रयतेला शत्रूपासून सुरक्षित ठेवण्यासाठी किती दक्षता घेत होते, याचा अंदाज येतो. राज्यकारभार करताना राज्याचा प्रमुख म्हणून राजाची कर्तव्ये छत्रपती शिवाजी महाराज कशी पार पाडत होते, याचा आशय अशा पत्रांमधून आलेला आपणास दिसून येतो. कौटुंबिक आशयाची खाजगी पत्रे सोडली तर सर्वच पत्रांचा आशय हा राजकीय असल्याचे लक्षात येते. कारण, व्यापक भूप्रदेशावर पसरलेल्या स्वराज्यातील अष्टप्रधानमंडळ, सरकारकून, चिटणीस, वतनदार, देशमुख, पाटील, सरदार इत्यादींशी प्रत्यक्ष भेटून कारभारविषयक आदेश, सूचना, आज्ञा देणे, न्यानिवाडे करणे, कौल देणे, परकीय राजवटींशी तह करणे, सल्लामसलत करणे इत्यादी गाष्टी शक्य होण्यासारखे नव्हते. म्हणून पत्रव्यवहाराशिवाय शिस्तशीर राज्यकारभार करता येणे हे अशक्य होते. यावरून पत्रलेखनाचे तत्कालीन राजकीय जीवनातील महत्त्व अधोरेखित होते. त्यामुळे राजकीय जीवनाचा आशय पत्रांमधून येणे ही अपरिहार्य ठरते.

### २.२.५.१.२ समाज जीवन

छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्य निर्माण केले. तत्कालीन परकीय राजवटींनी लोकांच्या रूढी, प्रथा, परंपरा, सामाजिक संस्था, दैवते यावर आक्रमण केले होते. समाजातील दैवतविचार, उत्सव, जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, रूढी, प्रथा, परंपरा, विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था, सामाजिक आचार-विचार इत्यादी सर्व घटक हे समाजाचे अंग होते. या घटकांविषयीचे तत्कालीन महाराष्ट्रातील मराठी माणसाचे अस्सल जीवनानुभव पत्रव्यवहारातून आविष्कृत झाले आहेत. धर्मनिष्ठा, ईश्वरनिष्ठा यांचा लोकजीवनावर प्रभाव होता. स्वामिनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती ही तत्कालीन समाजाची मूल्ये हाती. समाजात श्रद्धाभाव जागृत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील नैतिक मूल्यांचे रक्षण केले आणि सामाजिक न्यायनीतिचा आदर्श घालून दिला. राजकीय सत्तागटांचे संघर्ष आणि समाजरचनेतील दोष यामधून उद्‌भवलेले सामाजिक आणि कौटुंबिक कलह यांच्या आधाराने पत्रांमधून आलेल्या मजकुरातून तत्कालीन सामाजिक व्यवहारांचा आशय येतो.

राज्यकारभारविषयक पत्रव्यवहारामध्ये न्यायनिवाड्यांचा आशय येणे स्वाभाविक आहे. राजा, प्रजा, राजसत्ता, त्यांचा पराक्रम, राज्याची शासन व्यवस्था इत्यादींचे वर्णन पत्रसाहित्यातून आले आहे. राज्यकारभार चालवायचा म्हणजे राज्यातील न्यायव्यवस्थाही पाहावी लागते. यासाठी राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानमंडळाची निवड करताना त्यामध्ये स्वतंत्र न्यायाधीशाचीही नेमणूक केली होती. अंतर्गत कलह, फितुरी, दगाबाजी, युद्धात किंवा लुटीत सापडलेल्या स्त्रिया यांच्या बाबतीत राजे स्वतःच निवाडे करत

असत. कारण, राज्याची मूल्यव्यवस्था शाबूत राहावी आणि राज्याच्या शत्रूंच्या हाती काही लागू नये, हा हेतू त्यामागे होता. काही वेळा परंपरागत ज्या वृत्ती किंवा आचार्यपण चालत आलेले असे त्यामध्ये देखील हक्कावरून वाद होत, याविषयीच्या निवाड्यांचा आशयही पत्रांमधून आला आहे. गुरव हा तत्कालीन समाजजीवनात गावातील देवळाची परंपरेने झाडलोट व देवपूजा करणारा बलुतेदार असे. सणाच्या दिवशी पत्रावळी, बेल पुरविण्याचे काम गुरव करत असायचा. देवळात होणाऱ्या कथाकीर्तनाला लोकांना बोलावणे, कीर्तनात व भजनात मृदंग वाजवणे, इत्यादी कामे त्याला करावी लागत. त्या बदल्यात त्याला ओवाळणी दिली जात होती. याशिवाय शेतकऱ्याकडून त्याला काही उत्पन्न धान्याच्या स्वरूपात दिले जात होते. याशिवाय नैवेद्य, देवापुढील उत्पन्न, पात्रांचे उत्पन्न व नवस इत्यादींमधूनही त्याला उत्पन्नाचा वाटा मिळे. त्यामुळे गुरवपणाविषयी भाऊबंदकी व्हायची. जेजुरीचा गुरव पुजारी श्री मार्तंड भैरव याला पाठविलेल्या पत्रातून गुरवपणाचा हक्काविषयीचा निवाडा मातोश्री जिजाऊंनी केल्याचा मजकूर आला आहे. ''गुरवातील मिरासीचा गरगसा होता. त्याचा निवाडा मातुश्री (जिजाबाई) साहेबी करून सलासा कारणे कौल दिधला आहे.'' (पत्र क. ६४१, पृष्ठ क्र. १८१) यावरून तत्कालीन समाजजीवनातील गुरव समाज हा पुजाऱ्याचे काम करीत असल्याचे समजते. धर्मपीठाच्या पुजेच्या व वृत्तीच्या हक्कावरून होणारे वाद हाही तत्कालीन समाज जीवनात घडत असल्याचा मजकूर पत्रामधून आला आहे. ''बाबदेभट ब्रह्मे व त्रिंबकभट राजगुर काा माा यास आचार्याच्या वृत्तीचे भांडण होते... हरदोजण हुजूर आले. त्रिंबकभट राजगुर एथे, दिव्य केले तो खोटा जाला. त्याचा भाऊ भोजभट राजगुरू एथे होता. तो एथून पळाला आहे.'' (पत्र क्र. ६४५, पृष्ठ क्र. १८१) सदर मजकुरातून बाबदेभट आणि त्रिंबकभट राजगुर यांच्यातील आचार्यवृत्तीबद्दलच्या भांडणाचा आशय आला आहे.

शिवकाळात सरंजामी समाजजीवनाची परंपरा टिकून होती. यातून उद्भवलेले सामाजिक कलह पत्रांमधून आले आहेत. तत्कालीन समाज जीवनात आपल्या परंपरागत हक्काविषयी भांडणं होत होती याचे वर्णन पत्रांमधून आले आहे. तत्कालीन समाज जीवनात गुरवपण, आचार्यवृत्ती, पुजारी, गावकुलकर्णी इत्यादींचे परंपरागत ठरवून दिलेले काम त्या त्या जातीतील किंवा समाजातील लोकांना करावे लागत असे. त्यामध्येही कुळाचे, भाऊबंदकीचे हक्काविषयी वाद होत असत. हे वाद मिटवण्याचे काम मातोश्री जिजाऊही करत होत्या याचा संदर्भ पत्रातून आला आहे.

यावनी अमलाखाली असणाऱ्या प्रदेशातील समाज जीवनात मोठा हाहाकार माजल्याचे संदर्भ पत्रांमधून आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी समस्त ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य व शूद्र जाती, जमेदार, वतनदार तसेच सर्व जातीतील रयतेला उद्देशून लिहिलेल्या पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर आला आहे. ''हिंदु जातींत अनादि परंपरागत धर्मशास्त्राप्रमाणे धर्म चालत आले असता अलीकडे काही दिवसांत येवनी आमल जाहल्यामुळे काहीं जातीतील लोकांस बलात्कारे धरून भ्रष्ट केले व कित्येक जागीची दैवते जबरीने छिन्नभिन्न केली. हिंदु जातीत हाहाकार जाहाला.'' यवनांचा अमल जाहल्यानंतर हिंदुंच्या समाज जीवनातील मंदिरे, दैवते, परंपरा, श्रद्धा, रूढी यांच्यावरील आक्रमणाबरोबर स्त्रियांवरही अन्याय, अत्याचार होऊ लागला, याविषयीचा आशय प्रस्तुत पत्रातील मजकुरातून आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील राजकीय परिस्थिती ही अस्थिर आणि धगधगीची होती. मुघलशाही, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही यांच्याशी सातत्याने संघर्ष करत स्वराज्य उभे केले होते. हा संघर्ष करत असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सामाजिक संस्था टिकवून ठेवण्याचे काम केले. त्याबरोबरच सामाजिक मूल्यव्यवस्थेचे संरक्षण करून सामाजिक न्यायव्यवस्था बळकट करण्याचे काम केले. वतनसंस्थांचा स्वराज्य वाढविण्यासाठी उपयोग केला. वतनदार हा कर्तबगार व निष्ठावंत असला पाहिजे, अशी छत्रपती शिवाजी राजांची भावना होती. एकूणच तत्कालीन समाजातील श्रम विभागणीचे स्वरूप हे देशमुख, कुलकर्णी, पाटील, वतनदार कुणबी, बारा बलुतेदार या वतनदारांमधील सबंधांनी बनलेले होते. याविषयीचा आशय पत्रांमधील मजकुरातून स्फूट स्वरूपात आलेला दिसतो.

### २.२.५.१.३ धार्मिक जीवन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रसाहित्याच्या काळाचा विचार केल्यास या काळातील समाजजीवनावर धार्मिकतेचा पगडा होता, हे लक्षात येते. परकीय राजवटींमुळे धर्मभावना तीव्र स्वरूपाची होती. स्वधर्माविषयी अभिमान होता. धर्माच्या नावाखाली सर्व एकोप्याने राहू शकत होते. समाजातील वृत्तीप्रवृत्ती, चांगले-वाईट, नीती-अनीती यांना धर्माचे अधिष्ठान प्राप्त झाल्यामुळे संपूर्ण मानवी जीवन धर्माच्या नियंत्रणात होते. राजा, प्रधान, सावकार, वतनदार, प्रजा, सरदार, सेनापती, शिपाई, कारकून अशा सर्वांच्या जीवनव्यवहार, जबाबदारी आणि कार्ये यांवर धर्माचे नियंत्रण होते. त्यामुळे दानधर्म, अनुष्ठान, मंगलस्नान, पाप-पुण्याविषयीच्या लोकधारणा, आशीर्वाद, ओवाळणी, पूजाअर्चा, दत्तक विधान, विधी, अभिषेक, चांगली-वाईट वर्तणूक इत्यादींविषयीच्या पत्रातून आलेल्या मजकुरातून तत्कालीन धार्मिक जीवनाचा आशय आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपदे भट ढेर्गे, त्र्यंबकेश्वर यांना लिहिलेल्या पत्रात दक्षिणा देण्याचा मजकूर आला आहे. ''श्रीचे तीर्थ उपाध्यपण तुम्हास पूर्वीपासून दिले आहे ऐसीयास श्रीची पूजा नैवेद्य व ब्राह्मण भोजन-दक्षणा मोईन सालिना होनु पातशाही ६० श्रीची पूजा व नैवेद्य व नित्य दक्षणा ४० दक्षणा ब्राह्मण अभिषेक असे १०० केले असेत.''(पत्र क्र. २७२१, पृष्ठ क्र. २२८) ब्राह्मणास दक्षिणा देणे हे धार्मिक कार्य समजले जाई. दान धर्म मानला जाई. ब्राह्मण वर्गाला दान देणे, दक्षिणा देणे यामुळे पुण्य लाभते अशा प्रकारची तत्कालीन समाजातील धारणा होती, याचा आशय पत्रांमधून आला आहे. दक्षिणा देण्याबरोबरच अन्नदान करणे हेदेखील पुण्याचे कार्य समजले जाई. छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरुषोत्तम सोमयाग भट (बुरडी) यांना लिहिलेल्या पत्रात अन्नछत्रास केलेल्या मदतीचा उल्लेख आहे. ''आम्ही श्रीस ४२० होन नेम केला. पैकीं श्रीस ३० व तुम्हास ३० अन्नछत्रास ३६० होन.'' छत्रपती शिवाजी महाराज दरवर्षी ठरलेली मदत अन्नछत्रास देत असावेत हे या मजकुरावरून ध्यानात येण्यास मदत होते. पत्रांमधून आण किंवा शपथेचा उल्लेख आला आहे. सोपानदेव यांच्या सासवड येथील समाधीस्थळी दिवाबत्ती, तेल, नैवेद्य यासाठी केलेली तरतूद आणि नित्यनेमाने दरसाल चालू ठेवण्यासाठी पत्रातून सांगितले आहे. यामध्ये जो कोणी आडकाठी आणेल त्याला आण घातली आहे ती अशी, ''दरसाल चालवणे ताजा खुर्दखताचा उजूर न करणें हिंदू होऊन इस्कील करील त्यास गाईची आण आसे व मुसलमान होऊन इस्कील करील त्यास सोराची

आण आसे येणेंप्रो चालवणें.'' (पत्र क्र. १४२१, पृष्ठ क्र. २२४) आण किंवा शपथ देणे, बेलभाक करणे, कुलाचार चालविणे, अन्नछत्र चालविणे, दानधर्म करणे, दक्षिणा देणे, पूजाअर्चा करणे इत्यादींविषयीच्या पत्रामधून आलेल्या मजकुरातून शिवकालीन धार्मिक जीवनाचे दर्शन घडते. धर्मार्थ खर्च करण्याची पद्धती त्यावेळी रूढ होती याची कल्पना यावरून येते. पापपुण्यविषयक कल्पना या आपल्या कर्तव्यनिष्ठेशी आणि प्रामाणिकपणाशी जोडलेल्या होत्या. सर्जेराव देशमुख यांना लिहिलेल्या पत्रातील मजकुरावरून हे लक्षात येते. ''जेथे गनिमाचा अजार पहुचेना ऐशा जागियासि त्यासि पाठविणे, ये कामास हैगै न करणे-रोखा अहडताच सदरहू लिहिल्याप्रमाणे अमल करणे-ऐसियासि तुम्हापासून अंतर पडलियावरी मागेल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचे माथा बैसेल.'' शत्रू पोहचणार नाही अशा जागी लोकांना पाठवा. याकामात तुम्ही हयगय केली आणि शत्रूच्या हाती लोक लागले, त्यांना पकडून नेले तर त्याचे पाप तुमच्या माथ्यावर येईल, असे छत्रपती शिवरायांनी देशमुखांना पत्रातून सांगितलेले दिसते. रयतेप्रती असलेली जबाबदारी चोखपणे पार पाडणे म्हणजे पुण्याचे काम आणि ती गोष्ट नीट नाही पार पाडली आणि त्यातून काही विपरित घडले तर त्याचे पापही आपणास लागेल, असा कर्तव्यनिष्ठेविषयी जोडलेला धार्मिक भाव व्यक्त होतो.

पत्रव्यवहारातून आलेल्या अनुष्ठान, दानधर्म, अन्नछत्रे, दक्षिणा देणे, पूजाअर्चा करणे, पापपुण्याच्या कल्पना इत्यादी धार्मिक घटकांबरोबरच सांप्रदायिकता व भक्तीविषयक काही घटकांमधूनही धार्मिक जीवनाचा आशय आलेला दिसतो. दमसाजी नरसाला सर हवलदार महाल इमारती किल्ले महिपतगड यांना लिहिलेल्या पत्रामध्ये श्रीरामदास महाराज गडावर येणार असून त्यांना गडावर घेण्याविषयी पत्रातून संदेश दिला आहे. ''श्रीरामदास शिवतरी राहताती. सांप्रत ते गडावर रहाण्यास येतील, तरी त्यांचे लोकांस गडावर घेणे व हरएक खबर घेणे.'' (पत्र क्र. १८६४, पृष्ठ क्र. २२४) या पत्रातील मजकुरातून श्रीरामदास महाराज व त्यांच्या लोकांना गडावर घेण्याविषयी सांगून त्यांची हरएक खबर घेणे म्हणजे त्यांना हवेनको ते पाहण्याविषयीचा संदेश दिलेला आहे. याप्रमाणेच त्रिंबक गोपाल यास लिहिलेल्या पत्रामध्ये ''रा. वासुदेव गोसावी वाा मठ मौजे कान्हेरी ताा निथरडी हे पनाळियास येऊन स्वामीचा भाग्योदय सांगितला. तरी मांढरदेवी मठ येथे बिघे ४, कन्हेरीस बिघे ७ असे पाटस्थळ बिघे ११ दिले. ते गोसावी सुखरूप असे तोंवरी चालविणे.'' (पत्र क्र. २१०५, पृष्ठ क्र. २०९) असा मजकूर आला आहे. वासुदेव गोसावी या स्वामींनी पन्हाळ्यास येऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा भाग्योदय यांगितला म्हणून त्यांना मांढरदेवी मठ येथे चार बिघे आणि कन्हेरीस सात बिघे अशी अकरा बिघे जमीन दिली असा सदर मजकूर आहे. यातून छत्रपती शिवाजी महाराजांची सांप्रदायिकता व भक्ती याचा परिचय होतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी संत रामदासांना लिहिलेल्या एका पत्रामधून शिवरायांची सांप्रदायिकता आणि भक्ती समजून घेण्यास मदत होते. ''चरणरज शिवाजीराजे यांनी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे, मजवर कृपा करूनु सनाथ केले. आज्ञा केली की, तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करूनु, धर्मस्थापना, देव ब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावें. हे व्रत संपादून पुरुषार्थ करावा. तुम्ही जे मनीं धराल तें श्री सिद्धीस पावतील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरूक लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करूनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळे दुर्घट करावी, ऐसे जें जें मनी धरले तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले.'' सदर मजकुरावरून छत्रपती

शिवरायांना संत रामदासांनी दिलेल्या आशीर्वादाचा आशय आला आहे. याच पत्रात पुढे संत रामदासांचे वारंवार दर्शन घडावे. श्रीची स्थापना होऊन संप्रदाय, शिष्य वाढावे आणि भक्ती दीर्घकाळ घडावी अशी प्रार्थना केल्याचा उल्लेख आहे. यातून तत्कालीन धार्मिक जीवनात सांप्रदायिक भावना व भक्ती श्रद्धेशी जोडलेल्या होत्या हे समजते आणि श्रद्धा-समजुती यांनी धार्मिक जीवन व्यापलेले होते, याचा दाखला मिळतो.

### २.२.५.१.४ सांस्कृतिक जीवन

धार्मिक जीवनाप्रमाणेच सांस्कृतिक जीवनाचा आशयही पत्रांमधून आला आहे. माणसाच्या जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती. ती समाजनिर्मित असते. वस्तूरूप आणि मनोमय अशा दोन्ही स्वरूपाच्या माणसाच्या निर्मितींचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. खाण्यापिण्याच्या पद्धती, पोशाख, विवाह पद्धती, सण, उत्सव, यात्रा, श्रद्धा, मूल्ये, नियमने इत्यादींचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. सण, उत्सव, यात्रा, यावेळी खेळले जाणारे खेळ यांच्या वर्णनातूनही तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. लग्न, लग्नातील वेगवेगळ्या पद्धती, सण, उत्सव, खेळ, खानपान, पोशाख, किल्ल्याचे बांधकाम, वाड्याचे बांधकाम, देवालयांचे बांधकाम, पराक्रमानंतर दिली जाणारी शाबासकी, मानापमान, रीतीरिवाज इत्यादींमधून तत्कालीन मराठ्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. दत्ताजीपंत वाकेनिवीस यांना लिहिलेल्या पत्रामधून चाफळ येथे भरणाऱ्या यात्रेचा उल्लेख पुढीलप्रमाणे आला आहे, ''चाफळ येथे यात्रा भरते, महोत्छाह चालतो. तेथे कटकीचे सिपाही व बाजे लोक देवाची मर्यादा चालवीत नाहीत. यात्रेकरूस तसवीस देताती. दिवाणबले कलागती करताती. तरी तुम्ही अंगे जातीने जाऊन तसवीस उपद्रव होऊ नेदेणे'' (पत्र क्र. १४८६, पृष्ठ क्र. १९८) यावरून चाफळ येथे भरत असलेल्या यात्रेविषयीचा आशय व्यक्त होतो. तत्कालीन गावोगावी होणाऱ्या यात्राखेत्रा या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग होते. जातपात न मानता चाललेल्या रितीरिवाजाप्रमाणे वर्तन करणे हे तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे वैशिष्ट्य होते. राघो बल्लाळ सुभेदार यांना लिहिलेल्या पत्रामध्ये मशीदीवर तेल रोषणाई करण्याच्या आलेल्या मजकुरावरून याचा प्रत्यय येतो. ''महाराज साहेबांचे वेळेस भोगवटा चालिला असेल व अफजल (खान) मारिला त्याचे आधी साहेब पुण्यास असतां, ते वेळेस भोगवटा चालिला असेल, तेणेप्रमाणे तहकीक करून मनास आणून, इनाम व रोजमुरा व बाजे हक्क जे असेल ते भोगवटाप्रमाणे दुमाला करणे, व मशीद गांवगन्ना तेल रोषनाई चालत आले आहे तेणेप्रमाणे देणे.''(पत्र क्र. १६१६, पृष्ठ क्र. २०२) हा मजकूर तत्कालीन राजकीय संस्कृतीचा उत्तम नमुना आहे. अफजल खानाला मारले त्याच्या अगोदर जसा रितीरिवाज होता त्याप्रमाणे मशीदीवर रोषनाई करावी व त्यांच्या भोगवट्याप्रमाणे तरतूद करून तो रितीरिवाज कायम चालवावा हा संदेश या मजकुरातून दिला आहे. यावरून असे म्हणता येते की, छत्रपती शिवाजी महाराजांची लढाई कुठल्याही धर्माविरूद्धची किंवा जातीविरूद्धची लढाई नव्हती तर ती आपल्या भूप्रदेशावर ऐतद्देशीयांचे राज्य निर्माण व्हावे यासाठीची लढाई होती. तत्कालीन मराठी लोकांच्या सांस्कृतिक जीवनातील श्रद्धा, मूल्ये, रितीरिवाज, सण, उत्सव, मंदिरे, किल्ले हे सर्व म्हणजेच अभौतिक आणि भौतिक अशा दोन्ही स्वरूपाचे सांस्कृतिक जीवन अबाधित राहावे यासाठीची लढाई होती, याविषयीचा आशय अनेक पत्रांमधून आला आहे. एखादी सोपवलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडल्यावर त्याबदल्यात बक्षीस

देण्याची संस्कृती छत्रपतींच्या काळात होती. ''साहेब अगराहून निघालेया उपरी चिरं. रा. संभाजी राजे यास राजश्री कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळी केले. मानइले चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. मानइलेची मातुःश्री आआईजी-बंदिली. मा. काशी त्रिमळ हेहि बरोबर आलियाबद्दल मेहरबानीचे बकषीस द्यावयाचा तह मा पन्नास हजार रुपये रास मा काशी त्रिमय २५००० व मातुश्री आईजी २५००० येणेप्रमाणे पाववावे.'' (पत्र क. १४५८, पृष्ठ क्र. १९९) छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून निघाल्यानंतर सोबत असलेल्या छत्रपती संभाजी राजांना घेऊन राजगडावर सुखरूप नेण्याची जबाबदारी कृष्णाजी विश्वासराव यांच्यावर सोपवली होती. त्यांच्यासोबत त्यांची आई आणि काशी त्रिमळ हेदेखील होते. त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांना सुखरूप राजगडावर पोहचविले आणि सोपविलेली जबाबदारी चोख पार पाडली याबदल्यात त्यांना पन्नास हजार कृष्णाजी विश्वासराव यांना आणि आईजी व काशी त्रिमळ हे सोबत होते म्हणून त्यांना प्रत्येकी पंचवीस हजार बक्षीस दिल्याचे या पत्रातून समजते. एखाद्याकडून काही किरकोळ स्वरूपाचा गुन्हा घडला असेल आणि तो माणूस आपल्या स्वराज्याच्या कामी महत्त्वाचा असेल तर त्याचा गुन्हा माफ करून त्याच्यामध्ये पुन्हा विश्वास निर्माण करण्याची संस्कृती त्या काळात होती याचा दाखला पत्रांमधून मिळतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी हैबतराऊ सिलंबकर देशमुख यांना लिहिलेल्या पत्रामध्ये ''आजीतागायेत जो काय गुन्हा तुम्हापासुनु जाहला असेली तो तमाम माफ केला आसे. तुम्ही कोण बाबे शक व अंदेशा न करिता खातिरजमा करून बेशक होऊन येणे. साहेबांची भेटी घेणे. तुमच्या जीवास खता होणार नाही. ये बाबे श्री (साहेबा) ची मातुश्री साहेबांची आण असे व श्री-वरील बेल श्री-खंडाची भाक व रोटी व माल यैसे पाठविले असे ते घेणे.'' (पत्र क्र. १४६०, पृष्ठ क्र. १९९) असा मजकूर आला आहे. याचप्रमाणे हैबतराव देशमुख यांना लिहिलेल्या पत्रातही मनात कोणताही शक न धरण्याविषयीचा मजकूर आला आहे. ''कोणेहि गोष्टीचा शक न धरणे. तुमचे हजार गुन्हे माफ आहेती. तुम्हासी आम्ही कांहीहि वाईट वर्तणूक करूं तरी आम्हास महादेवाची आण असे व आईसाहेबांची आण असे.'' यावरून मनामध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी रितीरिवाज, श्रद्धा, परंपरा यांचा उपयोग येथे करून घेतला जात असावा याचा प्रत्यय येतो. आण घेणे, इनाम देणे, बक्षीस देणे, मान देणे, इज्जत देणे इत्यादींविषयी पत्रांमधून आलेल्या मजकुरातून तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते.

### २.२.५.१.५ पर्यावरण आणि ऋतूवर्णन

पत्रव्यवहारामधून सांस्कृतिक जीवनाप्रमाणेच पर्यावरण व ऋतू यांचेही वर्णन ओघात आले आहे. पत्रलेखनाचे मुख्य विषय हे तत्कालीन मानवी जीवनाभोवतीच फिरत असलेले दिसतात आणि मानवी जीवन हे आपल्या भोवतालच्या पर्यावरणाने भारलेले असते. काळ आणि परिस्थिती मानवी जीवनाभोवती नियंत्रणाचे वर्तुळ तयार करत असते. पत्रसाहित्यातील आशयाचा विचार करताना पत्रांमधून तत्कालीन पर्यावरण आणि ऋतू यांचे वर्णन आले आहे, हे लक्षात येते. युद्ध, मोहिमा, शत्रूंचा वेढा हे बऱ्याचदा दीर्घकाल चालायचे. शत्रूची वाट पाहावी लागायची. एखाद्या किल्ल्याभोवतीचा वेढा महिने दोनमहिने चालायचा. युद्धाच्या बाबतीतही युद्ध किती दिवस चालेल हे सांगता यायचे नाही. त्यामुळे रात्र, दिवस, पौर्णिमा, अमावस्या, पावसाळा, हिवाळा, उन्हाळा, दुष्काळ इत्यादींचा परिणाम युद्धावर व्हायचा. काही वेळा यांच्या आधारानेही

युद्ध केले जायचे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीत जेवढा वाटा पराक्रमी सरदार, सेनापती मावळ्यांचा आहे तितकाच महत्त्वाचा वाटा इथल्या डोंगरकपारी, दऱ्याखोऱ्यांचा, इथल्या निश्चित कालखंडातील ऋतूंचा आहे. त्यामुळे पत्रसाहित्याच्या आशयाचा विचार करताना पर्यावरण आणि नैसर्गिक ऋतू यांचा विचार करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी दाभोळच्या जुमलेदार, हवलदार व कारकून यांना लिहिलेल्या पत्रामध्ये ''दाभोळच्या सुबे यांत पावसाळ्याकारणे पागेस सामा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणा आसपास विलातितील लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरिता हाल कांहीएक उरला नाही. ऐसे असतां, वैशाखाचे वीस दिवस उनाळा, हेहि पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर जाले. त्याकरिता कारकुनाकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसीतैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोवरी धुंदी करून चाराल, नाहींसे जाले म्हणजे मग कांही पडत्या पावसांत मिळणार नाहीं, उपास पडतील, घोडी मरायास लागतील.'' (पत्र क्र. १३९२, पृष्ठ क्र. १९७) या पत्रातील मजकुरावरून पावसाळा, वैशाख उन्हाळा यांचा उल्लेख आला आहे आणि त्यासोबत आलेल्या इतर मजकुरावरून त्यावेळच्या पर्यावरणाचाही अंदाज येण्यासासारखा आहे. पावसाळा सुरू होण्याअगोदर गडावर घोड्यांचा लागणारा चारा जपून वापरण्याविषयीचा हा मजकूर आहे. उन्हाळ्यातच चाऱ्याचा साठा व्यवस्थित करून ठेवला जाई किंवा उपलब्ध चारा जपून वापरला जाई. कारण, पावसाळ्यात पडत्या पावसात बाहेर पडून चारा आणणे शक्य होण्यासारखे नसावे याचा अंदाज येतो.

### २.२.५.१.६ कौटुंबिक जीवन

ऐतिहासिक पत्रव्यवहाराचे राज्यकारभारविषयक पत्रव्यवहार आणि खाजगी किंवा कौटुंबिक पत्रव्यवहार असे मुख्य दोन भाग पडतात, याविषयी सुरुवातीला विचार केला आहेच. यापैकी कौटुंबिक स्वरूपाच्या पत्रांमधून कौटुंबिक जीवनाचा आशय येणे साहजिकच आहे. लग्न, जन्म, मृत्यू, कारभाराचे हस्तांतरण, वारस, दत्तक, नातेसंबंध, गृहकलह इत्यादींमधून कौटुंबिक जीवनाचा आशय पत्रांमधून आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यंकोजीराजे यांना लिहिलेल्या पत्रामधून कौटुंबिक जीवनाचा आशय आला आहे. व्यंकोजीराजे यांच्या तब्येतीविषयी आणि त्यांनी पत्करलेल्या वैराग्याविषयी काळजी करणारे भाव व्यक्त झाले आहेत. त्याचबरोबर आपल्या भावाने वैराग्य सोडण्याविषयी समजावणीचा स्वरही त्या पत्रामधून व्यक्त झाला आहे. त्या पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व्यंकोजीराजे यांना सांगतात की, ''तुम्ही आपले ठायी उदासवृत्ति धरून पहिलेसारखे आपले शरीरसंरक्षण करीत नाही. सणवार उत्सवादिक हेहि करीत नाही. वैराग्य धरिले आहे. एखादे तीर्थीचे बसून कालक्रमणा करू ऐशा गोष्टी सांगता, म्हणून विस्तार लिहिले होते तरी या गोष्टी आम्हास बहुत अपूर्व वाटल्या की, कैलासवासी स्वामींनी कसे प्रसंग संवारून उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला. ते सर्व तुम्हीं जाणतां. त्यांच्या सहायतेस त्यांच्या बुद्धि युक्ति सर्वही तुम्हास उपतिष्ठोन त्यापासून शहाणे जाले आहां. त्या उपरि आम्हीहि जे जे प्रसंग पडले ते निर्वाह करून कोणे तऱ्हेने राज्य मिळविलें हें जाणतां व देखत आहां. असे असोन तुम्हाला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याचमध्ये आपल्या संससाराची कृतकृत्यता मानून नसतें वैराग्य मनावरी आणून कार्यप्रयोजनाचा उद्योग सोडोन

लोकांहाती रिकामेपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें व आपल्या शरीराची उपेक्षा करणें. हे कोण शहाणपण व कोणती नीति? व आम्ही तुम्हास वडील मस्तकी असतां चिंता कोणे गोष्टीची आहे? या उपरि सहसा वैराग्य न धरिता मनांतून विषण्णता (काढून) कालक्रमणा करीत जाणे.'' (पृष्ठ क्र. १८७) या पत्रामधून छत्रपती शिवाजी महाराज आपला लहान भाऊ व्यंकोजी राजे वडीलभाऊ या कौटुंबिक नात्याने आधार देतात. त्यांना आपल्या वडिलांपासून आपण कसे प्रतिकूल परिस्थितीवर मात करत राज्य निर्माण केले याचा दाखला देत, उदासवृत्ती सोडून आपले राज्य वाढविण्याचा आणि तब्येतीकडे लक्ष देण्याचा सल्ला देतात. आपला हात तुमच्या मस्तकी असता तुम्ही कोणत्याही गोष्टीची चिंता करू नये असा भक्कम पाठिंबा असणारा भाव ते व्यक्त करतात. यातून छत्रपती शिवरायांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन घडते, तसेच कौटुंबिक कलहाचे दर्शन देखील त्यांच्या पत्रांमधून घडते. इ. स. १६७६-७७ मध्ये व्यंकोजीराजे यांना लिहिलेल्या पत्रामध्ये शहाजीराजांच्या मृत्यूनंतर संपत्तीमधील अर्धा वाटा देण्याविषयीचा मजकूर आला आहे. या पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात, ''कैलासवासी साहेबों कैलासवास केला त्यास आजी तेरा वर्षे जाली. महाराजाचे पैके व जडाव व हाती व घोडे व मुलूख अवघेहि रा. रघुनाथपंती तुम्हाला राज्यावरी बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हाती दिल्हे. यैसियास आमचा अर्ध वांटा तेरा वर्षें तुम्हीच खादला. आम्ही जरी तुम्हाजवळी मागावे तरी बहुत दूर होतो. बऱ्या बोले तुम्ही देणार नव्हां. म्हणून तेरा वर्षे सबूरी केली. मनामध्ये ऐसा विचार केला की, बरे महाराजांचे पुत्र तेही आहेत. खाती तोवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समई आम्हाला फावेल ते समई आम्ही वेव्हार सांगोन घेऊन. यैसे मनीं धरून होतो.'' व्यंकोजी महाराजांकडे असलेली संपत्ती ही आपल्याच भावाकडे आहे. तेही शहाजीराजांचे पुत्र आहेत. जोवर खातात तोवर खाऊद्या. असा तेरा वर्षांचा काळ सबुरीने गेला. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा व्यवहाराने आपला वाटा आपण घेऊ, असे छत्रपती शिवराय मनात धरून होते. याच पत्रात पुढे दोघांमध्ये वाटणीवरून युद्ध झाल्याचा प्रसंग सांगितला आहे. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात, ''तुमचे लोक चालून आल्यावरी तुमच्या आमच्या लोकांत थोर झगडा जाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवाजी राजे व शिवाजी दबीर यैसे तिघे धरिले व कितीयेक लोक मारिले, कितीयेक पलोन दाणादाण होऊन गेले. यैसा समाचार आआइकिला. हे ऐकोन बहुत नवल यैसे वाटले की, कै. महाराज त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, यैसे असोन कांहीं विचार करीत नाहीं व धर्माधर्म विचारीत नाहीं. येसे असता कस्टी व्हाल याचे नवल काये? तुम्ही म्हणाल कीं, काये विचार करावा? तरी यैसा विचार करावा होता कीं, अधर्मेकडून तेरा वर्षे आपण सारे राज्य खादले ते खादले. आता, अर्धा वांटा मागतात तो त्यांचा त्यांला द्यावा, आणि आपण सुखे रहावे. अैसा विचार करावा होता.'' (पत्र क्र. २३३२, पृष्ठ क्र. २१३) छत्रपती शिवाजी महाराज आपल्या कुटुंबाप्रती जिव्हाळ्याने वागत होते. परंतु, जेव्हा स्वराज्याचा प्रश्न असे तेव्हा मात्र ते नीती आणि धर्माने वागत. त्यासाठी मग समोर कुटुंबातील माणूस असला तरी जे न्यायाचे आणि नीतीचे असेल तेच धोरण ते अवलंबत होते. त्यामुळे कौटुंबिक कलह झाला तरी त्याला धैर्याने तोंड देत होते, याचा प्रत्यय उपरोक्त पत्रातील मजकुरावरून येतो. याबरोबरच वृत्तीविषयी किंवा आचार्यपणाविषयीचे कलह, सुखदुःच्या घटना व त्याविषयीचे निरोप देणारी पत्रे, घरातल्या माणसाची काळजी घेतल्याबद्दल दिली जाणारी बक्षीसे, इनाम, जन्ममृत्यूची माहिती देणारी पत्रे, न्यायनिवाड्याची पत्रे इत्यादींमधूनही कौटुंबिक जीवनाचा आशय येतो.

### २.२.५.२ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील अभिव्यक्ती

पत्रसाहित्यातील आशयाचा विचार केल्यानंतर प्रस्तुत ठिकाणी अभिव्यक्तीचा विचार करू. साहित्यातील आशय आणि अभिव्यक्ती या खरेतर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. लेखकाने काय सांगितले आहे? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे आशय. त्याप्रमाणे लेखकाने जे सांगायचे ते कसे सांगितले आहे? या प्रश्नाच्या उत्तरात अभिव्यक्ती सापडते. कसे सांगितले आहे या प्रश्नाचे उत्तर लेखकाच्या सांगण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. सांगण्याची पद्धत बदलली की अभिव्यक्ती बदलते. एकच आशय वेगवेगळ्या पद्धतीने सांगता येऊ शकतो. ही सांगण्याची पद्धत म्हणजे कथनपद्धती. पत्रांचा मूळ हेतू हा संदेश पोहचविणे हा असतो. हा संदेश देताना काही वेळा सांकेतिकता वापरलेली असते तर काही वेळा थेट विषयालाच हात घातलेला असतो. बऱ्याचदा पत्रातील अभिव्यक्तीला ज्या व्यक्तीला पत्र लिहायचे आहे त्या व्यक्तीने अगोदर लिहिलेल्या पत्राच्या उत्तराचे स्वरूप असते. पत्रांमधून सूचना, आज्ञा, सल्ला, निवाडा, काळजी, कौल, आशीर्वाद, बरेवाईटाची खबर इत्यादींची अभिव्यक्ती होते. ही अभिव्यक्ती पत्राचे बहिरंग असते. पत्राच्या अंतरंगाचा विचार केल्यास पत्रलेखकाचे विचारसौंदर्य, चिंतनशीलता, भावनासौंदर्य, पत्रलेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि भाषासौंदर्य यांची अभिव्यक्ती होत असते. या सर्वांचा विचार छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्राच्या अनुषंगाने आपणास करावयाचा आहे.

#### २.२.५.२.१ विचारसौंदर्य व चिंतनशीलता

पत्रसाहित्याच्या आशयाभिव्यक्तीचा विचार करताना विचारसौंदर्य आणि चिंतनशीलता यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. विचार किंवा चिंतन हा लेखनाचा गाभा असतो. गद्यवाङ्मय हे विचार प्रकटीकरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे माध्यम असते. कोणत्याही लेखकाला लेखनविषयाच्या मांडणीसंदर्भात सुचणारा विचार किंवा तो करत असलेले चिंतन हे गद्य स्वरूपातच असते. त्यामुळे गद्य हा वाङ्मयप्रकार विचार किंवा चिंतन प्रकटीकरणासाठी लेखकाला जवळचा वाटू शकतो. पद्यापेक्षा गद्यातील विचार प्रकटीकरणाला मोकळीक व अर्थाला सरळता प्राप्त होते. जे सांगायचे आहे ते सरळ गद्यात मांडल्यामुळे अर्थाकलनाच्यादृष्टीने संदिग्धता राहत नाही. त्यामुळे जो लेखनविषय मांडावयाचा आहे त्याची मांडणी अर्थदृष्ट्या कशी झाली आहे, हे पाहणे म्हणजे विचारसौंदर्य किंवा चिंतन अभिव्यक्तीचा अभ्यास करणे होय. पत्रांमधील सुखदुःखाचे प्रसंग, नीतियुक्त आचरणाचे प्रसंग, प्रजारक्षणाचे प्रसंग, धर्माचरणाचे प्रसंग यासारख्या प्रसंगांमधून विचारसौंदर्य व चिंतनशीलता अभिव्यक्त होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून व्यंकोजी राजे यांना लिहिलेल्या पत्रामधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या ठायी असणारी चिंतनशीलता आणि विचारसौंदर्य अभिव्यक्त होणारा मजकुर पुढीलप्रमाणे, ''नसतें वैराग्य मनावरी आणून कार्यप्रयोजनाचा उद्योग सोडोन लोकांहाती रिकामेपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें व आपल्या शरीराची उपेक्षा करणें. हे कोण शहाणपण व कोणती नीति?'' (पृष्ठ क्र. १८७) तत्कालीन मराठ्यांच्या जीवनात नीतियुक्त आचरण कसे असावे याचा परिचय या पत्रातील मजकुरावरून होतो. आपले जे कार्य आहे ते आपण पूर्ण केले पाहिजे; ते सोडून कोणतेही काम न करता ऐतखाऊपणे लोकांनी दिलेलं खाणं म्हणजे अनीती ठरते, हा विचार छत्रपती शिवाजी

महाराजांच्या या पत्रातून अभिव्यक्त होतो. ज्यावेळी काम करून लौकिक मिळवण्याची आवश्यकता असते, त्यावेळी वैराग्यवृत्ती धारण करणे म्हणजे शहाणपणाचे लक्षण नाही हे या मजकुरातून अभिव्यक्त होते.

स्वराज्य हे रयतेचे राज्य आहे, त्यामुळे रयत सुखी तर राज्य सुखी हा विचार छत्रपती शिवाजी महाराजांचा होता. त्यामुळे स्वराज्यातील शेतकऱ्यास शेती कसण्यास जे काही लागेल ते देण्याची त्यांची वृत्ती होती. रामाजी अनंत सुबेदार यांना लिहिलेल्या पत्रातील हा मजकूर पाहा, ''ज्याला सेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, नांगर, पोटास दाणे नाही; त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दोचो बैलाचे पैके द्यावे. बैल घेवावे आणि पोटास खंडि दोन खंडि दाणे द्यावे, जे सेत त्याच्याने करवेल तितके करवावे. पेस्तर त्यापासून बैलाचे व गेल्याचे पैके वाढीदिढी न करिता मुदलच उसनेच हळुहळू याचे तवानगी माफीक घेत घेत उसल घ्यावा. जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे.'' (पृष्ठ क्र. १८५) आपल्या राज्यात कोणीही साधनांच्याविना अडून राहता कामा नये हा विचार शिवरायांचा होता. त्यामुळे शेतकऱ्यास बैल, नांगर अशी अवजारे घेण्यास रोख पैसे देण्याबरोबरच उपासमार होऊ नये म्हणून खंडी दोन खंडी धान्य देण्याचाही विचार छत्रपती शिवाजी महाराज करत होते. एवढेच नाही तर दिलेल्या गोष्टींचा वसूल करताना त्या शेतकऱ्याची तवानगी म्हणजे त्याची परिस्थिती सुधारली असेल तर त्याच्याकडून हळूहळू परिस्थिती सांभाळून जेवढी मुदल आहे तेवढाच वसूल करावा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार या पत्रामधून अभिव्यक्त झाला आहे. याच पत्रामध्ये चोरी न करावी, इमाने इतबारे साहेबकाम करावे, येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरुस्त वर्तणे यासारख्या वाक्यांमधून छत्रपती शिवरायांचे नेक विचार स्पष्ट होतात. काही लोक छत्रपती शिवरायांना न कळता गैरवर्तन करतात, त्याची बदनामी आपणावर न यावी असा विचार सांगणारा मजकूरही पत्रांमधून आला आहे. राज्यकारभार करताना लोकांना बरेवाईट बोलावे लागते. एखाद्याने असेच मनात अढी ठेवून काहीही कुणाविषयीही सांगितले तर त्यावर लगेच विश्वास न ठेवता त्याची चौकशी करावी आणि मग त्याच्यावर नामेहेरबानी म्हणजेच जी शिक्षा असेल ती करावी, असे छत्रपती शिवरायांचे विचार होते. निळोपंत मुजुमदार यांना लिहिलेल्या पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज सांगतात की, ''लोक गैरमाकूल आम्हास न कळत वर्तले तरी त्याची बदलामी आपणावरी न ठेवावी. आपण खुतूत गैरमाकूल सहसा वर्तणार नाही. काराभारामुळे दहा लोकासी बरेवाईट बोलावे लागत आहे. एकादियाने लटकेच काही सांगितले तरी ते गोष्टीची बरी चौकशी करावी. सांगितलियावरून मनात गैरमेहेरबानी न धरावी. वाजीपुसी करिता नेमस्त खुतूत तमा आढळली. मग जे नामेहेरबानी करणे ते करावी. लोक गैरमाकूल वर्तले तरी जो जैसे करील तो तैसा पावेल.'' (पत्र क्र. १३२९, पृष्ठ क्र. १९६) स्वराज्याचा विस्तार वाढलेला होता. अशा काळात त्या त्या प्रदेशातील स्थानिक कारभाराची जबाबदारी तिथल्या वतनदार, सरदार, देशमुख, पाटील यांच्याकडे दिलेली असे. त्यांच्याविषयी कुणाच्या मनात राग, लोभ निर्माण झाल्यास त्यांच्याविषयीच्या बऱ्यावाईट गोष्टी महाराजांना सांगितल्या जात असत. परंतु, महाराज अशावेळी विचाराने वागत आणि संयमाने ऐकून घेऊन सांगितलेल्या गोष्टीची चौकशी करून मग त्यावर कारवाई करत असत. उगाचच कोणीही काहीही सांगितले तर त्यावर विश्वास ठेवल्यास राज्यकारभार करणे अशक्य होईल याची जाणीव छत्रपती शिवरायांना होती. त्यामुळे ऐकीव गोष्टीवर विश्वास

ठेवण्यापेक्षा वास्तव तपासून मग कृती करण्यातून महाराजांची वैचारिकता आणि संयमी वृत्ती दिसून येते. त्याचप्रमाणे न्यायनिवाडा करताना घेतलेली न्याय व नीतिची बाजू, रयतेच्या रक्षणासाठी घेतलेली काळजी, शेतकऱ्यांप्रती असणारी सहानुभूती, त्यांना शेती कसण्यासाठी केलेली मदत, व्यंकोजीराजे यांना वैराग्यवृत्ती सोडण्यासाठी दिलेला सल्ला आणि वडीलभाऊ म्हणून दिलेला आधार, वडीलधाऱ्या माणसांना दिलेला आदरभाव, किल्ल्यावरील लोकांबरोबर, जनावरांच्याही वैरणपाण्याची घेतलेली काळजी, चुकीचे वर्तन करणाऱ्यास दिलेली ताकीद, जबाबदारी उत्तमरितीने पार पाडणाऱ्यास दिले जाणारे बक्षीस इत्यादींविषयीच्या पत्रांमधून आलेल्या मजकुरातून विचारसौंदर्य आणि चिंतनशीलता अभिव्यक्त होते.

### २.२.५.२.२ भावनासौंदर्य

भावनांची उत्कट अभिव्यक्ती हे ऐतिहासिक पत्रांच्या आशयाभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. भावना आणि कल्पना ही ललित साहित्याची मूलतत्त्वे आहेत. पत्रांमधून आलेल्या मानवी भावनांच्या उत्कट आविष्कारामुळे त्याला सौंदर्यात्मकता प्राप्त झाली आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा, कृतज्ञता, सुख, दुःख, आनंद, भीती, धीर, संयम, राग, लोभ, क्रोध, हास्य, प्रेम, चिंता, असूया, दया इत्यादी प्रकारच्या भावभावना मानवी मनात स्थित असतात. खरे पाहता भावनांचे वर्णन सहजासहजी करता येत नाही. त्या अमूर्त असतात. त्यामुळे साहित्यातून लेखक भावनिक संवेगांचे वर्णन करतो. या संवेगांच्या मुळाशी भावना असतात. विशिष्ट प्रकारची भावना व्यक्त करण्यासाठी पात्राच्या हावभावात, कृतीत विशिष्ट बदल दाखवले जातात, याला 'संवेग' असे म्हणतात. पत्रातील भावनासौंदर्य आणि इतर ललित साहित्यातील भावनासौंदर्य यामध्ये मूलभूत फरक आहे. पत्रामध्ये विशिष्ट हेतूने केलेले अतिशय लघु स्वरूपाचे लेखन असते. त्यामुळे पत्रांमधून आलेले व्यक्तित्व त्रोटक आणि कमी भाषिक अवकाशातून आलेले असते. त्यामुळे त्यांच्या भावनाही अतिशय त्रोटक व मोजक्याच स्वरूपात आलेल्या असतात. पत्र लिहिताना लिहिणाऱ्याचे किंवा ज्याला पत्र लिहावयाचे आहे त्याच्या मनातील भावना पोहचविणे हे पत्राचे मुख्य कार्य असते. पत्राच्या मुख्य हेतूकथनाच्या गरजेतून भावनांची अभिव्यक्ती होत असते. आज्ञा करणारे किंवा सल्ला देणारे पत्र असेल तर त्यामधून आज्ञा देणाऱ्या किंवा सल्ला देणाऱ्या अधिकारकर्त्याची भावना व्यक्त होते. न्यायनिवाड्याचे पत्र असेल त्यामधून न्यायनिवाडा करणाऱ्या न्यायाधिशाची भावना व्यक्त होते. कौटुंबिक स्वरूपाचे भावाला, आईला, मुलाला लिहिलेले पत्र असेल तर त्यामधून भावाविषयीचा बंधुभाव, आईविषयीचा मातृभाव किंवा मुलाविषयीचा पितृभाव व्यक्त होतो. राज्यकारभार करताना कारकून, दिवाण, सरदार, शिपाई, देशमुख, पाटील, वतनदार इत्यादींना लिहिलेले पत्र असेल तर त्यामधून राजाचा राज्याविषयीचा, राज्यकारभाराविषयीचा किंवा आपल्या प्रजेविषयीचा असणारा भाव व्यक्त होतो. साधूसंतांना लिहिलेल्या पत्रामधून धार्मिक भावना, सांप्रदायिक भावना व भक्तिभावना व्यक्त होते.

बाबाजी सिवदेव सोनटके यांनी छत्रपती शिवरायांना लिहिलेल्या पत्रामध्ये केलेल्या गुन्ह्याच्या कबुलीची भावना अभिव्यक्त आहे. ''केदारजी बिन नरसोजी व खंडोजी बिन धर्माजी खोपडे देशमुख ता॥ उत्रोली याचा महजर गोत वगैरे महाराजाचे समोर हाजर मजालसींत जाला. कथला तुटून निमे निमे वतन उभयेतानी खावे असे जाले. त्यात मी लबाडी करून आपले बिकलम लिहिले. मी चाकर, वतनदार नव्हे. हा गुन्हा मजकडून

जाला. याउपरी असी लबाडी केल्यास दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा खोटा.'' (पत्र क्र. ६२६, पृष्ठ क्र. १८०) या पत्रातील मजकुरावरून आपण केलेल्या गुन्ह्याची कबुली बाबाजी सिवदेव यांनी दिली आहे. महाराजांच्या समोर निवाडा होऊन केदारजी बिन नरसोजी व खंडोजी बिन धर्माजी खोपडे या दोघांनी मिळून निम्मे निम्मे वतन खावे असे ठरले होते. परंतु, बाबाजी सिवदेव या देशकुलकर्णी यांनी लबाडी करून चुकीचा मजकुर तपशीलवार लिहिला. म्हणून त्या गुन्ह्याची कबुली देणारा कबुलीभाव या पत्रातून लिहिला आहे. तसेच पुन्हा अशी लबाडी केली तर आपण दिवाणाचा गुन्हेगार आणि गोताचा खोटा असे म्हटले आहे. गोत म्हणजे कुळी. जात, कुळ या गोष्टींना सामाजिक जीवनव्यवहारात त्यावेळी महत्त्वाचे स्थान होते. पुन्हा असा गुन्हा घडला तर मला खोट्या कुळाचा समजावा असे म्हटले आहे. कुळाविषयीचा स्वाभिमान हा तत्कालीन समाजजीवनात महत्त्वाचा होता. तो भावही प्रस्तुत ठिकाणी अभिव्यक्त होतो.

जुमलेदार, हवलदार व कारकून यांना आज्ञा देणाऱ्या पत्रामध्ये रयतेला काडीचाही त्रास न देण्याविषयीची भावना अभिव्यक्त झाली आहे. ''सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणे. कोण्ही पागेस अगर मुलुखांत गांवोगांव राहिले असाल त्याणी रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाही. आपल्या राहिल्या जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाही. साहेबीं खजानांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जे पाहिजे, दाणा हो अगर गुरेढोरे वागवीत असाल त्यास गवत हो, अगर फाटे, भाजीपाले व वरकड विकाया येईल, ते रास घ्यावें, बाजारास जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागगती करावयाची गरज नाही.''(पत्र क्र. १३९२, पृष्ठ क्र. १९७) राजाच्या मनातील रयतेविषयी असणारी कर्तव्यभावना अभिव्यक्त झाली आहे. राज्यकारभार करताना प्रजेचे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे राजाचे मुख्य कर्तव्य ठरते. आपल्या राज्यकारभाराचा किंवा आपल्या नोकर-चाकर, शिपायांचा किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील कोणाचाही लोकांना त्रास होऊ न देणे हे एका चांगल्या राजाच्या मनातील भाव असतो. हा भाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरील पत्रातून अभिव्यक्त होतो.

पत्रांमधून अभिव्यक्त झालेला श्रद्धाभाव हा तत्कालीन जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. देव-देवतांविषयी आणि राजाप्रती असणारा श्रद्धाभाव व कामाप्रती असणारा निष्ठाभाव याविषयी पत्रामधून आलेल्या मजकुरातून भावनासौंदर्याची अभिव्यक्ती झालेली दिसून येते. दादाजी नरसीप्रभू देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रातून ही श्रद्धेची भावना अभिव्यक्त झाली आहे. ''शहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बावास हवाल होऊ नये.'' (पत्र क्र. ५०४, पृष्ठ क्र. १७७) स्वराज्याची निर्मिती करण्यासाठी लोकांच्या मनात अगोदर आत्मविश्वास निर्माण करणे आणि जे काही स्वराज्यनिर्मितीच्या कामी करतो ती ईश्वरनिष्ठाच आहे, ही भावना लोकांच्या मनात निर्माण करण्याचे काम छत्रपती शिवरायांनी लोकजीवनातील श्रद्धेच्या आधाराने केले होते. लोकांच्या मनात असणारा देवतांविषयीचा श्रद्धाभाव आणि आपल्या स्वामीशी इमानाने राहण्याची स्वामीनिष्ठा या दोन ठळक तत्त्वांचा उपयोग छत्रपती शिवरायांनी स्वराज्य उभारणीच्या कामात लोकांमध्ये

विश्वास आणि प्रबळ इच्छा निर्माण करण्यासाठी करून घेतला होता. हा श्रद्धाभाव पत्रांमधून उत्कटपणे अभिव्यक्त झालेला दिसतो.

**२.२.५.२.३ भाषासौंदर्य**

भाषासौंदर्य हा ऐतिहासिक पत्ररूप गद्याच्या अभिव्यक्तीचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. ऐतिहासिक पत्ररूप गद्याचा भाषिक अभ्यास हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय ठरू शकतो. याठिकाणी केवळ भाषासौंदर्याची ओळख अभिप्रेत आहे. पत्रातील भाषा ललित वाङ्मयाची भाषा आहे. तिच्यात रसाळता, माधुर्य, शौर्य, गिर्रेबाजपण, भारदस्तपण, ठाशीवपण, हळूवार मुलायमता व भावगर्भता आहे. त्यामुळे वाचकाला आपल्या भाषिक मोहजालात ती ओढून घेते. वाचकाला तल्लीन होऊन वाचनात गुंग करणारी अशी पत्रांची भाषा आहे. त्यामुळे पत्ररूप गद्याच्या भाषेने मराठी भाषेच्या कालिक इतिहासात स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे.

संदेश पोहचविणे हा पत्रसाहित्याचा मुख्य हेतू असला तरी केवळ बुद्धिनिष्ठ भाषा पत्रांमध्ये नसून ललित वाङ्मयाची भावगर्भ भाषाही आली आहे. इतिहासपुरुषांचे जीवनानुभव आविष्कारीत करणारी, मानवी वृत्तीप्रवृत्तींचे भावगर्भ दर्शन घडविणारी, मराठ्यांच्या वृत्तीतील सडेतोडपणा व भावनात्मकता यांचा समतोल साधणारी, युद्धानुभवांचा पुनःप्रत्य देणारी, सुख, आनंदाबरोबर दुःख व कारुण्याची अभिव्यक्ती करणारी अशी पत्रसाहित्याची खास भाषा आहे. मऱ्हाठमोळी तत्कालीन बोलीभाषा, संस्कृत व फार्शी यांच्या नैसर्गिक मिश्रणातून पत्रसाहित्याची भाषा घडली झाली आहे. या भाषासौंदर्याच्या अभिव्यक्तीचा अभ्यास करताना वाक्संप्रदाय, सुभाषिते, शब्दकळा, वाक्यरचना इत्यादी घटक विचारात घ्यावे लागतात.

लोकव्यवहार, लोकरीती, मौखिक परंपरा आणि पुराणपरंपरा यांच्या प्रभावातून वाक्प्रचार आणि सुभाषिते यांची अभिव्यक्ती झाली आहे. लोकव्यवहार, लोकरीती आणि मौखिक परंपरेमधून वाक्प्रचार तर संस्कृत परंपरेतून सुभाषिते पत्रलेखकाने स्वीकारली आहेत. पत्र लिहिणाऱ्याच्या मनातील विचार आणि भावना यांचे यथायोग्य आणि अचूक दर्शन यातून घडते. पत्ररूप गद्यलेखनाची मर्यादा, पत्रलेखनाचे विषय आणि हेतू, पत्रलेखक व वाचक यांच्यातील परस्परसंबंध यामुळे पत्रलेखनात बखरींच्या तुलनेत म्हणींचा वापर कमी झालेला दिसतो. लेखनाच्या ओघात स्वाभाविकपणे किंवा एखाद्या संदर्भात चपखलपणे लागू पडणारी म्हण आली असेल तरच नाही तर फारसा वापर झालेला दिसत नाही. वाक्संप्रदायांची अभिव्यक्ती मात्र अधिक झालेली आहे. वाक्संप्रदायांमुळे अर्थाची परिणामकारक अभिव्यक्ती झाली आहे. वाक्संप्रदायामुळे तत्कालीन चालीरीती, लोकव्यवहार, धार्मिक समजुती, रूढी, प्रथा, परंपरा, लोकमानस यांचीही कल्पना येते. र. वि. हेरवाडकर यांनी 'मराठी बखर' या संशोधनात्मक ग्रंथामध्ये बखरींमधून अभिव्यक्त झालेल्या वाक्संप्रदायांचे स्वरूप मांडले आहे. त्यामध्ये त्यांनी उत्साह निर्माण करणारे संप्रदाय, शोक निर्माण करणारे संप्रदाय, भय जागृत करणारे संप्रदाय, प्रेम उत्तेजित करणारे संप्रदाय, उपहासनिर्मिती करणारे संप्रदाय, संकीर्ण संप्रदाय अशी वाक्संप्रदायांची वर्गवारी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून अभिव्यक्त झालेल्या वाक्प्रचारांमध्ये प्रशासकीय कामकाजासंदर्भातील वाक्प्रचार, गुन्हे, न्यायदान, सामाजिक व्यवहार यासंदर्भातील वाक्प्रचार, युद्धविषयक

वाक्प्रचार, धर्मविषयक वाक्प्रचार व अन्य वाक्प्रचार इत्यादी स्वरूपाच्या वाक्प्रचारांचा समावेश होतो. शिरभोई धरणे, तसलीम करणे, मुलाहिजा धरणे, दुमाला करणे, उजूर करणे, अर्जदास्त लिहिणे, भोगवटे चालविणे, तसरुफाती चालविणे, पाठी शक घालणे, शक धरणे, डावाडोल होणे, कारभारासी बजबज घालणे, माकूल करणे, कागद लिहिणे, अमानत करणे, नवे खलेल करणे इत्यादी वाक्प्रचार प्रशासकीय कामकाजासंदर्भात आलेले दिसतात.

गुन्हे, न्यायदान व सामाजिक व्यवहार यासंदर्भात पुढीलप्रमाणे वाक्प्रचार आलेले दिसतात. कौल देणे, कौल मऱ्हसत करणे, खोटा होणे, फिर्याद देणे, कथला मनास आणणे, आण असणे, वाजपुस करणे, बदअमल करणे, बेढंग वर्तणे, दस्त करणे, रुजुवाती करणे, मोकळ देणे, गैरमाकूल वर्तणे, कलागती करणे, कजिया लागणे, बदरहा वर्तणे, पाचबोंबा मारणे इत्यादी वाक्प्रचार हे गुन्हे, न्यायदान व सामाजिक व्यवहारासंबंधी आलेले दिसतात. जेर करणे, गर्देस मेलविणे, जिवास खता होणे, नेस्तनाबूद करणे, पाठ करणे, जुंझ करणे, गाठी पडणे, पारपत्य करणे इत्यादी युद्धविषयक तर अनुष्ठान करणे, देवाची मर्यादा चालविणे, इस्कील करणे, खलील करणे, सार्थक होणे, लोभाची आस्ता धरणे, त्रिकर्ण बुद्धीने सेवा करणे, संकल्प शेवटास नेणे इत्यादी धर्मविषयक वाक्प्रचार अभिव्यक्त झालेले दिसतात. शिरी येणे, द्वैतभाव धरणे, कळसास आणणे, गळा घालणे, शक ठेवणे, वल्गना करणे, उर्जित करणे, सर्फराज करणे, श्रमसाहस करणे, अपाय होणे, काडीइतके अन्तर न देणे, काडीची तोशीस लावणे, तगो देणे, मुलाहिजा धरणे, लेकराचे लेकी खाणे, कुसूर होणे, बेईमानीची राहाट करणे, कार्यभाग चालविणे इत्यादी वाक्प्रचारांमधून मराठेशाहीतील पत्ररूप गद्याच्या समृद्ध भाषेची प्रचिती येते.

संस्कृत साहित्य आणि पुराणपरंपरेच्या प्रभावातून पत्रसाहित्यामधून सुभाषितांची अभिव्यक्ती झाली आहे. सुभाषिते म्हणजे नीतिवचने होय. खरेतर भारतीय नीतिशास्त्रांचा उदय या संस्कृत सुभाषितांमध्ये असल्याचे म्हटले जाते. ऐतिहासिक पत्रांमधूनही नीतिविषयक आशयाची अभिव्यक्ती करण्यासाठी सुभाषिते आली आहेत. *दगा होये ऐसे न करणे, कथलियात फायदा नाही. वतनी राहणे हेहि काम थोर आहे., एकाने सिद्ध संरक्षण करावे. एकाने साध्य करावे, जो जैसे करील तो तैसा पावेल, सिपाही हो अगर पावखलक हो बहुत यादी धरून वर्तणूक करणे, आमच्या इमानावरी आपली मान ठेवुन आम्हापासी येणे, गनिमाचे चाकर गनिम जालेस ऐसे जाणोन बरा नतिजा पावेल., गृहकलह बरा नव्हे, हटाचे हाती न देणे, एक भाजीच्या देठास तेही मन न दाखविणे, सर्व ज्ञातीने एक दिल राहून करत मेहनत करून सेवा करून शत्रू पराभवाते न्यावा.* इत्यादी अशी सुभाषितवजा वाक्ये सहज लिहिण्याच्या ओघात आली आहेत. 'हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे.' यासारख्या सुभाषितामधून छत्रपती शिवाजी महाराज लोकमानसात स्वराज्य निर्माण व्हावे ही ईश्वराचीच इच्छा आहे, हा भाव रुजविण्यात यशस्वी ठरतात. यामागे केवळ धार्मिक श्रद्धा नसून धार्मिक भावनेला आवाहन करून लोकांना आपलेसे करण्याचे कौशल्य असल्याचे दिसून येते.

पत्रात्मक गद्याची शब्दकळा हा एक महत्त्वाचा भाषिक घटक आहे. पत्रांमधून विचार आणि भावनांची अभिव्यक्ती होत असते आणि विचार व भावना व्यक्त करण्याचे माध्यम शब्द असतात. शब्द हाच गद्याच्या लेखनशैलीचा पाया असतो. अर्थ व्यक्त करणाऱ्या अक्षरांच्या समूहाला शब्द असे म्हणतात. अर्थशून्य

अक्षरांना शब्द म्हणता येत नाही. विचारविनिमयाचे शब्द हे चलन असतात. त्यामुळे गद्याचा विचार करताना शब्दांचा विचार क्रमप्राप्त ठरतो. अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या शब्दांच्या तीन शक्ती शब्दांना अर्थ प्राप्त करून देत असतात. परंतु, शब्दाला खरी किंमत व्यवहारातील उपयोजनातून प्राप्त होते. गद्यव्यवहारात राजसत्ता, शेजार-संबंध, धार्मिक व सामाजिक श्रद्धा, कौटुंबिक संबंध म्हणजे एकूण तत्कालीन जीवनाची अभिव्यक्ती शब्दातून होत असते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासकीय व्यवहारातील शब्दयोजनेचा विचार केला असता त्यामध्ये पत्र, कागद, पत्रिका, अर्जदास्त, कारकून, सरकारकून, वृत्ती, वतन, साहेबी, फर्मान, कौल, निवाडा, गरगसा इत्यादी शब्दांचा सहज वापर केला आहे. या प्रत्येक शब्दयोजनेमागे विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ असलेले दिसतात. पत्र, पत्रिका आणि कागद हे विशिष्ट ठिकाणी हेतूपुरस्सर योजलेले दिसतात. व्यंकोजी महाराजांना लिहिलेल्या पत्रांमधील एका पत्रात 'कागद' हा शब्द आला असून इतर पत्रांमध्ये 'पत्र' असा शब्द वापरला आहे. विशेष जिव्हाळा किंवा आपुलकी व्यक्त केलेल्या पत्रामध्ये 'कागद' अथवा 'पत्रिका' वापरला असावा असे वाटते. दादाजी नरसीप्रभू देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रामध्ये 'लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही.' असा मजकूर आला आहे. यामध्ये परंपरागत असे किंवा वडिलोपार्जित असे न म्हणता 'लेकराचे लेकरी' असा शब्दप्रयोग वापरला आहे. बकाजी भोसले यांना पाटीलकी बक्षीस देतानादेखील 'जरी बकाजीस लेक न जाले तरी याचे जावयात आपले खुसीने बकाजी पाटीलकी देईल त्याणे लेकराचे लेकरी खावी.' असे म्हटले आहे. यावरून सरकारी फर्मान काढताना बादशाही पद्धतीचे लेखन असले तरी अंतरीचा जिव्हाळा अशा प्रकारच्या शब्दकळेतून अभिव्यक्त होतो. पत्रातील शब्दनिवड ही वस्तुस्थितीचे आकलन आणि लिहिणाऱ्याच्या विचारांचे आणि भावनांचे पत्र वाचणाऱ्याच्या मन व भावनांना एक प्रकारचे आवाहन असते. लिहिणाऱ्याच्या मनात वाचणाऱ्याविषयी कोणत्या भावना आहेत याची अभिव्यक्ती पत्रातील शब्दांमधून होत असते. छत्रपती शिवाजी महाराजांची राज्यकारभारविषयक असणारी औपचारिक पत्रे असली तरी त्यामधून कारकून, वतनदार, देशमुख, पाटील, देशकुलकर्णी, गावकुलकर्णी, सुभेदार इत्यादींविषयी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनातील भावना प्रकट करणाऱ्या शब्दकळा आलेल्या दिसतात. रोखठोक व स्पष्टपणाची शब्दयोजना हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. खरे तर राज्यकारभार करताना रोखठोक, स्पष्टपणा राजकारण्यांना परवडणारा नसतो. त्यामुळे संदिग्ध व पाल्हाळिकता असणारे लेखन केले जाते. परंतु, छत्रपती शिवाजी महाराजांचा शिस्तशीरपणा, रोखठोक स्वभाव, नेमकेपणा यामुळे पत्रामध्ये आटोपशीरपणा व नेमकेपणा जाणवतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून काही शब्द वारंवार येतात. त्यामध्ये हकलवाजिमा व इनामत, तकसिम, अजराहमऱ्हामत, मोईन, नख्त, साहेब, खबर, दिवाण, मसलत, देशमुखी, वतन, बिकलम, भोगवटा, निवाडा, मेहेरबान, तालिक, बरहक्क, मनसुफी, खलेल, मुलाहिजा, मुशारा, कुसूर, दस्तगीर, वारीसदार, तसदी, हेजीब, बितपशील, कुलबाब, कुलकानू, रसद, ताकीद, मिरासी, हवाला, फिर्याद,

मशहुल, महशूर पेस्तर इत्यादी शब्द सांगता येतील. प्रशासकीय कामकाजाच्या पत्रव्यवहारातील या शब्दयोजनेतून छत्रपती शिवरायांचा एक शासक म्हणून असणारी छाप उमटते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून आलेले साधित शब्द हे पत्रांच्या भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. यामध्ये फार्शी-अरबी उपसर्गघटित साधित शब्द, फार्शी-अरबी प्रत्ययघटित साधित शब्द, अरबी साधित शब्द, संस्कृत उपसर्गघटित साधित शब्द, निव्वळ मराठी कृदन्ते अथवा धातुसाधिते, निव्वळ मराठी तद्धिते अथवा शब्दसाधिते, मराठी उपसर्ग घटित साधित शब्द, सामासिक शब्द इत्यादी स्वरूपाच्या साधित शब्दांची अभिव्यक्ती दिसून येते. उपसर्गघटित, प्रत्ययघटित, समास आणि अभ्यस्त असे शब्दांचे चार प्रकार पत्रांमधून आले आहेत.

साधारणपणे शब्दाच्या आरंभी ऐन, कम, गैर, दर, बिन, बे, ना इत्यादी उपसर्ग लागलेले पत्रांमधून आलेले बेमानगिरी, बेइमानी, बेढंग, बेशक, नादानगी, नामेहेरबानी, दरसाल, बदअमल, बदलामी, गैरमिरासी, गैरमेहेरबानी, गैरमाकूल, बिलाकसूर, सरनोबत, हरसाल, हरएक, कमकुवत, हरजिन्नस इत्यादी फार्शी-अरबी उपसर्गघटित शब्द पत्रांमधून आलेले आहेत. गर, गिरी, शाही, वार, गीर, खोर, दार इत्यादी प्रत्यय लागून आलेले निजामशाही, कुतुबशाही, जहागिरी, सादिलवार, तपसीलवार, हरामखोर, जामदार, सुभेदार, मिरासदार इत्यादींसारखे फार्शी-अरबी प्रत्ययघटित साधित शब्द आलेले आहेत.

**अरबी साधित शब्द** : मंजूर, गाफील, मजबूत, मालिक, मजकूर, हाशील, महसूल, तपशील, तारीफ, तजबीज, तक्रार, मामलत, माफ, मोबदला, मुलुक, हकिकत, खातिर, रतीब, हुजूर, कुसूर, नुक्सान, अमल, तर्फ, अर्ज, कर्ज, जरब इत्यादी.

**संस्कृत उपसर्ग घटित साधित शब्द** : अनुष्ठान, अनुभव, अभ्युदयार्थ, अभिषेक, आलंकृत, आरोखून, आगंतूक, आसमंत. निःसंदेह, निर्गमन, निःस्पृह, परस्थळी, परामर्श, प्रतिवर्षी, प्रतिपक्षी, विज्ञापन, विक्षेप, विद्यमान, समागमे, सन्निध, संतति, संतोष, संकल्प, समेत, संतान, अक्षय, अधर्म, अभय, अखंडित, सबल, सनाथ, सविस्तर, सहवर्तमान, स्वामी, स्वकुशल, स्वकीय इत्यादी.

**निव्वळ मराठी कृदन्ते अथवा धातुसाधिते** : झगडा, चढाई, नासाडी, देकार, पाडाव इत्यादी.

**निव्वळ मराठी तद्धिते अथवा शब्दसाधिते** : बागाईत, दयाळू, उदईक, इकडून, घरोबा, वरकड, पाटीलकी, कलागत इत्यादी.

**मराठी उपसर्ग घटित साधित शब्द** : अनमान, अडचण, अदमण, आच्छेर, आघोली, दुकाळ इत्यादी.

**सामासिक शब्द** : सामासिक शब्दांमध्ये हरजिन्नस, दरसवाद, कुलबाब, दरमजल, बरहुकुम, बेईमान इत्यादी अव्ययीभाव समासाची उदाहरणे आढळतात. पीतांबर, सर्वोत्तम, अदबखाना, सबल, कमजोर, सनाथ, शकजादा इत्यादी कर्मधारय समासाची तर, देवाज्ञा, आज्ञापत्र, वर्षासन, दानपत्र, दस्तखत, राजपत्र, स्वामीसेवा, स्व-राज्य, राज्यवृद्धी, कुलस्वामी, भाग्योदय, गृहकलह, देवस्वामी, देवाधीन यासारखी तत्पुरुष समासाची उदाहरणे आढळतात. अष्टप्रधान हा सामासिक शब्द द्विगू समासाचे उदाहरण म्हणून सांगता येतो.

इत्यादी सामासिक शब्दांमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रात्मक गद्याची भाषा अधिक सशक्त झाल्याचे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांची भाषिक पाहणी करता बरेपणा, थोरपणा, वडिलपणा, देशमुखी, पाटीलकी, गुरुपण धाकुटपणा इत्यादी भाववाचक नामे, डावाडोल, सेतपोत, गावगना, बजबज, धसधस गर्गशा, धमधमा, सजवज, खटपट, तळतळाट, दाणादाण इत्यादी अभ्यस्त व ध्वन्यानुकारी शब्द आढळतात. काही शब्दांच्या वापरामध्ये स्त्रीलिंगी ऐवजी पुल्लिंगी असा लिंगबदल केला आहे त्यामध्ये जागा दिल्हा पाहिजे, मालमत्ता सापडला इत्यादी. पत्रातील शब्दांचा वचनाच्या बाबतीत विचार केला तर एकवचन व द्विवचन शब्द आढळतात. पत्राच्या मायन्यात येणारे कारकुनान्, देशमुखान्, देसायान् इतयादी प्रथमेची अनेकवचने आहेत. 'ई' प्रत्यय लागून कोणत्याही नामाचे अनेकवचनाचे रूप होते. तसेच विचारवंत प्राणीदर्शक नामाचे अनेकवचन 'आन्' प्रत्यय लागून होते. कुर्निसात, मरातब, मसाला, औकात, औलाद, आदाब इत्यादी काही मूळ फार्शीत अनेकवचनी असलेली नामे मराठीत एकवचनी अर्थाने उपयोगात आणलेली दिसतात.

पत्रामधील भाषेचा विभक्तीविचार केला असता प्रथमा एकवचनी शब्दांमध्ये अन्त्य उकारी नामे आढळतात. कित्येकदा माहाराजसाहेबु, जाधवराऊ, कौलु अशा फार्शी विशेष नामांनासुद्धा प्रत्यय लागला आहे. महालासी, मसलतेस, आपणियासी, यैसियास, खातिरेस इत्यादी द्वितीयेची उदाहरणे आढळतात. भटे, महाराजे, साहेबी, येही, तेही, मियां इत्यादींसारखी तृतीयेची उदाहरणे आढळतात. काही वेळा तृतीयेच्या 'शी' करिता 'सी' हा प्रत्यय आला आहे. 'नजरेसी पडत असिले' यासारख्या वाक्यातील 'नजरेसी' या शब्दातील 'सी' हा चतुर्थीचा प्रत्यय आला आहे. हजरुन, म्हणौउनु, पोताहून, फर्माउनु इत्यादी पंचतीची उदाहरणे सापडतात. षष्ठीचा 'इ' प्रत्यय मागील शब्दास लावण्याची प्रवृत्ती दिसते. मौजे, किल्ले इत्यादी उदाहरणांध्ये दिसतो. पूर्वे, उत्तरे, लोकी इत्यादी पत्रांमधून आलेले शब्द सप्तमीची उदाहरणे म्हणून सांगता येतात. 'सिपाही हो', 'पावखलक हो' यासारखी संबोधनाची उदाहरणे येतात. शब्दांची सामान्य रूपे, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये, विशेषणे, समानार्थी शब्द, विरूद्धार्थी शब्द, अनेकार्थी शब्द इत्यादींचीही भाषिक अभिव्यक्ती पत्ररूप गद्यामधून झालेली आढळते. त्याचा सविस्तर विचार येथे केलेला नाही. विद्यार्थ्यांनी मूळ पत्रे वाचून त्याविषयीचा विचार करता येण्यासारखा आहे.

### २.२.५.२.४ छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व

पत्रलेखनातून लिहिणाऱ्याच्या मनातील भावभावनांचे प्रकटीकरण होत असते. माणसाच्या भावभावना या त्याच्या चारित्र्याच्या/व्यक्तिमत्त्वाच्या महत्त्वाचा भाग असतात. म्हणूनच पत्रातून भावना, विचार जसे प्रकट होतात तसे पत्रलेखकाचे व्यक्तिमत्त्वही प्रकट होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून शिवरायांचे उत्तम प्रशासक, कर्तव्यदक्ष राजा, कुटुंबकर्ता, लहान भावाला आधार देणारा वडीलभाऊ, आज्ञाधारक शिष्य, कडक शिस्तीचा अधिकारी, प्रजाहितदक्ष राजा, रक्षणकर्ता इत्यादी स्वभावविशेष अभिव्यक्त होतात. त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील प्रजावात्सल्य, आपल्या माणसांबद्दलची आपुलकी, जनतेबद्दलचा

जिव्हाळा, सरदारांविषयी सहानुभूती, सावधगिरी, भ्रष्टाचाराची चीड, न्यायाची चाड, गरीब, मजूर यांच्याविषयी अपार करुणा, दूरदृष्टी, सद्‌गुणांचा पुरस्कार इत्यादी गुणांची प्रचिती पत्रांमधून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रामधून त्यांचा निगर्वी व आत्मविश्वासपूर्ण स्वभाव प्रकटतो. त्यांनी कधीच स्वतःला बिरुदावल्या लावून घेतल्या नाहीत. पण साधुसंतांना पत्र लिहिताना ते स्वतःला 'विद्यार्थी' म्हणवून घेतात. यातून त्यांच्याठायी असलेला गुरुजणांविषयीचा कृतज्ञताभाव अधोरेखित होतो. सर्वधर्मपीठासंबंधी आदरभाव दाखवून 'राजा' हा सर्व रयतेचा असतो, तो राज्यातील कोणत्याही एका जातीचा, धर्माचा नसतो. त्यामुळे सर्वांप्रती समभाव दाखविणे हे राजाचे कर्तव्य ठरते. ते छत्रपती शिवरायांनी अत्यंत चोखपणे पार पाडून कर्तव्यबुद्धी राखली. सर्व जातींना समान लेखले. आचार्य-गुरव यांच्यातील वाद सोडवले. सणउत्सव परंपरागत चालविले. मंदिर असो की मशीद तेथे दिवापाणी चालविण्यासाठी तरतूद केली. बदअमल करणाऱ्या पाटील-वतनदार यांना हातपाय तोडण्याची शिक्षा केली. प्रसंगी स्वतःच्या आप्तेष्टांनाही कडक शिक्षा केली. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना वचक बसविला. परकीयांना मिळू पाहणाऱ्या सरदारांना युक्तीप्रयुक्तीने व गोड भाषेने आपलेसे केले. रयतेस त्रास होऊ नये म्हणून शिपायांना, सैनिकांना पत्रे लिहून ताकीदवजा सूचना दिल्या. शत्रूच्या हाती आपली रयत सापडू नये म्हणून अधिकाऱ्यांना दक्षता घ्यायला सांगणारी पत्रे लिहिली.

'भाजीच्या एका देठास तेहि मन नको' अशी छत्रपती शिवाजी महाराजांची वृत्ती होती. इतर अधिकाऱ्यांनाही त्यांचा हाच आदेश होता. अशा प्रकारे 'प्रजाहितदक्ष' राजाचे व्यक्तिमत्त्व ही सर्व पत्रे वाचल्यानंतर वाचकापुढे उभा राहते. प्रशासनातील 'कारकुनी कावे' मोडून काढणारा उत्तम प्रशासक राजा अशी प्रतिमा या पत्रांमधून अभिव्यक्त होते. सनदशीर सत्ताधारी राजकारणी कसा असावा ते या पत्रांमधून आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या रूपाने वाचकांसमोर येते.

## २.३ समारोप

'मराठेशाहीतील पत्ररूप गद्य' या पुस्तकातील परिशिष्टामध्ये दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांच्या आधारे मराठेशाहीतील गद्याचे स्वरूप, पत्रलेखनपद्धती, पत्रांमधील आशय व अभिव्यक्ती यांचा विचार केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पत्रांमधून शिवकालीन घटनाघडामोडींबरोबरच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचा आशय आला आहे. शिवकाल म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ. छत्रपती शिवरायांनी वडील शहाजीराजे भोसले यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज असले तरी संकल्पक शहाजीराजे होते. जिजाऊ या जाधवांच्या सरदार घराण्यातील होत्या. त्यामुळे त्यांनी स्वराज्याचे संस्कार त्यांच्यावर केले तरी शहाराजांची देखरेखेखाली त्यांना राजसत्तेविषयीचे शिक्षण मिळाले होते. या काळातील परकीय आक्रमणामुळे महाराष्ट्रात दुःस्थिती निर्माण झाली होती. अशा काळात स्वराज्य निर्माण झाले तरच आपला लोकांचे कल्याण होईल. अशी महत्त्वाकांक्षा बाळगून छत्रपती शिवरायांनी शहाजीराजांच्या मदतीने आणि जिजाऊंच्या संस्कारांच्या बळावर स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या

पत्रांमधून या काळाचे दाखले पत्ररूप गद्यामधून आले आहेत. त्याचबरोबर राज्यकारभार कसा करावा, प्रशासन कसे सांभाळावे, प्रजेचे हित कसे सांभाळावे याचेही दाखले मिळतात. शिवकालीन गद्य भाषेचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीनेही ही पत्रे अत्यंत उपयुक्त ठरतात. पत्रांमधून आलेले वाक्प्रचार, सुभाषिते, शब्दकळा, सामासिक शब्द, विभक्तीविचार, लिंगविचार इत्यादींच्या आधारे शिवकालीन गद्य भाषेची पाहणी या पत्रांच्या आधारे करण्याचा प्रयत्न प्रस्तुत साहित्यकृतीमध्ये सुधाकर पवार यांनी अत्यंत सूक्ष्मपणे केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासाविषयीची गोडी निर्माण करणारी ही पत्रे आहेत.

## २.४ सरावासाठी प्रश्न

### २.४.१ योग्य पर्याय निवडा

१. 'बौद्धिक संगती साधण्याच्या उद्देशाने शब्द, वाक्यखंड, वाक्य आणि वाक्यमालिका यांचा विस्तार करणारी भाषा म्हणजेच गद्य होय.' अशी गद्याची व्याख्या कोणी केली आहे?

१) श्री. रं. कुलकर्णी २) यु. म. पठाण

३) शं. गो. तुळपुळे ४) लक्ष्मणशास्त्री जोशी

२. मराठीतील पहिला टीकात्मक गद्यग्रंथ कोणता?

१) कुवलयमाला २) विवेकसिंधु

३) ज्योतिषरत्नमाला ४) ज्ञानेश्वरी

३. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी तत्कालीन सरकारी पत्रलेखनाचे किती प्रकार मानले आहेत?

१) ७८ २) ८० ३) ८ ४) २

४. 'शिक्का' म्हणजे 'नाममुद्रा' आणि 'मोर्तब' म्हणजे 'मर्यादा मुद्रा' असे प्रतिशब्द कोणी वापरले आहेत?

१) शं. गो. तुळपुळे २) शं. ना. जोशी

३) गो. स. सरदेसाई ४) वि. का. राजवाडे

५. इतिहासाच्या साधनांचा सविस्तर व मूलभूत अभ्यास करणारा 'साधन चिकित्सा' हा ग्रंथ कोणाचा आहे?

१) वि. का. राजवाडे २) शं. गो. तुळपुळे

३. वि. ल. भावे ४) वा. सी. बेंद्रे

६. छत्रपती शिवाजी महाराजांची मुद्रा कशी होती?

१) चौकांनी २) षट्कोनी ३) अष्टकोनी ४) वर्तुळाकार

७. जुन्या ऐतिहासिक पत्रांमधील कालनिर्देशाचा बोध करून घेणे कशामुळे सुलभ होते?

१) कॅलेंडर २) जंत्री ३) पंचांग ४) सण

८. आचार्य, गुरु, साधूजनांना पत्र लिहिताना छत्रपती शिवराय स्वतःचा उल्लेख कसा करतात?

१) राजश्री २) मशरुल हुजरत ३) इजतमाहा ४) विद्यार्थी

९. 'भाजीच्या एका देठास तेहि मन नको' अशी वृत्ती कोणाची होती.

१) छत्रपती शहाजीराजे २) औरगजेब बादशहा

३) छत्रपती शिवाजी महाराज ४) व्यंकोजीराजे भोसले

१०. पत्रलेखन करण्यासाठी पत्रलेखकांचे किती 'फड' राजदरबारात असत?

१) दोन २) तीन ३) चार ४) पाच

**उत्तरे** : १. लक्ष्मणशास्त्री जोशी २. ज्योतिषरत्नमाला ३. ७८ ४. शं. ना. जोशी ५. वा. सी. बेंद्रे

६. अष्टकोनी ७. जंत्री ८. विद्यार्थी ९) छत्रपती शिवाजी महाराज १०. तीन

### २.४.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. ऐतिहासिक पत्रलेखनपद्धतीचे स्वरूप लिहा.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रातील आशय स्पष्ट करा.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रातील विचारसौंदर्य व भावनासौंदर्य स्पष्ट करा.

४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रातील भाषासौंदर्य स्पष्ट करा.

### २.४.३ लघुत्तरी प्रश्न

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांच्या मायन्याचे स्वरूप थोडक्यात लिहा.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रामधील राजकीय जीवनाचा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रामधील समाज जीवनाचा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

४. पत्रांमधून आलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.

५. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्राचा शेवट व नाममुद्रा यांचे स्वरूप थोडक्यात स्पष करा.

## २.५ उपक्रम

१. आपल्या जवळच्या ग्रंथालयातील इतिहासावर ग्रंथांचे वाचन करून त्यामधील ऐतिहासिक शब्दांची यादी बनला.

२. आपल्या जवळच्या पुरालेखाभिगाराला भेट देऊन ऐतिहासिक ग्रंथ संवर्धनाची माहिती घ्या.

## २.६ संदर्भ ग्रंथ


१. बेंद्रे वा. सी., साधन चिकित्सा, शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास, दुसरी आवृत्ती (पुनरावृत्ती), १ डिसेंबर, १९७६, मुंबई, लोकवाङ्मय गृह प्रा. लि.

२. आपटे द. वि. आणि ओतूरकर रा. वि. (संपा.), महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, (इ.स. १६२४ ते १८५९ या सुमारे अडीचशे वर्षांतील मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पाडणारी २५० तत्कालीन अस्सल पत्रें व वेंचे) १९४१, पुणे, सदाशिवपेठ, मुद्रक-प्रकाशक- विष्णू गंगाधर केतकर, लोकसंग्रह छापखाना.

३. कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा, द्वितीयावृत्ती, १९९१, पुणे, मेहता पब्लिशिंग होऊस.

४. सरदेसाई गो. स., काळे या. मा. व वाकस्कर वि. स. (संपा.), काव्येतिहास संग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रें यादी वगैरे लेख, द्वितीयावृत्ती, जून, १९३०, पुणे, सदाशिव पेठ, चित्रशाळा प्रेस.

५. शं. गो. तुळपुळे (संपा.), प्राचीन मराठी गद्य, प्रथमावृत्ती, १९४९, पुणे, व्हीनस बुक स्टॉल.

६. गुजर मा. वि. (संपा.), करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग आठवा, गोवा पुराभिलेख संग्रहालयातून निवडलेले कागद, (इ.स. १७१३ ते इ.स. १८३०), १९६५, पुणे, कसबा पेठ, प्रकाशक - मा. वि. गुजर.

७. जाधव रा. ग. (संपा.), विचारशिल्प : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे निवडक निबंध, प्रथमावृत्ती, १९७५, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.


❑❑❑

## घटक ३
# नदीष्ट– मनोज बोरगावकर

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला पुढील गोष्टी समजतील.

- कादंबरी या वाङ्मयप्रकाराची निर्मिती, अवकाश आणि स्वरूप याची माहिती होईल.
- आधुनिक कालखंडात बदलत जाणाऱ्या मानवी जगण्याला कवेत घेणाऱ्या आधुनिक काळाच्या कादंबरीची क्षमता आणि प्रयोगशीलता समजेल.
- नदीष्ट या कादंबरीच्या निमित्ताने माणसाच्या जगण्यातील आदिम भावनांचा मागोवा घेता येईल.
- नदीष्ट या कादंबरीच्या माध्यमातून कादंबरीची आशयसूत्रे, कथानक बांधणी, पात्रव्यवस्था, भाषाशैली या विविध घटकांचा अभ्यास करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

आधुनिक काळ हा विविध विकास टप्प्यांवर बदलतो आहे. हे बदल सामावून घेणारं लेखन या काळात संवेदनशील लेखक कवी करत आहेत. हे विकास आणि बदलाचे सूत्र माणसाचे जगणे व्यापून राहिले आहे. पण ही बदलसूत्रे त्याला त्याच्या मूळ माणूसपणापासून दूर घेऊन जाणारी आहेत का याचाही शोध, मागोवा घेणारे या काळातील लेखन असे काही यानिमित्ताने नदीष्ट कादंबरीचे वेगळेपण सांगता येते. लेखक मनोज बोरगावकर यांची नदीष्ट ही पहिलीच कादंबरी. याआधी त्याचा 'कोरा कागद निळी शाई' (२००७) हा कवितासंग्रह आणि 'अकथ कहाणी सदगुणांची' (२०१२) हा ललित लेख संग्रह प्रकाशित झाला आहे. आपल्या काळाविषयी, बदलत्या सामाजिक पर्यावरणाविषयी त्यांची कविता बोलते. मानवी मूल्यांविषयीचे चिंतन हा त्यांच्या ललित लेखनाचा गाभा आहे. मनोज बोरगावकर यांची 'नदीष्ट' ही पहिलीच कादंबरी ग्रंथाली प्रकाशनाने २०२० साली प्रकाशित केली. काळाचा बदललेला चेहरा आपल्या संवेदनशील लेखणीने नव्या शैलीत टिपण्याचा प्रयत्न मनोज बोरगावकर आपल्या लेखनातून करीत आहेत. गावखेड्यातील माणूस विकासाच्या टप्प्यावर निसर्गापासून, मातीपासून दुरावत चालल्याची एक जाणिव लेखकाला खोलवर व्यापून आहे. आपल्या निसर्ग सोबत्यांशी, प्रतिकांशी, मूळ संस्कृतीशी असलेल्या नात्यापासून माणूस तुटत चालल्याची एक भावना लेखकाला सतत टोचत राहते. हाच बदलता भवताल त्यातल्या माणसांसहित, त्यांच्या गोष्टींसहित लेखक मनोज बोरगावकर यांनी आपल्या कादंबरीत नोंदवला आहे.

## ३.२ विषय विवेचन

नदीष्ट कादंबरीने अगदी कमी कालावधीत मराठी कादंबरी विश्वात आपले वेगळेपण अधोरेखित केले. आपला स्वतंत्र वाचक वर्ग निर्माण करण्यात कादंबरी जितकी यशस्वी झाली तितकीच तिने समीक्षकांचेही

लक्ष वेधून घेतले. नावाप्रमाणेच ही कादंबरी नदीच्या अगदी आत पोटापर्यंत घेऊन जाते आणि बरोबरीने प्रत्येकाच्या आतल्या प्रवाहाला साद घालते. गोदावरी नदीत एक स्वतंत्र पात्र म्हणून लेखकाने कादंबरीत तिला स्पेस दिली आहे. निवेदक, कादंबरीचा नायक तिच्याभोवती घुटमळत राहतो. या प्रवासात त्याला इतरही असेच नदीष्ट लोक भेटत राहतात. नदीच्या अस्पर्शित अंतरंगाच्या गोष्टी शोधतानाच माणूस म्हणून माणसांच्या मनाच्या अव्यक्त तळाशी जाण्याचा प्रयत्नही निवेदक या प्रवासात करतो आहे.

निवेदक आणि इतर पात्रंही नदीशी वेगवेगळ्या कारणांनी बांधली आहेत. नदी ही त्यांची आंतरिक ओढ आहे, आधार आहे. त्यांचा नदीशी जोडलेला भूतकाळ आहे, समाजापासून तुटणं आहे, स्वत:पासून पळणं आहे. त्यांचा सतत एक संघर्ष, एक शोध आणि एक प्रवास सुरू आहे. आणि या सगळ्या गोष्टींवर जणू ही नदी हाच एक इलाज आहे, पर्याय आहे याच भावनेनं ही सगळी माणसं नदीशी जोडली गेली आहेत. स्वत:च्या मनाचा थांग शोधत, आधार शोधत निवेदक नदीकडे जात राहतो. नदीच्या नादानं नदीष्ट होतो. हळूहळू त्याच्या या प्रवासात त्याला भेटणाऱ्या प्रत्येक माणसाच्या आणि नदीच्या नात्याचा शोध घेतो. ही नाती शोधताना त्याला त्या माणसांच्या गोष्टीही सापडतात. याच नदीष्ट माणसांच्या प्रवासाची गोष्ट म्हणजे ही कादंबरी आहे. नदीच्या वाहतेपणाची गोष्ट सांगणारी, तिच्यासोबतच्या प्रवासाची गोष्ट सांगणारी, नदीच्या प्रवाहात खोल डुंबत तिलाच आपल्या आत उतरण्याची गोष्ट म्हणजे नदीष्ट. लेखक मनोज बोरगावकर यांच्या अनुभवांची वाचकाला प्रत्यक्षदर्शी अनुभूती देणारी ही एक तरल गोष्ट, नदीष्ट.

### ३.२.१ कथानक

या कादंबरीचा निवेदक नदीच्या अनिवार ओढीने नदीवर पोहायला जायला सुरवात करतो. नदीत पोहणे हा त्याचा दिनक्रम आहे. तो एका ऑफिसमध्ये नोकरी करतो. रेल्वेने प्रवास करतो. नोकरीहून घरी येतो तो थेट आपले पोहण्याचे कपडे घेऊन नदीच्या घाटावर येत राहतो. त्याची पोहण्याची जागाही ठरलेली आहे. सुरवातीला त्यांचा नदीवर पोहायला जाणाऱ्या विविध वयोगटातील मित्रांचा ग्रुप तयार होतो. पण पुढे हळूहळू त्यातले इतर लोक पोहायला येणे बंद करतात. पण निवेदक मात्र एका ओढीने पोहायला येतच राहतो. दादाराव हे याच गटातील त्याचे मार्गदर्शक आणि ज्येष्ठ मित्र. दादाराव त्याला पोहण्याचे विविध प्रकारही शिकवतात. हे दादाराव निवेदकाला नदीचे पूर्ण पात्र पोहून जायला शिकवतात. पहिल्या अठरा दिवसातच पूर्ण पात्र पोहून जाण्याची कामगिरी करुन निवेदक दादारावांची शाबासकी मिळवतो आणि त्यांचा पट्टशिष्य होतो. निवेदक आणि दादाराव यांच्यामध्ये नदीष्ट असण्याचा, नदीच्या, गोदामायच्या ओढीचा एक समान धागा आहे. तो म्हणजे दोघेही आपल्या मातृप्रेमाला पारखे झाले आहेत. त्यामुळे मातृप्रेमाचा ओलावा, जिव्हाळा ते गोदामायच्या कुशीत शोधत राहतात. नदीही त्यांना आपलसं करुन घेते, त्यांचं रक्षण करते. नदीचं पात्र ही जागा निवेदकाला अत्यंत सुरक्षित आणि आईच्या गर्भाशयाशी नातं सांगणारी वाटते. दादारावांना पुढे पुढे आपल्या वयामुळे, गुडघे दुखीमुळे नदीवर येणे, पोहणे शक्य होत नाही. पण निवेदक मात्र आपला पोहण्याचा आणि पूर्ण नदी पात्र पोहून येण्याचा दिनक्रम अगदी दहा वर्षाहून जास्त काळ सुरू ठेवतो आहे. त्याच्या सतत नदीवर पोहायला येण्याबाबत काही लोकांना कुतूहल आहे, तर काहींना हा वेडेपणा वाटतो. पण निवेदकाला मात्र नदीवर जाणं, पोहणं हा जगण्याचा आवश्यक भाग वाटतो. नदीवर गेले नाही तर अस्वस्थता, चिडचिड

वाटायची, गुदमरल्यासारखे वाटते. आपण नदीवर का जातो? या प्रश्नाचे उत्तर देता येत नसले तरी निवेदकाची स्वत:ची एक फिलॉसॉफी आहे. आईचा गर्भडोह आणि नदी ही सारखी वाटते. ज्याप्रमाणे मूल आईच्या गर्भात पाण्यात तरंगते, सुरक्षित रहाते, कसलीही चिंता न करता निर्धास्त राहते. त्याचप्रमाणे नदीविषयीच्या या अनादि आकर्षणाचे कारण निवेदक आईच्या गर्भाशी जोडतो. कॉन्शस, सबकॉन्शस पातळीवर आपले मन, मेंदू पुन्हा आईच्या गर्भात असल्याच्या सुरक्षित भावनेशी जोडणारी नदी निवेदकाला खेचून घेते. अशी एक धारणा निवेदकाने स्वत:पुरती तयार केली आहे. आणि याच विचारात निवेदक सातत्याने नदीवर येत राहतो, पोहतो. आपल्या जगण्यात एक आपली स्पेस तयार करतो, नदी परिसरात स्वत:ची निर्जन जागा शोधतो.

कादंबरीच्या सुरुवातीलाच निवेदक त्याच्या नदीवर पोहायला जाण्याच्या वेळेबाबत आणि दिनक्रमाबाबत सांगत आहे. त्याचबरोबर दिवसेंदिवस नदी, निसर्ग, नदी परिसरातील निसर्गाचे जीवनचक्र, त्यात होणारे बदल याबद्दल आपली निरीक्षणे नोंदवत आहे. नदी आणि नदीकाठी वसलेली संस्कृती, विकास, प्रगतीच्या नावाखाली नदीपासून पर्यायाने जगण्यापासून दुरावत चाललेला माणूस कसा जीवनापासून तुटत चालला आहे याबद्दल ही लेखक बोलतो आहे. नदीच्या सर्व प्राण्यांना जीवन देत राहण्याच्या उदात्त गुणांबाबत सांगताना लेखक नदी परिसरातील विविध प्रसंग सांगतो. माणूस आणि निसर्गाच्या आदिम, मूळ गुणधर्मात झालेले बदल लेखक अशा विविध प्रसंगातून टिपतो.

कादंबरीचा निवेदक सकाळ, दुपार, संध्याकाळ कोणत्याही वेळी नदीवर पोहायला जातो. प्रत्येक वेळी त्याला दिसणारी नदी, घाट, दिसणारे प्राणी, माणसं आणि निसर्ग या सगळ्यांविषयीची निरीक्षणे तो नोंदवत राहतो. कादंबरीच्या सुरुवातीलाच निवेदक नदीवर पोहायला जाण्याच्या जागी त्याला दिसलेल्या एकज्ञ प्रसंगाची चर्चा करतो. नदीचे पाणी कमी झाल्यामुळे हरणांचा एक कळप पाण्याच्या शोधात दूर मानवी वस्तीच्या जवळ नदीकडे आला आहे. खायला काही हिरवे नसल्यामुळे व्याकूळ झालेल्या हरणांना बघून चिंचेच्या झाडावर असलेल्या माकडांच्या कळपातील माकडे झाडाच्या फांद्या हलवून चिंचा खाली पाडतात. माकडांच्या या परोपकारी वृत्तीचे निवेदकाला कौतुक वाटते. मात्र पुढच्याच प्रसंगात मात्र दुष्काळामुळे हैराण झालेली माकडे पाण्याच्या शोधात आलेल्या त्या हरणांच्या कळपातील एका कोवळ्या पाडसाला उचलून झाडावर घेऊन जातात. आणि आपल्या न्याहरीसाठी ते त्या पाडसाचा फडशा पाडतात. या एकाच ठिकाणी घडलेल्या दोन प्रसंगांनी निवेदक सुन्न होतो. त्याला डार्विनने माकडांपासून माणसाच्या उत्पत्तीचा मांडलेला सिद्धांत मनोमन पटतो. चिंचांच्या बदल्यात एका कोवळ्या पाडसाचा जीव घेणाऱ्या माकडांमुळे निवेदक विषण्ण होतो.

निवेदक प्रत्येक ऋतुत, वातावरणात अगदी दिवसाच्या कोणत्याही वेळी नदीवर पोहायला येतो. त्याला या वेगवेगळ्या वेळात अनेक पात्रं भेटत राहतात. या प्रवासात नदी आणि रेल्वे स्टेशन या दोन ठिकाणांना विशेष महत्त्व आहे. नदी आणि स्टेशनचा संबंध सातत्याने दिसत राहतो. स्टेशनवर दिसणाऱ्या व्यक्ती निवेदकाला नदीवर भेटत राहतात. सकिनाबी ही एक स्टेशनवर भीक मागणारी आणि चोरी करणाऱ्या टोळीशी संबंधित असणारी भिकारीन. ती पहाटे आंघोळीला नदीवर येते. कुणी बघू नये, छेडछाड करू त्रास

देऊ नये म्हणून ती पहाटे येते. निवेदकही पहाटे नदीवर येतो तेव्हा त्यांची भेट व बोलणे होते. या ओळखीतून एक आपुलकीचा बंध तयार होतो. निवेदकाच्या पहाटे पोहण्याचे तिला कुतूहल वाटते. सकिनाबी निवेदकाला नदीत पोहताना काळजी घ्यायला सांगते. स्टेशनवर चोरांपासून सावध रहायला सांगते. नंतर कित्येक महिन्यांनी निवेदकाला तिच्या रेल्वेखाली सापडून मरणाची बातमी तिच्या मानलेल्या आईकडून समजते. तिच्या बेवारस मरण्याचे दुःख आणि 'माटीमिला अच्छा है' या तिने सांगितलेल्या आठवणीसोबत सकिनाबीचा अध्याय संपतो. पण नदीच्या परिवारातील एक व्यक्ती गमावल्याच्या निमित्ताने निवेदकाला माणसाने मातीत मिसळण्याचे सूत्र उमगते.

रोज पहाटे पोहायला जाण्याच्या या सत्रात पुढे पुरभाजी झिंगाभोई बामनवाड निवेदकाला भेटतो. प्रामाणिकपणे मासेमारी करणारा एक सामान्य कोळी. 'छनोछनी करावा, हाची इचार, ऐसे घात करी, काळ सावधान' असे म्हणून पाण्यात जाळे सोडणारा बामनवाड काही काळ निवेदकाला साथ करतो. त्याच्या सोबतीत निवेदकाला नदी आणि नदी भोवतालाविषयी अनेक नव्या गोष्टी समजतात. नदीत सापडणारे मासे, त्यांची नावे, किंमती याबरोबरच नदीच्या अन्जान जागची वाळू काढून आपल्या प्रिय व्यक्तीला दिल्यास त्याच्या मनातली इच्छा पूर्ण होते हीसुद्धा महिती मिळते. आणि निवेदक या नदीच्या अन्जान, व्हर्जिन जागची वाळू काढण्याचे आव्हान मनाशी स्वीकारतो आणि ते पूर्णही करतो. काही दिवसांनी मात्र बामनवाडच्या शांत शांत राहण्याचे कारण निवेदकाला समजते. नवऱ्याची दारू सुटावी म्हणून केलेला नवस फेडायला एका चांगल्या घरातली बाई नदीवर आंघोळीला आली होती. पण नदीवरच्या काही पोरांनी ती आंघोळीला बसली असताना तिला ओढून तिच्यावर बलात्कार केला होता. पण चाकू दाखवून कधीही धमकावणाऱ्या त्या पोरांचा प्रतिकार करुन त्या बाईची इज्जत वाचवू शकलो नसल्याची सल बामनवाडच्या मनात राहिली होती. आयुष्यभर आपल्या पोटाची सोय करणाऱ्या गोदामायसमोर जीवाच्या भीतीने आपण गप्प राहिलो, तिला काय वाटलं असेल हा विचार बामनवाडला छळत राहतो. तो या धक्क्यातून सावरू शकत नाही. त्याला त्याची स्पेस द्यावी म्हणून निवेदक त्याला त्याच्या शांततेत एकटा सोडतो.

निवेदकाला नदीवर येऊन बसणाऱ्या तृतीयपंथीयाची माहिती कालूभैय्या देतो आणि जपून रहायला सांगतो. सगुणा ही एक तृतीयपंथी आपल्या आयुष्यातल्या भूतकाळाच्या एका तुकड्याची आठवण म्हणून नदीवर येऊन बसते. सुरवातीला एक बाई दिसली म्हणून तिच्याकडे निघालेला निवेदक ती तृतीयपंथी आहे म्हणून मागे वळतो. आणि इथूनच त्याच्या सगुणा सोबतच्या प्रवासाची सुरवात होते. आधी नदीवर आणि नंतर रेल्वेत भेटणारी सगुणा आधी इथल्या समाजावरचा राग, त्रागा त्याच्याजवळ व्यक्त करते. हळूहळू निवेदकाला तिच्या कहाणीबद्दल कुतूहल वाटून तो तिचा विचार करायला लागतो. तिला आपल्या नदीवर पोहण्याच्या ठिकाणी, दुपारच्या वेळेत रेल्वेत भेटून तिच्याशी बोलायचा, तिला ऐकून घेण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये निवेदकाला तृतीयपंथी आणि त्यांच्या जगाची ओळख होते. तृतीयपंथीयांना आपल्या समाजाने दिलेली वागणूक, त्यांचे जगणे, त्यांचे समाजातील इतर लोकांशी संबंध या सगळ्या गोष्टींवर सगुणा मोकळेपणाने निवेदकाजवळ बोलते. आपल्या हिजडा बनण्याची गोष्ट, आपला भूतकाळ, आपलं जगणं आणि आपल्या पुढच्या आयुष्याच्या कल्पनांबद्दल सगुणा निवेदकाला सांगते. तृतीयपंथीयांच्या जगण्याची

पद्धती, त्यांच्या रूढ परंपरा, गुरु, घराणी आणि त्यांच्या भाषेबद्दल सगळी माहिती सगुणा निवेदकाला सांगते. आपला आयुष्यातून काढून न टाकता येणारा भूतकाळ, त्याची भळभळती, वाहणारी जखम आणि आईला एकदा भेटण्याची ओढ या सगळ्या गोष्टी सगुणा सांगत राहते. या सगळ्यात नदी आणि निवेदक एक श्रोता आणि एका माध्यमाची भूमिका बजावत राहतात.

समाजात ज्याला चेहराच नाही, कोणतीही ओळख नाही अशा भिकाऱ्याच्या मुखवट्याआड दडलेला भिकाजीही असाच निवेदकाला नदीवर भेटतो. स्वत:चा भूतकाळ लपवत, मरण येत नाही म्हणून जिवंत असणारा भिकाजी. आयुष्याने ज्याच्या जगण्याला एका अशा वळणावर नेऊन ठेवलं आहे जिथे त्याच्या माणूसपणाला एका चुकीची शिक्षा मिळाली आहे. नात्यांतील तणाव, मानसिक ओढाताण, व्यसन आणि त्यातून उद्भवलेल्या प्रसंगामुळे तो कुटुंबापासून तुटत गेला आहे. राग, असूया यातून एका बेसावध क्षणी त्याच्या हातून पोटच्या मुलीचा बळी जातो. काहीही न बोलता तो मिळालेली शिक्षा भोगतो. आपला भूतकाळ लपवत, नदीच्या सान्निध्यात नदीच्या पाण्याने तो पुसून धुवून टाकण्याचा प्रयत्न करतो आहे. आणि कुणाशीही न बोलणारा भिकाजी निवेदकाजवळ व्यक्त होतो. आणि कुणातही गुंतून न पडता तो त्याच्या प्रवासाला मार्गस्थ होतो.

निवेदकाला नदीवर आपल्या पोहण्याच्या ठिकाणी एक तरुण मुलगा भेटतो. नाग, सापांना जीवदान देण्यासाठी रिस्क घेऊन, आपला जीव पणाला लावणारा प्रसाद. पहिल्यांदा नाग पकडण्याचा प्रसंग तो अगदी समरसून सांगतो. एक कमी शक्ती आणि बौद्धिक क्षमता असणारा प्राणी, माणसांच्या अंधश्रद्धा आणि चुकीच्या रूढ समजुतीला बळी पडतो. आपल्या स्वार्थासाठी मुक्या, निष्पाप प्राण्याचा बळी देणाऱ्या माणसांपासून ह्या प्राण्याला वाचवलं पाहिजे. ती आपली जबाबदारी समजून, निसर्ग, प्राणी आणि माणसाचा संघर्ष टाळण्यासाठी प्रसाद काम करतो आहे. प्राण्यांच्या, माणसाच्या मनाची अवस्था आणि त्याचे संघर्ष याची निवेदकाला माहिती होते.

### ३.२.२ आशयसूत्रे

प्रवास, प्रवाह, वाहतेपण – नदीष्ट हा एक प्रवास आहे. कितीही चढउतार आले तरी आपलं प्रवाहीपण नदी कधीच सोडत नाही. नदीवर पोहायला जाण्याच्या या प्रवासात निवेदकाला अनेक पात्रं भेटत राहतात. वाहणं, प्रवाही राहणं हा जसा नदीचा आदिम आणि मूळ गुणधर्म आहे. तसच माणसांच्या गोष्टीही पिढ्यानपिढ्या वाहत राहतात. नदीच्या पाण्याबरोबर त्यांच्या त्यांच्या साचलेल्या गोष्टी वहायला लागतात. या कादंबरीत नदीष्ट निवेदक या गोष्टींच्या वहनाचा माध्यम आहे. तशीच नदी या सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानीआहे, सर्व गोष्टींना ती व्यापून राहिली आहे. निवेदक नदीवर जात राहतो. सातत्याने जात राहतो. त्याला स्वत:बरोबरच भेटणाऱ्या इतर प्रत्येक व्यक्तीची, निसर्गाची नव्याचे ओळख होते. त्याला नव्या माहितीचा शोध लागतो. नदीच्या अंतरंगाची, पात्राची, परिसरातील प्राण्यांची पर्यायाने निसर्गाची नव्याने ओळख होते. त्याला अनेक माणसं नदीवर भेटतात. त्या माणसांची काहीतरी गोष्ट आहे, त्यांचा भूतकाळ आहे, त्यांचा म्हणून काही एक भवताल आहे. या सगळ्याचा शोध घेण्याची निवेदकाला ओढ लागते.

**आदिबंध** : मानवी जगण्याला काही आदिम भावना, जाणिवा चिकटून आहेत. प्रेम, राग, दु:ख, लैंगिक जाणिवा, हिंसा, स्त्रीत्त्व, पुरुषत्त्व, मातृप्रेम, निसर्ग पर्यावरणाशी नाते, या सगळ्याचे कुतूहल अशा अनेक गोष्टी माणसाच्या जाणिव नेणीवेच्या पातळीवर खोलवर रुतून आहेत. पण कोणत्या ना कोणत्या प्रसंगात, जगण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर या भावना, हे बंध माणसाच्या जगण्यावर आपला प्रभाव टाकत राहतात. हे आदिबंध, या भावना संस्कृतीबरोबर पिढी दर पिढी वाहत राहतात. काही जाणिव नेणीवेत घट्ट रुतून वाहतात, काही समाज संस्कृतीच्या माध्यमातून, कथन परांपरेतून वाहत राहतात. नदीष्ट कादंबरीत लेखकाने हे सगळे मानवी जगण्यातील आदिबंध अतिशय संवेदनशीलपणे हाताळले आहेत.

**मातृप्रेम** : 'नदी म्हणजे आईचा विस्तारत गेलेला गर्भ.. नदीच्या किनाऱ्या किनाऱ्यानेच वस्ती आणि संस्कृती वसत गेली.' (पृ. १६३) नदीला मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. नदी काठानेच तर संस्कृती वसल्या, वाढल्या. नदी ही इथल्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जगण्याचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे नदी ही मानवी जीवनात मातृत्त्वाच्या स्थानीच आहे. नदीचे पात्र, पाणी निवेदकाला आईच्या गर्भाशयाशी जोडणारे वाटते. म्हणूनच कोणत्याही वेळी नदीत पोहणे हे आईच्या गर्भाशयात तरंगत असल्यासारखे वाटते. कादंबरीतील विविध पात्रांची त्यांच्या त्यांच्या आईच्या मायेशी, प्रेमाशी बांधलेला एक आठवणबंध आहे. आईच्या प्रेमाची पोकळी निवेदकाला नदीकडे घेऊन जाते. दादाराव यांचाही नदीशी असाच मातृबंध आहे. अगदी लहानपणी आपली आई गमावलेले, आई गेल्यानंतर शेवटचं तिचं दूध पिण्याची लहानपणीची आठवण आणि आईच्या प्रेमाची ती पोकळी दादाराव गोदामायच्या कुशीत शोधत राहतात आणि नदीही त्यांचा त्याच प्रेमाने सांभाळ करते. ''ज्या दिवशीपासून कळायं लागलं आपल्याला मे नाही तवापासून सकाळी न चुकता मी गोदामायच्या अंगावर खेळाया यायला लागलो. मायची वल्ली माया कधी मिळाली नाही, पण गोदामाय मात्र रोज वल्लं करुन अंगभर माया करते.'' (पृ. १३८) सगुणा हीसुद्धा नदीकडे याच मातृप्रेमाच्या ओढीने येत रहाते. ही गोदावरी आपल्या गावाहून वाहत येते, याच नदीच्या काठावर तिचं बालपण गेलं. आई, आज्जी आणि बहिण यांच्याबरोबरीने नदीला तिच्या भूतकाळात एक जागा आहे. ''अरे जान, ही नदी माझ्या गाववरूनही वाहत जाते.'' (पृ.१३१) आईला शेवटचं भेटायच्या इच्छेच्या हिंदोळ्यात सगुणा नदीकाठावर झुलत राहते. मातृकोषाच्या ओढीने ही सर्व पात्रे नदीभोवती घिरट्या घालत राहतात.

**स्त्री-पुरुष तत्त्व** : हा एक अनोखा बंध या कादंबरीच्या काही पात्रांच्या गोष्टीतून व्यक्त झाला आहे. माणसाच्या जगण्याला एका लैंगिक ओळखीत बांधणाऱ्या त्याच्या मानसिक स्थितीचे काही तुकडे या पात्रांच्या वर्तणूकीतून दिसत राहतात. सगुणाचे मुलगा म्हणून जन्माला येणे आणि त्याच्या मनात मात्र कसलीतरी स्त्री-पुरुष यामध्ये होणारी खळबळ, आपला आजा, आपले वडील यांच्या घर, संसार यापासून तुटत जाण्याची गोष्ट आणि इथला समाज या सगळ्या दाबातून आपण हिजडा, तृतीयपंथी असणं हे स्वीकारण्याची, जगणीची सुरवात करणं. या सगळ्यात स्वत:ला स्त्रीत्त्व आणि पुरुषत्त्वाच्या मध्ये कुठेतरी अधांतर जगणं जगत राहणं. समाजाने नाकारलेल्या एका समूहाचा भाग होऊन जगताना त्या समूहातील प्रत्येकाच्या गोष्टींत दु:ख, नाकारलेपण, अन्याय, कुटुंबापासून तुटत जाणं. या सगळ्याचं मूळ हे पुन्हा याच

स्त्री आणि पुरुष तत्त्वाच्या मधलेपणात, सामाजिक दबावात आहे. पुरुषापासून युनक होण्यापर्यंतचा सगुणाचा प्रवास हा याच आदिम लैंगिक भावना, ओळखीच्या अंतर्बाह्य संघर्षाचा आहे. उरलंसुरलं पुरुषत्त्व कापून टाकून स्त्रीत्त्वाच्या स्वीकारापर्यंत जाण्याचा आहे. तसेच भिकाजीसुद्धा या संघर्षातून गेला आहे. मांजरीच्या जास्त सानिध्याने स्त्री वांझ होते. ही लोकसमजूतीतून आलेली गोष्ट त्याच्या बहिणीच्या बाबतीत खरी होते. तिच्या वांझपणामुळे सासरी छळ होतो. यामुळे भिकाजीच्या मनात मांजरीबद्दल साचत गेलेला द्वेष, लग्नानंतर बायकोविषयी मनात निर्माण झालेला दुरावा, नात्यातील अपमान या सगळ्याचा त्याच्या मनावर एक घट्ट व्रण उमटला आहे. आणि यातूनच मांजर आणि स्त्रीरूपाविषयी त्याच्या मनात राग कायम आहे. ''स्त्री शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक अशा कोणत्याही पातळीवर जेव्हा तुम्हाला काही देत असते, तेव्हा त्याचा पुरेपूर मोबदला ति कोणत्या ना कोणत्या रूपात तुमच्याकडून वसूल करीत असते.'' (पृ. ९४) असा एक स्त्रीबद्दल विरोधी भाव भिकाजीच्या मनात आहे.

**दु:ख :** मानवी जीवनात सुख आणि दु:ख या दोन्ही भावनांमध्ये माणूस सातत्याने दु:खाला कवटाळून बसतो. हे दु:ख कायम त्याच्या मनाला व्यापून राहते. इतर कोणत्याही मानवी भावनांच्या सोबतीने एक दु:खाची किनार येत राहते. कादंबरीत लेखकाने निर्माण केलेल्या प्रत्येक पात्राच्या आयुष्यात असणारी एक दुखरी बाजू आणि नदी यांचे एक विशेष नाते दिसून येते. काहीतरी हरवल्याचे, गमावल्याचे, तुटल्याचे, दूर फेकले गेल्याचे, एकटेपणाचे दु:ख या सगळ्यापासून या पात्रांना नदीवर एक आपली स्पेस मिळते. आपले दु:ख आणि त्यावर उपाय म्हणून एक स्पेस शोधत सगळे नदीच्या आश्रयाला येतात. 'दु:ख आणि लोणचे मुरल्याशिवाय मजा येत नाही', हेच दु:ख माणसाच्या मनाचा तळ व्यापून उरते.

**हिंसा :** हिंसा हासुद्धा माणसाच्या ठायी वसत असलेला एक भाव. मानवी नातेसंबंध, समाज, रूढ समाजमान्य गोष्टी या सगळ्याच्या दाबतून माणसाच्या मनात हिंसेचा भाव तयार होतो. नदीवर आंघोळीला आलेल्या बाईवर झालेला बलात्कार हा तिच्या शरीरावर, मनावर ओरखडे उमटणारा आहेच पण त्याचबरोबर ह्या घटनेने बामनवाडच्या मनावरही खोलवर आघात झाला आहे. मानवी वासनेचे हिंसेत झालेले हे रूपांतर त्या बाईबरोबरच आणि बामनवाडच्या मनावर आघात कारणारे आहे. भिकाजीच्या आयुष्यात याच भावनांच्या विचित्र दारातून त्याचा राग टोकाला जाऊन मांजरीऐवजी चुकून स्वत:च्याच मुलीला भिंतीवर फेकून देतो आणि त्यातच त्या लहान मुलीचा करुण अंत होतो. सगुणाच्या जगात तर तिच्या आणि तिच्या सोबत्यांच्या आयुष्यात आलेले शारीरिक मानसिक हिंसेचे प्रसंग कोणत्याही संवेदनशील माणसाला हादरवून सोडणारे आहेत. आणि या सगळ्यात नदी पात्रातून बेसुमार वाळू उपसा करणारा माणूस नदीच्या गाभ्याला इजा करणारी हिंसक कृतीच आहे.

**पर्यावरण जाणिवा :** नदी आणि भोवतालच्या पर्यावरणाचे चित्रण नदीष्ट कादंबरीतून आले आहे. नदी, पाणी, झाडं, पानं, प्राणी, पक्षी, वातावरण, पाऊस, पूर आणि सगळ्या निसर्ग घटनांची सूक्ष्म निरीक्षणे आली आहेत. माणूस आणि निसर्गातील, माणूस आणि प्राण्यांतील संघर्ष यांचेही प्रसंग लेखकाने कादंबरीत चित्रित केले आहेत. वानरांच्या कळपाचा हरणांना चिंचा पाडून देऊन परोपकार करण्याचा प्रसंग आणि हरणांच्या एका कोवळ्या पाडसाला उचलून नेऊन त्याचा फडशा पाडण्याचा प्रसंग. परोपकाराचा पुरेपूर सूड घेण्याची

माकडांची भूमिका सुन्न करणारी आहे. नदीला आलेल्या पुराबद्दलही लेखकाने चर्चा केली. विकास, प्रगतीच्या नावावर माणसाने निसर्गाला कसे लुबाडले आहे. आणि त्याचाच परिणाम म्हणून निसर्गातले बदल हे माणसाला अपायकारक वाटत आहेत. अतिपावसामुळे नदी आपले पात्र सोडून गाव, वस्ती, शहरात घुसली. गोदावरीचा निवेदकाने बघितलेला पूर हा घाटाच्या बहात्तर पायऱ्या बुडणारा होता. आत्ता मात्र गोदामाय दिसेल तो अडथळा नेस्तनाबूत करीत होती. नदीचं हे रूप माणसाच्या आकलनापलीकडचं आहे. नदीचा महापूर म्हणजे तिची भडास आहे. नदीच्या मोफत मिळणाऱ्या पाण्याचा बाजार मांडून माणसाने तिला आपल्या सोयीनुसार बांधून ठेवण्याचे प्रयत्न केले. तिच्या गाभ्याला इजा होईल इतपत वाळू उपसा केला. दादाराव नदीच्या पुराबाबत आपली निरीक्षणे नोंदवतात. 'तिला जीवन उद्ध्वस्त करायचे नसते, तर पुनरुज्जीवन करायचे असते, पण जेव्हा तिच्यावरील अत्याचाराचा अतिरेक होतो, तेव्हा सारी कायनात तिच्या बाजूने उभी रहाते.' असाही नदीच्या महापुराचा एक अर्थ ते सांगतात. निसर्ग मुक्तहस्ताने माणसाला आजवर देतच आला आहे. पण माणसाने आपल्या हव्यासापायी निसर्गाची, पर्यावरणाची अपरिमित हानी केली. निसर्गाच्या बदलत्या रूपांकडे बघण्याचा एक दृष्टिकोण इथे व्यक्त झाला आहे. याचबरोबर नाग, साप या प्राण्यांचे जीवन, त्यांचे जगण्याचे संघर्ष, माणूस त्यांच्यावर आपल्या स्वार्थसाठी करीत असलेले अत्याचार याचीही चर्चा कादंबरीत केली आहे. मोरांचे डौलदार चालणे, जंगलातील प्राण्यांच्या जगण्याच्या, शिकारीच्या पद्धती याबद्दलही काही निरीक्षणे लेखकाने नोंदवली आहेत.

**तृतीयपंथी समूह**

नदीष्ट कादंबरीत सगुणाच्या निमित्ताने लेखकाने तृतीयपंथी समूहाच्या जगण्याचा विस्तृत पट उलगडून दाखवला आहे. मुळात भारतीय समाज मानसिकतेत तृतीयपंथी व्यक्ती किंवा एकूणच वेगळी लैंगिक ओळख असलेल्या व्यक्तीला मुक्तपणे जगणे कठीण आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत जरी त्यांना स्थान असले तरी काळानुरुप त्यांच्या जगण्याचे अवकाश संकुचित होत गेले. वेगळी लैंगिक ओळख असणं ही नैसर्गिक गोष्ट आहे. व्यक्ती म्हणून स्वातंत्र्य आहे. पण हे न स्वीकारता समाजाने तृतीयपंथी समूहाला वाळीत टाकले आहे. त्यांना व्यक्ती म्हणून स्वतःची ओळख घेऊन मुक्तपणे जगण्याचा अधिकार नाकारला आहे. या लैंगिक भावनांना आजार, कमतरता किंवा विकृती समजून समाजाने स्वीकारले नाही. अशावेळी आपली वेगळी लैंगिक ओळख आणि कुटुंब, समाज या सगळ्यात एक द्वंद्व सुरू होते. आपल्या वेगळेपणाला कुटुंबात, समाजात काहीही स्थान नाही हे लक्षात आल्यामुळे मग तृतीयपंथी लोकांचे वेगळे समूह तयार झाले. त्यांच्या समूहाचे जगणे, संस्कार, रूढी, परंपरा ह्या सामान्य समाजापेक्षा पूर्णतः भिन्न आहेत. तृतीयपंथी समूहाबाबत माहिती कमी आणि गैरसमज अधिक त्यामुळे त्यांना सामान्य आयुष्य जगतही कठीण आहे. यामुळे मग आपल्याला माणूसच न समजणाऱ्या समाजापासून तुटून त्यांनी स्वतःचं एक जग तयार केलं. त्यामध्ये त्यांची एक जगण्याची रीत आहे. संस्कृती आहे. या जगण्यात विशिष्ट बिरादरी आहेत, गुरू आहेत. 'ये समाज मे रहेगी ना, तो भेडबकरी की तरह छिल के खाएंगे तेरेकू' (पृ. ६८) अशाप्रकारे समाजाच्या जाचाला कंटाळून, आपल्याला आहे तसेच स्वीकारून जगू देणाऱ्या जगात सगुणासारख्या कित्येकांचा प्रवेश होतो. त्यांच्यासाठी तिथले जगणेही फार सुसह्य नाही. बिरादरीत दीक्षा देण्याचा विधि म्हणजे आपल्यातील उरलासुरला भूतकाळ,

उरलेसुरले पुरुषतत्त्व कापून टाकण्याची प्रक्रिया आहे, असे सगुणा सांगत राहते. सगुणाच्या प्रवासाच्या निमित्ताने लेखक तृतीयपंथी समूहाच्या संपूर्ण जगण्याचे चित्रण करतात. या समूहाच्या बिरादरी, गुरू परंपरा, त्यांचे काम, त्यांच्या उत्पन्नाचे मार्ग, संपूर्ण देशभरात असलेले त्यांचे संपर्काचे जाळे, प्रवास याचीही माहिती आहे. धार्मिक विधी, त्यांचे जगणे सुसह्य करण्याचा दिलासा देणारे त्यांचे मौखिक लोक परंपरेतील त्यांचे महत्त्व, कथा आणि कुवागमचा उत्सव, त्याचे महत्त्व याचीही चर्चा कादंबरीत आली आहे. सर्वसामान्य समजल्या जाणाऱ्या, प्रतिष्ठित जगणे जगणाऱ्या लोकांकडून तृतीयपंथीयांना माणूस म्हणून सामावून न घेणं आणि या सगळ्यात आपल्या कुटुंबापासून, माणसांपासून तुटून एका वेगळ्याच जगात जगत राहणं हे द्वंद्व सगुणाच्या निमित्ताने लेखक कादंबरीत घेऊन येतात. या समूहात समाजाने नाकारलेल्या प्रत्येकाला आसरा आहे. एकमेकांना समजून सांभाळुन घेत, नवीन कुटुंब, नवी नाती तयार करून राहणं आहे. जात, धर्म, पंथाचे बंधन नाही. भौगोलिक सीमांचे बंधन नाही. भाषा बोलीचे बंधन नाही. त्यांची स्वतंत्र भाषा, बोली, संकेत चिन्हे आहेत. कादंबरीत लेखक बोरगावकर यांनी तृतीयपंथीयांच्या जगण्याचे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे, त्यांच्या अंतर्बाह्य संघर्षाचे चित्रण केले आहे.

**३.२.३ पात्ररचना**

नदीष्ट कादंबरीत निवेदकाला त्याच्या नदीवर पोहण्याच्या प्रवासात अनेक पात्रं भेटत राहतात. ती पात्रं त्यांच्या आपली एक विशिष्ट, स्वतंत्र ओळख, आपली वेगळी गोष्ट घेऊन कादंबरीच्या गोष्टीत मिसळत राहतात. आणि अर्थात पाण्यात रंग मिसळावे तशी या नदीष्ट गोष्टीत आपले वेगळेपण घेऊन मिसळतात. निवेदक आणि नदी या सर्व पात्रांना एकत्र आणणारे माध्यम आहेत. सकिनाबी, कालुभैय्या, पुजारी, बामनवाड, सगुणा, मालाडी, दादाराव, सर्पमित्र प्रशांत, भिकाजी ही पात्र कादंबरीत भेटतात.

**कादंबरीतील पात्रे**

निवेदक हा एका कसल्याशा ऑफिसमध्ये काम करतो, रेल्वेने ये-जा करतो आणि गेली दहा वर्षे नदीवर पोहायला येतो आहे. त्याची नदीची ओढ त्याला एकही दिवस न चुकता, कोणत्याही ऋतुत, वातावरणात, दिवसाच्या कोणत्याही प्रहरी नदीवर घेऊन येते. तो आपल्या पोहण्याची घाटाच्या गर्दीपासून दूरवर एक शांत निर्जन जागा निश्चित करतो. आपल्याला असे कोणते कोरडेपण व्यापून आहे की, नदीच्या पाण्याची ओल समाधान देऊन जाते हे त्याला निश्चित सांगता येत नाही. गोदामायच्या त्या हजार पाचशे मीटरच्या टप्प्यात भेटणारी नदी, निसर्ग, प्राणी आणि माणसे यांच्याबद्दल त्याला एक कुतूहल आहे. तो या सगळ्यांचा बारकाईने विचार करतो, निरीक्षण करतो. नदीच्या अंतरीचा तळ शोधता शोधता त्याला भेटणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनाच्या तळाशी जाण्याचीही ओढ लागून राहते. आपल्या सामान्य मध्यमवर्गीय, मध्यममार्गी जगण्याची चाकोरी सोडून तो या माणसांच्या गोष्टीत उतरतो, मात्र त्याला त्यांच्या जीवनात उतरता येत नाही. तिथे मात्र त्याच्या मध्यमवर्गीय सुरक्षिततेची कुंपणं आड येतात. आणि हेही तो कबूल करतो. तो सकिनाबीशी बोलतो. बामनवाडशी बोलत राहतो, त्याने बघितलेल्या प्रसंगाने तो स्वत: विषण्ण होतो, पण त्याला धीर देऊन त्याला त्याच्या स्पेसमध्ये सोडतो. तृतीयपंथी सगुणाशी तो अत्यंत

संवेदनशीलपणे वागतो, बोलतो आणि तिची गोष्ट ऐकून घेतो. पण समाजाच्या भीतीमुळे तिच्यापासून अंतर राखून राहतो. तिच्या आईची भेट घेण्याचा, सगुणा आणि तिच्या आईची भेट घडवून देण्याचा विचार करतो, पण रूढ मध्यमवर्गीय सुरक्षित मानसिकतेतून बाहेर पडत ते प्रत्यक्षात मात्र आणू शकत नाही. भिकाजीच्या गोष्टीतही त्याला कुतूहल आहे, त्याच्या भेटीची ओढ आहे. त्याचीही गोष्ट तो ऐकून घेतो, पन्नास रुपये त्याच्या खिशात ठेवतो, त्याच्यासाठी जेवणाचा डबा घेऊन येतो. पण, नस्ती झंझट नको म्हणून त्याला फोन नंबर देण्याचे तो टाळतो. आणि हे सगळे तो कबूल करतो आहे. प्रसादच्या विस्मयकारक जगातल्या प्राण्यांच्या गोष्टी ऐकतो. निवेदक हा उत्तम श्रोता आहे. इनअॅक्टीव्ह राहून भवतालाचे सूक्ष्म निरीक्षण करतो आहे. तो अटॅच आणि डिटॅचही लवकर होतो. आणि या सगळ्यावर अतिशय चिंतनपूर्वक विचार तो व्यक्त करतो आहे. त्याची एक एक विधाने अतिशय व्यापक, विचारशील आहेत.

**सकिनाबी :** सकिनाबी ही रेल्वे स्टेशनवर छोटी मोठी चोरी करणाऱ्या टोळीतील भिकारीण आहे. आपल्याला कुणी बघू नये पहाटे येऊन झाडझुडुपात आंघोळ करते. कुरूप भिकारी असली तरी आपल्या स्त्रीत्त्वाची, लाजेची, स्वाभाविक सुप्त ओळख जपत राहाते. निवेदकाशी नदीवर झालेल्या ओळखीशी, बोलण्याशी इमान ठेवून ती त्याला स्टेशनवरच्या चोरांपासून वाचवते. 'माटीमिल्या' अशी शिवी देऊन निवेदकाशी आपुलकीने बोलते. त्याच्यावर विश्वास ठेवते. 'कोणतीही औपचारिकता न पाळणारी निसर्गासारखी साफसुथरी' सकिनाबी 'माटीमिला अच्छा है' म्हणत रेल्वे अपघातात जीव गमावते.

**पुरभाजी झिंगाभोई बामनवाड :** हा मासे पकडून आपली उपजीविका चालवणारा निवेदकाचा नदीवरचा मित्र. तो त्याला नदीच्या अन्जान जागची वाळू काढण्याबद्दल आणि अशाच इतरही गोष्टी सांगतो. नदीशी, आपल्या व्यवसायाशी अत्यंत प्रामाणिक राहून मासेमारी करुन जगणारा बामनवाड एक साधा सरळ व्यक्ती आहे. त्याला नदीची, तिच्या इतिहासाची, परिसराची, नदीतल्या माशांची अगदी बारीक माहिती आहे. नदीवर नवस फेडायला आलेल्या बाईवर बलात्कार होताना बघून आपण काहीच प्रतिकार करू शकलो नाही, गोदामायच्यासमोर एका बाईवर अत्याचार होताना जीवाच्या भीतीने बघत राहिलो, ही सल त्याच्या मनाला लागून राहिली आहे. 'त्या बाईला अंगभर इसकटताना बघून आपण काही म्हंता काही करू शकलो नाही' हे त्याचे दु:ख नदीत बुडायला वेळ लागतो.

**सगुणा :** सगुणाला आधी अगदी ओझरतं बघून तिच्या हिजडा असण्यापासून दोन वेळा दूर पळणाऱ्या निवेदकाला रेल्वेत भेटल्यावर सगुणा थेट प्रश्न विचारते, ''नजर चुरानेवाले तुम.. और हिजडे हम.. वा रे व्वा.. सच्ची बता, आँखमे आँख डालके देखनेवाला हिजडा की नजर चुरानेवाला हिजडा?'' तृतीयपंथांबद्दल समाजात अनेक समज-गैरसमज आहेत. त्यांना स्त्री आणि पुरुषांसारखे सन्मानाने जगणे तर लाभत नाहीच, उलट अनेक प्रकारे शारीरिक, मानसिक अन्यायाला सामोरे जावे लागते. सगुणा मात्र याबद्दलची सगळी भडास निवेदकाजवळ व्यक्त करते. त्याला आपली गोष्ट, भूतकाळ, अंध:कारमय जगणे, प्रवास, पंथातील दीक्षा, विधी, बिरादरी, त्यांच्या परंपरा, समाजाकडून केले जाणारे शोषण, अत्याचार हे सगळं सांगते. या सगळ्यात माणूस म्हणून तृतीयपंथी व्यक्तीची होणारी घुसमट सगुणा व्यक्त करते. आपल्या पंथाचे पौराणिक महत्त्व, तमिळनाडूतील कुआगमची यात्रा याबद्दल सांगते. तृतीयपंथीयांची भाषा, त्याचे अर्थ, त्यातील संकेत

याविषयीही ती निवेदकाला बारकाईने सांगते. तृतीयपंथीयांची जीवनशैली, भाषा याचे यथार्थ चित्रण सगुणाच्या निमित्ताने कादंबरीत होते.

**सर्पमित्र प्रसाद :** प्रसाद या सर्पमित्र तरुणाची निवेदकाला नदीकाठी तो एका सापाला जीवदान देण्यासाठी  जंगलात सोडायला आला असताना भेट होते. त्याची सापांबद्दलची जाण आणि सापाला पकडण्याच्या युक्ती आणि क्लुप्त्या, त्याची प्राण्यांची निरीक्षणे, त्यांच्या जगण्याचा, बुद्धी सामर्थ्याचा विचार, निरीक्षणे या अद्भुत वाटणाऱ्या गोष्टी तो सांगतो. पण माणसाने आपल्या स्वार्थासाठी या प्राण्याला दिलेल्या त्रासातून त्यांना त्याला सोडवायचे आहे. या निष्पाप प्राण्याला जीवनदान देण्याचे काम तो आपल्या जिवाची रिस्क घेऊन अगदी प्रामाणिकपणे करतो आहे. प्रसादच्या निमित्ताने एक वेगळा जीवन अनुभव इथे चित्रित झाला आहे.

**भिकाजी :** एके दिवशी नदीकाठी चिंचेवर आलेल्या रानमांजराला बघून त्याच्या आत आत त्याने लपवून ठेवलेला नकोशा भूतकाळाचा तुकडा उघडा पडतो. भिकाजी हा दारूच्या नशेत, रागाच्या भरात आपल्या तान्ह्या मुलीला जिवानिशी मारून टाकतो. त्याच्या हातून अनावधानाने झालेल्या बाळाच्या मृत्युसाठी भिकाजीला पंधरा वर्षाची शिक्षा देखील होते. मात्र तो यासाठी कायम स्वतःला अपराधी समजत राहतो. बाळाच्या मृत्युनंतर भिकाजीचं बदललेलं जगणं, त्याचं दुःख, अबोलवृत्ती, त्याला झालेला मांजराचा फोबिया, त्याची अलिप्त वृत्ती या सगळ्या गोष्टींनी  त्यांच्याविषयी वाचकांच्या मनात सहानुभूती निर्माण होते. भिकाजीच्या आत दडलेला संवेदनशील बाप आणि त्याच्या मनात सतत बोचणारी सल त्याच्या बोलण्यातून सतत जाणवत राहते.

दादाराव, कालूभैय्या आणि त्याची प्रेयसी, पुजारी हे कादंबरीभर दिसत राहतात. दादाराव हे निवेदकाचे नदीवर पोहण्याचे बारकावे शिकवणारे, जीवनात मार्गदर्शन करणारे अनुभवी गुरु आहेत. कालूभैय्या हा गुराखी आहे. आपली गुरे सांभाळताना नदी परीसरावर त्याचे कायम लक्ष्य असते. कोण नवीन आले, गेले, काही वेगळी घटना घडली या सगळ्याकडे त्याचे लक्ष असते. निवेदकाला ही सगळी माहिती देणे हे त्याला जबाबदारीचे वाटते. घाटावरील मंदिरातील पुजारीही निवेदकाची सोबत करत राहतो. बामनवाड, सगुणा ही पात्रे आजच्या आपल्या भोवतालच्या समाजजीवनावर, बदलत्या निसर्ग, मानवी प्रवृत्तींवर तिखट भाष्य करतात. लेखकाचे कुटुंब, मित्रपरिवार, नोकरी या गोष्टींची कादंबरीत फक्त उपस्थिती जाणवते, त्यांचा प्रत्यक्ष वावर नाही.

**नदी :** नदी एक प्रमुख पात्र म्हणून संबंध कादंबरीभर व्यापून राहिली आहे. नदी ही जिवंत प्रवाह असते, तिच्यातला लिव्हिंग ऑरगॅजन कादंबरी वाचताना प्रत्ययाला येतो. मनुष्यवस्तीच्या सहवासात नदी पूर्णपणे माणसाळते. पण जिथे मनुष्याचा स्पर्शही झालेला नाही अशीही जागा नदीच्या पात्रात असते. नदीच्या अशा व्हर्जिन जागेचा शोध घेण्याची लेखकाची असोशीही या कादंबरीत व्यक्त झाली आहे. नदीतली अशी व्हर्जिन जागा शोधून तिथली वाळू काढायचा निश्चय निवेदक करतो आणि मोठ्या धैर्याने ती वाळू मिळवतो. कादंबरीत ओघाने येणारा हा प्रसंग अतिशय रोमांचक, वाचकालाही एक वेगळा प्रत्यक्ष अनुभव देणारा आहे.

खरं तर काठावरून शांत दिसणाऱ्या नदीच्या आत खोलवर काय काय सुरू असतं, याचा अंदाज येणं कठीणच असतं. नदीच्या परिसरात तर अशा कित्येक घटना घडून जात असतात, त्याचं नदीलाही काहीतरी वाटत असेल. नदी या सगळ्या अगणित घटना पुसून टाकून पुन्हा साऱ्या घडण्याबिघडण्याला, निर्माणाला सामोरी जात असेल. हाच विचार लेखकाला पुन्हा कुठेतरी आश्वस्त करतो. नदीचं प्रवाहीपण हाच आपल्या जगण्याचा मूलमंत्र आहे.

### ३.२.४ प्रसंगनिर्मिती :

माकडांच्या कळपाची गोष्ट, सगुणाची गोष्ट, तृतीयपंथी समूहाच्या अनेक प्रथा, परंपरा, त्यांचे विधी, अनेक मौखिक परंपरा, रामायण-महाभारतातील त्यांच्या अस्तित्त्वाचे संदर्भ, नाग पकडण्याचा प्रसंग, नदीच्या व्हर्जिन जागेची वाळू काढण्याचा प्रसंग, ती शोधात असताना, काढत असताना निवेदकाच्या मनाची अवस्था, एक धुंदी हे सगळे प्रसंग लेखक मनोज बोरगावकर यांनी आपल्या शब्द, शैली आणि कल्पना प्रतिभेच्या जोरावर अगदी जिवंत केले आहेत. हे प्रसंग चित्रण वाचकाला घटनेची प्रत्यक्ष अनुभूति देणारे आहेत. निवेदक हा कादंबरीचा सूत्रधार असला तरी अनेक प्रसंगात तो श्रोता किंवा त्या प्रसंगाचा इनॲक्टीव्ह भाग असल्यासारखा वावरतो. येणाऱ्या नव्या पात्राला त्याची गोष्ट सुरू करायला, सांगायला भाग पडतो. संवेदनशीलपणे ती ऐकतो.

### ३.२.५ भाषाविशेष

आपला भवताल जसा आधुनिक झाला आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या गोष्टींची सरमिसळ झाली आहे. अगदी तशीच भाषेतही भिन्न भाषिक शब्द गुणधर्माची मिसळ झाली आहे. या कादंबरीत भाषेचे एक सुंदर मिश्र रूप आहे. लेखक मनोज बोरगावकर यांची भाषाही अगदी नांदेड परिसरातील बदलती ग्रामीण बोली आहे. लेखनात जस ग्रामीण बोलीची रुपे येतात. काही हिंदी उर्दू भाषेतील शब्दही लेखकाने निवेदनाच्या प्रवाही भाषेत वापरले आहेत. तसेच मराठीत प्रचलित झालेले आणि भाषेत रुजलेले इंग्रजी शब्दही येतात. यामुळे कादंबरीचे निवेदन प्रवाही झाले आहे. भिकारीन सकिनाबी आणि सगुणा, पुरभाजी झिंगाभोई बामनवाड, कालू भैय्या यांचे मराठी, हिंदी-उर्दू मिश्रित तसेच ग्रामीण मराठी बोलीतील शब्दवापर आणि संवाद वेगळेपण आणणारे आहेत.

'माटीमिले.. दिन खुलनेकू नदी पे मिलता और रात बंद होने कू ठेसन पे क्या कोई कामा नही क्यारे तेरेकू',

'सांडशील पाण्यात, तर, कोणाला खबरबी नाही लागणार.'

'शानपणा सांगू नको.. झाडाझुडपात आंघोळ धुवावी लागते, न्हाईतर पोट्टेपाट्टे पहात राहतात..'

'माटीमिले, रोज ठेसन पे आतेकू गलेमे सोने की चैन निकाल के आता क्या .. आज वैसेच गले मे दिखरी, भूल गया क्या निकाल के रखनेकू?' (पृ. १८-१९)

'म्याबी जिवाच्या भीतीनं गप्पगार बसलो, बाईच्या इनवन्या अन् पोरायचा पिसाट कल्ला अन् टाचा घासण्याचे आवाज आयकीत... कव्हाबी चाकू दावून आमची माशी काढून घिऊन जाणारे हे पोट्टे. माशापाई जीव घेण्याची तयारी असणारे हे पोट्टे, म्या काही आरडा केला असता तर अलमक मजा जीवबी काढून नेले असते. अर्ध्या घंट्यानं अंगभर इस्कटलेली बाई आली की हो म्हया म्होरं बेशरमाआडून. धाय मोकलून रडली ओ माझ्या म्होरं.. त्या दिवशी तिच्या डोळ्यातल्या पान्यापरीस नदीचं पाणी मला कमजोर वाटलं.' (पृ. ३२)

कालूभैय्याचीही संवादाची भाषा हिंदी आहे. 'साब जरा इधर आव जी, आप को कुछ बोलने का है। दो चार दिनसे बोलना बोलरू तुमकू, एक हिजडा आरा जी नदी पे । मै दो तीन बार देखा ।' (पृ. ३७)

सगुणाचीही संवाद भाषा हिंदी आणि मराठी अशी मिश्र येते. 'दिल की भडास निकालने के लिए बैठी, पण नुसती भडास काढून चालत नाही. पैसे लागतातच णा, पण आज तुझ्याकडून पैसे घेताना कितीतरी वर्षांनी आपलं जमीर बेचल्यागत वाटतंय.' (पृ. ६२)

**ग्रामीण बोलीरुपे** : आपल्याला हा पोहण्याचा 'किरम्या' आहे. टोंगळेदुखी, लई दुपारचे आलांव, अनेक माशांची ग्रामीण बोलीतील नावे कत्ला, बाम, मरळ, घेगर, झिंगा, वरडोळी, वीस फूट रुतलेलं मढ 'अलमक' काढलं, लवंडेल की कश्ती पाण्यात, कश्ती डुगडुगायला लागली, कुडाकर्कट, म्हैस आणि त्याचे वगारू, आमची सिट्टीपिट्टी गुल झाली, घरी जाऊन 'फराकत' झोपायचे, भिकाजी हळूहळू हे शहर सोडण्याचे 'आसार' दिसत होते.

**इंग्रजी शब्द** : स्विमिंग काश्चूम, अयशस्वी अटेम्ट, डंक इन चा अपभ्रंश होऊन डंपिन आणि शेवटी डंकिन, लँडींग, अटॅच-डिटॅच, चालू प्रक्रियेचा इनअॅक्टीव्ह भाग, पुरभाजी बामनवाड 'माईम'च झाला होता, व्हर्जिन जागची अनटच्ड वाळू, थेरॉटीकल प्लॅन, अघोषित कर्फ्यू, सर्कमस्टान्सेस, एक सुप्त बॉंडेज घेऊन डीपार्ट झालो आम्ही, ढकलस्टार्ट गाडी.

**हिंदी-उर्दू शब्द** : माटीमिले, कश्ती-किश्ती, 'अन्जान' जाग्यावरची तळाची वाळू, त्याच्या 'जिनगानीची मनशा', 'लयी कोशीश', मनसोक्त 'मुशाफिरी', मी मात्र 'तहेदिल' त्या चित्रात रमलो, 'दोनोही सुरतो में काहीना काही' नक्कीच माझ्या हाती लागले असते, सारे प्रश्न 'जवाबाची' तारिख शोधत.., ती एकमेकात 'घुलमिलून' गेलेले असतात, रुतबा, बधाईचे गाणे, केवढी 'पाकीजगी' व्यापून राहिली होती, जरिया, दामन, ताउम्र.

कादंबरीत तृतीयपंथी समूहाच्या काही संकेत भाषा, शब्दांचा सगुणा या पात्राने परिचय करुन दिला आहे. जसे की, बडमा म्हणजे शंभरची नोट, पानकी म्हणजे दहा रुपयाची नोट, छिंदू म्हणजे हिंदू, छिलव्हूह म्हणजे मुसलमान, कनसाबी म्हणजे फोन, पतवाईदास म्हणजे आता इथून निघून जा, काटका म्हणजे पन्नास रुपयाची नोट, कोती म्हणजे रखेल, धौकन्नी म्हणजे बिडी, पनके म्हणजे आपल्या क्षेत्रात गाणे बजावणे करणारे आणि खैरगल्ले म्हणजे दुसऱ्याच्या क्षेत्रात गाणे बजावणे करणारे आणि गिरिया म्हणजे हिजड्याने ठेवलेला पुरुष. असे वेगवेगळे शब्द आणि त्यांचे अर्थ सगुणा या पात्राच्या निमित्ताने कादंबरीत आले आहेत.

हा असा विविध भाषेतील शब्द आणि संवादाचा वापर कादंबरीला एक प्रवाही परिणामकारकता आणि भाषिक वैविध्य, सामर्थ्यासाठी उपयुक्त ठरला आहे.

### ३.२.६ 'नदीष्ट'चे वेगळेपण

या कादंबरीचा नायक, निवेदक ही संपूर्ण गोष्ट सांगतो आहे. आपल्या प्रवासाची, प्रवासात भेटलेल्या लोकांची गोष्ट. हा निवेदक जरी या नदीत, नदीच्या पर्यावरणात, भेटणाऱ्या माणसांमध्ये गुंतल्यासारखा वाटत असला तरीही प्रत्यक्षात मात्र तो या सगळ्या गोष्टींपासून अलिप्त आहे. या सगळ्या माणसांचा, त्यांच्या गोष्टींचा तो विचार करत राहतो. नदीष्ट कादंबरीचे विशेष म्हणजे लेखकाचे विविध विषयांचे चिंतनशील विचार यामध्ये व्यक्त झाले आहेत. निसर्ग, माणूस, बदलते पर्यावरण, त्याचे परिणाम, माणूस आणि निसर्गाचा सहसबंध आणि संघर्ष, माणूस आणि प्राण्यातील संघर्ष, मानवाच्या आदिम भावना, त्या भावनांशी त्याचा झगडा या सगळ्याबद्दल लेखकाचे विचार पात्र प्रसंग विशेषाने व्यक्त झाले आहेत. कादंबरीत निसर्गातील सूक्ष्म निरीक्षणे आली आहेत. निसर्ग आणि निसर्गातील अनेक गोष्टी लेखकाला समजल्या आहेत. लेखकाच्या जीवनानुभवाला निसर्ग आणि नदीने समृद्ध केले आहे. निसर्गातील, नदीच्या परिसरातील घटनांचे, प्रसंगांचे अनेक तपशील लेखकाने प्रचंड ताकदीने वर्णन केले आहेत. कादंबरी वाचताना वाचकाला घटना प्रसंगांचे अगदी हुबेहुब चित्र दिसते. वाचकाला आपण प्रत्यक्षदर्शी त्या घटनांचा साक्षीदार आहे असे वाटते. बामनवाड आणि निवेदकाच्या निमित्ताने लेखकाने मध्यमवर्गीय समूह मानसिकतेची काही निरीक्षणे नोंदवली आहेत. भीती, अलिप्तपणा, गप्प बसून दुर्लक्ष करणे हे विशेष काही प्रसंगातून दिसतात. घडणाऱ्या घटनांपासून बाजूला राहून, त्या सगळ्यापासून दूर जाऊन कुठल्याशा अदृश्याचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. लेखकाचे हे चिंतन फार महत्त्वाचे आहे.

## ३.३ समारोप

मनोज बोरगावकर यांच्या लेखनात, व्यक्त होण्यात एक साधेपणा, अकृत्रिमता आहे. निवेदन शैली प्रथमपुरुषी आहे. त्यामुळे लेखनात आत्मस्वर असला तरी आत्मकेंद्रित भाव नाही. तो वाचकाला आपल्या भूतकाळाशी आणि वास्तव भवतालाशी जोडणारा समतोल भाव आहे. आपल्या सभोवतालाच्या निसर्गाशी, माणसांशी जोडून घेत जगणे सांधणारा दुवा म्हणजे नदी, जगणे वाहते ठेवणारी ती नदी. कादंबरीच्या शैलीतील प्रवाहीपणा ही कादंबरीची गरजच होती. नदीष्ट कादंबरीची शैली ही कथनाची शैली आहे. ती लोकपरंपरेतून आलेल्या महाकाव्याची आहे. त्यात अनेक माणसं येतात, त्यांच्या आपापल्या गोष्टी येतात. या प्रत्येक पात्राची गोष्ट भिन्न वेगळी आहे, स्वतंत्र आहे. त्यांचा एकमेकांशी थेट काही संबंध नाही. पण तरीही प्रत्येक गोष्टीच्या तळाशी नदी आहे, एक वाहतेपण आहे. आपण नदीपासून दुरावत गेलो की आपलं उदात्तपणही हिरावून गेलं. नदीष्ट ही कादंबरी भलेही गोदावरी नदीच्या काठावर घडत असली तरीही ती इतर कोणत्याही प्रदेशातील नदी आणि नदीकाठ सामावून घेणारी आहे. त्यामुळे ही कादंबरी एका प्रदेशाची न राहता सर्व मानव समूहांना आणि नदी परिसराला आपल्या अवकाशात सामावून घेते. ललित गद्य रूपाचा प्रभाव या कादंबरीच्या मांडणीवर जाणवतो. एक निराळे अनुभवविश्व, प्रवाही कथनशैली, बोली आणि मिश्र

भाषा वापर यामुळे नदीष्ट कादंबरी वाचकांच्या मनाचा तळ गाठते. मानवी जीवनाकडे, निसर्गाकडे बघण्याचा एक तरल, सुंदर, कलात्म दृष्टीकोण देते. कादंबरीचे मुखपृष्ठ हे अतिशय वेगळे, सुंदर व कादंबरीच्या तसेच नदी व नदी काठच्या अंतरंग परिसराची प्रथमदर्शी कल्पना देणारे आहे.

## ३.४ शब्दार्थ

टोंगळेदुखी - गुडघेदुखी

अलमक - अलगद

कश्ती - होडी

फराकत - निवांत

आसार - लक्षण

सिट्टीपिट्टी गुल होणे - भीतीने गाळण उडणे

डंकिन - 'डंक इन'चा अपभ्रंश - डंपिन

माईम - स्तब्ध, मुकाभिनय

कोशिश - प्रयत्न

मुशाफिरी - भटकंती

तहेदिल - पूर्ण मनापासून

घुलमिलून - मिळूनमिसळून

रुतबा - दर्जा, महत्त्व

पाकीजगी - शुद्धता

जरिया - माध्यम

ताउम्र - आयुष्यभर

## ३.५ प्रश्नांचे स्वरूप

**अ) बहुपर्यायी वस्तूनिष्ठ प्रश्न**

१. कादंबरीतील सर्पमित्राचे नाव काय ?

अ) प्रकाश ब) प्रसाद क) सगुणा ड) दादाराव

२. निवेदकाला पूर्ण नदी पात्र पोहायला कोण शिकवते ?

अ) बामनवाड ब) भिकाजी क) पुजारी ड) दादाराव

३. निवेदकाला नदीवर भेटणाऱ्या भिकाऱ्याचे नाव काय ?

अ) प्रसाद ब) सगुणा क) भिकाजी ड) बामनवाड

४. सगुणाच्या मैत्रिणीचे नाव काय ?

अ) मालाडी ब) सकीनाबी क) पार्वती ड) गोदावरी

५. नदीष्ट कादंबरी कोणत्या प्रकाशनाने प्रकाशित केली आहे ?

अ) लोकवाङ्मय गृह ब) मौज प्रकाशन क) ग्रंथाली प्रकाशन ड) साधना प्रकाशन

**उत्तरे :** (१. ब) प्रसाद, २. ड) दादाराव, ३. क) भिकाजी, ४. अ) मालाडी ५. क) ग्रंथाली प्रकाशन)

**क) लघुत्तरी प्रश्न**

१. नदीष्ट कादंबरीतील पात्रांचित्रणाचा परामर्श घ्या.

२. नदीष्ट कादंबरीचे भाषाविशेष विशद करा.

**ड) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. नदीष्ट कादंबरीच्या आशयसूत्रांची चर्चा करा.

२. नदीष्ट कादंबरीतील आदिबंधांची चर्चा कार.

## ३.६ संदर्भ ग्रंथ

बोरगावकर, मनोज : नदीष्ट, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१९ (आवृत्ती आठवी : २३ फेब्रुवारी, २०२३)

### ३.७ उपक्रम

✻ लेखक संवाद / लेखक मुलाखत.

✻ कादंबरीचे समूह अभिवाचन व चर्चा घडवून आणा.

✻ आपल्या जवळच्या नदी व नदी परिसराला भेट देऊन निरीक्षण करा.

❑❑❑

### घटक ४

# सूर्य पाहिलेला माणूस

## ४.० उद्दिष्ट्ये

१. मकरंद साठे लिखित 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाची संरचना लक्षात घेणे.

२. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाची वर्तमानकालीत प्रस्तुतता अभ्यासणे.

३. सत्यनिष्ठा, सद्वर्तन, सदाचार, व्यक्तिनिष्ठा, जबाबदार नागरिकत्व या घटकांची मानवी जीवनातील उपयुक्तता विचारात घेणे.

४. सत्यशोधनाचा आणि आणि तो आचरणात आणण्याचा संघर्ष आणि प्रवास समजून घेणे.

५. नाटकाच्या आशय आणि अभिव्यक्तीतील प्रायोगिकता अभ्यासणे.

६. या नाटकातील जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये यांची चर्चा करणे.

७. मराठी वैचारिक नाटकाच्या परंपरेत 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाचे स्थान निश्चित करणे.

## ४.१ प्रास्ताविक

या नाटकाचा पहिला प्रयोग परिवार या नाट्यसंस्थेकडून २४ जानेवारी, १९९९ रोजी सादर करण्यात आला. हे सॉक्रेटिसच्या जीवनावरचे नाटक वाटत असले तरी ते सॉक्रेटिसचे चरित्र मांडणारे नाटक नाही. या नाटकात सॉक्रेटिसने मांडलेली कालातीत तत्त्वे पुन्हा उच्चारली गेली. सत्याला अनेक परिमिती असतात संपूर्ण सत्य असे काही नसते या न्यायाने सॉक्रेटिसच्या विचारांनाही तपासून पाहता येते. आज जगण्याच्या चौकटीत जी लाजिरवाणी स्थिती सहन करावी लागते त्यात सॉक्रेटिसची सत्य, सदाचरण, सविनय कायदेभंग आणि मानवीय प्रश्नांचा शोध ही तत्त्वे कसे रूप धारण करतात हे पाहता येते. शिवाय झांटिपीसारख्या इतिहासात कैदाशीण मानलेल्या स्त्रीला मानवीय ताकद मिळवून देता आली हे या नाटकाचे वेगळेपण होय. या नाटकाच्या निर्मितीबद्दल 'नाटकवाल्यांचे प्रयोग' या ग्रंथात अतुल पेठे लिहितात, ''हे नाटक करताना मनाशी तत्त्वाचे आचरण करून नैतिकदृष्ट्या जीवनातील प्रश्नांशी लढाई करणारा कुणीही कार्यकर्ता समोर होता. या काळात बाबरी मशीद, मुंबई बॉम्बस्फोट, नर्मदा आंदोलन, भ्रष्ट मंत्र्याविरुद्धचे अण्णा हजारे यांचे आंदोलन... वगैरे प्रश्न ऐरणीवर होते. संपूर्ण सामाजिक अवस्था काळवंडलेली होती. बेकारी, बालमजुरी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, उदारीकरण, जागतिकीकरण अशी घोंघावत येणारी वादळे होती. अशा अवस्थेत सॉक्रेटिसकडे परत जावे असे वाटून या नाटकाची निर्मिती झाली.'' कुठल्याही अंधकारमय कालखंडात 'मी या अवस्थेत कसा जगू' हा प्रश्न संवेदनशील माणसाला पडतोच. असा माणूस कायम एकटा आणि एकाकी असतो. आजूबाजूच्या भ्रष्ट परिस्थितीने त्याची घुसमट होते. तो माणूस काही बोलू पाहतो, समजावू पाहतो. तत्त्वाला घट्ट चिकटून राहणे ही त्याची प्रतिज्ञा असते. तो तसाच जगतो आणि मरतोदेखील. सॉक्रटिसच्या मते,

'समाज हा एखाद्या सुस्त बैलासारखा असतो. त्याला जागे ठवेण्याकरिता गोचिडाची आवश्यकता असते,' 'सगळं शाबूत ठेवून उरलेल्या अवकाशात राजकारण करता येत नाही' हे त्याचे तत्त्वज्ञान आहे.

मकरंद साठे हे आजच्या काळातले महत्त्वाचे नाटककार आहेत. *ठोंब्या, ऐसपैस सोयीनं बैस, गोळायुग डॉटकॉम, चौक, ते पुढे गेले, वारंवार कुरुक्षेत्री येताती मनुष्य, प्रस्थान उर्फ एक्झिट* ही वेगळ्या वाटेने जाणारी नाटके त्यांनी लिहिली. शिवाय त्यांच्या *अच्युत आठवले आणि आठवण, ऑपरेशन यमू, काळे रहस्य, इडन ऑफ गार्डन उर्फ साई सोसायटी* या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या प्रत्येक नाटकाची शैली आणि मांडणी वेगळी असली तरी त्यात एक समान सूत्र आहे. त्यांच्या नाटकातली पात्रे आजच्या समाजव्यवस्थेविषयी, त्यातल्या सुसंगतीविषयी, विसंगतीविषयी, त्यातल्या अंतर्विरोधाविषयी खूप काही सांगत असतात. ही पात्रे कधी जवळ येऊन बोलतात तर कधी त्रयस्थासारखी अंतर ठेवून राहतात. सॉक्रेटिसही असाच कधी जवळ तरी कधी लांब गेल्यासारखा वाटतो. त्याच्या सद्‌वर्तनाच्या, सदाचाराच्या भूमिकेवर आधारलेले नाटक म्हणजे *सूर्य पाहिलेला माणूस* हे होय.

हे नाटक समजून घेण्यापूर्वी नव्वदोत्तर सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण या नाटकाने एकोणिसशे नव्वदनंतरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर, त्यातल्या चेहरा हरवल्याच्या वैचारिक अवस्थेवर नेमकेपणाने बोट ठेवण्याचे कार्य केले आहे.

गेल्या दोन तीन दशकात सामाजिक परिस्थिती सर्वंकष आणि गुणात्मक पद्धतीने बदलली. पाश्चात्य पद्धतीच्या आधुनिकीकरणाची सुरुवात दिडशे वर्षापूर्वी झाली असली तरी खऱ्या अर्थाने ज्यांच्या जगण्यात काही बदल झाले नव्हते असे आदिवासी समूह, कृषीवल संस्कृतीच्या घटकातील सर्वसामान्य माणसे अचानक आधुनिक नव्हे तर उत्तराधुनिक संस्कृतीला येऊन भिडली. त्यांच्या विरोधाला जागतिकीकरणाच्या रेट्यात पर्यायच उरला नाही. साहित्य, नाटक, कला ही मुळातच सांस्कृतिक, सामाजिक चलनवलनाशी संबंधित गोष्ट आहे. त्यामुळे त्यांच्यातही बदल झाले. आज समाजात एखाद्या मुद्द्यावर एकत्र येणेच संपले आहे. स्वातंत्र्य, समता या गोष्टी उत्तर भांडवलशाहीच्या काळात कुचकामी व्हाव्यात इतकी सामाजिक विघटनाची प्रक्रिया फोफावली. माणूस एकाकी, रिता झाला. त्याला वाईटाचे वैषम्य उरले नाही. उलट वाईटाचा उत्सवच सुरू झाला. व्हर्च्युअल रिॲलिटीचे, आभासात्मक वास्तवाचे आगमन झालेल्या या काळात वास्तव हेच जणू परिकथा झाले. विलक्षण घनघोर स्पर्धेने मानवाला अति टोकापर्यंत नेले. (उदा. काय डेंजर वारा सुटलाय- जयंत पवार) बदललेल्या परिस्थतीचा अन्वयार्थ लावणाऱ्या विचारधारा असमर्थ झाल्यामुळे जाणवणाऱ्या असंगत भावनेने व्याकूळ केले. व्यामिश्रता वाढली. अर्थात व्यामिश्रता यापूर्वीही होती पण ती किमान द्विधृवीय Bipolar (प्रतिगामी विरुद्ध पुरोगामी, भांडवलवाद विरुद्ध समाजवाद) अशी होती. आज ती अनेक चमत्कारिक स्तरावर गेल्याचे दिसते. त्यामुळे समाज अनेक पातळ्यांवर विखंडित, शतखंडित झाला. विरुद्ध विचारधारा विचित्र पद्धतीने एकत्र नांदू लागल्या. एकीकडे जग जवळ येत असताना साहित्य, कला मात्र छोट्या छोट्या गटात विभागून त्यांच्यात विसंवाद वाढला. *सेझ अराजकाची नांदी* हा या विषयावरील माहितीपट यासंदर्भात अधिक महत्त्वाची चर्चा करणारा आहे.

आज इतर साहित्य प्रकाराच्या तुलनेत नाटक या प्रकाराबाबत अधिकच अडचणीची परिस्थिती दिसते. येथे लेखक आणि वाचक असे थेट एकास एक नाते नसते तर त्यात दिग्दर्शक, कलाकार, सेट डिझायनर, संगीतकार, प्रकाशसंरचनाकार अशी असंख्य माणसे त्या प्रक्रियेत येत असतात. आज समाजात तयार झालेल्या दऱ्या पाहता नाटक या प्रकियेतले संवादित्व बिकट झालेले दिसते. नाटक जिवंत परफॉर्मन्सची कला आहे. संवादित्व संपल्यामुळे आजची सामाजिक परिस्थिती नाटकातून मांडणे अवघड झालेले आहे. त्यामुळे नाटक जगभरच या क्रायसिसमधून जाताना दिसते. विखंडीकरणाने ग्रासलेल्या काळात मध्यमवर्ग निम्नवर्गापासून सर्वार्थाने तुटल्यामुळे त्याच्या जगण्याची परिभाषा पुन्हा एकदा बदलत आहे. जागतिकीकरण, बहुसांस्कृतिकता यांनी मध्यमवर्गाचे भाषा, साहित्य, नाटक-सिनेमा, खेळ, वर्तमानपत्रही वेगळे केले. इंग्रजी वर्तमानपत्रच शहरी मध्यमवर्ग वाचतो. त्यात वृत्तपत्राच्या जिल्हानिहाय आवृत्त्या आधीच आकुंचन पावलेल्या लोकांना अधिक संकुचित करीत आहे. यासारख्या अनेक कारणाने त्याचा सार्वजनिक अवकाशच चिंचोळा झाला. आधीच मध्यमवर्गापुरता सिमित असलेला रंगभूमीचा व्यवहार त्यातही तुकड्यातुकड्यात विभागला. अतुल पेठे आणि काही प्रायोगिक मंडळी यांच्यासारखा एखादा अपवाद वगळता नाटक संपूर्ण महाराष्ट्रभर घेऊन जाणारे दिग्दर्शक दिसत नाहीत.

साहित्यप्रकाराला आजच्या परिस्थितीतील व्यामिश्रता, प्रवाहीपणा आणि सापेक्षता या तीनही गोष्टींचे भान असणे आवश्यक आहे पण आज हे भान दिसत नाही. बदल झाला हे बहुतेक लेखक मानतात, पण त्यांच्या लिखाणाच्या दृष्टिकोनात तो दिसत नाही. ''आजची स्थिती 'जगणे आजच्या काळात' आणि 'साहित्यनिर्मिती पूर्वीच्या काळात' अशी काहीशी दिसते.'' तसेच यापूर्वीच्या सोनेरी कालखंडात मराठी नाट्यकृतीसमोर त्यांच्या आधी आलेली युरोपीय आदिरूपे होती. कित्येक मराठी नाटकांच्या बाबतीत एकासएक संबंध दाखवता येतील इतकी आदिरूपे आणि कलाकृती यांच्यात नातेसंबंध होते. जागतिकीकरणानंतर सर्व जगच सपाट झाले. ''आज जगाच्या जवळ येण्यामुळे आणि संस्कृतीच्या सरमिसळींमुळे, ओळखीच्या अनेकविधतेमुळे अशी आदिरूपे आजच्या लेखकांपुढे नाहीत... प्रचंड बदल झाले असल्याने पूर्वीची आदिरूपे आज उपयोगी पडत नाहीत. एवढेच कशाला दर पिढी काहीतरी क्रांती करण्याचा प्रयत्न करते, आधीचे नाकारते, त्यातील नाकारणे या प्रक्रियेचे रूपही आज खूप बदलले आहे... बिनीचा शिलेदार याची व्याख्याही बदललेली आहे. त्या व्याख्येभोवतीची पूर्वीची गूढता, वलयांकितता, उदात्तीकरण (Self Glorification) आता उरलेले नाही. आस्वादी वाचक यांच्याही डोळ्यासमोर काही आदिरूपे नाहीत.'' त्यामुळे त्यांचेही झगडणे सुरू आहे.

आजचे साहित्य एकलक्ष्यी, एकसंध, केंद्रित परिणाम करणारे असावे या गोष्टींचा अट्टाहास वाचक आणि लेखक यांना सोडावा लागेल. याबरोबरच आजच्या साहित्यातला नायक, त्याची प्रतिमा ही पूर्वीच्या नायकासारखी उदात्तीकरण केलेली, वलयांकित असणार नाही. उलट ती या संकल्पनेचे 'मूर्तीभंजन' करणारी आहे. त्यामुळे या कालखंडात जसे 'सखाराम', 'घाशीराम' यांनी एक युग पेलले होते तसे युगकारी नायक नाहीत. नायकाच्या प्रतिमेतच मोठा फरक पडलेला दिसतो. चौकमधील १९ पात्रे सारखाच ताण घेऊन नाटकात वावरताना दिसतात. किंवा तेच अधांतर, शोभायात्रा याही नाटकांबाबतीत दिसेल. तसेच नाटक

यशस्वी होण्यासाठी जी नाट्यमयता आवश्यक असते ती अनेकदा वलयांकित करण्यावर अवलंबून असते. ''आजची परिस्थिती मांडू पाहणारी नाटके अशा नाट्यात्मकतेत कमी पडणार हे उघड आहे. एक तर या घट्ट केल्या गेलेल्या कल्पना आपल्याला बदलाव्या लागतील. ही नाट्यमयता इतर कशातून तरी निर्माण करावी लागेल, किंवा नाटकात या नाट्यमयतेची आवश्यकताच नाही हे स्वतःच्या वा प्रेक्षकांच्या गळी उतरवावे लागेल...हे दोन्ही पर्याय शक्य नसल्यास नाटक हा कलाप्रकारच, आजच्या घटकेला तरी आजच्या परिस्थितीला सामावून घेऊ न शकणारा म्हणून काही काळासाठी बाद करावा लागेल.'' आजच्या काळात नाटक जीवनापासून तुटू नये असे वाटत असल्यास वर जे निर्देश केले आहेत त्याचा गांभीर्याने विचार करून या परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या नाटकात प्रायोगिकता शोधावी लागेल.

१९९० नंतरच्या काळात मराठी प्रायोगिक रंगभूमीला ओहोटी लागल्याची मोठी चर्चा झाली. ''मराठी प्रायोगिक चळवळीत असा गंभीर, सखोल अनुभव घेऊन तो आपल्या साक्षीने व्यक्त करणारे महामनस्क व्यक्तिमत्व नाही. त्यांनी आयुष्याविषयी स्वतःला विचारलेले प्रश्न जसे खूप प्रगल्भ नाहीत, तसे प्रयोगशरण कला म्हणून रंगमंचमाध्यमास विचारलेले प्रश्न फार मूलभूत नाहीत. याचमुळे मराठीतील प्रायोगिक चळवळ अवघ्या वीस एक वर्षांत कृतकतंत्राच्या भोवऱ्यात सापडली आहे.'' प्रायोगिकतेचा जो एक प्रवाह पुढे जिवंत असणे अभिप्रेत होते तसे झाले नाही. म्हणून अशी टीका झाली. पाश्चात्य जगतातील नवता ही काही मनस्वी माणसांच्या संवेदनांच्या साक्षीने जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनातून आली. मानवी अस्तित्वाकडे पाहताना जाणवले ते पूर्वीच्या जीवनविषयक कल्पनांशी सुसंगत नव्हते. त्यामुळे रंगमंचाच्या गृहितकल्पनांना तीव्र प्रश्न विचारून विद्रोह निर्माण झाला. म्हणून पाश्चात्य प्रायोगिक चळवळीला एक मूलभूत असे स्वरूप प्राप्त झाले.

मराठी साहित्यात ज्याप्रमाणे साठोत्तरी हा शब्दप्रयोग वापरला गेला त्याच लक्षार्थाने आता नव्वदोत्तरी असा शब्दप्रयोग केला जातो. मराठी नाटकासंदर्भात नव्वदोत्तरी नाटक अशी काप काढून मांडणी करणे थोडेसे संदिग्धपणाचे वाटते. साठोत्तरी काळ हा राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक स्वप्नभंगाचा काळ होता तर नव्वदोत्तरी काळ हा कित्येकांसाठी दुःखद आहे. आपण जगतो आहोत ते वास्तव की स्वप्न याबद्दल संभ्रम वाटावा अशी परिस्थिती आहे. त्या परिस्थितीचा वेध घेणाऱ्या नाटकांचाच येथे विचार करावयाचा आहे. सत्तरच्या दशकात मराठी नाटकांनी एक बहराचा काळ निर्माण केला होता. लोकमान्य आणि राजमान्य अशी बरीच नाटके लिहिली गेली. या नाटकांनी मराठी रसिक सुखावला. नाटक करणारेही या सुखमय जाणिवेने तृप्त झाले. त्याचा परिणाम असा झाला की १९८० च्या दशकामधील राजकीय अस्थिरता, सामाजिक अशांतता, फुटीरतावादी चळवळी आणि हिंसा या उद्रेकाच्या तडक परिणामाने रंगभूमीचे तेज मंदावू लागले. त्याचा ताण नाटक करणाऱ्यांना आणि पाहणाऱ्यांनाही आला. हा ताण चांगल्या कलाकृती जन्माला घालण्यासाठी पूरक व्हावयास पाहिजे होता परंतु मराठी रंगभूमीचे ध्येय बहुतांश रसिकांना सुखावणे हेच असल्यामुळे रंगभूमीला उतरती कळा लागली. सर्वसामान्य रसिकही आता रंगभूमीवर अत्रे, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर यांच्यासारखे नाटककार कुठे आहेत? असा भाबडा प्रश्न विचारू लागला. त्यांच्या काही नाटकाचे अपवाद वगळता मांडणी अत्यंत सुमार होती, हे रसिकांच्या लक्षात आले नाही.

प्रायोगिक रंगभूमीही प्रस्थापितांशी उभा दावा मांडणारे काही ठळक अपवाद वगळता (आळेकर, तेंडुलकर, गो. पु. देशपांडे, एलकुंचवार) त्यापलीकडे जात नाही. या दशकाच्या मध्यावर लिहिणारे चं. प्र. देशपांडे आणि श्याम मनोहर यांच्याविषयी अधिक बोलले गेले नाही. परंतु या बदलाची चाहूल लक्षात घेऊन पुण्यात थिएटर ॲकॅडमीने १९८६–८७ मध्ये घेतलेली नवनाटककार कार्यशाळा आणि १९९०च्या सुमारास सत्यदेव दुबे यांनी मुंबईत घेतलेले लेखकांचे वर्कशॉप या दशकातील बदलाचा वेध घेण्यास प्रवृत्त करणारे कारण ठरले. म्हणून जयंत पवार म्हणतात, ''येऊ घातलेलं जागतिकीकरण हा या दशकाचा विशेष असला तरी या दशकातल्या नाटकांचा विशेष मला वेगळा वाटतो. ९० साल उजाडण्याआधी घडलेल्या दोन घटनांचा त्यावर मोठा प्रभाव आहे. एक म्हणजे लालकृष्ण अडवाणी यांनी काढलेली रथयात्रा, जिचं पर्यवसान बाबरी मशीद पाडण्यात झालं. दुसरी घटना मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची. इथून देशातली जातीय समीकरणं बदलू लागली आणि मधल्या–पिछड्या जाती वेगाने पुढे येण्याची प्रक्रिया सुरू झाली. या दोन्ही घटनांच्या एकत्रित प्रभावातून काही एक वैचारिक भूमिका आकार घेऊ लागली. जात, वर्ण, वर्ग, लिंग वर्चस्ववादी प्रवृत्तींच्या विरोधात उभी राहणारी ही भूमिका होती.'' याच काळात साहित्यामध्ये दलित, आदिवासी, ग्रामीण, विद्रोही इ. संमेलनेही मुळे धरू लागल्याने कधी नव्हे इतकी सामाजिक घुसळण सुरू झाली. यातून पुढे आलेल्या नाटककारांची पिढी थेट सामाजिक भूमिका घेणारी ठरली.

**नाटक म्हणजे सांस्कृतिक चळवळ**

नाटक ही एक सांस्कृतिक चळवळ आहे. कोणत्याही चळवळींचा जन्म सामाजिक सांस्कृतिक संरचनेची पुनर्मांडणी करणे या उद्देशातून होतो. मराठी नाटक रंगभूमीच्या बाबतीत हा मुद्दा विचारात घेणे आवश्यक आहे. मराठी रंगभूमीच्या संदर्भात व्यवसायिक, प्रायोगिक इत्यादी भेद कल्पून सामाजिक भान देणे ही जणू केवळ प्रायोगिक रंगभूमीचीच जबाबदारी आहे असा भास निर्माण केला जातो. नाटकाकडे सांस्कृतिक चळवळ म्हणून पाहिले जात नाही. धंदेवाईक नाटक असायलाच हवे पण त्याचबरोबर ते प्रायोगिकही असायलाच हवे. प्रायोगिक रंगभूमी ही व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळा असते. एखादा उद्योग व्यवसाय असतो तेव्हा तिथे रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभाग असतो. तिथे संशोधन होत असते. तिथे फायद्या तोट्याचा विचार नसतो. पण या संशोधनावर आधारित प्रयोग करून हा उद्योग व्यवसाय आपला माल बाजारात आणत असतो. अशी यंत्रणा रंगभूमीसंदर्भात असणे आवश्यक आहे. प्रायोगिक रंगभूमी कालांतराने नष्ट झाली तर व्यावसायिक रंगभूमीही संपेल. कारण तेव्हा व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळाच बंद झालेली असेल.

या नाटकातून जे मांडलं गेलं आहे ते पहिल्यांदाच मांडलं आहे अशातला भाग नाही. चांगल्या माणसाच्या मागे भोग असतात अशी पारंपरिक म्हण आहेच. शासक विरुद्ध विचारी माणूस हे द्वंद्वं जुनेच आहे. सॉक्रेटिस म्हणाला होता, बुद्ध म्हणाला होता, गांधी म्हणाले होते तसेच आज थोड्याफार फरकाने मेधा पाटकर वगैरे मंडळी म्हणतात. ''शासनकर्ते हे जुलमी, उद्धट, लोकांची पर्वा नसलेले, स्वतःचेच स्वास्थ्य जपणारे असतात आणि त्यांच्याशी काही माणसं टक्कर देत असतात, हे चित्र संपूर्ण जगात दिसतं. आजचा नवीन बायोलॉजिकल थॉट–निरो डार्विनिझम तरी काय सांगतो? माणूस हा प्राणीच आहे आणि

मूलतः तो स्वार्थी आहे. येनकेनप्रकारेण जगत रहाणं ही त्याची गरज आहे. तो सुधारणं ही सावकाश घडत जाणारी गोष्ट आहे. पण हा एकच प्राणी असा आहे, ज्याच्यावर संस्कार होऊ शकतात. बुद्धी, विचारशक्ती, कल्पनाशक्ती सगळं त्याच्याजवळ आहे. त्यामुळे निसर्गानं बहाल केलेला स्वार्थीपणा संस्कारानं कमी करता येतो... माणसाचा चार-पंचमांश मेंदू हा जनावराचाच असतो. त्याच्यापेक्षा वेगळी गोष्ट माणसांत असते, ती म्हणजे विवेकशक्ती. जिचा अजूनही उपयोग करताना माणूस आढळत नाही. त्यामुळे संपूर्ण जगभर अंधश्रद्धांचं प्रमाण वाढलेलं दिसतं. स्वतःची बुद्धी, विवेक वापरून भोवतालचं परिस्थितीचं विश्लेषण करण्यापेक्षा अंध विश्वास टाकून तो मोकळा होतो. त्यामुळे संस्कार करत राहणं आवश्यक आहे.

संस्कृती, सांस्कृतिक या शब्दांची फार उथळ अर्थानं आपल्याकडे ओळख आहे. त्यामुळे शासनकर्त्यांना त्याची पर्वाच नाही. थातूरमातूरपणा, गाणी म्हणणं यापलीकडं संस्कृती असते, हे त्यांना माहीतच नाही... कारण समाजालाच संस्कृतीचं महत्त्व समजलेलं नाही.'' असे श्रीराम लागू यांचे मत आहे. संस्कृती ही संकल्पना ज्या वरवरच्या अर्थाने एकूण समाज घेतो वास्तवात ती तशी नसते.

## ४.२ विषय विवेचन

*सूर्य पाहिलेला माणूस* हे मराठीतील नव्वदोत्तर काळातील एक महत्त्वाचे नाटक आहे. मनोरंजन आणि स्फूर्ती थिएटर्स या संस्थांनी या नाटकाचा पहिला प्रयोग २४ जानेवारी, १९९९ रोजी संध्याकाळी ५:३० वाजता भरत नाट्यमंदिर पुणे येथे सादर केला. या नाटकाला वर्तमान समाजाचा वैचारिक चेहरा हरवल्याचा एक वास्तविक संदर्भ आहे. विवेकी आणि जबाबदार माणसे ही शासक जमातीला कशी नको असतात हे सार्वत्रिक आणि सार्वकालिक सत्य हे नाटक अधोरेखित करते. याचा सर्वांगीण अभ्यास होणे आवश्यक आहे. हे नाटक खालीलप्रमाणे समजावून घेता येईल.

### ४.२.१ 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाची निर्मितीप्रेरणा

मकरदं साठे हे मराठीतील गंभीर नाटक आणि कादंबरीकार आहेत. सामान्य माणूस आणि त्याच्या भोवतालची परिस्थिती याच्यातले ताण ते लेखनातून मांडतात. सूर्य... या नाटकालाही एक वर्तमानातील ताणाचा संदर्भ आहे. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाच्या निर्मितीच्या मुळाशी काय विचार होता किंवा काय दृष्टिकोन होता हे नाटककार मकरंद साठे सांगतात.

''हे नाटक लिहित असताना एक दृष्टिकोन निश्चित होता, की आजची सामाजिक परिस्थिती आणि मी या गोष्टीशी नाटकाच्या विषयाचं नातं असलंच पाहिजे. सॉक्रेटिसचे काही विचार हे आजच्या परस्थितीत जास्त महत्त्वाचे ठरतात. सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानातील पाच गोष्टी मला आजच्या परिस्थितीत जास्त महत्त्वाच्या वाटतात.

१. सत्याचा निरलस शोध. आजच्या विखंडित मानसिक अवस्थेत तो फार महत्त्वाचा ठरतो. असं आताच्या काळात मानलं जात नाही.

२. केवळ सत्याचा शोध घेऊन भागत नाही, तर ते आचरणात आणावं लागतं.

३. आयुष्य नेमकं समृद्ध कशानं होतं, हा आजच्या युगातला मोठा प्रश्न आहे. नैतिकतेला संपूर्ण फाटा देऊन आयुष्य संपन्न होऊ शकत नाही.

४. कला उमगलेलं सत्य मला आचरणात आणायचं आहे; पण समाज कायदा त्या बाजूचा नाही. अशा वेळी मी माझी वागणूक कशी ठेवणार?

५. हा मुद्दा माझ्या मते नाटकाचा गाभा आहे. आपल्याला वाटणारी हवी असणारी कृती घडवून आणण्यासाठी मी दुसऱ्यावर किती अवलंबून राहणार? आपण प्रत्येक जण दुसऱ्यावर जबाबदारी ढकलत असतो. दुसऱ्या कोणीतरी एखादी गोष्ट करावी, अशी आपली अपेक्षा असते. असं न करता ही गोष्ट मी करीन, इतका बदल व्हायला हवा.

हे मुद्दे भिडल्यावर वास्तववादी शैलीत नाटक लिहून बघण्याचं मी ठरवलं. तसेच सॉक्रेटिसच्या आयुष्यातले काही क्षण घेऊन आजच्या परिस्थितीवर भाष्य करण्याचं मी ठरवलं. सॉक्रेटिसच्या माध्यमातून आचजे प्रश्न उलगडून मांडणं हा या नाटकामागचा हेतू आहे.

### ४.२.२ 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाला असलेले संदर्भ

या नाटकाला असलेल्या संदर्भाविषयी मकरंद साठे लिहितात.

१. ऐतिहासिक आढावा घेणं. सॉक्रेटिसचं तत्त्वज्ञान समजून घेण्याआधी त्या काळाचा आढावा घेणं गरजेचं असतं. त्या वेळी, त्या आधी आणि त्यानंतर आजूबाजूला काय घडत होतं हे जाणून घ्यावं लागतं निरनिराळ्या काळातील लोकांनी सॉक्रेटिसला इंटरप्रिट का केलं, हे समजून घ्यावं लागतं.

२. प्रत्यक्षात सॉक्रेटिस कसा जगला, त्याचं चरित्र या गोष्टींना मी नाटकात स्थान दिलेलं नसलं, तरी त्या संदर्भात मी माहिती गोळा केलीच. नाटकाला अभिप्रेत असं तत्त्वज्ञानाचं वाचन केलं. प्लेटो व सॉक्रेटिसच्या आणखी एका शिष्यानं संवादरूपात हे तत्त्वज्ञान लिहून ठेवलं आहे.

३. सामाजिक इतिहास बघावा लागतो. अथेन्समध्ये लोकशाही होती म्हणजे काय होतं? त्यासाठी ग्रीक कालखंडाचे भाग वाचले.

थोडक्यात सॉक्रेटिसला काय म्हणायचं होतं, त्याच्या गाभ्याशी पोचण्याकरता व त्या वेळचे सामाजिक संदर्भ जाणून घेण्याकरता जे वाचायचं होतं ते मी वाचलं. आणि सत्याचा अपलाप होऊ न देता नाटक लिहिले. अभ्यास करून तो काळ आणि त्या काळाचे संदर्भ जिवंत करीत, त्या काळाच्या आणि आजच्या परिस्थितीत साम्य दाखवत हे नाटक लिहिले गेले आहे.

### ४.२.३ 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाचे मध्यवर्ती आशयसूत्र

अतिवास्तववाद-व्यस्ततावाद, अस्तित्ववाद आणि नवअभिजातवाद या तीन मूलभूत भूमिकांतून मराठी रंगभूमीवर १९५५ ते १९७५ या काळात प्रायोगिकता आली. प्रायोगिकता ही कलावंताची अपरिहार्य आवश्यकता आहे आणि तशी ती असली, तरच ती अस्सल कलात्मक प्रायोगिकता म्हणता ठरते. प्रचाराचे

किंवा शिकवणुकीचे साधन म्हणून जी नवीनता कलेत किंवा नाटकात येते, ती काही सारीच्या सारी प्रायोगिकता नसते. परंतु मकरंद साठे लिखित आणि अतुल पेठे दिग्दर्शित 'सूर्य पाहिलेला माणूस' हे नाटक म्हणजे गेल्या पाव शतकात जी काही महत्त्वाची प्रायोगिक नाटके प्रयोगांकित होऊन गेली त्यातले एक महत्त्वाचे नाटक मानता येईल.

'सूर्य पाहिलेला माणूस' सारखी नाटके व्यावसायिकदृष्ट्या विक्रमी यश मिळवणारी ठरतातच, असे नाही, परंतु अशा नाटकांना विविध थरातील प्रवाहांतील लोकांनी गर्दी करावी आणि त्यापासून प्रेरणा घ्यावी. ही एक उल्लेखनीय सामाजिक सांस्कृतिक गोष्ट समजता येईल. नव्वदनंतरच्या काळात अशा नाटकाचे शंभरच्यावर प्रयोग व्हावेत ही उल्लेखनीय गोष्ट आहे.

आज जागतिकीकरण आणि बाजारपेठीय अर्थव्यवस्थेच्या रेट्यात एक नवी मूल्यव्यवस्था आकारास आली आहे. राजकीय दहशतवादाचे काय करायचे, व्यापारी दहशतवादाचे काय करायचे, मानवी समतेचे काय करायचे आणि मानवी मूल्यांचे काय करायचे, असे प्रश्न निर्माण झाले आहेत. सगळी मूल्ये उद्ध्वस्त होत असताना खऱ्या अर्थाने भरीव, समृध्द आयुष्य कसे जगायचे, सत्याचे आकलन होणे म्हणजे काय? या बाबी किमान चर्चेच्या केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. या दृष्टीने मराठी रंगभूमीकडे पाहता काही महत्त्वाची नाटके समोर येतात. त्यापैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे हे नाटक होय. या प्रश्नांची चर्चा या नाटकात अत्यंत सकस आणि मूलभूत पातळीवर करण्यात आली आहे.

आपल्यावर झालेल्या अन्यायाची कल्पना असूनही आणि पळून जाण्यचे मार्ग उपलब्ध असूनही तत्त्वाकरिता आणि जीवनभर ज्या सत्याचा आग्रह धरला, त्या सत्याकरिता सॉक्रेटिसने वीरमरण पत्करले. 'सत्याग्रही सॉक्रेटिसचे वीरमरण' या आपल्या पुस्तिकेत श्री. वसंत पळशीकर म्हणतात की, ''सॉक्रेटिसकडे केवळ एक थोर तत्त्वज्ञ, 'पाश्चिमात्य तत्वज्ञान परंपरेची गंगोत्री' म्हणून न पाहता, 'इतिहासातला आद्य सत्याग्रही वीरपुरुष' म्हणून पाहणे उदबोधक व प्रेरक ठरेल.''

एकदा सत्य म्हणजे काय हे समजल्यावर ते आचरणात आणायचे अवघड असते पण ते आणायचेच या निश्चयाने सॉक्रेटिस वागला. तत्कालीन परिस्थिती व आताची परिस्थिती यात अनेक साम्य आहेत. म्हणूनच आज हे नाटक महत्त्वाचे ठरते.

सॉक्रेटिसचे वडील मूर्तिकार होते. सॉक्रेटिस सुरुवातीला आपला परंपरागत व्यवसाय करत असे, परंतु नंतर ज्ञान, विवेक व सत्याच्या दिशेने त्याचा प्रवास सुरू झाला. यथावकाश न्यायसंस्थेकडे खटला होऊन त्याला विष प्राशणाची शिक्षा झाली. राजकीय सूड, हितसंबंधी शक्तीचा द्वेष यामुळे ऐहिक सुखाचा कसलाही लोभ न बाळगणाऱ्या दृष्ट्या पुरुषाचा नेहमीच बळी पडत गेला आहे. सॉक्रेटिस, ख्रिस्त ते महात्मा गांधी यांच्यापर्यंतचा इतिहास पाहिला तर हेच घडत आले आहे असे दिसेल. सत्य, सदाचरण, निष्ठा, नीतीधैर्य समाजाला शिकवायचे असतील तर समाजाला एका सॉक्रेटिसची गरज आहे ही भावना हे नाटक निर्माण करते.

### ४.२.४ 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाची संचरना

**संविधानक**

'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाच्या पहिल्या अंकात पडदा उघडला की रंगमंचावर तीन व्यक्ती दिसतात. मागील पडद्यावर वेगळ्याच सावल्या आहेत. एखाद्या तापदायक वादविवादानंतर यावी तशी शांतता आहे. व्यक्ती दोन आणि व्यक्ती तीन अस्वस्थ आहेत. व्यक्ती एक मात्र अत्यंत शांत आणि आरामात आहे. सुरुवातीला हे व्यक्ती गुहेत असल्याचा भास होतो. ते आत चर्चा करीत आहेत. एखाद्या व्यक्तीचे शांत असणे हा कसा राजकीय पवित्रा असतो या विषयी चर्चा सुरू आहेत. व्यक्ती तीन हा वैतागलेला असून त्याच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या मानसिक वेदना त्याला असह्य होत आहेत. तेवढ्यात एक माणूस धडपडत आत येतो. डोळे दिपल्यासारखा तो आंधळा आहे. तिघेही त्याच्याकडे धावतात. त्याला सावरून बसवतात पण तो काहीच बोलत नाही. हा व्यक्ती चार आहे. ही जागा गुहेची आहे. या जागेत जास्त कुणी येतही नाही अशी चर्चा करीत असतानाच सॉक्रेटिस प्रवेश करतो. आणि त्याच्यासोबत इतरही चार माणसे आहेत. ज्यात सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो, सॉक्रेटिसचा मित्र क्रिटो, अल्किबियाडिस आणि शेवटी फिडो आहे. तेव्हा सॉक्रेटिस या गुहेविषयी बोलतो.

''ही बघा गुहा. सर्व मनुष्यजात इथं वास्तव्य करते. या गुहेचं तोंड त्या बाजूला आहे बघा लहानसं. इतकं लहान की त्यातून उजेडसुद्धा धड आत येत नाही. लहानपणापासून इथंच असतात सर्वजण. हातपाय साखळदंडांनी बांधलेले. मान खोड्यात अडकवलेली. कोणाला हलताही येत नाही. नजर समोर फक्त एकाच दिशेला बघू शकणारी... आणि त्या माणसांच्या मागे पाहिलंत? प्रखर अग्नी आहे. त्याचाच उजेड आहे गुहेत. आणि नीट पाहिलंत तर ती भिंत दिसेल. अग्नीच्या आणि माणसांच्या मधे असणारी.''मनुष्य जात एका गुहेत, अंधाऱ्या खोलीत वास्तव्य करीत आहे. ज्यात उजेड किंवा सूर्य येत नाही. याचे सूचन नाटककार येथे करतात. भिंतीवर विविध प्रकारचे आकार आहेत. पुठ्ठे आहेत. त्यांच्या सावल्या आहेत. या सर्वांसाठी सत्य म्हणजे या सावल्या आहेत. त्या गुहेतून एक माणूस कसा बाहेर येतो आणि त्याला उजेड कसा दिसतो याचे वर्णन प्लेटो, फिडो आणि सॉक्रेटिस यांच्या संवादातून येते. नंतर तो उजेड किंवा सूर्य कसा असतो, कोणता खरा याची चर्चा होते तेव्हाचा व्यक्ती तीन आणि प्लेटो यांच्यातला संवाद महत्त्वाचा आहे.

**३ : पण अशा परिस्थितीत त्यानं काय करायचं? जगायचं कसं?**

**प्लेटो** : अशीच परिस्थिती असते नेहमी गुहेच्या या भागात. सूर्य पाहिल्यानंतर कसं जगायचं, हे काहींना कळत नाही. मग तो सूर्य कुठलाही असो. ही मंडळी, काय काय करत असतील? तर तो सूर्यच पहिल्यांदा झाकोळून टाकतील. स्वतःच्याच वागण्यानं. स्वतः तर हास्यास्पद होतातच, पण सूर्यालाही ग्रहण लावतात.'' (सूर्य पाहिलेला माणूस पृ. ६, ७)

गोंधळाची परिस्थिती माणसाच्या आसपास नेहमीच असते. किंवा बऱ्याचवेळा मनाच्या विरुद्धही असते. किंवा परिस्थिती मनासारखी नसली की गोंधळ निर्माण होतो.

**क्रिटो** : मनासारखी परिस्थिती आहे, की नाही ते कळण्यासाठीसुद्धा थोडीशी स्वच्छ परिस्थती लागते. ही स्वच्छता असत नाही ना अशावेळी. परिस्थिती कळलीच पाहिजे, आज आहे ती!... आणि ती फार वाईट असली तर माणसावर माणूस म्हणून एक किमान विश्वाससुद्धा ठेवता येत नाही.

४ः हेच! हेच झालंय, माझ्या तिथं. सगळ्यात जवळ असणाऱ्या माणसावरही विश्वास ठेवता येईनासा झालाय. कोण खरा, कसा, हेच कळेनासं झालं; खरं काय, तेच कळेनासं झालं; मी वेडा, का शहाणा, तेच कळेनासं झालं. (सूर्य पाहिलेला माणूस पृ. ७)

नाटक अधोरेखित करत आहे तो महत्त्वाचा मुद्दा म्हणजे परिस्थिती गोंधळाची असते तेव्हा विवेक बाळगावा लागतो. अशा परिस्थितीत सॉक्रेटिससारखी माणसं असतात जी आयुष्यभर ढोंगी माणसांचे बुरखे फाडतात. सत्य काय याचा शोध बायका मुलांचाही विचार न करता घेतात. हीच परिस्थिती सॉक्रेटिसवर आली होती. या विषयीचे विवेचन अल्किबियाडिस करतो. घरात खायला धान्य नसताना, मुलंबाळं उपाशी असताना सॉक्रेटिसकडून ज्ञान फुकटात मिळवायला आलेल्या लोकांवर झांटिपी तोंडसुख घेते. तिथेच सॉक्रेटिसला उद्देशून क्रिटो म्हणतो, ''सॉक्रिटिस, काल संसदेत परत युद्धाचा ठराव मांडला गेला.

**सॉक्रेटिस** : संपन्न राज्यांना आपल्या सीमा वाढवाव्याच लागतात.

**क्रिटो** : संपन्न लोकांना आपल्या घराच्याही सीमा वाढवाव्या लागतात. येनकेन प्रकारेण! भ्रष्टाचाराची चार प्रकरणं काल निकालात निघाली संसदेत. थोड्याच वेळात सगळे दोषमुक्त. (सूर्य... ११) नाटकात न आलेल्या न्याय, समाज, संपन्न राष्ट्र, समाजाचे शास्ते, शासनकर्ता या संकल्पनेविषयी पूर्वीच विवेचन केल्याचा उल्लेख करून व्यक्तीविषयी बोलण्याची विनंती प्लेटो सॉक्रेटिसला करतो. इतक्यात फिडो सॉक्रेटिसच्या विरुद्ध कट शिजत असून उद्या न्यायालयात त्याच्यावर खटला चालणार आहे याची बातमी देतो. ''सॉक्रेटिस हा पापाचरणी, असत्य वर्तन करणारा आहे. युवकांना चुकीच्या मार्गाला लावणारा, नगरराज्याच्या देवता न मानणारा पाखंडी माणूस आहे. सॉक्रेटिस वेगवेगळ्या देवतांची पूजा करतो.'' (सूर्य...१२) अल्किबियाडिस हा संसेदचा प्रतिनिधी आहे. त्याला हे सगळे आरोप मूर्खपणाचे वाटतात. त्यापेक्षा पायात पायताण न घालण्याचा आरोप केला असता तर तो शहाणपणाचा झाला असता असे त्याला वाटते. याच्यासाठी मृत्यूदंडाची शिक्षा नोंदवली गेली आहे. परंतु सॉक्रेटिस हा अथेन्सचा नागरिक असल्यामुळे अथेन्सच्या कायद्याचं पालन केलंच पाहिजे म्हणून तो खटल्याला न्यायालयातच सामोरे जाण्याचे निश्चित करतो. तितक्यात दोन सैनिक येवून सॉक्रेटिसला घेऊन जातात. क्रिटो आणि फिडो त्याच्या मागोमाग जातात.

नंतर व्यक्ती एक, तीन आणि चार चर्चा करीत असतात. व्यक्ती तीनच्या मते, ''तरुणांना भडकवणं आणि बहुसंख्यांना मान्य असणारी दैवतं न मानणं, हे अत्यत गंभीर आरोप आहेत. कुठल्याही कालखंडात, कुठलीही राज्यव्यवस्था उलथू शकते त्यानं! कुठलीही राज्यव्यवस्था देहदंडच देणार अशा आरोपांना.'' (सूर्य... १३) दुसऱ्याच दिवशी सॉक्रेटिसवर खटला भरला जातो आणि सॉक्रेटिस ज्युरीसमोर त्याचे म्हणणे मांडण्यासाठी उभा राहतो.

सॉक्रेटिसवर जे आरोप केले गेले होते ते अनिटस, मेलेटस आणि त्याच्या मित्रपरवारांनी केले होते. त्याला प्रत्युत्तर देत असताना सॉक्रेटिसनी केलेले भाषण एकूण समाज, शासन, न्याय इत्यादी व्यवस्थांचा खरा चेहरा उघड करीत असतानाच त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणवीही करून देणारे आहे.

''**सॉक्रेटिस** : अथेन्सच्या नागरिकांनो, माझ्यावर आरोप करणाऱ्यांच्या शब्दांनी तुमच्यावर किती परिणाम केला, मला ठाऊक नाही. शब्दांवर त्यांचं इतकं प्रभुत्व आहे की त्यांचं बोलणं ऐकताना काही काळासाठी 'मी कोण आहे' हेसुद्धा जवळजवळ मी विसरलो. परंतु सत्याचा अंश असेल असा एकही शब्द त्यांनी उच्चारला नाही.

''मी माझ्या प्रतिवादाची सुरुवातही थोड्या वेगळ्या पद्धतीनं करतोय, क्षमा करा. मी माझ्याविरुद्ध दोन प्रकारचे फिर्यादी आहेत, असं समजतो. एक, ज्यांनी या न्यायालयात प्रत्यक्ष खटला दाखल केला आहेत ते – ॲनिटस, मेलेटस आणि त्यांचा मित्रपरिवार. दुसरे न्यायालयाबाहेरचे. मला ज्यांची नावंही माहीत नाहीत असे, ज्यांना प्रत्यक्ष खटला करावा लागत नाही असे. ते सांगत असतात एका सॉक्रेटिसबद्दल. 'तो आकाशापलीकडच्या आणि पृथ्वीच्या पोटातल्या, थोडक्यात भलभलत्या गोष्टींबद्दल बोलतो. तो चांगल्या गोष्टींना वाईट ठरवतो आणि वाइटाला चांगलं!' असं ते म्हणतात. ही मंडळी मेलिटसपेक्षाही धोकादायक आहेत. ही मंडळी खूप आहेत. ती खूप काळ हे आरोप करत आहेत. तुम्ही लहान असताना, तुमची मनं खूपच जास्त संवेदनशील असताना त्यांनी तुम्हाला या गोष्टी सांगितल्या आहेत... आणि त्या वेळी तुम्हाला दुसरी बाजू सांगायला कुणीही नव्हतं आणि मला त्यांची नावंही माहीत नाहीत. त्यांच्या सावलीशीच जणू मला लढायचंय. त्यांच्यापासुन मी सुरुवात करतो.

''त्यांचे आरोप तर मी आत्ताच सांगितले. ते असंही म्हणतात, की हे मी सगळ्यांना शिकवतो. ॲरिस्टोफेनिस त्यांच्यापैकीच एक असणार. त्याचं नाव मला ठाऊक आहे. माझा ज्याच्याशी संबंधही नाही, अशा अनेक गोष्टी तो माझ्या तोंडी, त्याच्या नाटकात घालतो. त्याच्या नाटकातला सॉक्रेटिस हवेत चालतो. विज्ञानाविषयी बोलतो. विज्ञानाविरुद्ध मला काहीच म्हणायचं नाही. मला त्याविषयी माहिती नाही. मी विज्ञानाविषयी बोलेन कसा? तुमच्यातले कित्येकजण मला ओळखतात. 'मी बोलतो कधी विज्ञानाबद्दल?' हा प्रश्न तुम्ही स्वत:लाच विचारा आणि उत्तर उरलेल्यांना सांगा. याविषयी जास्त बोलायची आवश्यकताच मला वाटत नाही.'' (सूर्य...१३-१४) सॉक्रेटिस त्याच्यावरील आरोपाविषयी त्याचे जे म्हणणे आहे तो येथे मांडतो. लोकांना सत्य, विज्ञान, अंधश्रद्धा इत्यादी गोष्टी तो समजावून सांगतो. लोक त्याचे म्हणणे पटत असते म्हणून त्याच्याभोवती एकत्र येत असतात.

''अथेन्सवासीयांनो, यावर तुम्ही काय म्हणणार ते मला ठाऊक आहे. तुम्ही म्हणाल, 'सॉक्रेटिस, कुठल्याच आरोपात तथ्य नाही, असं तू म्हणतोस, मग तुझ्यावर हे आणि इतके आरोप का व्हावेत? तुझ्या वागणुकीत काहीतरी वेगळं असणार! धूर आहे तिथं अग्नी असतोच. सामान्य माणसासारखा तू असणं शक्य नाही. या सगळ्या आरोपांमागे काहीतरी तर कारण असणार! तुझा न्याय आम्हाला घाईगडबडीनं करायचा नाही. ही कारणं आम्हाला सांग!' आणि तुमचं हे म्हणणं योग्य आणि निर्मळ आहे, यात शंका नाही. मी

तुम्हाला कारण सांगतो. याचं कारण म्हणजे माझ्याजवळ असणारं एक प्रकारचं शहाणपण. कुठल्या प्रकारचं शहाणपण? माणसाजवळ असू शकतं, तसं आणि तेवढं शहाणपण. मी शहाणा आहे, तो असा आणि एवढाच आणि ज्यांच्याबद्दल मी नावं न घेता बोलतोय, त्यांच्याजवळ आहे, ते अतिमानवी शहाणपण. ते माझ्याजवळ नाही. त्याबद्दल मी काय सांगू? आणि आता मी जे बोलणार आहे, ते बेताल, अमर्याद वाटलं, तरी कृपया मला मधेच थांबवू नका. कारण आता मी जे सांगणार आहे, ते मूलतः माझ्या तोंडचे शब्द नाहीत. आता मी डेल्फीच्या देवतेची साक्ष काढतो. हे तिच्या तोंडचे शब्द आहेत. तीच तुम्हाला माझ्या शहाणपणाविषयी सांगेल. चेरेफॉनला आपण सगळेच ओळखतो. चेरेफॉन किती उतावळा होता, हे सर्वांना ठाऊक आहे. तो डेल्फीच्या देवतेसमोर गेला आणि धाडसानं त्यानं देवतेला विचारलं, 'या जगात –' (लोकांचे आवाज, थोडा कोलाहल) ..कृपया, कृपया मला बोलू द्या. आता मधे कृपया गडबड करू नका. त्यानं देवतेला विचारलं, 'डेल्फीच्या देवते, सॉक्रेटिसपेक्षा शहाणा कोण?' आणि दैववाणी झाली. 'सॉक्रेटिसपेक्षा शहाणा कोणीच नाही.' चेरेफॉन आता हयात नाही; पण त्याचा भाऊ इथं उपस्थित आहे. हवं तर तुम्ही त्याची साक्ष घ्या. माझं म्हणणं पडताळून पाहा...

''इथं अजून एक गोष्ट सांगितली पाहिजे. अथेन्समध्ये अनेक श्रीमंत तरुण मुलं आहेत. त्यांना इतर काही कामधंदा नसतो. ते माझ्याभोवती जमतात. मी ढोंगी मंडळींना उघडं पाडताना ऐकायला त्यांना आवडतं. मग ते माझी नक्कल करत उरलेल्यांची परीक्षा घेतात. ज्यांची अशी परीक्षा घ्यावी, अशी अजून किती माणसं आहेत, म्हणून तुम्हाला सांगू? परीक्षेतून या मंडळींचं अज्ञान आणि वृथा गर्वच बाहेर येतो... आणि विशेष म्हणजे ज्यांची परीक्षा घेतली गेली, ती माणसं आपण मूर्ख आहोत हे कळल्यावर स्वतःवर रागावण्याऐवजी माझ्यावर चिडतात! ते म्हणतात, 'हा पापी सॉक्रेटिस, हा तरुणांना प्रस्थापितांच्या विरुद्ध भडकवणारा, त्यांना वाईट मार्गाला लावणारा माणूस!' आपलं शहाणपणाचं ढोंग फोडलेलं त्यांना खपत नाही. 'सॉक्रेटिसनं खरोखर काय वाईट कृत्य केलं?' असा प्रश्न त्यांना विचारला, तर त्यांना सरळ उत्तर देता येत नाही. मग ते नेहमीचीच युक्ती योजतात! मोघम आरोप! आपण शहाणे नाही, हे ते मान्य करत नाहीत, सत्य मान्य करत नाहीत. आणि ही मंडळी संख्येनंही बलिष्ठ आहेत. एका प्रकारे या न्यायालयातले प्रत्यक्ष फिर्यादीही त्यांच्यातलेच, त्यांच्यामुळंच उभे आहेत – मेलेटस, ॲनिटस आणि लायकॉन. मेलेटस कवींच्या वतीनं उभा आहे, ॲनिटस राजकारण्यांच्या आणि कारागिरांच्या, आणि लायकॉन वक्त्यांच्या! तर अथेन्सवासीयांनो, सत्य हे आहे. पूर्ण सत्य. मी काहीही लपवून ठेवलेलं नाही. कुठलाही आडपडदा ठेवलेला नाही. माझ्यावरच्या या प्रकारच्या फिर्यादींचे आरोप हे त्यांच्या मनात माझ्याविषयी असणाऱ्या पूर्वग्रहातून आलेले आहेत. तुम्ही स्वतः चौकशी केलीत, तर निश्चितच याच निष्कर्षाला पोचाल.'' (सूर्य पृ. १५ ते १९) हे संवाद नाटकाचा गाभा आहेत. ज्यात सॉक्रेटिसची सत्यासाठीची तळमळ दिसते.

नंतर सॉक्रेटिस फिर्यादीकडे वळतो. त्यांनी प्रत्यक्षात या न्यायालयात आरोप केले आहेत, त्यांना उत्तर देणं भाग आहे म्हणून सॉक्रेटिस त्यांना परत आरोप करायला सांगतो. मेलेटस हा यांचा पुढारी आहे. मेलेटसला पुन्हा एकदा आरोप मांडण्याची विनंती करतो. तेव्हा मेलेटस सॉक्रेटिस हा पापी, दुराचरण करणारा माणूस असून तो तरुणांना कर्तव्यभ्रष्ट करतो. त्याचा नगराच्या देवतेवर विश्वास नाही. तो वेगळीच दैवतं

निर्माण करीत असल्याचा आरोप मेलेटस मांडतो. तेव्हा सॉक्रेटिस मेलेटस हा किती दुष्ट माणूस आहे. तो एखाद्या व्यक्तीला किती द्वेषाने न्यायालयात खेचतो. पण ज्या कारणांसाठी ज्या व्यक्तीला न्यायालयात खेचतो त्यात त्याला काहीही रस नसतो. आणि आपण मनापासून खरंखुरं बोलतो असं जेव्हा तो म्हणतो तेव्हा तो खरंतर टवाळी करीत असतो. म्हणून सॉक्रेटिसच मेलेटसला उलटतपासणी करण्यासाठी उभं करण्यात यावं अशी विनंती करतो. जेव्हा सॉक्रेटिस तरुणांच्या भवितव्याविषयी मेलेटसला विचारतो तेव्हा तो काहीच उत्तर देत नाही. नंतर तरुणांचं भवितव्य मात्र कायद्याच्या हाती आहे असे एका प्रश्नाला प्रत्युत्तर देतो. पुढे अनेक आरोप मेलेटस करतो आणि त्याला सॉक्रेटिस निरुत्तर करतो. अर्थात मेलेटसच्या कोणत्याच प्रश्नात तथ्य नसते याची सॉक्रेटिसला आणि समाजालाही जाणीव आहे. पहिल्या अंकाच्या शेवटी सॉक्रेटिस मरण आले तरी चालेल पण मी माझ्या भूमिकेवर ठाम राहणार आहे असे सांगतो. ज्यातून सॉक्रेटिसची भूमिका अधिक स्पष्ट होते. अशी भूमिका घेणारी माणसेच मूल्यदृष्ट्या महत्त्वाची असतात असा सूचित संदेशही हे नाटक देते. भूमिका घेणे आणि ती सत्य व न्याय्य असणे कसे गरजेचे आहे याचाही संदेश या संवादातून दिला जातो.

''**सॉक्रेटिस :** मेलेटसच्या आरोपांबद्दल अजून बोलण्यासारखं काही उरलेलं नाही. परंतु माझ्याविषयी एकंदरीत किती वैरभाव निर्माण झाला आहे, याची जाणीव मला आहे. जगात असूयेनंच अनेक चांगल्या माणसांचा बळी घेतला आहे, पुढेही घेतला जाईल. मी असा शेवटचा बळी आहे, अशी भीती बाळगण्याचं कारण, नाही. मृत्यूची भीती तर नसावीच. ज्या माणसाला थोडंसुद्धा चांगलं काही करायचं आहे, तो स्वत:ला फक्त एकच प्रश्न विचारू शकतो : मी करतोय ते चांगलं, का वाईट? त्यानं मृत्यूची गणितं मांडता कामा नयेत. अथेन्सवासीयांनो, तुम्ही जेव्हा जेव्हा मला युद्धावर पाठवलंत, तेव्हाही मी असाच मृत्यूला सामोरा गेलो. देवांनी मला तत्त्वज्ञ बनवलं. स्वत:ला आणि दुसऱ्याला तपासणं हे तत्त्वज्ञाचं कर्तव्य आहे. ही देवाची आशा आहे. त्यातच मी चुकलो, तर ती विपरीत घटना होईल. मग मात्र मला 'देवाची आज्ञा मोडल्याबद्दल' या न्यायालयासमोर खरोखर उभं करता येईल. मृत्यूची भीती वाटणं ही शहाणपणाची टिंगलच असते. ती मला वाटली, तर मला 'शहाणा' म्हणणाऱ्या देववाणीची आज्ञा मी पाळली नाही, असा त्याचा अर्थ होईल. उलटपक्षी, मला मुक्त करणार असलात, तर माझ्यावर बंधनं घालू नका. तुम्ही कदाचित असं म्हणाल, 'सॉक्रेटिस, या वेळी आम्ही ॲनिटसचं न ऐकता तुला मुक्त करत आहोत. पण एका अटीवर. तुझ्या या तत्त्वज्ञाच्या व्याख्येला अनुसरून जगणं तुला थांबवलं पाहिजे. स्वत:चा आणि दुसऱ्याचा शोध घेणं तुला थांबवलं पाहिजे. तू परत असाच वागताना दिसलास, तर मात्र तुला ठार मारावं लागेल.' अथेन्सवासीयांनो, माझं तुमच्यावर कितीही प्रेम असलं, तरी मला देवाची आज्ञा पाळलीच पाहिजे. माझा ज्यावर विश्वास आहे, त्याच मार्गानं मी जाईन. तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि शिकवणं मी कधीच बंद करणार नाही. जो भेटेल, त्याला मी हेच सांगत राहीन, 'हे भल्या माणसा, पैसा, सत्ता, प्रसिद्धी यांच्याच मागे लागून सत्य, ज्ञान आणि आत्म्याची उन्नती यांबद्दल काहीच न करताना तुला काहीच लाज वाटत नाही?' प्रत्येकाजवळ मी हे बोलतच राहीन. विशेषतः इथं अथेन्समध्ये. कारण हे माझं नगर आहे. इथले लोक माझे बांधव आहेत. तुम्ही मला दोषी ठरवा अथवा मुक्त करा. एक मात्र नक्की. मी माझा मार्ग कधीच सोडणार नाही. हजार वेळा मृत्यू आला, तरीही सोडणार नाही.

[प्रेक्षकांतून आवाज, कोलाहल.]

''अथेन्सच्या नागरिकांनो, मला थांबवू नका. मला तुम्ही बोलू द्याल, असा आपला करार झाला होता. एक लक्षात ठेवा. मला ठार मारण्यानं माझ्यापेक्षा तुम्हालाच जास्त नुकसान पोचणार आहे. चांगल्या माणसाला मारल्यानं मारणाऱ्याचंच जास्त नुकसान होत असतं. मी एक गोमाशी आहे, देवानं पाठवलेली. मला मारलंत तर दुसरी सहजासहजी मिळणार नाही. समाज एखाद्या सुस्त बैलासारखा असतो. त्याला जागवण्यासाठी माझ्यासारख्याची आवश्यकता असते. ही दैवी योजनाच आहे. माझ्या स्वत:बद्दल स्वतःच्या सुखाबद्दल कुठलीही काळजी न करता वर्षानुवर्षं मी हे कार्य करत आलो, हा त्याचा पुरावा आहे. एखाद्या वडीलधाऱ्यासारखा तुम्हाला सद्गुणांच्या मार्गावर नेण्याचा हा ध्यास मनुष्याच्या सामान्य वर्तणुकीपेक्षा वेगळा आहे. मनातून काही झाला असता, तर माझ्या वर्तणुकीचा वेगळा अर्थ लावता आला असता. माझ्यावर हा लाभाचा आरोप तर कधीच करता येणार नाही. सर्व पुरावा माझ्याच बाजूचा असेल आणि तो म्हणजे माझी कायमची गरिबी.

''मी एकटाच, वैयक्तिकरीत्या, असा दुसऱ्याशी बोलत, त्यांना माझे विचार सांगत का फिरत असतो? माझे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी मी राजकारणात का दाखल होत नाही? असाही प्रश्न तुम्हाला पडेल. मला आतून देवी आवाज ऐकू येतो, हे तुम्हाला ठाऊक आहे. याच देवतेचा मेलेटसनं आरोपपत्रात उल्लेख केला आहे. ही दैवी वाणी मला राजकारणात येण्यापासून थांबवते. हा लढा व्यक्तिगतच असावा लागतो, हे लक्षात घ्या. तो सार्वजनिक पद स्वीकारून होऊच शकत नाही. मी अशा पदावर असतो, तर केव्हाच नष्ट झालो असतो आणि कुठलंच चांगलं कृत्य करू शकलो नसतो. माझ्या आयुष्याकडे पाहिलंत तरी हे सहज समजून येईल. सत्यापासून न ढळण्याच्या प्रतिज्ञेखातर मी दोनदा मारला जाणार होतो... पण तो इतिहास तर तुम्हा सर्वांना ठाऊक आहे. त्यावर मी परत वेळ घालवणार नाही. मी एखाद्या राजकीय पदावर असतो, तर मी आत्ता वागतो तसा वागू शकलो असतो? मीच काय, कोणीच अशा पद्धतीनं वागून जिवंत राहणं शक्य नाही.

इथं मी एक आवाहन करू इच्छितो. ज्या अनेकांशी मी त्यांच्या तारुण्यात बोललो, आणि ज्यांना मी भ्रष्ट केल्याचा आरोप माझ्यावर आहे, त्यांच्यापैकी कित्येक आज प्रौढ वयाचे आहेत. इथं हजर आहेत. त्यांच्यापैकी कुणालाही, 'मी त्यांच्याशी वाईट गोष्टींबद्दल बोललो, त्यांना चुकीच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न केला', असं वाटत असेल, तर त्यांनी पुढं येऊन इथं माझ्याविरुद्ध साक्ष द्यावी. त्यांचे बंधू, वडील, नातेवाईक - कोणीही इथं येऊन - त्यांच्या कुटुंबावर माझ्यामुळं झालेले वाईट परिणाम इथं मांडावेत. इथं क्रिटो आहे, क्रिटोबलसही मला दिसतो आहे. लिसेनिअस, अँटिफॉन, प्लेटो... असंख्य आहेत इथं. त्यांच्यापैकी एकाची तरी साक्ष मेलेटस माझ्याविरुद्ध काढायला हवी होती. तो विसरला असला, तर मी बाजूला होऊन, त्याला अजून एक संधी देतो. मेलेटस येत नाही. विराम. हे सगळे माझ्या बाजूनं साक्ष देतील, हे मेलेटस जाणतो, असं दिसतं. म्हणूनच या सर्वांत महत्त्वाच्या साक्षी तो घडवत नाही. या मंडळींचं, समजा, माझ्याशी संगनमत असेल, असं आपण क्षणभर मानू. पण त्यांचे वडीलधारे नातेवाईक?

त्यांचे मित्र? ते तर निश्चितच निष्पक्ष असणार? त्यांची साक्षही माझ्यावर आरोप करणारे का काढत नाहीत? तेही माझ्या बाजूनंच साक्ष देतील, अशी भीती त्यांना का वाटते? सत्य माझ्या बाजून आहे का मेलेटसच्या, याचा निवाडा करणारा हा पुरावाच आहे.

आता एक शेवटची गोष्ट. नेहमीच्या प्रथेप्रमाणे माझ्या कुटुंबीयांना, मुलांना इथं आणून त्यांच्या रडण्या-भेकण्यातून न्यायासनापुढे या मागण्याचं कृत्य मी करणार नाही. मलाही कुटुंब आहे. तीन लहान मुलं आहेत. मला मृत्यूची भीती आहे अथवा नाही, हा वेगळा मुद्दा. रडण्या-भेकण्याची ही प्रथा पाळताना मी अनेक नामवंतांना पाहिलं आहे. हे लाजिरवाणं कृत्य आहे. अशी प्रथा थांबवलीच पाहिजे. न्यायासनाला आपली बाजू सांगणं हे योग्य कृत्य आहे. त्याकडून दयेची भीक मागणं अश्लाघ्य आहे. माझी आपणास विनंती आहे की, ही प्रथाच कायमची बंद करावी. न्यायालयाचं काम न्याय करणं हे आहे. न्यायाची भीक घालणं नव्हे. मला कृपया हे अप्रशस्त कृत्य करण्यास सांगू नका. मी ते कधीच करणार नाही. माझा देवावर विश्वास आहे. त्याच्यावर आणि तुमच्यावर माझं भवितव्य अवलंबून आहे. तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी योग्य आणि न्याय्य असेल, ते आपण करा.

सॉक्रेटिस एका कोपऱ्यात उभा राहतो. हळूहळू त्याच्यावर अंधार येतो. आणि पहिल्या अंकाचा पडदा पडतो.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला अल्किबिडियास आणि व्यक्ती १, २, ३ आणि ४ आपापसात संवाद साधत असतात. सॉक्रेटिसला दिल्या गेलेल्या मृत्यूदंडाच्या शिक्षेची चर्चा करीत असतात. अथेन्समध्ये मृत्यूदंडाऐवजी देहदंड दिला जातो. तो सॉक्रेटिसला दिला गेला होता परंतु त्याने तो नाकारला होता. कारण हे करणे म्हणजे न्यायदेवतेचा अपमान आहे असे त्याला वाटत होते. एक न्यायदेवतेने निर्णय दिला की तो मान्यच करावा अशी सॉक्रेटिसची धारणा आहे. काही लोकांना स्वतःच्या स्वार्थासाठी सत्य नको असते तर काही लोकांना अज्ञानामुळे सत्य नको असते अशी चर्चा अल्किबियाडिस आणि प्लेटो करू लागतात. तेव्हा सॉक्रेटिसही मला दिलेला देहदंड अनपेक्षित नव्हता हे सांगू लागतो.

**सॉक्रेटिसः** देहदंड! न्यायसभेचा हा निर्णय मला अपेक्षित होता. अपेक्षित नव्हती, ती मतविभागणी. मेलेटस, ॲनिटस आणि लायकॉन- तिघंजण एकत्र, आल्यावरही फक्त तीस मतांनी निर्णय माझ्याविरुद्ध गेला? परिस्थिती निराशाजनक नाहीये. ॲनिटस आणि लायकॉन मेलेटसच्या बाजूनं एकत्र आले नसते, तर हे झालंच नसतं. किंबहुना चुकीचा खटला दाखल केल्याबद्दल प्रथेप्रमाणे मेलेटसला दंड भरावा लागला असता. पण तरी झालं ते आश्चर्यकारकच. माझी अपेक्षा यापेक्षा वाईटाची होती.

मेलेटस म्हणतो, देहदंड. मी काय दंड सुचवू बदल्यात? जो माणूस आयुष्यात एक क्षणही स्वस्थ बसला नाही, पण ज्यानं पैसे, मानमरातब, जमीनजुमला - कशाचाही विचार केला नाही, त्या माणसाची किंमत काय असावी? तुमचं भलं करू पाहणाऱ्या माणसाची किंमत काय असावी? निदान रथांच्या शर्यतीत विजेत्याला मिळणाऱ्या बक्षिसापेक्षा जास्त? त्याला कशाची आवश्यकता नसते आणि मला आहे, म्हणून तरी? तो तुम्हाला क्षणिक सुखच फक्त देतो आणि मी तुम्हाला सत्याची जाणीव करून देतो, म्हणून तरी? मी

रडणार नाही, दया मागणार नाही, हे तर मी मघाशीच सांगितलं. मग मी हे तरी का बोलतोय? कारण मला खोलवर माहितीय की, मी निर्दोष आहे. हे मी तुम्हाला पटवून देऊ शकलो नाही. हा भाग वेगळा. वेळ फार कमी होता. देहदंडाचे खटले एका दिवसात निकालात काढले जाऊ नयेत, असा कायदाच अथेन्स सोडून इतर सर्व नगरराज्यांत आहे. तशीच परिस्थिती अथेन्समध्ये असती, तर कदाचित मी तुम्हाला माझी बाजू समजावूनही देऊ शकलो असतो.....मी इतरांवर कधी अन्याय केला नाही. 'अमुक एक दंड देतो', असं म्हणून माझ्या स्वतःवरच अन्याय कसा करू? माझ्या स्वतःवरच अन्याय करणंही योग्य नाही. का असावं? मृत्युदंडाला घाबरून? असं बघा, दंड हा निश्चितच वाईट आहे, याची मला, आपल्या सर्वांना खात्री आहे. दुसऱ्या बाजूला मृत्यू चांगला आहे, की वाईट आहे, हे मला माहीत नाही. मी दंड का मागू? समजा, मागितलाच, तर मग दंड भरेपर्यंत तुरूंगवास मागावा लागेल. म्हणजे तुरुंगवासच कारण दंड भरण्यासाठी माझ्याकडे पैसेच नाहीत. हां, अजून एक पर्याय आहे. हदपार होणं हे मागू? तुम्ही, माझे देशबांधव, माझे शब्द, माझं वागणं मान्य करू शकत नाही. तर इतर कसे करतील? आणि मी माझी जगण्याची पद्धत बदलणं तर शक्य नाही. आता या वयात, या शहरातून त्या शहरात या राज्यातून त्या राज्यात भटकत राहू? कायमचा हद्दपार, कायमचा हाकलला जाणारा? मला खात्री आहे, मी कुठंही जावो, तरुण मुलं माझ्याभोवती जमणार. मी सत्य बोलणार आणि बाहेर हाकलला जाणार. (सूर्य...२७, २८.) जे आहे निमूट सहन करीत जगणं किंवा देश सोडून पळून जाणं असे तऱ्हा भिन्न असलेले परंतु परिणाम सारखेच असलेले पर्याय जेव्हा निवडायचे असतात तेव्हा जगण्यापेक्षा मरण जास्त योग्य वाटायला लागते. सॉक्रेटिसला दिले गेलेले पर्याय हे नावापुरतेच भिन्न पर्याय आहेत. जगणं हा पर्याय निवडला तर जिवंत मरण आहे आणि मृत्यू हा पर्याय निवडला तर एकदाच मरण वाट्याला येणार आहे. तात्पर्य त्याच्यादृष्टीने जिवंत राहण्याचा पर्याय हा उलट जास्त दमनकारी आहे. शिवाय सॉक्रेटिसचे असे म्हणणे आहे की मला ठार मारण्याऐवजी थोडी वाट पाहिली असती तर नैसिर्गिकरित्याच मृत्यू आला असता. तुमच्याऐवजी हे कृत्य निसर्गानेच केले असते. सॉक्रेटिसला देहदंडाची शिक्षा देणाऱ्यांसाठी हे उलट जास्त हिताचे राहिले असते.

**सॉक्रेटिस :** अथेन्सवासीयांनो, मला ठार करण्यासाठी थोडी वाट पाहिली असतीत, तर हे कृत्य निसर्गानंच केलं असतं, इतकं माझं वय झालं आहे. आता काय होईल, माहितीये? 'तुम्ही सॉक्रेटिस नावाच्या शहाण्या माणसाला मारलंत', असा आरोप कायम तुमच्या विरोधात केला जाईल. चांगले लोक तर तो करतीलच. परंतु तुमच्याविरुद्ध आणि स्वतःच्या फायद्यासाठी वाईट माणसंसुद्धा त्याचा वापर करून घेतील. थोडं थांबला असतात- आणि हे मी सगळ्यांना उद्देशून बोलत नाही-तर हे काम आपोआप झालं असतं. कसं का असेना, युद्धात आणि न्यायानं वागण्याच्या बाबतीत, मृत्यूपासून पळून जाण्याचे मार्ग असले तरी ते वापरू नयेत. कारण प्रश्न, मृत्यू टाळण्याचा नसून, दुराचरण टाळण्याचा असतो.

मृत्यू ज्याच्या जवळ आहे, असा माणूस भविष्यात बघू शकतो, असं म्हणतात. मलाही आज भविष्य दिसत आहे. मी सांगतो, ते ऐका. माझ्यावर आरोप करणाऱ्यांना घाबरून आज हा निर्णय तुम्ही घेतला आहे. तुमच्या विवेकालाच तो घेतला गेलेला नाही. आता भविष्यात तुमच्यावर आरोप केले जातील. तुमच्यावर

आरोप करणारे जास्त तरुण असल्यानं ते जास्त निर्घृण असतील. आपल्याला अनीतिमान वर्तनापासून दूर करू पाहणाऱ्या व्यक्तीस मारून टाकणं, हा कशावरचाच उपाय असू शकत नाही. त्याची फळं भोगावीच लागतात.

माझ्या बाजूनं मत देणाऱ्या लोकांनाही मी काही सांगू इच्छितो. माझ्याबाबत आज झालेल्या घटना सर्वार्थानं वाईट नाहीत. माझ्या आतून येणाऱ्या दैवी आवाजानं आज मला एकदाही अडवलं नाही. त्या अर्थी मी योग्य तेच वागलो, योग्य तेच झालं. मृत्यू वाईट नाही, असाच त्याचा अर्थ आहे. मृत्यू म्हणजे एकतर काहीच नाही, किंवा एका जगातून दुसऱ्या जगात जाणं आहे. एक स्वप्नविरहित शांत झोपेची अवस्था तरी आहे, जिच्यासाठी आपण जिवंतपणीसुद्धा झुरतो. असा पूर्ण शांततेचा काळ जिवंतपणी किती वेळासाठी मिळू शकतो? किंवा तसं न होता दुसऱ्या जगात मी जाणार असलो, तर तिथं मला पूर्वी होऊन गेलेले सर्वश्रेष्ठ लोक भेटतील, असं म्हणतात. मला मिनॉस भेटेल. राधामैटस भेटेल. जी महान नीतिमान, श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वं होती, अशी सगळी माणसं भेटतील. ऑफिसशी मी बोलू शकेन. आणि म्युसायस, हेसॉइड, होमर ? सगळेच भेटतील सर्वात महत्त्वाचं म्हणजे ज्ञानाच्या प्रांतातल्या शोधाचा हा प्रवास मी नेटानं चालू ठेवू शकेन. तिथं मृत्युदंड असूच शकत नाही.

जाण्याआधी एक विनंती मात्र करू इच्छितो. जेव्हा माझी मुलं मोठी होतील, तेव्हा मी ज्या प्रकारे तुम्हाला त्रास देत आलो, त्याचप्रमाणे त्यांना द्या. ते कधीही सदाचरणाऐवजी श्रीमंतीच्या मागे लागले, आपल्याजवळ ज्ञान नसताना ते आहे, असं ढोंग करू लागले, तर मी तुम्हाला त्रास देत असे, तसा त्यांना द्या. हे तुम्ही केलंत, तर मला आणि माझ्या मुलांना दोघांनाही तुम्ही न्याय दिलात, असं मी समजेन. मला वाटतं, आता त्या मृत्यूआधीच्या कोठडीत जाण्याची वेळ झाली आहे. मी माझ्या मृत्यूच्या वाटेनं जातो, तुम्ही जीवनाच्या जा. कुठली वाट जास्त चांगली ते देवच जाणे. (सूर्य...३०.) हे संवाद मात्र सॉक्रेटिसच्या मनात भविष्यात समाज कसा नीट राहू शकेल या दृष्टीने केलेली भविष्यवाणीच आहे. सॉक्रेटिसचे सतत अथेन्सवासियांना उद्देशून बोलणे हे सामाजिक आवाहन जास्त परिणामकारक वाटणारे आहे. ज्यामुळे नाटक प्रेक्षक व एकूण समाज यांची उपस्थिती सतत जाणवत राहते.

सॉक्रेटिसला देहदंड निश्चित आहे याची पक्की खात्री झाल्यानंतर त्याचे शिष्य आणि मित्रपरिवार त्याला पळून जाण्याचा सल्ला देतात. क्रिटो तर तो पळून जाऊन राहिला तर समाजसाठी जास्त उपयुक्त होऊ शकेल असा सल्ला देतो. तेव्हा सॉक्रेटिस म्हणतो,

''क्रिटो, अशी तडफ प्रत्येक वेळी योग्य असतेच, असं नाही. मी सांगितलंय एकदा, मी का पळून जाणार नाही ते. विवेकानं सत्य आणि न्याय्य काय, ते मी आयुष्यभर ठरवत आलो. आता माझी तत्त्वं बदलणं म्हणजे भीतीनं मार्ग बदलण्यासारखं होईल. लहान मुलं बागुलबोवाला घाबरतात ना? तसं. तरी तुझ्या समाधानासाठी माझी भूमिका आपण परत एकदा तपासून पाहू. मी मरणाच्या दारात उभा आहे. अशा वेळी बुद्धी अस्थिर होण्याचा धोका असतो. पण तू तर मृत्यूपासून कित्येक योजनं दूर आहेस. तू माझ्या प्रश्नांची उत्तरं दे. मग पळून जाणं योग्य, असं सिद्ध झालं, तर मी तुझं ऐकेन. अन्यथा तू माझं ऐक. पैसे, लोक काय म्हणतील, मुलांचं काय होईल, अशांसारख्या गोष्टींचा इथं काहीही संबंध नाही. ती सगळी

स्वतःच्या फायद्यासाठी बनवलेली तत्त्वं आहेत. आपण एकाच प्रश्नाचं उत्तर शोधलं पाहिजे. मी पळून जाणं सद्वर्तन आहे, की मृत्यूला सामोरं जाणं? मग कुणाला कितीही त्रास होवो...

परिस्थिती कितीही जटील असली तरी भीतीने मार्ग बदलणे हे कधीही क्षम्य नसते. उलट त्याला धीराने सामोरे गेले पाहिजे अशी सॉक्रेटिसची धारणा आहे. लोकं काय म्हणतील, मुलांचं काय होईल ही स्वतःच्या फायद्यासाठी बनवलेली तत्त्वं आहेत हा मुद्दा मात्र क्रिटो समजत नाही तेव्हा तो समजावा म्हणून सॉक्रेटिस एक युक्ती करतो. ''समज, प्रत्यक्षात राज्यव्यवस्था आणि कायदा है मनुष्यरूप धारण करून माझ्यासमोर आले. आणि मी पळून जाताना त्यांनी माझी उलटतपासणी घेतली तर ते काय म्हणतील? ते म्हणतील, 'सॉक्रेटिस, तू हे काय करतोयस? तू पळून जाण्यानं संपूर्ण व्यवस्थाच उद्धवस्त करतो आहेस! कायद्याला जिथं जुमानलं जात नाही, ती राज्यव्यवस्था किती दिवस टिकू शकते? आणि तुझ्या पळून जाण्यानं कायदा पायदळी तुडवला जात नाही?' मला माहितीये, क्रिटो, तुला काय विचारायचं आहे. मीही त्यांना तेच म्हणेन. मी त्यांना सांगेन, 'पण कायद्यानं माझ्यावर अन्याय केलाय. मी का मानू असा कायदा?'

**क्रिटो :** हाच प्रश्न माझ्या मनात होता.

**सॉक्रेटिस :** मग ते म्हणतील, 'पण असा करार होता आपला? तुला मान्य होईल तो कायदा तू मानणार, उरलेले धुडकावणार, असा? तू तर कुठल्याच अटी न घालता कायदा मान्य केला होतास. आम्हीच तुला मोठा केला. इथल्या कायद्यान्वयेच तुझ्या आईबापांचं लग्न झालं. तुझं पालनपोषण झालं, शिक्षण झालं. तुला नागरिकत्वाचे अधिकार मिळाले. तू स्वत:ला आमच्याबरोबरीचा कसा मानतोस, सॉक्रेटिस? आम्ही असं वागलो, तर तू तसं वागणार, असा अधिकार तुला कुठून मिळाला? स्वत:च्या आईवडिलांशी असं वागशील तू? हे सद्वर्तन ठरेल? राज्य हे आईबापांच्यापेक्षाही महत्त्वाचं असतं, हे एका तत्त्वज्ञाला कळू नये? युद्ध असो, का न्यायालय, आम्ही म्हणतो, ते तुला सर्व परिस्थितीत ऐकलंच पाहिजे. हे सर्व विवेकाच्या मार्गानं, समजावून सांगून तू बदलू शकतोस. तो अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे, परंतु आहे तो कायदा तू हातांत घेऊ शकत नाहीस. होईल ती शिक्षा तुला त्यासाठी भोगलीच पाहिजे!' आता सांग क्रिटो, ते योग्य बोलतात का अयोग्य?

**क्रिटो :** ते योग्य आहेत.

**सॉक्रेटिस :** ते पुढे म्हणतील, 'अथेन्समधल्या प्रत्येक माणसाप्रमाणे तू वयात आलास, तेव्हा आम्ही तुला अजून एक मुभा दिली होती. आम्ही तुला अयोग्य वाटत होतो, तर तू हे नगर सोडून इतर कुठंही जायला मुखत्यार होतास. आता इतक्या वर्षांनी, आपल्या सोयीनुसार, तुला हे करता येणार नाही. इतकी वर्षं इथं राहिलास, त्या अर्थी तुझे आमच्यावर प्रेम आहे. तुच नव्हे, तर तुझी मुलंही इथंच जन्मली. इतउप्पर, तुला शिक्षा देण्याचा निर्णय झाल्यावर तुला दंड भरण्याची मुभाही देण्यात आली होती, हद्दपार होण्याचा पर्यायही देण्यात आला होता. त्या वेळी 'हद्दपारीपेक्षा मृत्यू बरा' असं म्हणालास, ते ढोंग होतं?' यावर आपण काय उत्तर देऊ, सांग.

[क्रिटो गप्प राहतो.]

ते पुढे म्हणतील, 'तू कुठंही गेलास, तरी तिथले चांगले लोक तुझ्याकडे कायद्याचा शत्रू म्हणून संशयानंच पाहतील. आयुष्यभर न्यायाचा आणि सद्वर्तनाचा विचार पहिल्यांदा करत आलास. आता तसं करणं सोडू नकोस. जगणं, मुलंबाळं या सगळ्या नंतरच्या गोष्टी. मृत्यू चांगला असो वा वाईट, तुझ्या मृत्यूबद्दलच्या कल्पना योग्य असोत वा चुकीच्या, त्यापासून पळून जाण्यात तुला कधीच समाधान मिळणार नाही.' हे सगळं मला ऐकू येतं, क्रिटो. एखाद्या गूढवाद्याच्या कानांत बासरीचे सूर ऐकू यावेत, तसं. मला इतर काहीही ऐकू येत नाही मग. सद्वर्तनाच्या मार्गानं आहे ती परिस्थिती बदलणं, लोकांना समजावणं, सत्याचा शोध घेणं हा माझा मार्ग आहे. मग त्यासाठी होईल ती शिक्षा मला भोगलीच पाहिजे. अशा वेळी माझे मार्ग बदलणं कसं योग्य होईल?.... तुला काही सांगायचंय, क्रिटो? (सूर्य...४०.) अर्थात क्रिटो काहीही बोलत नाही. त्याच्याही लक्षात येतं की सॉक्रेटिसने आपल्याला निरुत्तर केलेले आहे. आणि सॉक्रेटिस मृत्यूला सामोरे जाण्याच्याा निर्णयापासून हटणार नाही. शेवटी तो झांटिपीला भेटण्यासाठी जातो.

उद्याच्या सूर्यास्तापूर्वी सॉक्रेटिसला विषाचा पेला देण्याचा निर्णय घेतला जातो. आणि त्यापूर्वी झांटिपी सॉक्रेटिसला भेटायला येते. हा संवाद मात्र वेगळीच कलाटणी देऊन जातो. कारण एकमेकांना आणि एकमेकांचा बौद्धिक आवाका आयुष्यभर संसार करूनही कधीकधी नीट ओळखता येत नाही याचा प्रत्ययच या संवादातून येतो. कारण सॉक्रेटिस पळवून नेण्याचा प्रयत्न करू नका तो जाणार नाही हे त्याच्या स्वभावाचे सत्य उलट झांटिपीच क्रिटोला समजावून सांगते.

**सॉक्रेटिस :** मी कधीच पळून जाणार नाही, असं म्हणालीस तू त्याला?

**झांटिपी :** हं.

**सॉक्रेटिस :** आपण उभ्या आयुष्यात कधीच एवढे जवळ का आलो नाही? मी तुला ओळखत होतोही, आणि नव्हतोही.

**झांटिपी :** मी पण तर कायमच ओरडत आले. तक्रार करत आले. सगळेजण माझा तिरस्कारच करतात. चूक माझीच आहे.

**सॉक्रेटिस :** नाही, झांटिपी. मी थोडं जास्त समजवायला हवं होतं तुला. हे आधीच व्हायला हवं होतं. (विराम.) आपल्या वयातलं अंतरच आड आलं.

**झांटिपी :** असं म्हणून समाधान करून घ्यायचं आता.

**सॉक्रेटिस :** म्हणजे?

**झांटिपी :** काही नाही.

**सॉक्रेटिस :** बोल आता. आता मनात काही ठेवू नकोस. या क्षणी मला हुरहुर लावू नकोस.

**झांटिपी :** वयाचा प्रश्न तर थोडा होताच. आणि... तुझं तत्त्वज्ञान, जगण्याची पद्धत मला मान्य नव्हती, असंही नाही. पण दोन माणसांत फरक असतोच ना? सगळ्या मनोवृत्ती सामावून घेता येतील, एवढा मोठा आवाका हवाच कुठल्याही तत्त्वज्ञानाचा. एका माणसाच्या मनाचं आणि कल्पनांचं संपूर्ण समाधान झालं म्हणजे तत्त्वप्रणालीचं काम संपत नाही.

**सॉक्रेटिस :** झांटिपी!

**झांटिपी :** मी या भाषेत बोलतेय, म्हणून आश्चर्य वाटलं? गेली इतकी वर्ष इतक्या जवळून ऐकतेय मी हे सगळं.

**सॉक्रेटिस :** बोल, झांटिपी. आता थांबू नकोस.

**झांटिपी :** तुझं तत्त्वज्ञान पाळायचं, तर मग लक्तरं घालूनच जगलं पाहिजे? माझ्या मुलांनी एकदाही चांगलं काही खाऊच नये? स्त्रियांनी या मातीत जखडून राहावं, अशाच पद्धतीनं वाढवतो हा समाज त्यांना. मग त्या या भौतिकतेचा विचार करणारच. पण आमची ही भौतिकता खरी असते. ठाम असते. बोलवलेली स्वतःच्या मुलांचा विचार करणारी. महालात राहणं मलाही नको होतं. पण का वृत्तीला कुठं स्थान आहे तुझ्या तत्त्वज्ञानात!

**सॉक्रेटिस :** झांटिपी, सत्य सापडलं वाटतं, पण निसटुन जाते का? मी चुकलोच का?

**झांटिपी :** तू? तू चुकलास असं मी कसं म्हणेन? ती माझी लायकीच नाही. तुझ्या तत्त्वांना चिकटून राहणं तुला पण भागच होतं, असतंच. नेहमीच. मी पण तर कायम दुसऱ्या टोकाला जाऊन भांडत राहिले. माझं म्हणणं कधी नीट सांगितलं मी तुला? तू मोठाच होत राहिलास. दूरच जात राहिलास, मला कधीच तुला गाठणं जमलं नाही. पण म्हणजे तू मला अगदीच समजत नव्हतास, असं नाही.

**सॉक्रेटिस :** झांटिपी! कुठल्याही तत्त्वज्ञानानं सर्वांना सामावून घेतलंच पाहिजे. खरं आहे. आणि कुठलीही तडजोडही करता कामा नये, हेही खरं आहे. (विराम) या विनातडजोडीच्या भानगडीत माणूस स्वतःच्या बाहेर पाहणंच बंद करतो का ग?

(विराम. झांटिपी काहीच बोलत नाही. तिला हुंदका आवरत नाही.)

**सॉक्रेटिस :** झांटिपी, घरी जा.

काही वेळ इतर अनेक विषयांवर चर्चा होते आणि तुरुंगाधिकारी येतो. तो संवेदनशील असला तरी हुकुमाचा ताबेदार आहे. तो सॉक्रेटिसला म्हणतो विष तयार आहे तुझी घ्यायची तयारी झाली की सांग मी घेऊन येतो (म्हणून रडत निघून जातो.)

**सॉक्रेटिस :** भली माणसं अशी अचानक भेटतात. तुझ्या चांगुलपणाची परतफेड मी कशी करू? किती स्वच्छ मनाचा माणूस आहे हा! मला भेटायला दरदिवशी येत असे. माझी विचारपूस करत असे. आणि

आता माझ्यामुळे दुःखी झाला आहे. क्रिटो, आता उगाचच वेळ दवडण्यात अर्थ नाही. विष घेऊन ये.

**क्रिटो :** पण अजून तर सूर्यास्ताला वेळ आहे. त्याआधी इतर काही आणू का? आणि कित्येकजण तर सूर्यास्ताची वेळही पाळत नाहीत. घाई करू नकोस. तेवढी मुभा इथं प्रत्येकाला दिली आहे.

**सॉक्रेटिस :** लोक वेळ लावतात, ते मलाही ठाऊक आहे. त्यांचं बरोबरही आहे. त्यांना वाटतं, उशीर करून जीवन लांबवावं. पण मला असं काहीच वाटत नाही, हे तुला माहितीये. आता उशीर करणं हे वेडगळपणाचं आहे. कृपया आता मी सांगितलं तसं कर.

[क्रिटो खूण करतो. तुरुंगाधिकारी विषाचा पेला घेऊन आत येतो. सॉक्रेटिस त्याच्याकडून पेला घेतो.]

**सॉक्रेटिस :** तुला याबाबत खूप अनुभव आहे. शांतपणे मृत्यू यावा, म्हणून मला काही सूचना देऊ शकशील?

**अधिकारी :** एकच सांगू शकतो. विष प्यायल्यावर चालत राहा. त्यानं विष भिनण्यास मदत होते. पाय जड होईपर्यंत चालत राहा. मग जमिनीवर आडवा हो. विष आपलं काम करेल.

[सॉक्रेटिस निर्विकारपणे विष पितो. सर्वजण माना वळवून मूकपणे रडू लागतात. सॉक्रेटिस फेऱ्या मारत आहे. एकाच्या तोडून न राहवून हुंदका बाहेर येतो. इतर सर्वजण रागावून, भांबावून त्याच्याकडे बघतात.]

**सॉक्रेटिस :** (फेऱ्या मारताना क्षणासाठी थांबत) हा कुठला चमत्कारिक आवाज? हे दृश्य नको, म्हणून तर मी स्त्रियांना घरी पाठवलं. माणूस शांतपणे मरावा, असा माझा विश्वास आहे. कृपया धीर धरा. शांत रहा. (सर्वजण लाजून शांत होतात. सॉक्रेटिस काही वेळ चालतो. मग पाठीवर आडवा होतो. विराम. तुरुंगाधिकारी त्याच्या पायांकडे बघतो. मग पाय जोरात दाबतो.)

**अधिकारी :** मी तुझा पाय दाबतो आहे. तुला जाणवतंय ते?

**सॉक्रेटिस :** नाही. (सॉक्रेटिस त्याच्या अंगावरील पांघरूण डोक्यावर ओढून घेतो. आता त्याचा हात दाबून बघतो. विराम. काही क्षणांसाठी सॉक्रेटिस तोंडावरचे पांघरूण बाजूला करतो.)

**सॉक्रेटिस :** (शांत स्वरात) फिडो, अस्लेपियसला एक कोंबडं द्यायला हवं. माझ्या वतीनं तू ते नेऊन पोचवशील?

**क्रिटो :** लगोलग पोचवलं जाईल. अजून काही सांगायचंय?

प्रश्नाला उत्तर येत नाही. मिनिटाभरानंतर किंचित हालचाल जाणवते. सॉक्रेटिसच्या अंगावरील पांघरूण काढले जाते. क्रिटो त्याचे उघडे डोळे मिटतो. गुहेतील सावल्यांप्रमाणे सर्वांच्या सावल्या मागील भिंतीवर दिसत

आहेत. सर्वजण स्तब्ध. जणू बांधलेले. ४ मात्र एकटा बाजूला जाऊन एकाग्र झालेला दिसतो. काही काळ प्रकाश फक्त त्याच्यावर. मग अंधार. आणि पडदा पडतो. अर्थात नाटक संपते.

हे नाटकाचे संविधानक आहे. ज्यातून या नाटकाचा प्रवास लक्षात येतो.

**४.२.५ पात्रचित्रण**

नाटकात एकूण पात्रांची जी रचना केली आहे ती वेगवेगळ्या भूमिका वठवणारी आहे. गुहेतली माणसे हे सर्वाधिक प्रातिनिधिक चित्रण आहे. ही पात्रं माणसांच्या गोंधळलेल्या अवस्थेचे चित्रण करतात. क्रिटो, फिडो, प्लेटो ही सॉक्रेटिसची शिष्य मंडळी असून ते सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान आणि मांडणी लक्षात घेऊन ती समाजापर्यंत पोहचवत आहेत.

गुहाप्रकरण आणि सॅक्रिटिस हे एकमेकांना समांतर उदाहरण म्हणून होते. कुठल्याही काळातल्या तीव्र भान असणाऱ्या व्यक्तींना त्या त्या कालखंडात 'जगायचं कसं?' किंवा 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' वाटतच असते. असे वाटणारी चार माणसे मकरंद साठे यांनी गुहेतल्या अंधकारमय परिस्थितीत उभी केली आहेत आणि सॉक्रेटिसच्या नैतिक आचरणाचे दर्शन त्यांना घडवले. त्यांना गुहेतून माणसात आणण्याचा तो प्रयत्नच होता. या चौघांच्या नजरेतून पाहिल्यास खरंतर आज अशाच काहीशा भांबावलेल्या परिस्थितीत जगणाऱ्यांच्या प्रातिनिधिक व्यक्तिरेखांच्या दृष्टिकोनातून आपण सॉक्रेटिसने आचरणात आणलेले तत्त्व पाहत, तपासत जातो. जग आता ज्या परिस्थितीतून जात आहे किंवा एकूण समाज म्हणून आपण आता ज्या काळात जगतो आहोत, तो कालखंड आधीच्या सर्व कालखंडांहून निश्चितच निराळा आणि अत्यंत आव्हानात्मक आहे. सर्व मूल्ये, विचारप्रवाह कोसळत असताना उभे राहायला नैतिक बळ नाही, अशी अवस्था आहे. विविध पातळ्यांवर जगभर अभूतपूर्व गोंधळाची परिस्थिती आहे. एका अर्थाने निर्णायकी समाज अशा एका टप्प्यावर आहे, की पुन्हा सत्य, सदाचरण, न्याय, नैतिकता या तत्त्वांचा पुनर्विचार व्हायला हवा. तेव्हा अशा अवस्थेत, काहीच पूर्ण मान्य आणि विश्वासार्ह न वाटण्याच्या स्थितीतही सॉक्रेटिसला आहे तसा न स्वीकारता त्याने मांडलेल्या कुठल्याही काळात आचरणाच्या पातळीवर पुन्हा स्वीकाराव्याशा वाटणाऱ्या तत्त्वांकडे पाहणे हा या नाटकाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा होता.

ही परिस्थिती मांडत असताना लेखक म्हणून मकरंद साठे यांना आणि दिग्दर्शक म्हणून अतुल पेठे यांना अनेक जटिल समस्यांना आणि प्रक्रियेला सामोरे जावे लागलेले आहे. यादृष्टीने या नाटकातील झांटिपी या पात्राकडे पाहता येईल. एकतर अथेन्समधली संपूर्ण मानसिकता किंवा परिस्थिती ही जशीच्या तशी आज मान्यच करता येऊ शकणार नाही. गुलामांपेक्षाही कमी स्थान असलेल्या त्या समाजातील स्त्रीकडे आज आपण तसे पाहू शकणार नाही. सॉक्रेटिसची बायको झांटिपी कजाग मूर्ख होती आणि तिच्याविषयीच्या दंतकथा कोणत्याही विवेकी लेखक आणि दिग्दर्शकाला गंमत किंवा विरंगुळा मजा म्हणून स्वीकारता येऊच शकत नाहीत. तिची मानवीय तडफड जी इतरांच्या नजरेतून कदाचित अनाकलनीय, चेष्टेचा विषय असेल, ती या लेखक दिग्दर्शकांनी स्वीकारलेली नाही. अशा अवस्थेत जगणाऱ्या व्यक्तीला तत्कालीन सामाजिक, राजकीय, मानसिक आणि शारीरिक कितीतरी पदर असू शकतात. ते उलगडण्यासाठी मकरंद साठे यांनी जे

कसब पणाला लावले आहे ते फार महत्त्वाचे आहे. आणि सॉक्रेटिसवरील लेखनात ते वेगळे तसेच मोलाचे आहे. मकरंद साठे यांनी आजच्या स्त्रीवादी भूमिकेतून विचार करता जवळ जवळ सॉक्रेटिसइतकेच महत्त्वाचे स्थान त्यांनी झांटिपीला प्रदान केले आहे. ती सहज जाता जाता जे उद्गारते, ते तिच्या अस्सल जगण्यातून समग्रपणे उगवलेले तत्त्वज्ञान आहे. त्याचे स्वरूपच इतके अस्सल आहे की तिच्यासमोर सॉक्रेटिसदेखील क्षणभर थक्क होऊन जातो. इतकेच नव्हे तर सत्याचे नव्याने आकलन करून घेत कबुली देतो. तिच्या या संवादातून सत्य त्यालाच नव्याने गवसते.

या नाटकातील तुरुंगाधिकारी हे पात्रही नाटकाला एका वेगळ्या उंचीवर नेणारे आहे. त्याचे सॉक्रेटिसबरोबरचे संवाद तपासले की याचा प्रत्यय येतो. एखाद्याला विष देणे हे वाईट काम आहे याची त्याला जाणीव आहे. पण ती त्याची जबाबदारी आहे. तो ती जबाबदारी निष्ठेने पार पाडतो. विष अंगात भिनावे म्हणून सॉक्रेटिसला मदत करतो. इतर कैद्यांपेक्षा सॉक्रेटिस कसा वेगळा आहे हे तो सॉक्रेटिसला ऐकवतो. आणि त्यांच्यातल्या माणूसकीचीही प्रेक्षकांना प्रचिती येते. त्यावेळचे संवाद वाचले तरी तो ही मानवी पातळीवरचा आहे याचा प्रत्यय येतो.

**४.२.६ सॉक्रेटिस ही ऐतिहासिक व्यक्तिरेखा**

सॉक्रेटिस या ऐतिहासिक व्यक्तिरेखेवर साठे यांनी प्रथमच नाटक लिहिले. साठे यांच्या मते, ''हा माझ्या नेहमीच्या लिखाणापेक्षा एक वेगळा असा प्रयोग होता. अशा प्रकारच्या ऐतिहासिक व्यक्तिरेखेवर मी तोपर्यंत काही लिहिले नव्हते. तरी त्या केवळ ऐतिहासिक व्यक्ती, इतिहास, चरित्र मांडणे हा त्यांचा हेतू नव्हता. आजच्या सामाजिक वास्तवाशी, समाजातील वैचारिक, सांस्कृतिक अंतर्प्रवाहांशी सॉक्रेटिसचे विचार नातं सांगतात, त्या पार्श्वभूमीवर ते महत्त्वाचे ठरतात. म्हणूनच सॉक्रेटिसमध्ये त्यांना रस होता. त्यांच्या सूर्य पाहिलेला माणूस आणि इतर नाटकातलं समान सूत्र म्हणजे आजच्या समाजातल्या सांस्कृतिक आंतरप्रवाहांचा शोध घेणे, ते तपासणे हेच आहे. मकरंद साठे यांच्या मते, ''आत्मभान, समाजभान या गोष्टींविषयी स्वतःच्या नजरेतून मांडणी करणं मी महत्त्वाचं मानतो. केवळ एक समस्या, प्रॉब्लेम मांडणं यापेक्षा खोलवरच्या तात्त्विक आंतरप्रवाहाकडे पहाण्याचा आणि मला ते कसे जाणवतात ते मांडण्याचा प्रयत्न मी करतो. एकदा आंतरप्रवाहांपर्यंत पोचता आलं तर विशिष्ट समस्या वा प्रॉब्लेम्स यांच्या मुळाशी तर आपण जाऊ शकतोच, शिवाय आपल्या आकलनाचा आवाकाही पुरेसा विस्तृत झाल्याने अनेक प्रश्नांमधली संगती उलगडू शकते.'' (अनुष्टुभ दिवाळी- २००२.)

सूर्य पाहणे तसे सोपे नसते. उगवतीचा अक्षर मावळतीचा सूर्य कुणीही पाहू शकतो परंतु उद्यापासून अस्तापर्यंत उघड्या डोळ्यांनी सूर्य पाहणारा माणूस सापडणे ही जगाच्या पाठीवर अत्यंत दुरापस्त गोष्ट आहे. असा सूर्य म्हणजे संपूर्ण सर्वांगीण सत्य होय. सर्वसामान्य माणसाला ते श्रेयस असले तरी प्रेयस असेलच असे नाही. किंबहुना त्याचे दर्शनही डोळे दिपवणारे असते. स्वतःभोवती आखून घेतलेल्या सुखासीनतेच्या वर्तुळातच फिरू इच्छिणाऱ्यांना तर भोवंडून टाकणारे असते. सामान्य माणूस जन्म घेतो आणि तेव्हापासून त्याला जे दाखवले जाते तेच आणि त्या दिशेचे दिसेल तेवढेच सत्य मानून जगतो आणि त्याच चाकोरीत

किमान धडपडतो. त्यापलीकडे जाण्याची त्याला इच्छाच नसते. तशी इच्छाच जर कुणी दाखवले तर तथाकथित सुखसाधनांचे दलाल त्याला वेडा किंवा बंडखोर ठरवतात. जनसामान्याच्या झुंडीला कातरी लावण्याचे चातुर्य त्यांच्याकडे असते. धनसत्ता, बळसत्ता, राजसत्ता यांच्या आधाराने ते पुढारीपणाही मिरवतात. कोणा एका जनसामान्याचे सत्याचा सूर्य पाहण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या जाणिवा मुळासहित खरवडून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी सहज असते. अज्ञ माणूसही अशा प्रयत्नाला आपल्या अस्तित्वावरचे अक्रमण समजायला लागतो. सूर्य पाहिलेल्या माणसाचा प्रतिकार करू लागतो. जाड कातडीची माणसे एकत्र करून समाजालाही वेठीस धरू लागतो. सत्तेला वश करून घेतो. आणि सत्य पाहिलेल्या किंवा सूर्य पाहिलेल्या माणसाला मृत्यूला कवटाळण्याखेरीज पर्याय ठवेत नाही. तो मृत्यू स्वीकारतो पण सत्याची कास सोडत नाहीत. मृत्यू त्याचे दहन करतो परंतु त्याचे विचार चिरंतन राहतात. असाच सत्याच सूर्य पाहिलेला माणूस म्हणजे सॉक्रेटिस होय. तो म्हणतो, ''ज्ञान मिळवणं आणि त्याप्रमाणे वर्तन करणं, हा काही फक्त मार्ग नव्हे. ते अंतिम ध्येयही आहे. मार्ग आणि ध्येय वेगवेगळे करताच येत नाहीत. माणसाचा मेंदू आणि आत्मा कधीच फक्त खाऊनपिऊन शांत होऊ शकत नसतो. या सीमा उल्लंघून जावेच लागते... त्यानेच माणसाला माणूसपण येते... यालाच संस्कृती म्हणतात आणि समाजात ती अशीच आवश्यक बनत जाते-अन्नपाण्याइतकी!'' हा सॉक्रेटिसच्या काळातला एक टप्पा पकडून तत्त्वाच्या आणि सत्याच्या वाटेवरून चालत सॉक्रेटिसच्या काळापासून आज आणि उद्याचाही वेध घेण्याचा प्रयत्न हे नाटक करते. त्याचेवळी मकरंद साठे सॉक्रेटिस या ऐतिहासिक व्यक्तिरेखेला मानवी पातळीवरील संघर्षाची किनार प्राप्त करून देतात.

**४.२.७ या नाटकातील नाट्यमयता**

'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकात नाट्यमयता कमी आहे अशी टिका करण्यात आली होती. परंतु मकरंद साठे यांची नाटकाच्या संरचनेविषयी वेगळी भूमिका असल्यामुळे त्यांना हे मान्य नाही. नाटकात काही भावनात्मक गोष्टी आल्या, तरच नाट्यमयता येते, हेच त्यांना मान्य नाही. नाटकातल्या ताणतणावातून उलगडत होणारी विचार, घटना, भावनोद्रेक यांची साखळी खिळवून ठेवत असेल, तणाव निर्माण करून तुमच्या आयुष्याशी नातं जोडत असेल तर ती नाट्यमयता आहे. सॉक्रेटिसचं चरित्र मांडणं हा या नाटकाचा हेतू नाही. नायक वा खलनायक आणि नाटकाचा आशय या गोष्टी वेगवेगळ्या असू शकतात. घाशीराम कोतवालमधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा वेगळी आणि विषय वेगळा आहे. लेखक तिथं त्या व्यक्तिरेखेची गोष्ट सांगत नाही, तर सत्ताकारणातल्या काही गोष्टी सांगू इच्छितो. या नाटकाबाबत तसेच आहे. हे नाटक व्यक्तिरेखेबाबत बोलत नाही तर त्या व्यक्तीच्या भूमिकेबद्दल, त्या भूमिकेच्या राजकारणाबद्दल बोलत आहे. म्हणून प्रेक्षकांच्या रूढ नाट्यमयतेच्या कल्पनेला हे नाटक उतरत नाही. तर स्वतः वेगळी वैचारिक भूमिका घेऊन हे नाटक अवतरते. म्हणून यातली नाट्यमयता रूढ नाटकातल्या नाट्यमयतेपेक्षा वेगळी वाटते. नाट्यमयतेविषयी प्रेक्षकांची जाणीव बदलवण्याचा प्रयत्न हे नाटक करताना दिसते.

### ४.२.८ या नाटकातील संवाद आणि स्वगत.

मराठी रंगभूमीला स्वगताविषयी मोठी परंपरा आहे. १९६० नंतरच्या काळात मराठी रंगभूमीवर तेंडुलकरांच्या शांतता कोर्ट चालू आहे! नाटकातील आणि इतरही नाटकातील स्वगते १९६० नंतरच्या काळात चर्चेचे केंद्र ठरली होती. असे स्वगत सूर्य पाहिलेला माणूस याही नाटकात आहे. त्याचा वैचारिक बाणा मात्र इतर नाटकाच्या स्वगतांपेक्षा वेगळा आहे. या स्वगताला खूप मोठा आधार प्लेटोच्या संवादरूपी लेखनाचा आहे. हे स्वगत डॉक्टर श्रीराम लागू यांनी अत्यंत सक्षमपणे साकारलेले आहे.

या नाटकातील संवाद मोठ्या आणि दीर्घ पल्ल्याचे आहेत. अर्थात हे संवाद सॉक्रेटिसच्या तोंडचे आहेत. आणि त्याला तात्त्विक अंग आहे. आणि हे नाटक त्या तत्त्वज्ञानामुळेच वेगळे ठरले आहे. गुहेतल्या माणसांचे संवाद, प्लेटो-क्रिटो-फिडो यांचे संवाद, अल्किबिडियास यांचे संवाद, सॉक्रेटिसचे संवाद, झांटिपीचे संवाद आणि तुरुंगाधिकाऱ्यांचे संवाद अशी वेगवेगळी विभागणी या नाटकातील संवादाची करता येईल.

या स्वगताला अनेक छटा आहेत. त्यात अनेक गहन प्रश्न आहेत. काही वेळा ते तत्त्वज्ञानाच्या अंगाने येतात तर काहीवेळा राजकारणाच्या अंगाने येतात. इथे प्रश्न निर्माण झाला होता तो म्हणजे भाषेचा. भाषेच्या समकालिनत्वाचा. सॉक्रेटिसला चौकातला तत्त्वज्ञ म्हटलं जायचं. तो खूप साधा बोलत असे. खूप मोठे तत्त्वज्ञान, विचार तो साध्या भाषेत मांडत असे. विचार साध्या भाषेत मांडले नाहीत तर ते लोकांपर्यंत पोहचणार नाहीत हे लेखक आणि दिग्दर्शकांच्या लक्षात आल्यामुळे साधी परंतु तत्त्वज्ञानाला योग्य ठरेल अशी भाषा या नाटकात निवडली होती. आणि सॉक्रेटिस हा दोन सव्वादोन हजार वर्षांपूर्वीचा माणूस होता. अशा माणसाच्या आणि तत्त्ववेत्याच्या तोंडी कोणती भाषा द्यायची हा मोठाच प्रश्न निर्माण होतो. म्हणून समकळातल्या भाषिक पोतपेक्षा थोडी वेगळ्या पद्धतीची, थोडं अंतर राखून असलेली, भावनिक नाट्यमयता कमी करून, कर्ता-कर्म क्रियापदाची थोडीशी आलटापालट करून, आताची नसलेली परंतु आपली वाटणारी, लोकांशी संवाद साधण्याची आसोशी बाळगणारी भाषा या स्वगतांमध्ये निवडलेली दिसते. म्हणून सॉक्रेटिसचे स्वगत हे नव्वदोत्तरी काळातले वेगळे आणि त्याच्या वैचारिक भूमिकेची मांडणी करणारे ठरते. तसचे सत्याचा अपलाप न करता काहीतरी टाळलेले आहे असे न वाटता प्लटोच्या संवादातले सर्व विचार या स्वगतात येतात. ही दुसरी बाब मोठी कौतुकास्पद आहे. हे आव्हान लेखक मकरंद साठे यांनी पेललेले दिसते.

### ४.२.९ सूर्य पाहिलेला माणूस हे एक राजकीय चर्चानाट्य / विचारनाट्य

मराठी रंगभूमीवर चर्चानाट्याची मोठी उणीव आहे. गो. पु. देशपांडे, दत्ता भगत, सदानंद मोरे आणि इतरही काही मोजक्याच नाटककारांनी चर्चानाट्य हा नाट्यप्रकार रंगभूमीवर रूढ करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याच परंपरेत आणि प्रवाहात या नाटकाचे स्थान निश्चित करता येईल.

चुकीच्या मार्गाने चाललेले सत्तेवरील लोक आणि त्यांच्या दबावापुढे मान तुकविणारा मोठा वर्ग हे चित्र सनातन आहे. अशा परिस्थितीत सॉक्रेटिस मार्ग दाखवितो. तो निर्भय होण्यास सांगतो. विचारी व विवेकी

होण्यास सांगतो. सत्याचरणाने हे शक्य आहे असे तो सूचवितो. तो निःस्वार्थी व निःस्पृह होता म्हणूनच हे तो करू शकतो. तरुणांना तो जागे करतो. त्यांना विचार करायला लावतो. कुणीही तात्कालिक लाभाचा विचार करू नये असा संदेश देतो. ही बाब तर आजच्या परिस्थितीत मोलाची ठरते. भ्रष्टाचार, अत्याचार, अविवेक, लबाडी यांना तो थारा देत नाही. अविचार, लबाडी, भ्रष्टाचाराने वागले तरच आपले हित साधेल, असे हिताचे केले जाणारे मोजमाप तो तरुणांनी मनातून काढून टाकावे असा तो संदेश देतो.

माणसाने तात्कालिक सुखाचा त्याग केला की त्याला सत्यापर्यंत जाण्याचे मार्ग साडतात. सत्य हे सूर्याप्रमाणे असते. ते बघण्याची ताकद बाळगण्याकरिता आचारणही स्वच्छ, निष्कलंक लागते. स्वविचारावर, भूमिकेवर अवीट आणि अविचल श्रद्धा असली की माणूस इतरांना सहज निरुत्तर करू शकतो. असाच स्वतःच्या भूमिकेवर श्रद्धा ठेवणारा सॉक्रेटिस मूर्ख राज्यकर्त्यांना निरुत्तर करतो. हे राज्यकर्त्यांना कसे रूचणार. मग ते त्याचा छळ करू लागतात. त्याच्या विरोधात कारस्थाने करून, तरुणांची माथी भडकवली म्हणून त्याला शिक्षा सुनावतात. आणि त्याच्यासमोर मृत्यूचे भय रचून पळून जाण्याचे मार्गही सूचवतात. पण तो मृत्यूदंडाची शिक्षाही सहज स्वीकारतो. यातून राजकारण्यांची तो जास्त कोंडी करतो. सॉक्रेटिसला देहान्ताची शिक्षा टाळता आली असती पण तो ती टाळत नाही. किंवा तो माफी मागत नाही. कोणतेही बचावाचे साधन वापरत नाही. ते शक्य असूनही करत नाही. तो दंड भरू शकला असता. तो न भरण्याची त्याची भूमिका असते. तसेच मायदेश सोडून जाण्याचेही तो नाकारतो. 'आपल्या लोकांनाच जर माझे म्हणणे पटत नसेल तर तो परक्यांना कसे पटेल' म्हणून तो मरण पत्करतो, परंतु पळून जात नाही. किंवा कोणत्याही संकटाला पाठ दाखवत नाही. उलट यातली कोणतीही कृती हा न्यायदेवतेचा अवमान करणारी असेल असे म्हणून तो न्यायदेवतेच्या सन्मानासाठी मरण स्वीकारतो. न्यायदेवता श्रेष्ठ असते आणि तिने दिलेला निर्णय अंतिम असतो अशी त्याची धारणा आहे.

सॉक्रेटिसचे स्वतःचे लिखाण उपलब्ध नाही. त्याचा शिष्य प्लेटोने जे त्याचे आणि सॉक्रेटिसचे संवाद लिहिले त्यातून सॉक्रेटिस कळतो. वसंत पळशीकर यांनी 'आजचा चार्वाक' या दिवाळी अंकात 'सॉक्रेटिसचे वीरमरण' हा लेख लिहिला होता. त्यांनी सॉक्रेटिसचा जो मराठी वाचकांना परिचय करून दिला त्यावरून जाणवतं की सत्याचं आचरण सॉक्रेटिस आणि गांधी यांच्यात साम्य आहे. कायदेभंगासाठी प्रस्थापित व्यवस्थेने फर्मावलेली शिक्षा दोघांनी विनतक्रार भोगल्या. गांधी हा अँटेनबरोनिर्मित चित्रपट बघताना कायदा मोडण्याचा गुन्हा केल्यावर त्याची शिक्षा आपल्याला झालीच पाहिजे असा आग्रह धरून ब्रिटिश सत्तेची आणि न्यायव्यवस्थेची कोंडी करून टाकली. त्यातून महात्मा गांधी यांच्या वागण्यात सत्याचा, साधनशुचितेचा आग्रह जाणवतो. त्यात एक नाट्य जाणवतं. गांधीजींनी केवळ सत्याचारणाचा आग्रह धरला असे नाही तर लोकचळवळीचे नेतृत्त्वही केले.

**४.२.१० नाटकातील प्रतिकात्मकता**

नाटक एका अंधाऱ्या गुहेपाशी सुरू होते. गुहेतला अंधार म्हणजे अज्ञान. गुहेतून बाहेर पडणे म्हणजे ज्ञानाचा, सत्याचा शोध आणि सूर्य म्हणजे साक्षात ज्ञान, सत्य असे हे प्रतीक आहे. सूर्य न पाहिलेली चार

माणसे पाठमोरी दिसतात. त्यातल्या एकाला सूर्याचे दर्शन झाल्यामुळे तो पुन्हा अंधारात रमू शकत नाही. त्याचं वागणं सूर्य न पाहिलेल्यांना विचित्र वाटतं. पुढे नाटक हे गुहेचे प्रतीक फारसे वागवत नाही. तिथेच सोडून सॉक्रेटिसच्या भूमिकेच्या विवेचनावर आपला दर्शनबिंदू निश्चित करते. आणि सॉक्रेटिसने सत्याशी दिलेल्या झगड्यावर निश्चित होते.

नाटकाच्या सुरुवातीला सॉक्रेटिस व अन्य पात्रं एका गुहेत असताना दर्शविली आहेत. प्लेटोच्या 'डॉयलॉग' मध्ये 'केव्हज' आहेत. त्याच्याशी या गुहेचा काही संबंध आहे का? या प्रश्नाचे स्पष्टीकरण साठे यांनी दिले. ''ते तर आहेच; पण माझ्या मते ही गुहा एक प्रतीकही आहे. विवेकाचं समाजात काय होत राहतं? ज्या दिशा दिसत असतात, त्या दिसत असताना समाज त्यांना कसा सामोरा जातो. समाज सत्याला कसा सामोरा जात असतो? प्रत्येक कालखंडात मोठे मानले गेलेले हे प्रश्न, विषय आहेत. आजच्या कालखंडातही ते महत्त्वाचे वाटतातच. पूर्वी समाजावर छोटा गट प्रभाव पाडत असे. आज जग फारच विस्तारलंय. हा विस्तारच समाजावर प्रभाव पाडतोय. आपल्या जगण्यातल्या अनेक गोष्टींवर दृश्य, अदृश्य किंवा आपल्याला अज्ञात असलेल्या घटकांचाही थेट प्रभाव पडतोय. अशा वेळी वैचारिक नेते व समाजातले संबंध ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. गांधी काय, सॉक्रेटिस काय समाजातल्या सामान्य घटकापर्यंत जात, ते फारच महत्त्वाचं आहे. या अर्थानं हे प्रतीक आहे.''

अतुल पेठे यांच्या मते, गुहेतला अंधार हा बौद्धिक, राजकीय, सामाजिक अशा क्षेत्रातल्या अंधाराशी नातं सांगणारा आहे. या गुहेत मला आणखीही एक प्रतीक जाणवलं. एशर हेच एक गुहा आहे. त्यात आत्मा अडकला आहे. तो मुक्त होणं आम्हाला दाखवायचं होतं. म्हणूनही सेट व पर्यायाने मांडणी वेगळी होत गेली.

**४.२.११ नाटकातील सूचकता**

या दोन अंकी नाटकात सॉक्रेटिसची दीर्घ भाषणे आहेत. ज्यूरीसमोर भाषण करताना सॉक्रेटिसची भूमिका करणारे श्रीराम लागू रंगमंचाच्या मध्यभागी येऊन प्रेक्षकांना उद्देशून बोलातात. जणू प्रेक्षक हेच सॉक्रेटिसला विष पिण्याची शिक्षा देणार आहेत असा भास निर्माण होतो. सत्यवचनी माणसाला ठार मारणारा हात प्रत्यक्षात कुणा व्यक्तीचा असला तरी त्या हत्येला काही अंशी समाज जबाबदार असतो आपणच सत्याचा खून करत आहोत असे सूचवू पाहणारी ही रचना आहे.

सूर्य पाहिलेला माणूस हे नाटक सूचवते ते म्हणजे सत्याचा शोध किंवा सत्याकडे जाण्याचा ध्यास ही सॉक्रेटिसच्या जगण्याची प्रेरणा आहे. पण सत्य हे केवळ तात्त्विक पातळीवर स्थिर नसते. ते तुमच्या आमच्या जीवनातही असते. किंवा त्याचा अभाव असतो. सत्याची ही भूमिका ओळखणारा सॉक्रेटिस म्हणूनच कोणत्याही काळाचा मार्गदर्शक आहे. सर्वसामान्य माणसातही सत्य शोधण्याची प्रेरणा देणारा हा महान विचारवंत आहे.

विश्वरचनेबद्दल भाकिते करण्यापेक्षा आत्मज्ञान हे महत्त्वाचे आहे. सत्य आणि सद्गुण हे अभेद्य आहे. आणि दुर्गुण व दुर्जनत्व हे अज्ञानातून येते, हाच सॉक्रेटिसचा जीवनविषयक दृष्टिकोन होत. सत्याचा शोध हा

अपरिहार्यपणे सद्‌वर्तनाशी–चांगुलपणाशी जोडलेला आहे. तुम्ही सत्याचे पाईक असाल, तर दुष्टपणा करूच शकणार नाही. नुसत्या विद्वत्तेपेक्षा अंतःप्रकाश, आत्मज्ञान हे महत्त्वाचे आहे. हेच या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र आहे.

सॉक्रेटिसच्या मागेही तरूण मुले होती. त्यांची संख्या इतकी व्यापक होती की संपूर्ण समाजच वेगळ्या श्रद्धांचा पुरस्कार करू लागला म्हणून त्याच्यावर खटला भरून त्याला देहदंड देण्यात आला. नाटकात सॉक्रेटिसच्या सत्याचरणाचा उल्लेख आला तरी तपशीलाचे संदर्भ येत नाहीत. तरुण त्याच्याकडे नव्या विचाराने आकर्षित होतात. राजसत्तेला त्याच्याविषयी दहशत वाटते याचा उल्लेख केला जातो. थोर माणसांच्या तत्त्वनिष्ठेबद्दल सूचित केले जाते.

**४.२.१२ नाटकातील समकालीनता**

सॉक्रेटिस ही नाटकातली मध्यवर्ती व्यक्तिरेखा असली तरी हे नाटक सॉक्रेटिसच्या चरित्रावर बेतलेले नाही. तर अशा परिस्थितीत कसे जगायचे असा प्रश्न विचारणाऱ्या कोणत्याही काळातल्या माणसाचे हे नाटक आहे. कालातीत तत्त्वावर ते आपल्याशी नाते जोडू पाहते. हाच या नाटाकचा मुख्य आशयबिंदू आहे. आजचा काळ संभ्रमित आहे. त्यानं पुन्हा सॉक्रेटिस बघणं आवश्यक आहे. कारण सत्य हे एकच नसतं, हे त्यानं सांगितलंय. दिसलेला सूर्य म्हणजे सत्याचं दर्शन, असं आपण मानतो. सत्याला अनेक कंगोरे आहेत, सत्यमापनाची अनेक अंगे आहेत. प्रत्येकाला दिसलेला सूर्य वेगवेगळा असेल तर? आज एकमेकांवरचा विश्वास मोठ्या प्रमाणावर हरवला आहे. अशा परिस्थितीला सामोरं कसं जाता येईल, याचं भान हे नाटक देतं.

सध्याचा काळ हा सर्वच पातळ्यांवर गोंधळात टाकणारा आहे. सर्वच मूल्ये, श्रद्धा आणि तत्त्वप्रणाली यांबाबत एक विलक्षण भांबावून टाकणारी आणि घुसमट करणारी परिस्थिती सर्वांसमोर उभी आहे. इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर अशा गोंधळाच्या एखाद्या वळणाच्या टप्प्यावर उभ्या असणाऱ्या परिस्थतीची अनेक उदाहरणे दिसतात. प्रत्येक वेळच्या परिस्थितीत वेगळेपण तर असतंच परंतु न्याय, नैतिकता, सत्य इत्यादीबाबतचे त्रिकालाबाधित प्रश्न कायम असतात. अशा परिस्थितीचा स्वार्थासाठी फायदा उठवणारा प्रस्थापित वर्गही कायम असतो. सुमारे सव्वादोन हजार वर्षापूर्वी ग्रीक समाजाच्या इतिहासातही असा गोंधळाचा कालखंड आला होता. अशावेळी सॉक्रेटिस नावाचा एक दुर्लभ तत्त्वज्ञ काही तत्त्वं पाळून निरलसपणे जगला. आयुष्यभर सतत सत्याचा शोध घेत राहिला. त्याप्रमाणे प्रत्यक्ष जगून सत्य आचरणात आणून सामान्यांपर्यंत पोहचवण्याचे काम त्याने केले. सदाचरण, न्यायनिष्ठा, नैतिक वर्तन अशा गोष्टी तो जगण्यासाठी प्राथमिक गरजेच्या मानत आला. अशी माणसे नेहमीच प्रस्थापित व्यवस्थेला अडचणीची ठरत असतात. आणि अडचण, अडथळा प्रस्थापित व्यवस्था नेहमी दूर करीत असते. अर्थात सॉक्रेटिसलाही दूर केले गेलं. त्याला मृत्यूदंडाची शिक्षा दिली. त्यानं स्वतःची मूल्ये जपण्यासाठी उघड्या डोळ्यांनी ती स्वीकारली. कुठल्याही अंधकारमय वाटणाऱ्या परिस्थितीतही अशी सूर्य पाहिलेली माणसं असतात. त्यांना स्वार्थाच्या मार्गातून दूर केलं तरी त्यांचे विचार कायमच स्फुर्तिदायक ठरतात. ते अन्याय्य व्यवस्थेला

नाकारण्यासाठी मदत करतात. सॉक्रेटिसचा सत्याग्रह आणि त्यानं स्वीकारलेलं मरण हे आजच्या परिस्थितीतही महत्त्वाचं ठरतं, त्याविषयी जाणीव करून देतं. म्हणून हे नाटक कालीतीत होते आणि त्याचा आशय समकालीन ठरतो.

मला काहीच कळत नाही, अशी भूमिका घेणारा हा तत्त्वज्ञ आयुष्यभर सदाचार, सद्‌गुण, विवेकाची कास धरत गेला. ही मूल्यं प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर झगडला. त्याचा हा संघर्ष आजच्या काळातही महत्त्वाचाच आहे. कारण चिरंतन मूल्यांसाठीचा हा संघर्ष आणि तो कालातीतही आहे.

सूर्य पाहिलेला माणूसच्या बाबतीतला महत्त्वाचा घटक म्हणजे ''अनेक पातळ्यांवर, अनेक संस्कृतीत आज मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण होत आहे. अनेक विचारधारा आणि विचारप्रणाल्यांची सरमिसळ होत असताना, 'सत्य' काय या विषयी संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा वेळी भावनिकदृष्ट्या सामान्य माणूस काहीसा भीतीग्रस्त, व्याकुळ होताना दिसतो. भावना व विचार यांची एकमेकांपासून फारकत करता येत नाही... अशा काळी 'सत्या'चा अविरत शोध चालू ठवेण्याची प्रेरणा देणारी 'राजकीय'दृष्ट्या जागृत ठेवणारी, सॉक्रेटिसची विचारपद्धती मला महत्त्वाची वाटली. सॉक्रेटिसच्या विचारपद्धतीचे पुनर्मुल्यांकन अनेकांनी, विविध काळात केले आहे. ते आजच्या परिस्थितीत परत करावेसे वाटले. तसेच 'माणूस' हे सर्वात मोठे माध्यम असते.'' एकटा सामान्य माणूससुद्धा परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे योगदान करू शकतो, याचेही भान सॉक्रेटिस देतो व ते आजच्या परिस्थितीत मला सर्वात महत्त्वाचे वाटते.

**३.२.१३ सूर्य पाहिलेला माणूस या नाटकाची शैली.**

सूर्य पाहिलेला माणूस या नाटकाची शैली व त्यातले संवाद वेगळ्याच धाटणीचे आहेत. दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीचं डॉक्टर श्रीराम लागू यांचे स्वगत हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या शैलीबाबत मकरंद साठे म्हणतात, ''विशिष्ट उत्तम चौकटी, डेकोरेशन, आलंकारिकता मला नसते. माझ्या नाटकात ते कधी येतच नाही. (सूर्य...११) थोडे स्थलकालातीत करण्याचा प्रयत्न केला. मला जे ठीक वाटत गेलं ते मी लिहित गेलो. नाट्यलेखनात भावनिक जवळीक व त्रयस्थताही मला अत्यावश्यक वाटते. त्यामुळेच विचाराला वाव ठेवेल एवढी त्रयस्थता. शैली त्या अप्रोचमधून उद्‌भवते.

या नाटकाची मांडणी वेगळी आहे. मकरंद साठे यांच्या मते हे नाटक वास्तववादी आहे. तर अतुल पेठे यांच्या मते, वरवर पाहता तसं वाटलं, तरी आमचा त्या मागचा विचार वेगळा आहे. तात्त्विक अंगानं, आशयाच्या दृष्टीनं नाटक काय सांगतं, हा एक विचार आणि दुसरा म्हणजे त्यातून निर्माण होणारी शैली. नाटकचा वैचारिक आशय मला रंगमंचावरून प्रक्षेपित आणि दृश्यांकित करायचा होता. नाटक तात्त्विक असलं तरी तो काही तत्त्वज्ञानाचा तास नव्हे. माझ्या डोळ्यापुढे या नाटकाचा पोत हा अभिजात चित्रकलेशी नातं सांगणारा दिसत होता... या नाटकाकरता साधा, सोपा आणि अर्थातच अर्थपूर्ण सेट उभा करताना वेगवेगळ्या उंचीचे फ्लॅट्स, लेवल्स मला वापरायच्या होत्या. सॉक्रेटिसच्या विचारांची उंची, खोली, लांबी रुंदी मला दृश्य स्वरूपात अशी दिसू लागली. या पार्श्वभूमीवर जेव्हा विविध माणसं त्यांच्या 'भूमिका' घेऊन उभी राहतात तेव्हा ती आशयाला आणि शैलीला अधिक अर्थ प्राप्त करून देतात. सॉक्रेटिसमध्ये वापरलेला

प्रकाश (श्रीकांत एकबोटे) आणि संगीतही (भास्कर चंदावरकर यांनी संगीत तुकडे निवडून दिले.) हाच अर्थगर्भ शोध घेणारे होते. ते सारे एकवटून झाले. संपूर्ण मूलभूत रंगशैली वेषभूषेतही (श्याम भूतकर) मग आपोआपच आली. अशा सर्व स्पेस, रंगमंच, अवकाश, वापरणं या अर्थानं मी शैली म्हणतो.

## ४.३ समारोप

सूर्य पाहिलेला माणूस हे मराठीतील महत्त्वाचे नाटक आहे. त्या नाटकामध्ये १९९०च्या भारतीय समाजाला आलेल्या वैचारिक शैथिल्याचा एक विस्तारित ध्वनी आहे. त्याचबरोबर ते नव्वदी नंतरच्या काळातले महत्त्वपूर्ण वैचारिक आणि प्रायोगिक नाटक आहे. माणसाला सत्य, सदाचरण, सदवर्तनाची जाणीव करून देणारे हे नाटक आहे. तसचे या नाटकाच्या मांडणीत आजचं विवेकाचं रूप काय असावं, आजच्या नैतिक मूल्यांचं स्वरूप, निकष काय असावेत इत्यादींचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला आहे. म्हणजे त्या शोधाची सुरुवात करण्याचा प्रयत्न होता. त्या 'शोधाचं' महत्त्व विषद करण्याचा प्रयत्न होता. त्या अनुषंगाने त्या नाटकाची मांडणीही आपसूकच यथातथ्यवादी झाली आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**बहुपर्यायी प्रश्न :**

१. अथेन्सच्या संसदेतील प्रतिनिधी म्हणून खालीलपैकी कोणते पात्र चित्रित केले आहे.

अ. क्रिटो   आ. प्लेटो   इ. **अल्किबियाडिस**   ई. फिह्रो

२. गुहेतल्या माणसांची संख्या नाटकात किती दर्शविलेली आहे.

अ. ५   आ. ४   इ. ३   ई. २

३. सॉक्रेटिसच्या विरोधात कवींच्यावतीने फिर्यादी म्हणून कोण उभा होता.

**अ. मेलेटस**   आ. ॲनिटस   इ. अल्किबियाडिस   ई. फिह्रो

४. संसद सदस्य तरुणांना योग्य मार्गदर्शन करतात, हे मत कुणाचे?

**अ. मेलेटस**   आ. ॲनिटस   इ. अल्किबियाडिस   ई. क्रिटो

५. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाच संगीत दिग्दर्शन कुणी केले.

**अ. भास्कर चंदावरकर**   आ. अतुल पेठे

इ. श्रीकांत एकबोट   ई. श्याम भुतकर

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. इ. अल्किबियाडिस

२. आ. ४

३. अ. मेलेटस

४. अ. मेलेटस

५. अ. भास्कर चंदावरकर

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाचे मध्यवर्ती आशयसूत्र लिहा.

२. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकाचे एक विचारनाट्य म्हणून विवेचन करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. १. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकातील सूचकता.

२. २. 'सूर्य पाहिलेला माणूस'ची शैली.

## ४.७ उपक्रम

तुमच्या आवडीच्या वेगवेगळ्या नाटकांचे वाचन करा.

## ४.८ संदर्भ ग्रंथ


१. साठे मकरंद, सूर्य पाहिलेला माणूस, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१९. (प. आ. १९९९, मॅजेस्टिक प्रकाशन)

२. Jaaware Aniket, Socrates in the Time of Populism : A Brief Note On a New Marathi Play, Theatre India.

३. कदम निळकंठ, सूर्याच्या शोधातला नेटका प्रयोग, आपलं महानगर, १० सप्टेंबर, १९९९.

४. पवार जयंत, हवेत तरंगणारा सॉक्रेटिस, महाराष्ट्र टाईम्स, दिनांक २२ एप्रिल, १९९९.

५. पाध्ये सुरेशचंद्र, सॉक्रेटिस (सत्याचा) सूर्य पाहिलेला माणूस, ४ फेब्रुवारी, १९९९.

६. पेठे अतुल, नाटकवाल्याचे प्रयोग, उनि., पृ. ४४

७. पेठे अतुल, आजच्या काळात सॉक्रेटिस बघणं आवश्यक, दै. सकाळ, ५ ऑगस्ट, १९९९.

८. सूर्य पाहिलेला माणूस, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९९, पृ. ४.

९. बाबू मोशाय, महाराष्ट्र टाईम्स, सूर्य पाहिलेला माणूस आणि सूर्याची पिल्ले, महाराष्ट्र टाईम्स, २३ फेब्रुवारी, २००२.

१०. जोशी प्रतिमा, सूर्य...चा शोध, अनुष्टुभ, दिवाळी, २००२.

११. लिमये विनायक, सत्याचा शोध उजेडात आणणारे सूर्य पाहिलेला माणूस, लोकसत्ता, २० जानेवारी, १९९९.

❑❑❑

# घटक १
# तुकाराम गाथा (निवडक अभंग)

**संपा. भालचंद्र नेमाडे**

## १.१ उद्दिष्ट्ये :

१. भालचंद्र नेमाडे यांनी संपादित केलेल्या तुकाराम गाथा (निवडक अभंग) या ग्रंथातील अभंगाच्या आधारे तुकारामांच्या अभंगाचे आकलन करुन घेणे.

२. या अभंगाच्या निवडीमागील त्यांचा दृष्टीकोन आणि त्यांनी वापरलेला निकष समजून घेणे.

३. या अभंगाच्या आधारे विरक्तीचे स्वरूप पाहाणे.

४. तुकारामांच्या भक्तीचे स्वरुप समजून घेणे.

५. तुकारामांच्या अभंगातील नितीशिक्षणाचे स्वरूप समजून घेणे.

६. तुकारामांच्या कवित्वशक्तीचे स्वरूप पाहाणे.

७. केवळ कवित्व शक्तीच्या जोरावर एका सामान्य साधकाचे संतपदापर्यंत पोहचण्याची कारणे आपल्याला त्यांच्या अभंगातून सापडू शकतील त्याचा शोध घेणे.

८. तुकारामांचा संपूर्ण प्रवास विरक्तीतून भक्ती आणि भक्तीतून मुक्ती असाच राहिला आहे. तो समजून घेणे.

९. तुकारामांच्या निवडक अभंगाच्या माध्यमातून त्यांचे व्यक्तित्व समजून घेणे.

## १.२ प्रास्ताविक

मराठी भाषेच्या सुरुवातीच्या काळामध्ये चक्रधर, म्हाइंभट, नामदेव, ज्ञानदेव, मुक्ताबाई व जनाबाई या संत महात्म्यांनी मराठी साहित्याची भाषा घडवली. या काळामध्ये निर्माण झालेल्या साहित्याच्या मुख्य प्रेरणा धार्मिक व भक्तिपर होत्या. कालानुरूप निव्वळ भक्तीच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या या साहित्याचा लंबक सामाजिक सुधारणांकडे झुकत गेला. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ यांच्या निमित्ताने सुरू झालेली भक्ती साहित्याची ही परंपरा तुकारामांपर्यंत अधिकाधिक समृद्ध आणि लोकाभिमुख होत आली असल्याचे आपल्याला दिसते.संत तुकारामांच्या साहित्याची भाषा ही मुख्यत्वे लोकभाषा होती. त्यांनी लोकधर्मी साहित्याप्रेरणेतून आपले साहित्य लिहिले. त्यामुळे त्यांचे साहित्य महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी व कष्टकरी वर्गामध्ये लोकप्रिय झाले. त्यांच्या कित्येक अभंगातील ओळी आजही महाराष्ट्रातील घराघरातून म्हणी, सुभाषिते आणि लोकोक्तीच्या रूपाने रुळल्याचे आपण पाहतो. तुकारामांचे अभंग अनेक वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगेवगळ्या निमित्ताने प्रकाशित केले आहेत. यातील बऱ्याच रचनाच्या अधिकृततेबद्दल मतमतांतरे आहेत. त्यातही आलेक्झांडर ग्रांट यांनी प्रकाशित केलेली गाथा सर्वात अधिकृत मानली जाते.

इ.स. १८६९ साली प्रकाशित आलेल्या या गाथेमध्ये ४५०० अभंगांचा समावेश आहे. हेच संकलन पुढे १९७३ साली सांप्रदायिक गाथांमधील काही पाठभेदासह प्रकाशित केले.

आज अभ्यासाच्या दृष्टीने अशा अनेक गाथा उपलब्ध असल्या तरी भालचंद्र नेमाडे यांनी साहित्य अकादमीच्या माध्यमातून तुकारामांच्या निवडक ५०० अभंगांचे केले संपादन एकूण मराठी साहित्य परंपरेतील तुकारामांचे श्रेष्ठत्व अधोरेखित करणारे आहे. या संपादनाच्या निमित्ताने भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तुत ग्रंथास लिहिलेली प्रस्तावना त्यांची अभंग निवडीमागील भूमिका आणि निकष स्पष्ट करणारी आहे. याशिवाय तुकारामांच्या अभंगाच्या आकलनासाठी व अर्थानिर्णयासाठी आवश्यक धागेदोरे या प्रस्तावानेतून आले आहेत. नेमाडे यांनी प्रस्तुत संपादनातील हे पाचशे अभंग निवडताना काही निकष ठेवले आहेत. तुकारामांच्या अभंगाची निकषावर निवड करणे कठीण काम आहे. कारण त्यांचे सर्वच अभंग काही तरी मोठे वैश्विक सत्य सांगून जातात. परंतु त्यांचे असेही काही अभंग आहेत की जे सबंध रचनाच कविता म्हणून अंतर्लयीने भरलेला श्रेष्ठ भाषिक अविष्कार वाटते. काव्यगत अनेक वैशिष्ट्ये त्यामध्ये सामावलेली आहेत. या अभंगांनी तुकारामांचे कवित्व अधोरेखित केले आहे. या संपादनामध्ये नेमाडे यांनी तुकारामांच्या या कवित्व अधोरेखित करणाऱ्या अभंगांना एकत्र करून  संपादित केले आहे. त्यामुळे तुकारामांचे कवित्व जोखण्याच्या दृष्टीने आणि तुकारामांचे कवी म्हणून असलेले मोठेपण समजून घेण्याच्या दृष्टीने या ग्रंथास महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.३ विषय विवेचन

तुकारामांच्या अभंगाच्या अनेक गाथा आज उपलब्ध आहेत. परंतु प्रस्तुत विवेचनासाठी भालचंद्र नेमाडे यांनी संपादित केलेली आणि साहित्य अकादेमीद्वारे प्रकाशित झालेली तुकाराम गाथा केंद्रभागी ठेवली आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये नेमाडे यांनी पाचशे अभंगाचा समावेश केला. या अभंगाची विभागणी त्यांनी विरक्ती, भक्ती, नैतिकता, कवित्व, संतत्व आणि मुक्ती अशा सहा घटकामध्ये केली आहे. प्रस्तुत विवेचनामध्ये नेमाडे यांचा हा दृष्टिकोन आधारास घेताला. सोबत त्यांचे अभंग समजून घेण्याच्या दृष्टीने  सुरुवातीस त्यांच्या जीवन चरित्राविषयी काही विवेचन संक्षेपाने दिले.

### १.३.१ तुकाराम जीवनचरित्र

तुकारामांना उणे-पुरे ४२ वर्षाचे आयुष्य लाभले होते. एवढ्या छोट्याशा जीवनयात्रेत देखील त्यांनी आपल्या कवित्व शक्तीने समाजासमोर जे कार्य उभा केले ते कालातीत आहे. तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करत असताना त्यांचा जीवन परिचय समजून घेणे क्रमप्राप्त आहे. तुकारामांचे जीवनचरित्र त्यांच्या समकाळामध्ये एकत्रितपणे लिहिलेले कुठेही आढळत नाही. परंतु तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांची आत्मानुभूती असल्यामुळे त्याचे जीवनचरित्र त्यांच्या अभंगापासून वेगळे करता येणार नाही. त्यांच्या जीवनातील घटनाप्रसंग त्यांच्या रचनेतून नैसर्गिकपणे अवतरताना दिसतात. एवढेच नाही तर त्यांनी जगण्याला दिलेला प्रतिसादच त्यांच्या अभंगाचे विषय बनून आविष्कृत झालेला आहे. त्याचबरोबर शिष्या बहिणाबाई व त्यांच्या समकालीन इतर काही संतकवींनी तुकारामांच्या चरित्रपर आठवणी आपल्या साहित्यातून लिहून ठेवल्या आहेत. नंतरच्या काळात या साधन सामग्रीच्या आधारे महिपतीबुवा कांबळे ताहराबादकर आणि

वा.सी. बेंद्रे यांनी लिहिलेल्या तुकारामांच्या चरित्रग्रंथामध्ये त्यांच्याबद्दल बरीचशी माहिती उपलब्ध झाली आहे. तुकारामाच्या जीवनातील बऱ्याच प्रसंगांबद्दल अनेक मतमतांतरे दिसून येतात. त्यामध्ये इंद्रायणीमध्ये त्यांची अभंग गाथा तरण्यापासून ते तुकारामांच्या सदेह वैकुंठ गमनापर्यंत अनेक घटनाप्रसंगाचा समावेश होतो. ते आपल्या अभंगातून स्वतःच्या जीवनानुभवाबद्दल अतिशय खुलेपणाने बोलताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून त्यांचे जीवनचरित्र समजून घेणे आवश्यक आहे.

तुकारामांचा जन्म इ.स. १६०८ मध्ये देहू येथे झाला. तुकारामांच्या वडिलांचे नाव बोल्होबा आणि आईचे नाव कनकाई होते. त्यांचे घराणे आंबिले ऊर्फ मोरे होते. या घराण्याकडे प्रतिष्ठित अशी गावाची महाजनकी होती. ते तीन भावंडातील दुसऱ्या क्रमांकाचे होते. तुकारामांचा मोठा भाऊ सावजी विरक्त वृत्तीचा होता. त्यामुळे घराची संपूर्ण जबाबदारी तुकारामांवर आली होती. कुणबी समाजामध्ये जन्म घेतलेल्या तुकारामांना वारसाने पंधरा एकर बागायती जमीन, एक वाण्याचे दुकान आणि थोडी सावकारकी असा व्यवसाय प्राप्त झाला होता. पंढरपूरचा विठ्ठल हे त्यांचे आराध्य दैवत होते. संत परंपरेचे खोल संस्कार त्यांच्या व्यक्तित्वावर झाले होते. एकत्र कुटुंबपद्धतीतील समृद्ध नातेसंबंध असलेले बालपण त्यांना लाभले होते. नंतरच्या काळात त्यांचा विवाह रखमा नावाच्या मुलीशी झाला. तिच्यापासून तुकारामांना संताजी नावाचा एक मुलगा झाला. रखमाबाईच्या दीर्घ आजारपणामुळे तुकारामांना जिजा उर्फ आऊली सोबत दुसरा विवाह करावा लागला.

तुकाराम सतरा वर्षाचे असतानाच त्यांचे आईवडील मरण पावले. या दरम्यान त्यांना भयंकर दुष्काळाचा सामनाही करावा लागला. थोरल्या भावाची बायको, रखमा आणि संताजी अशी घरातील माणसे दुष्काळात उपासमारीने मरण पावली. गुरे-ढोरे, सगे-सोयरे सर्व काही बुडाले. हे सर्व पाहून तुकारामांचे मन उदास झाले. याच्यातून त्यांच्या मनात जगण्याबद्दल एकप्रकारची विरक्ती निर्माण झाली. अशा एकामागून एक आलेल्या संकटामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली. एकूणच संसारतापे तापलो मी देवा, करिता या सेवा कुटुंबाची अशी स्थिती तुकारामांची झाली होती. यातूनच तुकारामांनी देहू गावाजवळ भंडारा डोंगरावर जाऊन विठ्ठलाची आराधना सुरू केली. ते हरी चिंतनात पूर्णपणे मग्न झाले. दरम्यानच्या काळात त्यांना बाबाजी चैतन्य यांच्याकडून गुरु उपदेशही प्राप्त झाला. सलग पडलेल्या दुष्काळामुळे मनुष्य आणि एकूणच प्राणीमात्रांचे झालेले हाल पाहून तुकाराम आतून हादरून गेले होते. सिद्धार्थचा बुद्ध होतानाची ज्ञानप्राप्ती आणि तुकारामाने भंडारा डोंगरावर केलेल्या चिंतनातून साधलेली समाधी हे दोन्ही एकाच जातकुळीचे होते. तुकारामांना या अनुभवातून प्राप्त झालेले अर्घ्य हे त्यांच्या अभंगाचे एकूण सार आहे.

खेळकर समृद्ध बालपण, अवकाळी पडलेली कौटुंबिक जबाबदारी, कौटुंबिक जीवनातील विफलता, एका मागून एक येणारी संकटे आणि यातून मनाला प्राप्त झालेली विरक्ती, ही विरक्ती ते वैकुंटवास यांच्यामध्ये त्यांनी केलेली अभंग रचना यांच्यामध्ये तुकारामांच्या व्यक्तित्वाच्या रंग रेषा उमटल्या आहेत. दरम्यानच्या काळात तुकारामांना लिहिते ठेवणाऱ्या अनेक घटनाप्रसंगाची रेलचेल त्यांच्या जीवनचरित्रामध्ये येते. तुकारामांच्या जीवनाबद्दल भालचंद्र नेमाडे यांनी दिलेला पुढील अभिप्राय खूप बोलका आहे. अशा परिस्थितीतली तुकारामाच्या मनाची तडफड दु:स्वप्नांसारखी नंतरच्या काळात लिहिलेल्या काही अभंगामधून

सतत उमटते. ही आजन्म अस्वस्थता त्याचा स्थायीभाव होऊन राहिली. दुष्काळात त्याची शेती संपुष्टात आली. गुरे ढोरे तडफडून मेली. धंदा ही बुडाला. दिवाळखोर झाल्याने कोणाकडे तोंड दाखवणे कठीण झाले. घरातील पंधरा वीस माणसे जगवणे अशक्य झाले. त्यासाठी काढलेले कर्जही संपले. ते फेडता येईना त्यामुळे नवे कर्ज कोणी देईना. सासऱ्यांकडून मदद घेण्याची नामुष्की एकदोनदा आली. कुटुंबातले अन्नाअभावी निस्तेज होत मातीआड जाणारे लाडके चेहरे इहलोकीच्या अस्तित्वाची क्षणभंगुरता त्यांच्या जाणिवेचा अविभाज्य भाग होऊन बसली. (भालचंद्र नेमाडे : प्रस्तावना : ०७ ) थोडक्यात तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांनी जीवनातील विविध आघातांना दिलेली प्रामाणिक प्रतिक्रिया होती. त्यांचे जगणे प्रवाहीपणे त्यांच्या अभंगातून आले आहे. त्यामुळे त्यांचे जीवनचरित्र त्यांच्या अभंगातूनच समजून घेणे श्रेयस्कर ठरेल.

### १.३.२ विरक्ती

तुकारामांना जीवनाबद्दल विरक्ती निर्माण व्हावी अशी अनेक कारणे त्यांच्या जीवनात घडलेली दिसतात. अकाळी आई वडिलांचे देहावसान असेल किंवा दुष्काळात अन्न पाण्या अभावी बायको मुलाचे मृत्यू असतील. या शिवाय आयुष्याच्या उत्तरार्धात दुसऱ्या बायकोचा स्वभाव कर्कश असणे असेल. या सर्व गोष्टींमुळे त्यांचे मन संसारात रमले नाही. संसार आणि परमार्थ यांच्यातील अनेक अंतरद्वंद्व त्यांच्या रचनेत सापडतात. विध्वंसकारी दुष्काळानंतर आलेल्या विरक्तीने तुकारामांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले. त्यांची ही मनोवस्था चिरकाल टिकणारी नव्हती. जीवनातील चढउताराबरोबर त्यांची मनोवस्थाही बदलत होती. त्यानुसार त्यांचे अभंगाचे आशय आणि विषयही बदलत होते. त्यांच्या अभंगातून मानवी जगण्याच्या या बहुविध अवस्थांचे दर्शन घडते. सर्वसामान्य जीवन व्यवहारामध्ये अशा अनेक पेचप्रसंगाना त्यांना आपल्याला तोंड द्यावे लागते. अशा कोणत्याही पेचप्रसंगातून सोडवणूक करून घेण्याची तुकारामाच्या अभंगात ताकद होती. आयुष्यातील अपार दुःख आणि या दुःखातून परमेश्वराच्या चरणी वाहिलेला असहाय शरणभाव असे त्यांच्या विरक्तीतून लिहिलेल्या अभंगाचे स्वरूप आहे. सोसलेल्या दुःखाचा साक्षीदार प्रत्यक्ष परमेश्वरच असल्यामुळे आणि त्यांचे अभंग म्हणजे एक प्रकारे परमेश्वराशी त्यांनी साधलेला संवाद असल्यामुळे त्यांच्या अभंगातून असत्य कथनाच्या सर्व शक्यता संपुष्टात आल्या आहेत. म्हणूनच भालचंद्र नेमाडे यांना तुकारामाचे अभंग म्हणजे केवळ सत्य मानणाऱ्या असहाय माणसाचे पापोद्धाटन वाटतात.

सन १६२९ आणि १६३० साली दखखनमध्ये जो भयंकर दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळाने संपूर्ण प्राणीजन व मनुष्यजनाचे झालेले हाल पाहून तुकारामांना अतीव दुःख झाले. या दुःखाच्या प्रसंगी त्या विठ्ठलाजवळ आसरा शोधला. भंडारा डोंगरावर चिंतन करायला सुरुवात केली व यातून त्यांना जी विरक्त आवस्था प्राप्त झाली. ती त्यांच्या अनेक अभंगातून दिसून येते. त्यादृष्टीने त्यांचा हा अभंग महत्त्वाचा आहे. बाप मेला न कळता । नव्हती संसाराची चिंता ।। विठो तुझे माझे राज्य । नाही दुसऱ्याचे काज ।। बाईल मेली मुक्त झाली । देवे माया सोडविली ।। पोर मेले बरे जाले । देवे मायाविरहित केले।। माता मेली मज देखता । तुका म्हणे हरली चिंता ।। (पृष्ठ क्र.५) तुकारामांचा हा अभंग माणसाची मोहमायेच्या पाशातून सुटका कशी होते याचे उत्तम उदाहरण आहे. आत्मानुभूती हा तुकारामांच्या अभंगाचा धर्म आहे. ज्ञान उपदेशपेक्षा व्यक्त होणे, मोकळे होणे, कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वतःला वाहते ठेवणे हे प्रधान

प्रयोजन मनी बाळगून त्यांनी आपली अभंग रचना केल्याचे दिसून येते. बापाचे मरणे असेल किंवा बायको मुलाचे मृत्यू असतील जीवनातील अशा घनघोर क्षणी तुकारामांनी जी प्रतिक्रिया दिली आहे ती साधारण माणसाची किंवा कवीची नसून एका पूर्णत्वास पोहचलेल्या संतमहात्म्याची प्रतिक्रिया आहे. संसार सुखाच्या संपूर्ण विरक्तीशिवाय ही अवस्था प्राप्त होणे शक्य नाही.

दुष्काळासारख्या संकटाने तुकारामांच्या मनावर झालेले खोल परिणाम या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केले आहेत . बरे जाले देवा निघाले दिवाळे । बरी या दुष्काळे पीडा गेली ।। बरे जाले नाही धरिली लोकलाज । बरा आलो तुज शरण देवा ।। (पृष्ठ क्र.५). या अभंगातून तुकाराम आपल्या आंतरिक वेदनेला उजागर करताना दिसतात. वस्तूत: व्यवसाय धंद्यामध्ये दिवाळे निघणे त्रास देणारेच असते. कोण्याही सामान्य माणसाला आपले दिवाळे निघणे बरे वाटणारे असणार नाही.परंतु तुकारामांना या सर्व गोष्टींचा नाश म्हणजे मोहमायेचा नाश आणि परमेश्वराची प्राप्ती वाटते. अत्यंतिक वेदनेतून प्राप्त झालेले आत्मज्ञान आणि यातून आलेली विरक्ती हा त्यांच्या लेखनाचा मूळ आधार असल्यामुळे त्यांना धनद्रव्याचा नाश हे परमेश्वराशी जोडले जाण्याचे एक कारण वाटते. या संसार प्रपंचात अडकून पडलो असतो तर मला माझ्यातल्या शूद्रत्वाची ओळख झाली नसती आणि लोकलाजेने आणि दंभानेच मेलो असतो थोडक्यात दुष्काळासारख्या संकटाला परमेश्वराला शरण जाण्याची संधी आणि नाश पावलेले मोह मायेला पीडा मानणारा आत्मभाव एका टोकाच्या विरक्तीतूनच त्यांच्याकडे आल्याचे दिसते.

तुकारामांचा जन्म हा शूद्र कुणबी समाजामध्ये झाला होता. तत्कालीन समाज रचना लक्षात घेता त्यांच्यासाठी ही बाब खूप चांगली नक्कीच नव्हती. यातही तुकाराम बरा कुणबी केलो । नाही तरि दंभेचि असतो मेलो ।। असे म्हणून त्यांनी तत्कालीन जात व्यवस्था आणि त्यातून माणसांना जडलेले गंड यावर प्रकाश टाकला आहे. नीच कुळीत जन्म होणे देखील त्यांना खूप भाग्याचे वाटते. कारण वर्ण श्रेष्ठत्वाच्या अहंकाराने मी संत सेवेला मुकलो असतो. संत सेवेविना आपल्याला नरकवास प्राप्त झाला असता. या अभंगामध्ये संपूर्ण विरक्तीतून आलेले शहाणपण दिसून येते. तुकाराम स्वतःच्या जीवनात कितीही विरक्त झाले असले तरी परपीडेने मात्र व्यतीत झालेले दिसतात. लोककल्याणची आत्मिक इच्छा असलेल्या या संताला आपल्या स्वतःच्या कोणत्याही दुःखापेक्षा समाजाचे दुःख मोठे वाटत होते. यातूनच ते परमेश्वराकडे आपले गाऱ्हाने मांडताना दिसतात. न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते ।। त्यांना हे जनमानसाचे दुःख देखवत नाही आणि तुझ्या उपस्थितीत हे सर्व घडणे बरे नाही असे ते विठ्ठलाला खडसावतानाही दिसतात.

स्वतःच्या संसार सुखापासून विरक्त झालेल्या तुकारामांची बांधिलकी केवळ मानवजातीपुरती मर्यादित न राहता ती समस्त जीवसृष्टीशी जोडून घेताना दिसते. वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वर आळविती ।। तुका म्हणे होय मनाशी संवाद । आपुलाचि वाद आपणाशी ।। (पृष्ठ क्र.२२) याठिकाणी सुख दुःखाशी निसंग झालेल्या महात्माचे सृष्टीजातशी एकरूप होणे अधोरेखित झाले आहे. एकाच वेळी खऱ्या नाते संबंधापासून मुक्तीची आस बाळगणाऱ्या तुकारामांना वृक्ष, वल्ली, वनचर यांच्याशी नाते जोडावे वाटते आहे. आपल्या क्षणभंगुर नाते संबंधाने तयार केलेली ही मोहमायेची चौकट तोडल्याशिवाय संपूर्ण

विश्वकुटुंबत्वाची भावना जपणारी चौकट तयार करणे शक्य नसते. संपूर्ण सृष्टीजाताचा जगण्याचा अधिकार मान्य करणारी त्यांची ही भावना त्यांना कवी पदापासून संत पदापर्यंत घेवून जाते. जगण्यातील ही परिपक्वता बाह्यशक्तींशी चाललेल्या आपल्या वादातील निरर्थकता समजून घेतल्याशिवाय शक्य होत नसते. तुकारामांच्या जगण्यातील ही द्वंद्व मिटली आहेत. त्यामुळेच तुकाराम यापुढाचा वाद आपला आपल्याशीच असल्याचे सांगतात. या विरक्तीतूनच त्यांना माझिया देहाची मज नाही चाड । कोठे करू कोड आणिकांचे ।। असे अभंग स्फुरले आहेत. माणसाला आपले अस्तित्व विसरुन जायला भाग पाडणारी विरक्ती त्यांच्या अनेक अभंगाचे लक्षण आहे. विठ्ठलावरील निस्सीम भक्तीतूनच त्यांच्याठायी ही विरक्ती आल्याचे आपल्याला दिसून येते.

### १.३.३ भक्ती

विठ्ठल भक्ती हे तुकारामांच्या अभंगाचे आत्मतत्त्व आहे. दुःख हे मानवी जगण्याचे मुख्य सार असले तरी दुःखातून सोडवणूक हे साफल्य आहे. या दुःखाची सोडवणूक परमेश्वर चरणी समर्पणाशिवाय शक्य नाही. विठ्ठल चरणी शरणांगती व संपूर्ण समर्पणभाव हेच तुकारामांच्या भक्तीचे स्वरूप राहिले आहे. प्रत्यक्ष तुकारामाचे जीवनच भक्ती मार्गाने चालत राहिल्यास सामान्य माणसालाही संतत्व कसे प्राप्त होवू शकते याचे उत्तम उदाहरण आहे. तुकारामांनी आपल्या एका अभंगामध्ये म्हटले आहे, देव पाहावया आलो, तेथे देवची होवुनी गेलो। सर्वसामान्य माणसाला केवळ भक्तीमुळेच देवत्व प्राप्त होवू शकते. हे केवळ तुकारामच नाही तर आषाढी, कार्तिकी वारीला पंढरपूरच्या दिशेने निघणाऱ्या अनेक संतांच्या पालख्या आणि हरिगजरात मग्न होवून नाचणारा जनसमुदाय पाहिला की आपल्या लक्षात येते. कोणे एकेकाळी स्वतःला विठ्ठल भक्तीमध्ये वाहून घेलेल्या संताना आज देवत्व प्राप्त झाले आहे. भक्तीमध्ये असलेली ही ताकद तुकारामच्या अभंगातून ठिकठिकाणी अधोरेखित झाली आहे. संसारातील षड्रीपूंनी चित्त विचलित होणे स्वाभाविक आहे. परंतु विठ्ठलाच्या अखंड नामस्मरणातूनच चित्तशुद्धी शक्य असल्याचे तुकाराम मानतात आणि आपल्या जगण्यातून आणि अभंग रचनेतून नव्या भक्तीमार्गाची स्थापना करतात. अर्थात त्यांच्या भक्तीमार्गला ज्ञानेश्वर, नामदेव व समस्त संतमेळा यांनी स्थापित केलेल्या वारकरी संप्रदायाच्या भक्ती परंपरेच्या लोकधर्मी तत्त्वज्ञानाचा आधार आहे. नामदेवांच्या नामसंकिर्तनाचा वापर तुकारामांनी विठ्ठल भक्तीसाठी व आपल्या व्यक्त होण्यासाठी वापरला.

तुकारामांनी अंगीकारलेला भक्तीमार्ग हा थेट देवाशी संवाद साधणारा होता. तुकारामांनी अधिक प्रशस्त केलेली ही वाट खऱ्या अर्थाने संत नामदेव व ज्ञानदेवांनी तेराव्या शतकातच मोकळी करून दिली होती. तुकारामांनी थेट देवाशी संवाद साधणाऱ्या या भक्ती मार्गाच्या निमित्ताने भक्त व देव यांच्यांत नेहमी मध्यस्थी करणाऱ्या पुरोहित वर्गाला हद्दपार केले. यातून त्यांनी देव व भक्त यांच्यातील अंतर कमी केले. पुरोहित वर्गाचा भक्तीमार्गातील अडसर दूर करण्यासाठी तुकारामाची भाषा अधिक कठोर झालेली दिसते. या ठिकाणी तुकाराम बंडखोर आणि विद्रोही वाटतात. तुकारामांचे हे योगदान केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील भक्ती चळवळीला अधिकाधिक लोकाभिमुख बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहे.

तुकारामांनी आपल्या भक्तीपर काव्यातूनही तत्कालीन भ्रष्ट प्रस्थापित ब्राह्मणवर्ग व सरंजामदार यांनी भक्तीमार्गत उभ्या केलेल्या शोषण व्यवस्थेवर मर्मभेदक टीका केली आहे.

विठ्ठलावरची अखंड श्रद्धा ही त्यांच्या भक्तीपर अभंगाचा मुख्य आधार आहे. बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव, तुका म्हणे देह भरीला विठ्ठले । कामक्रोधे केले घर रीते, याठिकाणी तुकारामांचे संपूर्ण जीवनच विठ्ठलमय झाल्याचे दिसून येते. तुकारामांचा संपूर्ण देह केवळ विठ्ठल नामाने भारला आहे. त्यांचे बोलणे, चालणे, पाहणे अशा सर्वच गोष्टी केवळ विठ्ठलाचे नामस्मरण करण्यासाठी शिल्लक राहिले असल्याचे तुकाराम सांगतात. आता काम, क्रोध, मोह, माया या षड्रीपूंनी त्यांचे मन आता रिते झाले आहे. आमचा तू ऋणी ठायीचा चि देवा मागावया ठेवा आलो दारा, तुकारामांची भक्ती ही देवाला आपल्या ऋणात ठेवणारी आहे. आमच्यामुळेच तुला देवपण प्राप्त झाले आहे नाहीतर तुला कोण पुसतो असा तुकारामांचा दावा आहे. यातूनच ते प्रत्यक्ष परमेश्वरावर आता तुझा भाव कळो आला देवा, ठकूनिया सेवा घेसी माझी, असा तू माझ्याकडून फसवून भक्ती करवून घेत आहेस असा आरोप करताना दिसतात. विठ्ठलावर असणाऱ्या निस्सीम प्रेमातूनच ते थेट परमेश्वराबरोबर हे लटके भांडण रचताना दिसतात.

तुकारामांची पंढरपूर आणि पंढरपूरचा विठ्ठल यांच्यावर प्रगाढ श्रद्धा होती. विठ्ठलाच्या अधिवासामुळे पंढरपूर हे संपूर्ण तिन्ही लोकांत पवित्र तीर्थक्षेत्र त्यांना वाटते. पंढरपूरचे महात्म्य काशी आणि द्वारका या तीर्थांपेक्षाही मोठे असल्याचे त्यांनी मानले आहे. म्हणूनच एकेठिकाणी ते म्हणतात, काशीयात्रा पाच द्वारकेच्या तीन । पंढरीची जाण एक यात्रा ।। काशी देह विटंबने द्वारके जाळणे। पंढरीशी होणे ब्रह्मरुप।। अठरापगड जाती सकळ ही वैष्णव। दुजा नाही भाव पंढरीसि।। तुका म्हणे असो अथवा नसो भाव। दर्शन पंढरीराव मोक्ष देतो।। (पृष्ठ क्र.५५) विठ्ठलावर असलेल्या भक्तीमुळेच तुकारामांना पंढरपुराहून पवित्र तीर्थ दुसरे कोणतेही दिसत नाही. तुकारामांच्या अभंगातून विठ्ठल भक्तीची बहुविध प्रकट होताना दिसतात. परमेश्वर चरणी समर्पणभावापासून ते परमेश्वराला शिव्या देण्यापर्यंत भक्तीच्या विविध अवस्था त्यांच्या अभंगातून स्पष्ट होतात.

तुकारामांचे विठ्ठलाशी असलेले सख्य हे अनेक रुपे घेवून प्रकटले आहे. भक्तीच्या रूपामध्ये तो कधी विठ्ठलाचा मत्सर करताना दिसतो तर कधी त्याला भीतीही घालतो. कधी विरहिणीसारखा विलाप करतो तर कधी आत्मशरणांगतीही पत्करतो. म्हणूच तो विठ्ठलाला मी तुझा दास आहे हे सांगायला सुद्धा लाज येत असल्याचे ते सांगतात. माझे लेखी देव मेला, असो त्याला असेल, निलाजरा तुज नाही यातिकुळ, चोरटा शिंदळ ठावा मज, तुका म्हणे मज खवळीले भांडा, आता धीर तोंडा न धरवे आता या रचनांमधून तुकाराम आणि विठ्ठल यांच्यातील संघर्ष दिसून येतो. अर्थात विठ्ठलाला शिव्या शाप देवून त्याची भक्ती करण्याचा हा प्रकार मराठी साहित्यात नवा नव्हता. या आधीही संत जनाबाई सारख्या अनेक संत कवींनी विठ्ठलाला काळतोंड्या सारख्या शिव्या दिल्याची उदाहरणे आहेत. तुकाराम त्याचं भक्ती परंपरेचे पायिक झाल्याचे दिसते. परमेश्वरावर असलेले प्रेम हेच या भक्तीचे मुख्य सूत्र आहे. त्यामुळे एका बाजूला ते विठ्ठलाला शिव्या देत असले तरी तू माऊलीहून मायाळ चंद्रहून शीतळ, पाण्याहून पातळ कल्लोळ प्रेमाचा असे म्हणायला देखील विसरत नाहीत.

### १.३.४ नैतिकता

नैतिकता हा संपूर्ण संत साहित्याचा मूलाधार राहिला असल्याचे आपण पाहतो. वारकरी संप्रदायाने रुजू घातलेली ही नैतिकताच तुकारामांच्या जीवन व्यवहाराचे मुख्य उर्जाकेंद्र होती. तुकारामांच्या जीवन व्यवहाराशी एकरूप झालेल्या कवित्व शक्तीतून स्फुरलेल्या या अभंगातून नैतिकमूल्यांचा जागर नैसर्गिकपणे आला आहे. नीती मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी तुकाराम शोषण व्यवस्थेचा आधार बनलेल्या प्रस्थापित मूल्य व्यवस्थेवरही कठोर प्रहार करताना दिसतात. त्यांच्या या प्रगतीशील विचारांतून विद्रोही तुकारामाचा जन्म होतो. केवळ मराठीच नव्हे तर भारतीय साहित्यामध्येही भक्ती परंपरेत वाढलेल्या संताच्या ठायी असा विद्रोह अपवादानेच पाहायला मिळतो. त्यांच्या अभंगातील ही नैतिकता कालओघात इतकी स्वीकार्य झाली आहे की त्यांचे अभंग व अभंगाच्या काही ओळी मूल्यशिक्षणाचा आधार ठरणाऱ्या सुभाषिताच्या रूपाने समाजामध्ये प्रचली आहेत. तुकारामांच्या अभंगाना प्राप्त झालेल्या लोकाश्रायाची व लोकप्रियतेची खरी कारणे त्यांच्या व्यक्तित्वाला लाभलेल्या बहुविध रंगछटांबरोबरच त्यांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी वापरलेल्या भाषेमध्ये होती. त्यांनी आपल्या संपूर्ण अभंग रचनेसाठी सामान्यजणांच्या दैनंदिन व्यवहारातील बोलीभाषेचा वापर केला. त्यामुळे तत्कालीन मुठभर प्रस्थापित वर्गाच्या रोषाचा सामना त्यांना जरूर करावा लागला. परंतु त्या भाषेमुळेच समाजातील सर्वच स्तरातील लोकांनी त्यांच्या अभंगांवर अपार प्रेम केले.

तुकारामांचे जीवन म्हणजे एक ज्ञानयज्ञ आहे. आत्मानुभूतीतून प्राप्त झालेले ज्ञान सकळजणांना वाटत राहणे हे तुकारामांच्या कवितेचे मुख्य प्रयोजन होते. त्यांचा सामान्यत्वापासून सुरू झालेला हा प्रवास त्यांना संत पदापर्यंत घेवून जाताना दिसतो. या प्रवासात या प्रवासात त्यांनी अनेक चढउतार पाहिले. तुकारामाचे संपूर्ण जीवन भक्तीमार्गाने मोक्ष शोधू पाहणाऱ्या कोणत्याही साधकाला मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपल्या अभंगातून अधिकारवाणीने समाजाला उपदेश केला आहे. या उपदेशाच्या निमित्ताने त्यांच्या अभंगातून आलेले नीती शिक्षण सर्वकाळ सामान्यजनांना मार्गदर्शन करणारे ठरले आहे. सामान्यपणे काळाच्या कसोटीवर नीतीमूल्यांचे औचित्य घटत असते किंवा नष्ट होत असते व नवी व्यवस्था प्रस्थापित होत असते. तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे नीतिशिक्षण देणारी गाथाच आहे. अनेक ठिकाणी त्यांची ही नैतिक भूमिकाही रुढी परंपरांनी ग्रासलेल्या धर्ममार्तंडांना आणि पाखंडी लोक समूहाला जाचक ठरली आहे. लोकशिक्षक तुकारामांना अनेकवेळा याची किंमत मोजावी लागली आणि त्यांनी ती आनंदने मोजलीही. त्यांच्या अभंगातून समाजाचे अभूतपूर्व नैतिक विच्छेदन पाहायला मिळते. कठोर आत्मटीका हा देखील त्यांच्या अभंगांचं महत्त्वपूर्ण गुण आहे. त्या लिहिलेले अभंग हे मुख्यता स्वतःचे नैतिक मार्गदर्शन करण्यासाठी आत्मप्रेरणेतून लिहिलेले अभंग आहेत. स्वतःचे मार्गदर्शन करण्याच्या क्रमामध्ये तुकाराम समाजाचे मार्गदर्शन करून जातात.

त्यांचे अभंग नैतिकतेचा नवा अर्थ मांडणारे होते. त्यांनी आपल्या अभंगातून साधू संतांची काही लक्षणे सांगितली आहेत. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा।। थोडक्यात या अभंगात तुकारामांना रंजल्या गांजल्याना आपलेसे करणारा कोणीही मनुष्य प्राणी साधू संतापेक्षा कमी वाटत नाही. प्राणीमात्राच्या सेवेपासून दूर असलेला कोणताही विधी उपचार त्यांना

अमंगळ खेळ वाटतो. भ्रष्ट व अनैतिक  समाजरचनेत आपली एक स्वतंत्र नैतिक भूमिका घेवून परिणामाची पर्वा न करता आपण निवडलेल्या मार्गाने निष्ठेने चालत राहणे तुकारामांसाठी सोपे नव्हते. याची परिणती म्हणून त्यांना आपल्या प्राणापेक्षा प्रिय असलेल्या अभंगगाथेला इंद्रायणीच्या प्रवाहात विसर्जित करण्यापर्यंतचे भोग भोगावे लागले. परंतु प्रत्येक वेळी त्यांच्या मदतीस  पंढरपुरचा सखा पांडुरंगच आल्याचे ते ठिकठिकाणी व्यक्त करतात. यासंदर्भात भालचंद्र नेमाडे यांनी दिलेला अभिप्राय खूप महत्त्वाचा आहे. आपण एका ऐतिहासिक अशा अजस्त्र अपप्रवृत्तीशी शत्रुत्व करीत आहोत आणि सर्वस्व पणाला लावत आहोत, ही जातिवंत लेखकात निसर्गतः असलेली अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जिद्द तुकारामांमध्ये दिसून येते. विठ्ठलच आपल्याला या संकटातून वाचवेल, अशी निष्ठावंत भक्ताची श्रद्धा फक्त त्यांच्या आधाराला होती. हे युद्ध त्याने मोठ्या आत्मविश्वासाने खेळले आणि मानवी संस्कृतीच्या अभिवृद्धीला जसे अनेक चमत्कार उपयोगी पडले, तसेच मराठी वाङ्‌मयीन संस्कृतीतल्या या एका आणीबाणीच्या प्रसंगी एक चमत्कार झाला, आणि तुकारामाच्या अभंगाची गाथा तेरा दिवसांनी वर तरंगत आली. (भालचंद्र नेमाडे : प्रस्तावना : ११)

तुकारामांचा परस्त्रीबद्दलचा दृष्टिकोन अतिशय उदात्त आणि कमालीचा सावध होता. त्यांच्या पुढील अभंगातून त्यांचा परस्त्रीबद्दलचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. पराविया नारी रखुमाई समान । हे गेले नेमून ठायीचे चि ।। जाई वो तू  माते न करी सायास । आम्ही विष्णूदास नव्हो तैसे ।। याठिकाणी ते परस्त्रीला रुक्मिणीचे स्थान देतात. याठिकाणी तुकाराम व्यभिचारी स्त्रीला आव्हान करताना दिसतात हे माते आम्हाला परस्त्रिया देवी रुक्मिणी समान आहेत. त्यामुळे तू उगीच इथे प्रयत्न करू नकोस. आम्ही विष्णुचे दास आहोत त्यामुळे आमच्या हातून काही व्यभिचार होण्याची तिळमात्र शक्यता नाही. हे माते तुझे हे पतन मला पाहावत नाही. विषय सुखानी आसक्त झालेल्या स्त्रिला तुकाराम हे माते, देवी रुक्मिणी असे संबोधून समस्त स्त्री जातीबद्दल आदरभाव व्यक्त करताना दिसतात. जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।। परोपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माया।। (पृष्ठ क्र.९३) या अभंगामध्ये तुकारामांनी धनप्राप्ती व धन खर्च करण्याची सुचिता सांगितली आहे त्याच्या मते माणसाने धन प्राप्त करताना नेहमी उत्तम व योग्य मार्गानेच मिळवावे. आणि खर्च करताना मात्र उदास वृत्तीने करावे. परस्त्रीस माता भगिनी प्रमाणे मानावे असे सांगतात. थोडक्यात त्यांच्या अभंगातून आलेली नैतिक शिक्षण समाजाचे सर्वकाळात मार्गदर्शन करणारे ठरले आहे.

तुकारामांनी लोकशिक्षकाची भूमिका स्वीकारली असली तरी प्रत्येकवेळी उपदेशाने समाज सुधारेल असे नाही. त्यासाठी उपदेश देणाऱ्या इतकेच घेणाऱ्याचेही चित्त शुद्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते प्रस्तुत अभंगमध्ये नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।। तैसी चित्तशुद्धी नाही। तेथे बोध करील काई।। (पृष्ठ क्र.९३) थोडक्यात उत्तम दागिने बनविण्यासाठी सर्वच गुण सोनारामध्ये असून चालत नाही तर सोनं शंभर नंबरी आणि बावन्नकशीच असावे लागते. तुकाराम स्वतःवर देखील नैतिकतेच्या बाबतीत कठोर आचारसंहिता घालून घेताना  दिसतात. ते परमेश्वराकडे मागणे मागतात पापाची वासना नको दावू डोळा । त्याहुनी अंधळा बरा मी ।। निंदेचे श्रवण नको माझे कानी । बधिर करोनि  ठेवी देवा ।। (पृष्ठ क्र.३१) ते परमेश्वराला म्हणतात माझ्या डोळ्याला पापाची वासनादेखील दाखवू नको त्यापेक्षा मी आंधळा बरा आहे.

थोडक्यात विषयसुखामध्ये भरकटलेले जीवन जगण्यापेक्षा मरण जवळ केलेले बरे असेच तुकारामांचे म्हणणे आहे.

सामाजिक ढोंगावर, वैचारिक आणि व्यवहारिक कर्मठपणावर, ऐतखाऊ व शोषक प्रवृत्तींवर केलेली टीका त्यांच्या मौलिक निरीक्षणावर आधारित आणि सदसद्विवेकबुध्दीला धरूनच असल्याने त्याने माघार घेतली नाही. शेंडी जानवे काढून टाका, जटा धारण करणे म्हणजे जांभुवेष आहे, तीर्थामध्ये धोंडापाण्याशिवाय काही नसते, लबाड ब्राह्मणाला दान केल्याने दान घेणारा आणि देणारा असे दोघेही नरकात जातात. (भालचंद्र नेमाडे : प्रस्तावना : १०) तुकारामांनी आपल्या अभंगातून हाताळलेले विषय आणि भालचंद्र नेमाडे यांचा पुढील अभिप्राय पाहिला तरी आपल्याला तुकाराम कोणते मार्गदर्शन करू इच्छित होते आणि कोणत्या मूल्यावर आधारलेल्या समाज व्यवस्थेचे स्वप्न त्यांनी पाहिले होते हे लक्षात येते. या स्वप्नपूर्तीसाठी त्यांच्या वैकुठगमनानंतरही साडेतीनशे वर्षे उलटूनही त्यांचे अभंग निष्ठेने कार्य करत असल्याचे आपण आजही पाहातो. यातच तुकारामांच्या अभंगाचे मोठेपण दडले आहे.

### १.३.५ कवित्व

तुकारामांच्या कवित्व प्रेरणेबद्दल वेगवेगळी मते प्रचलित असली तरी त्यांनी आपल्या एका अभंगातून आपल्याला कवित्व करण्याचे काम कोणी सोपवले आहे याबद्दल सांगितले आहे. नामदेव केले स्वप्नामाजी जागे। सवे पांडुरंगे येवोनिया।। सांगितले काम करावे कवित्व । वाऊगे निमित्य बोलो नको।। (पृष्ठ क्र.११७) त्यांच्या या अभंगावरून असे लक्षात येते की त्यांना अभंग लेखनाची प्रेरणा नामदेवाकडून मिळाली होती. त्यांच्या लेखनावर नामदेव, ज्ञानदेव कबीर व एकनाथ यांच्या साहित्याचा विलक्षण प्रभाव होता. त्यांनी केवळ मराठीच नव्हे तर भारतीय साहित्यातील अनेक भक्ती साहित्यातील अनेक बंडखोर कवींचे संस्कार पचविले होते. शूद्रकुळी जन्मूनही त्यांना वेद, उपनिषदे, गीता, पुराणे, बौद्ध, रामायण- महाभारत आदी साहित्याचा चांगला परिचय होता. यातूनच त्यांचे कवित्व अधिकाधिक प्रगल्भ होत गेले होते.

आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची।। साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धनी वेगळाची।। (पृष्ठ क्र. १३३) तुकारामांचा आपल्या कवित्वाबद्दलच हा अभिप्राय खूप महत्त्वाचा आहे. ते आपल्या अभंग रचनेचे संपूर्ण श्रेय ईश्वराला देतात म्हणूनच तुका म्हणे मज बोलवितो देव या सारख्या रचनांचा वावर त्यांच्या अभंग रचनेत दिसतो. बोलिलो जैसे बोलाविले देवे । माझे तुम्हा ठावे जातिकुळ।। करा क्षमा काही नका धरू कोप । संत मायबाप दीनावरी ।। (पृष्ठ क्र.१३१) तुकाराम आपल्याला मिळालेल्या काव्य प्रतिभेबद्दल कमालीचे विनम्र आहेत. प्रस्तुत रचनेमध्ये त्यांनी आपल्या लाभलेले कवित्व ही निव्वळ ईश्वरी कृपाच नमूद केले आहे. प्रसंगी कठोर होणारी तुकारामांची लेखणी याठिकाणी कमालीची मृदू आणि ईश्वर चरणी संपूर्ण समर्पणभाव व्यक्त करणारी आहे. आपण जे कवित्व करतो ती कारागीर आपली नाही हे कार्य ईश्वराचेच आहे . त्यामुळे ते जे लिहीत होते त्याबद्दल त्यांच्या मनात कुठेही भयगंड आढळून येत नाही. ईश्वर कृपेतून प्राप्त झालेल्या आत्मविश्वासातून त्यांनी अभिव्यक्तीने अनेक धोके पत्करले आहेत. ज्या ज्या वेळी सामाजिक विसंगतीवर बोलण्याची वेळ आली आहे त्या त्या

वेळी त्यांची लेखणी अधिक धारदार बनली आहे. त्या सामाजिक समस्यांवर कठोर प्रहार केले आहेत. त्याची त्यांना मोठी किंमत मोजावी लागली आहे. परंतु अशा कठीण प्रसंगी आपली सर्व मदार विठ्ठलावर सोडून ते मोकळे झाले आहेत. अशा प्रसंगातून तरुन जाण्याचे सामर्थ्य त्यांना ईश्वरी कृपाप्रसादातून प्राप्त झाले आहे. करितो कवित्व म्हणाल हे कोणी। नव्हे माझी वाणी पदरची ।। माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलावितो ।। (पृष्ठ क्र.१३०) या दृष्टीने त्यांचा हा अभंगही महत्त्वाचा आहे.

तुकारामांना आपले कवित्व म्हणजे परमेश्वर प्राप्तीच्या अनेक साधनांपैकी एक साधन वाटते. हा भवसिंधू तरुन जाण्यासाठी परमेश्वर संग हा अपरिहार्य आहे. तो संग आपल्याला आपण कवितेच्या माध्यमातून त्याची जी स्मरण भक्ती करतो आहे यातूनच प्राप्त होणार असल्याचे सांगतात. या दृष्टीने त्यांचा पुढील अभंग महत्त्वाचा आहे. शब्दांची रत्ने करूनी अलंकार । तेणे विश्वंभर पूजियेला ।। भावाचे उपकार करूनी भोजन । तेणे नारायण जेवविला ।। (पृष्ठ क्र.१२१) या ठिकाणी तुकाराम आपण शब्दरूपी काव्यालंकाराने विश्वंभराची महती गात असल्याचे सांगतात. थोडक्यात पारंपरिक भक्ती साहित्यातील ईश्वर भक्तीसाठी काव्यरचना करण्याची प्रथा पुढेही चालवताना दिसतात. तुकारामांसारख्या महान संताच्या अवतार कार्याचे केवळ एकमात्र प्रयोजन असू शकत नाही. समाजाच्या उन्नयनामध्ये त्यांनी अनेकविध दिशांनी कार्य केल्याचे दिसून येते. त्याच्या कार्याच्या परिपूर्तीसाठी त्यांनी शब्दच शस्त्र म्हणून वापरल्याचे त्या आपल्या पुढील अभंगात म्हटले आहे. आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने। शब्दाचीच शस्त्रे यत्न करू ।। शब्द चि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।। (पृष्ठ क्र.१२२) त्यांनी समाज प्रबोधन असेल, विठ्ठल भक्ती असेल किंवा आत्मपीडेची अभिव्यक्ती असेल सर्व ठिकाणी शब्दांचा म्हणजेच आपल्या कवित्वाचा शस्त्राप्रमाणे वापर केला आहे.

स्वतःच्या कवित्वाबद्दल बोलत असतानाच तुकाराम त्यांच्या भवती चाललेल्या कवित्वाच्या कसरतीवरही भाष्य करताना दिसतात. तुकारामांच्या अभंगाना त्यांच्या काळातच प्रचंड अवहेलनेला सामोर जावे लागले. हे जितके खरे आहे. तितकेच त्यांच्या अभंगांना सामान्य वैष्णवजनामध्ये प्रचंड प्रसिद्धी मिळाली हेही तितकेच सत्य आहे. त्यांच्या अभंगाच्या उत्कर्षकाळात त्यांच्या अभंगाची चोरी करून आपल्या नावाने खपवणारे आणि स्वतःला विद्वान पंडित म्हणवून घेणारे अनेक लोक होते. त्यांच्याबद्दल बोलताना तुकाराम म्हणतात. उष्ट्या पत्रावळी करूनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची ।। ऐसे जे पताकी ते नरकी पचती । जोवरी भ्रमती चंद्रसूर्य ।। (पृष्ठ क्र.१२३) या अभंगाच्या द्वारे तुकाराम वाङ्मय चौर्य करणाऱ्या भामट्यांची रवानगी थेट नरकात करताना दिसतात. कोणताही प्रतिभावान कवी हा असाच जन्म घेत नसतो. अनेक अंतरबाह्य द्वंद्वांचा आणि युद्धांचा परिपाक म्हणजे त्यांची कविता असते. तुकारामांसारख्या युगप्रवर्तक कवीच्या बाबतीतील ही द्वंद्वं तर निश्चितच मोठी असायला हवीत. या बाबतीत त्यांनी एका अभंगातून सांगितले आहे. रातंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।। जीवाही आगोज पडती आघात। येऊनिया नित्य नित्य करी ।। (पृष्ठ क्र.१२६) हा अभंग आणि तुकारामांच्या जीवनातील वादळे आणि त्यांच्यावर झालेले आघात पाहिले की आपल्याला त्यांच्या अभंगातील सत्यता लक्षात येते. त्यामुळे सत्यासाठी माझी शब्दविवंचना असे स्वतःच्या कवित्वाबद्दल तुकारामांचे विधान अधिक अर्थघन वाटू लागते.

### १.३.६ संतत्व

तुकारामांचे जीवन असामान्य नव्हते कुठल्याही चार सामान्यजणांना आपापल्या आयुष्यात सामान्यपणे भोगावे लागणारे सर्व भोग त्यांनाही भोगावे लागले होते. शुद्र कुळी जन्मल्याने वाट्याला येणारी अवहेलना, आर्थिक विवंचनेतून येणारे दुःख, कौटुंबिक आणि नातेसंबंधातील विरागातून पदरी पडलेले नैराश्य सामान्य माणसाला मोह पाशात अडकवण्यासाठी आणि विवंचनेच्या गर्तेत घेवून जाण्यासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधाने तुकारामांच्या जीवनात उपस्थित होती. परंतु त्यांच्या हृदयात असलेल्या मानवी जीवनावरील आस्थेमुळे आणि संपूर्ण प्राणीजगताच्या करुणेमुळे त्यांना संसाराच्या काचातून स्वतःची सोडवणूक करून घेणे शक्य झाले. त्यामुळेच त्यांच्या ठायी अभावातून पदरी पडलेल्या निराशेची जागा विरक्तीने घेतली. तुकारामांच्या अभंगातील आणि व्यक्तिमत्त्वातील उदार व सहिष्णू प्रवृत्तीची कारणे भालचंद्र नेमाडे तत्कालीन परिस्थितीमध्ये शोधताना दिसतात. तुकारामांचा काळ म्हणजे १६०८ ते १६५० काळ होता. हा काळ महाराष्ट्रामध्ये शिवाजी महाराजांच्या राजवैभवाचा काळ मनाला जातो. हा काळ धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्वच बाबतीत संमिश्र स्वरूपाचा होता. अनेक वेगवेगळ्या परंपरा अंतर्विरोधासह त्या समाजात एकत्र नांदत होत्या. चहूबाजूंनी यवनांची आक्रमणे होत असली तरी दक्षिणेकडील हा संघर्ष धार्मिक अस्मितेपेक्षा सत्तेसाठीचाच जास्त होता. याच काळात सनातती ब्राह्मण वर्गाकडून तुकारामाची झालेली अवहेलनाही सर्वश्रुत आहे. सोबत समांतरपणे हिंदू, मुसलमान, जैन, लिंगायत, महानुभाव, वारकरी अशा सर्वच पंथातील लोक एकत्र नांदत असल्याचे उल्लेखही या काळात आढळतात. या अर्थाने दखखनमधील वातावरण संमिश्र स्वरूपाचे होते. या संमिश्र वातावरणात तुकारामांनी मात्र धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार करणाऱ्या अत्यंत उदार व बंडखोर परंपरेशी जोडून घेतले. त्याच्या खोल संस्कारातून त्याची कविता अभिव्यक्त होत राहिली. त्यांचे संतत्व फुलत गेले. एकूणच तुकारामांच्या अभंगावरुन असे लक्षात येते की त्यांच्या संवेदनशीलतेला ज्ञानजन्य शहाणपणाची जोड होती. म्हणूनच कवी म्हणून त्यांनी जी उंची गाठली त्याहून जास्तच ख्याती त्यांना संत म्हणून प्राप्त झाली.

केवळ आपल्या कवित्वाच्या जोरावर एवढ्या मोठ्या संत पदाला पोहचलेले तुकारामांसारखे उदाहरण मानवी इतिहासात अपवादानेच पाहायला मिळते. यावरून त्यांच्या कवित्वाचे वेगळेपण लक्षात येते. एका शुद्राने समाजाचे अध्यात्मिक नेतृत्व करणे ही गोष्ट तत्कालिन समाजाला न रुचणारी होती. त्यामुळे त्यांच्या अभंग रचनेत, विठ्ठल भक्तीत आणि एकूणच आध्यात्मिक उन्नतीमध्ये त्याना अनेक बाधांचा सामना करावा लागला. अनेक परीक्षा द्याव्या लागल्या. अनेक दिव्य पार करावी लागली. परंतु तुकारामांनी सर्व संकटात स्वतःला सिद्ध केले. ही संकटे केवळ मानव निर्मित नव्हती, दुष्काळासारखी अनेक संकटे तर ईश्वर निर्मितच होती. या अस्थिरतेच्या काळात त्यांनी स्वतःला स्थिर ठेवले व संपूर्ण समाजाच्या पुढे एक संत म्हणून, एक कवी म्हणून, एक लोकशिक्षक म्हणून नवा आदर्श उभा केला. तुकारामाच्या कवितेला लाभलेले भाग्य त्या त्या भाषेतील एका दुसऱ्या कवीलाच लाभल्याचे सांगून भालचंद्र नेमाडे तुकारामांची तुलना कबीर, शंकरदेव, तुलसीदास, वेमन, शाह लतीफ आणि गालिब साहित्यिकांशी करतात. नेमाडे यांनी तुकारामांची या साहित्यिकांशी केलेली तुलना तुकारामांच्या कवित्वाचा सन्मान करणारी आहे.

गेली साडेतीनशे वर्षे मराठी भाषिकांच्या धार्मिक व सामाजिक मनोव्यापारांना तुकारामांच्या अभंगांनी प्रभावित ठेवले आहे. संत म्हणून त्यांना जी महती प्राप्त झाली तेवढीच कीर्ती त्यांनी कवी म्हणूनही मिळाली. त्यांच्या कवित्व शक्तीमागे मानवतेला वाहून घेतलेले कठोर संतत्व कार्यरत होते. या संतत्वामुळे सांगण्या वागण्यातील अंतर संपुष्टात आले होते. त्यामुळे संपूर्ण समर्पणभाव व निडर अभिव्यक्तीच्या कोंदणाने त्यांचे कवित्व उजळून निघाले दिसून येते. तुकारामांच्या कवितेने तयार केलेला हा संवाद केवळ त्यांच्या कवितेने लळा लावलेल्या धार्मिक व श्रद्धाळू कष्टकरी वर्गापुरता सीमित राहिला नाही तर त्याने गेल्या साडेतीनशे वर्षापासून महाराष्ट्र भूमीमध्ये जी काही वैचारिक आंदोलने झाली त्या सर्वांना उर्जा पुरविण्याचे कार्य केले आहे . वारकरी संप्रदायाच्या विकास विस्तारामध्ये ज्या अनेक संतानी भर घातली. त्यामध्ये तुकारामांचे कार्य अनन्यसाधारण आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव बहिणाबाईनी पुढील शब्दात केला आहे.  संतकृपा झाली इमारत फळा आली। ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस ।। थोडक्यात काय तर ज्ञानदेवांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या वारकरी संप्रदायाला त्याच्या उत्कर्षबिंदूपर्यंत घेवून जाण्याचे महत्त्वाचे कार्य तुकारामांच्या संतत्वाने आणि कवित्व शक्तीने केल्याचा उच्चार बहिणाबाईनी केला आहे. त्यांचे कार्य पाहता बहिणांबाईंनी त्यांना वारकरी संप्रदायाच्या मंदिराच्या कळसाची दिलेली उपमा सार्थ वाटते.

### १.३.७ मुक्ती

तुकारामांनी आपल्या अभंगातून ज्याप्रमाणे विठ्ठल नामाचे महिमामंडण केले आहे त्याप्रमाणे गुरूकृपेचाही महिमा गाईला आहे. संसाराच्या अनुतापापासून मुक्ती मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या तुकारामांना बाबाजी चैतन्य स्वामी यांनी गुरू उपदेश करुन त्यांच्यासाठी मुक्तीची द्वारे उघडल्याचा उल्लेख तुकारामांच्या अभंगातून आलेला दिसतो. सद्गुरूराये कृपा मज केली। परी नाही घडली सेवा काही।। सापडविले वाटे जाता गंगास्नाना। मस्तकी तो जाणा ठेविला कर।। बाबाजी आपले सांगितले नाम। मंत्र दिला राम कृष्ण हरि ।। (पृष्ठ क्र. १६७) त्यांनी आपले गुरू बाबाजी चैतन्य यांनी दिलेला राम कृष्ण हरि हा मंत्र पुढे आयुष्यभर जपला. विठ्ठल भक्ती  आणि हरी नामाचा जपच आपल्यासाठी मुक्तीची द्वारे उघडून देईल अशी त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. थोडक्यात मुक्तीसाठी धडपडणारे त्यांचे मन गुरूपदेशानंतर पूर्णपणे हरिनामात आणि विठ्ठल भक्तीत रममान झाले. मोक्ष प्राप्तीची संपूर्ण चिंता हरली.

तुकारामांना मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ वाटते. त्यांना मुक्तीची म्हणजे मो प्राप्तीचे फारस अप्रूप नाही. ते आपल्या अभंगातून थेट परमेश्वराला म्हणताना दिसतात, मोक्षाचे आम्हासी नाही अवघड। तो असे उघड गाठोळीस।। भक्तीचे सोहळे होतील जीवासी। नवल तेविशी पुरविता।। (पृष्ठ क्र. १७८) ते परमेश्वराला म्हणतात तुझा मोक्ष आणि मुक्ती आम्हाला नकोच आहे. आम्ही वैष्णवजण मुक्ती आणि मोक्ष तर गाठीशी बांधून फिरतो आहोत. आमच्या जीवनात चाललेले हे भक्तीचे सोहळे तेवढे चालू राहू दे म्हणजे झाले. ज्याच्या जीवनात भक्तीचे असे सोहळे येत राहतात त्यांना मोक्ष प्राप्तीची फोल चिंता वाहण्याची गरज नाही असे तुकाराम समस्त वैष्णवजणांनाही सुचवू पाहात आहेत. याही पुढे जावून तुकाराम भगवंताकडे मला मुक्ती देण्यापेक्षा तुझ्या भक्तीचा आनंद वारंवार घेण्यासाठी परत परत हाच मनुष्य जन्म दे म्हणतात.

तुकारामांना घर-दार, कुटुंब-परिवार, नाती-गोती, धन-द्रव्य हे सगळे मायाजाळ वाटते. या गोष्टी माणसाला खऱ्या आध्यात्मिक सुखापासून दूर घेवून जातात अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे ते या सर्व मोहमायेपासून दूर राहू पाहतात. यातूनच ते परमेश्वराकडे नको देऊ देवा पोटी हे संतान । मायाजाळे जाण नाठवसी ।। नको देऊ देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्योग होय जीवा ।। (पृष्ठ क्र.३५) असे मागणे मागताना दिसतात. माणूस जो पर्यंत माझे आणि मी मध्ये अडकून राहतो तोपर्यंत त्याची आत्मिक उन्नती होणे शक्य नाही. जोपर्यंत या सर्व गोष्टी तो विसर्जित करुन परमेश्वर चरणी शरण जात नाही तो पर्यंत त्याला मोक्ष प्राप्ती दुरापास्त असल्याचे ते मानतात. माझे आणि मीपणाच्या सर्वनाशाशिवाय दंभभावाचे विसर्जन होत नाही आणि दंभ, अहंकार यांच्या त्यागाशिवाय आपल्या हातून संत सेवा घडू शकणार नाही अशी तुकारामांची ठाम समजूत आहे. म्हणूनच ते संसार सुखापासून विरक्त होण्याचा मार्ग स्वीकारतात. त्यांच्या अनेक अभंगातून मनुष्य जन्मास आध्यात्मिक उन्नतीकडे घेवून जाणारी मुक्ती दिसून येते. मुक्ती हे त्यांच्या अभंगाचा मुख्य कार्यकारण भाव होता.

तुकाराम हा आपल्या स्वतःच्या मरणाचा सोहळा आपल्याच डोळ्याने अनुभवलेला एक विरळा संत होता. त्याच्या भक्तीपुढे आणि यातून त्याला प्राप्त झालेल्या आत्मिक शक्तीपुढे मोक्ष आणि मुक्ती या गोष्टी किरकोळ वाटतात. ते आपल्या एका अभंगांमध्ये म्हणतात आपुले मरण पाहिले म्या डोळा। तो जाला सोहळा अनुपम्य।। आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवणे। सर्वात्मकपणे भोग जाला।। (पृष्ठ क्र.१८३) तुकारामांचे संपूर्ण जगणे मुक्तीसाठी कधीच नव्हते. केवळ भक्ती हेच तुकारामांच्या जीवनाचे एकूण सार होते. म्हणूनच आपले मरण आनंदने भोगण्याचा आत्मविश्वास त्यांच्या जवळ आला. आम्ही जातो आपुल्या गावा। आमुचा राम राम घ्यावा।। तुमची आमची हे चि भेटी। येथुनिया जन्मतुटी।। (पृष्ठ क्र.१८५) एकूणच निस्सीम भक्तीतून साधलेल्या मुक्तीमुळेच त्यांना आनंदने जगाचा निरोप घेण्याचे धैर्य प्राप्त झाले आहे.

## १.४ समारोप

तुकारामांचे अभंग आज आपल्याला मुद्रित संहितेच्या माध्यमातून सर्वत्र उपलब्ध होत असले तरी मौखिक परंपरेत टिकून राहणे हे त्याच्या अभंगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कोणतीही कृती मौखिक परंपरेत टिकून राहण्यामागे तिच्यातील ताल, लय आणि यातून उद्भवणारा काव्यगत नैसर्गिक गोडवा कारणीभूत ठरत असतो. तुकारामांनी आपल्या अभंगामध्ये विभिन्न लोकगीतांचे रूपबंध वापरले असल्यामुळे त्यांची रचना वेगवेगळ्या गेय प्रकारांनी समृद्ध आहे. त्यांच्या अभंगातील या गेयतेमुळे त्यांचे अभंग आजही दिवसभर कबाडकष्ट करणाऱ्या अगणित शेतकारी वर्गाच्या जगण्याचा एक अविभाज्य घटक बनून आहेत. तुकारामांचा वैविध्यपूर्ण रचना संसार पाहता त्यांच्या अभंगाची वर्गवारी करणेही कठीण काम आहे. भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तुत संपादनामध्ये तुकारामांच्या अभंगामध्ये प्रभावीपणे दिसणाऱ्या सूत्रांच्या आधारे त्यांच्या अभंगाचे विरक्ती, भक्ती, नैतिकता, कवित्व, संतत्व आणि मुक्ती अशा सहा विभागात वर्गीकरण केले आहे. प्रस्तुत विवेचनामध्ये आपण तुकारामांच्या अभंगाचा विचार या वर्गीकरणानुसार करणार आहोत.

## १.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### १.५.१ बहुपर्यायी वस्तूनिष्ठ प्रश्न

१. तुकाराम हे नाव कोणत्या काव्यप्रकारासाठी अग्रक्रमाने घेतले जाते?

अ. ओवी ब. अभंग क. आर्या ड. यापैकी नाही

२. संत तुकारामांचा जन्म कोठे झाला.

अ. देहू ब. आळंदी क. पंढरपूर ड. जेजूरी

३. संत तुकारामांच्या आईचे नाव काय होते?

अ. आऊली ब. बहिणाबाई क. कनकाई ड. जेजूरी

४. संत तुकारामांनी देहू गावाजवळ असणाऱ्या कोणत्या डोंगरावर जाऊन विठ्ठलाची आराधना सुरू केली.

अ. भंडारा ब. कळसुबाई क. गाविलगड ड. बालाघाट

५. संत तुकारामांनी अंगीकारलेला भक्तीमार्ग हा थेट कोणाशी संवाद साधणारा होता?

अ. देवाशी ब. पत्नीशी क. दानवाशी ड. यापैकी नाही

६. 'तुका झालासे कळस' हे वर्णन कोणी केले आहे.

अ. जनाबाई ब. बहणाबाई क. मुक्ताबाई ड. वेणाबाई

७. संत तुकाराम आपल्या काव्यनिर्मितीचे श्रेय कोणाला देतात?

अ. ज्ञानेश्वर ब. नामदेव क. एकनाथ ड. विठ्ठल

८. भालचंद्र नेमाडे यांनी संपादित केलेल्या 'तुकाराम गाथा निवडक अभंग' या ग्रंथामध्ये तुकारामांच्या किती अभंगांचा समावेश केलेला आहे?

अ. ५०० ब. ६०० क. ४०० ड. ३००

९. संत तुकारामांच्या गुरूचे नाव काय होते.

अ. चैतन्य स्वामी ब. बोल्होबा क. सावजी ड. नामदेव

१०. संत तुकारामांना किती वर्षाचे आयुष्य लाभले होते?

अ. ४० ब. ४२ क. ४४ ड. ४६

**उत्तरे** १. ब. अभंग २. अ. देहू ३. क. कनकाई ४. अ. भंडारा

५. अ. देवाशी		६. ब. बहिणाबाई	७. ड. विठ्ठल	८. अ. ५००

९. अ. चैतन्य स्वामी	१०. ब. ४२

**१.५.२ दीघोत्तरी प्रश्न**

१. लोकशिक्षक म्हणून संत तुकारामांच्या अभंगाचे महत्त्व सांगा.

२. भक्ती ही संत तुकारामांच्या अभंगाची मूळ आधारशील आहे. या विधानाची चर्चा करा.

३. संत तुकारामांचे जीवनचरित्र आणि त्यांच्या अभंगांतील विरक्तीभाव यांच्यातील अनुबंध उलगडून दाखवा.

४. संत तुकारामांच्या अभंगाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

**१.५.३ लघुत्तरी प्रश्न**

१. संत तुकारामांच्या अभंगाची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.

२. संत तुकारामांच्या अभंगातील प्रभावशीलता अधोरेखित करा.

३. वारकरी सांप्रदायातील एक संत म्हणून संत तुकारामांचे महत्त्व विशद करा.

## १.६ अधिक वाचन :


१. नेमाडे, भालचंद्र (संपा.), तुकाराम गाथा (निवडक अभंग), साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, द्वितीय आवृत्ती २००६.

२. मोरे, सदानंद, तुकाराम दर्शन, सकाळ प्रकाशन, पुणे, २०१४.

३. साळुंखे, आ.ह., विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन सातारा, तृतीय आवृत्ती २०१४.

४. नेमाडे, भालचंद्र, तुकाराम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, नववी आवृत्ती २०१८.

५. सरदार, गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोक वाङ्मयगृह, मुंबई.

६. जाधव, मारुती, भाऊसाहेब, तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण भाग एक आणि दोन, संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१९.


**१.७ उपक्रम**

संत तुकारामांच्या अभंगांचे वाचन करा.

❑❑❑

# घटक २
# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे लिखित 'प्रवासवर्णन'

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासातून :

- प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचा थोडक्यात परिचय होईल.
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तित्त्व आणि कार्याचा परिचय होईल.
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनाबद्दल अधिक जाणून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर ध्येयवादीवृत्तीने आणि कर्तव्यबुद्धीने केलेले सामाजिक कार्य अनेक दृष्टींनी व्यापक आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर - देशभर त्यांनी अत्यंत कष्टाने आपल्या कार्याचा विस्तार केलेला होता. सूक्ष्म अभ्यास, तरल व कुशाग्रबुद्धी, जिज्ञासूवृत्ती, चिकित्सक संशोधनदृष्टी, समाजाविषयीची अपार तळमळ, शांत व धीरगंभीर स्वभाव इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक महत्त्वाचे पैलू सांगता येतील. याशिवाय त्यांचा आणखी एक महत्त्वाचा व्यक्तीविशेष सांगणे आवश्यक आहे, तो म्हणजे ते एक प्रतिभाशाली लेखकही होते. इतक्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनातही त्यांनी वेळात वेळ काढून भरीव व विचारदर्शी लेखन केले. आजच्या काळातही त्यांचे लेखन व विचार सुसंगत, मार्गदर्शक ठरतात. कारण काळाच्या पुढचे पाहण्याची एक चिरंतनदृष्टी त्यांच्या ठायी उपजत होती. महर्षी शिंदे आजीवन समाजासाठीच जगले. त्यांनी लिहिलेल्या वैविध्यपूर्ण वाङ्मयाच्या वाचनातून त्यांच्या ह्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या अनन्यसाधारण कार्याची ओळख आपल्याला होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी वैचारिक, आत्मपर, संशोधनपर, ललित आणि माहितीपर असे मोजकेच परंतु कसदार लेखन केले. त्यांनी आत्मपर स्वरूपाचे जे काही लेखन केले, त्यात प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकारातही लेखन केलेले आहे. वास्तविक मराठीमध्ये आजवर जी काही प्रवासवर्णनपर पुस्तके लिहिली गेली किंवा प्रकाशित झाली, त्यांची नावेही निरनिराळी व लक्षवेधक म्हणजेच 'माझा प्रवास', 'केल्याने देशाटन', 'साता समुद्रापलीकडे', 'माडगूळ ते मलबोर्न' इत्यादी इत्यादी आहेत. मात्र महर्षी शिंदे यांच्या या पुस्तकाला वेगळे असे निराळे शीर्षक दिलेले नसून 'प्रवासवर्णन' याच नावाने ते प्रकाशित झालेले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'प्रवासवर्णन' या पुस्तकाविषयी सविस्तर जाणून घेण्यापूर्वी 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराविषयी अर्थातच 'प्रवासवर्णन' म्हणजे काय आणि मराठीतील 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराची वाटचाल नेमकी कशी झाली, हे थोडक्यात जाणून घेणे अत्यंत उपयुक्त ठरेल.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ प्रवासवर्णन : प्रेरणा, स्वरूप व वाटचाल :

#### २.२.१.१ प्रवासवर्णन : व्याख्या :

प्रवास + वर्णन असे दोन शब्द एकत्रित केलेले आहेत. यावरून असे म्हणता येईल की, ''केलेल्या प्रवासाचे साद्यंत, ओतप्रोत, माहितीपूर्ण वर्णन म्हणजेच प्रवासवर्णन होय.''

डॉ. वसंत सावंत यांनी प्रवासवर्णनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, ''प्रवासवर्णन म्हणजे प्रवासात पाहिलेल्या किंवा घडलेल्या गोष्टींचा वृत्तान्त.''

य. रा. दाते यांनी संपादित केलेल्या 'महाराष्ट्र शब्दकोशा'मध्ये 'प्रवास' या शब्दाचा अर्थ, 'स्वदेश सोडून अन्यत्र जाणे, देशाटन, परदेश संचार' किंवा 'परदेशात केलेला तात्पुरता वास, परदेशात प्रवास करताना राहणे' असा दिलेला आहे.

यावरून आपला प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात जाणे, भटकंती करणे, फिरणे म्हणजे प्रवास करणे आणि त्या प्रवासात आलेल्या अनुभवांचे, पाहिलेल्या प्रसंगांचे, स्थळांचे, वास्तूंचे लिखित स्वरूपात वर्णन करणे यालाच मराठीमध्ये 'प्रवासवर्णन' असे म्हणतात. हिंदीमध्ये याला 'यात्रा साहित्य' म्हटले जाते, तर इंग्रजीमध्ये 'Travel Literature' किंवा 'Travelogue' असे म्हटले जाते.

#### २.२.१.२ प्रवासवर्णन : प्रेरणा :

'सांगणे' किंवा 'कथन' करणे ही मानवाची स्वाभाविक वृत्ती आहे. आपल्या मनातले गूज दुसऱ्याला सांगणे, ही अतिशय स्वाभाविक भावना आहे. या स्वाभाविक सांगण्यातूनच पुढे 'गोष्ट/कथा किंवा ललितगद्य' जन्माले आले. आई-आजी मुला-नातवांना 'गोष्ट' सांगू लागली. फावल्या वेळेमध्ये माणसं एकमेकांना एकमेकांचे अनुभव सांगत. या 'सांगण्यातून'च साहित्याचा, वाङ्मयाचा जन्म झाला. एखादा प्रवास करून झाल्यावर आपण नवीन काय पाहिले, काय काय अनुभवले हे इतरांना सांगण्याच्या उर्मीतून 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराचा जन्म झाला.

वास्तविक प्रवास करणे ही माणसाची फार जुनी उपजत व मूलभूत प्रेरणा राहिलेली आहे. अनादी काळापासून वेगवेगळ्या निमित्ताने माणूस प्रवास करत आलेला आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी, एका गावाहून दुसऱ्या गावी जाणे याला साधारणपणे आपण प्रवास असे म्हणतो. पूर्वीच्या काळी राजेरजवाडे स्वारी करण्याच्या उद्देशाने नव्या प्रदेशावर, तिथल्या राज्यांवर चढाई करत. एकमेकांच्या प्रदेशावर चढाई करून तो प्रदेश जिंकत. यामध्ये लढाईच्या किंवा राज्य जिंकण्याच्या निमित्ताने सगळ्या सैन्यासह एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाणे किंवा स्थलांतर करणे, यातून प्रवास घडू लागला. काही लोक शिक्षणासाठी, ज्ञानार्जनासाठी किंवा व्यापारउदिम करण्याच्या हेतूने एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात, एका देशातून दुसऱ्या

देशात जात. काही लोक धार्मिक वा आध्यात्मिक हेतूने देवदेवांच्या यात्रा-धाम, तीर्थाटन करत दूरदूरच्या धर्मस्थळांना, तीर्थक्षेत्रांना, मंदिरांना भेटी देत असत. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने प्रवास घडे.

प्रवास करण्याच्या उर्मीतून माणूस एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाऊ लागला. तिथला प्रदेश, तिथली माणसे, तिथला निसर्ग, तिथली संस्कृती, तिथले लोकजीवन, भाषा, रीतिभाती, न्याहाळू लागला. त्याचा अनुभव घेऊ लागला. त्याला आपला प्रदेश आणि नवीन प्रदेश यामध्ये कमालीचे वेगळेपण दिसू लागले. नव्या प्रदेशाच्या पाहणीतून त्याच्या मनात नवीन विचार खुणावू लागले. तिथल्या नवलाईने हरखून जाऊ लागला. आपण हा नवीन अनुभव घेतो आहोत खरा, पण हा अनुभव आपल्या प्रदेशात जाऊन आपल्या लोकांना कधी सांगू आणि कधी नाही, असे त्याला वाटू लागले. यातूनच आपले अनुभव त्याला लिखित पद्धतीने नोंदवून ठेवावेत असे वाटू लागले. अशाप्रकारे प्रवासातील आपले अनुभव, विचार, निरीक्षणे लिहिण्यातून 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराचा जन्म झाला.

पूर्वीच्या काळी वाहनांचा शोध लागलेला नव्हता तेव्हा माणूस मजल दरमजल करत पायी प्रवास करत असे. दिवसभर काही मैल चालले की रात्री एखाद्या गावात, धर्मशाळेत मुक्काम करत आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा चालायला सुरुवात करत. अशाप्रकारे टप्प्या टप्प्याने माणूस इच्छित स्थळी पोहोचत असे. पायी चालत प्रवास करण्यात खूप दिवस जात. कष्टही खूपच पडत. त्या काळी माणसाने महिना महिना, वर्ष वर्ष पायी प्रवास केल्याची अनेक उदाहरणे, वर्णने आपल्या जुन्या भारतीय ग्रंथांमध्ये वाचावयास मिळतात. पुढे घोडा, हत्ती, गाढव, खेचर, बैल, उंट आदी पाळीव प्राण्यांच्या मदतीने माणूस प्रवास करू लागला. यातूनच बदलत्या काळानुरूप बैलगाडी, घोडागाडी, टांगा, छकडा वगैरे वाहनांची निर्मिती माणसाने केली. पायी चालण्यापेक्षा पाळीवप्राण्यांच्या मदतीने आणि बैलगाडी, घोडागाडी आदी सुविधांमुळे प्रवास काहीसा सुखकर झाला. यात वेळही वाचू लागला, शिवाय शारीरिक कष्टही कमी झाले.

पुढे विज्ञानामध्ये जसजसे नवनवीन शोध लागू लागले, तसतशा नवनवीन वाहनांची निर्मिती होऊ लागली. कालौघात शोध लागत गेले तसे, जहाज, सायकल, दुचाकी, चारचाकी, बस, रेल्वे, विमान अशाप्रकारे वाहनांचे विविध प्रकार आले. आज विमानसेवेमुळे जगभरचा प्रवास अवघ्या काही तासांवर आला. एखाद्या ठिकाणी जायला एकेकाळी सहा महिने, वर्ष लागत, तिथे आज काही तासांत माणूस पोहचू शकतो. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले. प्रवासाच्या ह्या बदलत्या स्वरूपामुळे माणसाचा दृष्टिकोनही बदलत गेला. आज देशोदेशी पुष्कळ टुरिझम कंपन्या स्थापन झाल्या आहेत. लाखो लोक दररोज विविध पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. जगभर कुठूनही कुठे प्रवास करणे सोईस्कर झाले आहे. याचा एक फायदा म्हणजे विविध ठिकाणच्या प्रवासांची वर्णने बहुसंख्य पुस्तकरूपाने येत आहेत.

काकासाहेब कालेलकर यांनी आपल्या 'हिमालयातील प्रवास' या पुस्तकात म्हटले आहे की, ''जो बसून राहतो त्याचे नशिबही बसून राहते, जो चालू लागतो त्याचेच नशिब चालते.'' याचा अर्थ सतत कामात असणाऱ्याला किंवा सतत काही ना काहीतरी करणाऱ्याला मरण नाही. जो फिरतो, प्रवास करतो, तो जग बघितल्याच्या समाधानाने निवृत्त होतो. प्रवास ही मानवाची, मानवीजीवनाची मूलभूत प्रेरणा आहे. महात्मा

गांधी यांनी जेव्हा देशाच्या राजकारणात प्रवेश केला तेव्हा त्यांनी संपूर्ण भारत भ्रमण केले. पुढारी म्हणून देशाचे राजकारण करावयाचे तर आपला देश आपल्याला व्यवस्थित माहीत असायला हवा, या विचारांनी गांधी प्रेरित झाले. सबंध देशभर खेडोपाडी फिरून गांधींनी भारत जवळून पाहिला, अनुभवला आणि मगच देशाच्या राजकारणात ते सक्रिय झाले. या भारतभ्रमणात त्यांना देशातील विविध राज्ये, तेथील लोकजीवन, इतिहास, भाषा, संस्कृती, प्रश्न, समस्या अशा कितीतरी गोष्टी लक्षात आल्या. त्यानुसार पुढे त्यांनी देशाला मूलभूत दिशा दिली. गांधीजींचा हा देशप्रवास पाहता, प्रवासाचे महत्त्व लक्षात येते.

सतत काही तरी नवे जाणून घेणे ही मानवी सहजप्रेरणा आहे. 'काश्मीर पाहायचे माझे स्वप्न आहे', 'मला अमेरिका पाहायची आहे', 'आयुष्यात एकदा तरी जपानला मी जाणार म्हणजे जाणार' इत्यादी अशाप्रकारे अनेकांची काही स्वप्ने असतात, काही प्रेरणा असतात. त्यानुसार माणसे विविध प्रदेशात, देशांमध्ये भटकंती करून येतात. पर्यटनाला जातात. कधी व्यवसायानिमित्त, कामानिमित्त माणसाचा प्रवास होतो. यामागे कामाव्यतिरिक्त नवे काही तरी जाणून घेणे, नवे काही तरी पाहणे ही जिज्ञासा असते. या जिज्ञासेतून प्रवास होतो. नवे काही पाहिल्यावर ते नोंदवण्याची इच्छा होते. प्रवासवर्णनाच्या मागे अशाच काही व्यक्त-अव्यक्त प्रेरणा दडलेल्या असतात.

**२.२.१.३ प्रवासवर्णन स्वरूप :**

'प्रवासवर्णन' हा एक वास्तवदर्शी, सशक्त आणि तितकाच लालित्यपूर्ण असा वाङ्मयप्रकार आहे. असे असले तरी वास्तविक या वाङ्मयप्रकाराची सैद्धान्तिक वा तात्त्विकदृष्टीने स्वतंत्र सकस अशी मांडणी करणारे साहित्य फारसे उपलब्ध नाही. याला अपवाद म्हणजे कवी-लेखक डॉ. वसंत सावंत यांनी १९८७ साली लिहिलेल्या 'प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार' या ग्रंथाचा आहे. सदर ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केला आहे. प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराची तात्त्विक आणि वाङ्मयीन मांडणी करणारा हा मराठीतील पहिला स्वतंत्र ग्रंथ म्हणता येईल.

याशिवाय वेळोवेळी प्रवासवर्णनपर पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना, मनोगते किंवा त्या अनुषंगाने झालेले लेखन वगळता एक वाङ्मयप्रकार म्हणून स्वतंत्रपणे चिकित्सा करणारे, मांडणी करणारे लेखन अतिशय तुरळक प्रमाणात दिसते. रा. दा. जोशी, अ. ना. देशपांडे, वि. सी. सरवटे या लेखकांनी प्रवासवर्णनांचा आढावा घेतल्याची नोंद वसंत सावंत यांनी त्यांच्या ग्रंथात केलेली आहे. याशिवाय डॉ. स. गं. मालशे, प्रा. रा. भि. जोशी, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. गंगाधर गाडगीळ, आदी समीक्षकांनी प्रस्तावनांच्या किंवा समीक्षणांच्या रूपाने वेळप्रसंगी प्रवासवर्णनावर लिहिलेले आहे. त्यांनी प्रवासवर्णनांची वाङ्मयीनदृष्ट्या चर्चा केलेली दिसते.

कोणताही प्रवास करावयाचा तर प्रवासी हवाच. प्रवाशाशिवाय प्रवास नाही. म्हणजेच जी व्यक्ती प्रवास करणार आहे तिला प्रवासी म्हणतात. प्रवास करताना या प्रवासी व्यक्तीला विविध अनुभवांना सामोरे जावे लागते. त्यात वाहनांचा (बसगाडी, रिक्षा, कार, विमान, जहाज वगैरे) अनुभव, प्रवासात शेजारी बसलेल्या किंवा इच्छितस्थळी भेटलेल्या अनोळखी व्यक्तींचा अनुभव, गाडीतून दिसणारा आजूबाजूचा प्रदेश,

वातावरण, गाडीतील निरनिराळे प्रवासी, प्रवासात लागणारी छोटीमोठी गावे, विविध ठिकाणे, ज्या स्थळांना भेट द्यावयाची आहे ती स्थळे, गावे, प्रदेश इत्यादी विविध अनुभवांना प्रवाशाला सामोरे जावे लागते. यात कधी गमतीजमती घडतात, तर कधी अप्रिय प्रसंगांनानाही तोंड द्यावे लागते. हा सगळा प्रवास 'प्रवासी'चा म्हणजेच 'मी'चा असतो. प्रवासवर्णनामध्ये लेखक स्वत: वावरत, बोलत असतो. हा लेखक अर्थातच 'मी' असतो. हा 'मी' आपले प्रवासातील अनुभव, वृत्तान्त मांडत असतो. कादंबरीमध्ये किंवा कथेमध्ये जशी प्रथमपुरुषी, द्वितीयपुरुषी, तृतीयपुरुषी निवेदनपद्धती असते. प्रवासवर्णनात प्रथमपुरुषी अर्थातच 'मी' ही निवेदनपद्धती असते. हा 'मी' स्वत:ला आलेल्या अनुभवांना, अनुभूतीला व्यक्त करत असतो. प्रवासवर्णनात काय किंवा इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारात काय, अनुभूतीला महत्त्व असते. ही अनुभूती किंवा अनुभव जितका समृद्ध तितकी साहित्यकृती कसदार होते. प्रवासवर्णनात हा 'मी' जितका अनुभवसमृद्ध असेल, तितके संबंधित प्रवासवर्णन हे कसदार होते. या 'मी'ची आपल्या आजूबाजूला पाहण्याची, न्याहाळण्याची 'नजर' जितकी अचूक, सूक्ष्म, आकलनक्षम असेल तितके त्याचे अनुभव निराळे आणि समृद्ध होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून प्रवासवर्णनात निरीक्षणाला खूप महत्त्व प्राप्त होते. प्रवास करताना या 'मी'कडे तरल निरीक्षणशक्ती असणे आवश्यक असते. 'जशी दृष्टी, तशी सृष्टी' ही म्हण प्रवासवर्णनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. निरीक्षणदृष्टी जशी असेल, तसेच प्रवाशाला दिसेल, हा त्यातला कळीचा मुद्दा आहे. ह्या 'मी'कडे कलात्मकदृष्टी असेल तर त्या प्रवासवर्णनाला एक निराळीच वाङ्मयीन उंची प्राप्त होते.

प्रवासवर्णनात हा 'मी' संयतपणे व्यक्त होत असेल तर ते प्रवासवर्णन निश्चितच चांगल्यापद्धतीने उभे राहते. जर हा 'मी' प्रमाणापेक्षा अधिकच व्यक्त झाला तर ते आत्मस्तुतीकडे-आत्मकथनाकडे झुकण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे या 'मी'ने संयतपणे व्यक्त होणे, तटस्थपणे निरीक्षणे नोंदवणे अधिक गरजेचे असते. हा 'मी' अभ्यासू, बहुश्रुत, चतुरस्र, संशोधक, काव्यात्म व्यक्तिमत्त्वाचा असेल तर ते प्रवासवर्णन वाङ्मयीनदृष्ट्या चांगल्या उंचीवर जाते. कारण त्याच्या या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब कळत नकळतपणे प्रवासवर्णनात उमटते. त्यामुळे प्रवासवर्णन अधिक रंजक, कलात्मक, वाङ्मयीनदृष्ट्या वाचकाला चांगली अनुभूती देणारे ठरू शकते. अभ्यासक डॉ. वसंत सावंत यांनी प्रवासवर्णनाचे तीन महत्त्वाचे 'प्र' घटक सांगितले आहेत. ते म्हणजे 'प्रवासी,' 'प्रवास' आणि 'प्रदेश' होय. प्रवासवर्णनाचा संपूर्ण डोलाराच या तीन घटकांवर उभा असतो. या तीन घटकांमुळेच प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो, हे लक्षात घ्यावयास हवे.

**२.२.१.४ प्रवासवर्णन वाटचाल :**

मराठीमध्ये प्रवासवर्णन या प्रकारात पुष्कळ लेखकांनी आपापल्या परीने भरीव लेखन केलेले आढळते. प्राचीन भारतीय वाङ्मयावर किंवा इतिहासावर एक दृष्टिक्षेप टाकला असता काही प्रवाशांबद्दल आणि प्रवासवर्णनांबद्दल माहिती मिळते. मेगॅस्थनीज, अल बेरुनी, फा-हिएन आणि ह्यु-एन-त्सांग (युआन श्वांग) या चार प्रवाशांनी भारताला भेटी दिल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत. मेगॅस्थनीज २४०० वर्षांपूर्वी भारतात आला होता. त्याचा वृत्तान्त त्याने 'इंडिका' या पुस्तकात लिहिलेला आहे. मेगॅस्थनीजच्या नंतर साधारण ७०० वर्षांनी चीन येथील बौद्ध भिक्षू फा-हिएन हा भारतात आला होता. तब्बल सहा वर्षे त्याने भारतभर

पायी प्रवास केला. 'बौद्ध राज्यांचा वृत्तान्त' या ग्रंथामध्ये फा-हिएन याने या भारत भेटीबद्दल व प्रवासाबद्दल बरेच काही लिहून ठेवले आहे. यानंतर दोनशे वर्षांनी चीनमधील दुसरा प्रवासी आणि बौद्ध भिक्षू ह्यु-एन-त्सांग (युआन श्वांग) भारतात येऊन गेला. चीन-भारत प्रवासाबद्दल त्याने 'प्रवासी', 'पश्चिमी देशांविषयीचे लेख' आदी ग्रंथांमधून भारतातील प्रवासाबद्दल लिहिले आहे. यानंतर भारतात येऊन गेलेला चौथा प्रवासी म्हणजे अल बेरुनी हा मुस्लीम प्रवासी होय. अल बेरुनी हा एक विद्वान गृहस्थ होता. अरबी भाषेत त्याने पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. त्या ग्रंथांमधून त्याने तत्कालीन भारतातील प्रवासाविषयी लिहिले आहे. वरील चारही प्रवाशांनी भारताला भेटी दिल्या, भारत देश जवळून पाहिला आणि भारताबद्दल त्यांना काय वाटले, इथली संस्कृती, लोकजीवन, भाषा आदींबद्दल त्यांना जे काही आकळले ते लिहिले. या व्यतिरिक्त देशोदेशीचे व्यापारी, खलाशी व्यापार-व्यवसाय करण्याच्या निमित्ताने विविध देशांना, राज्यांना, गावांना भेटी देत फिरत असत. त्यातल्या काहींनी आपापल्या प्रवासांचे वृत्तान्त लिहून ठेवले. अशाप्रकारचे लेखन इंग्रजीमध्ये पुष्कळ प्रकाशित झाले आहे.

भारतात किंवा महाराष्ट्रात जुन्या काळी काही शास्त्री-पंडित शास्त्रांतील विविध विषयांवर वाद-विवाद किंवा चर्चा करत गावोगाव हिंडत असत. सिद्धार्थ गौतम बुद्ध हे अनुयायांनी आयोजित केलेल्या सभांना संबोधित करण्यासाठी विविध गाव-नगरांना भेटी देत असत, याचे दाखले बौद्ध वाङ्मयात पुष्कळ सापडतात. संत वाङ्मयातही प्रवासाबद्दलचे, प्रवासातील अनुभवांबद्दलचे काही उल्लेख सापडतात. महानुभाव वाङ्मयातील 'लीळाचरित्र', 'ऋद्धिपूरवर्णन', संत नामदेवांचे 'तीर्थावळीचे अभंग' आदींमध्ये प्रवासवर्णनाची काही बीजे सापडतात. वास्तविक परदेशगमन करणे किंवा समुद्रप्रवास करणे म्हणजे धर्म बुडणे किंवा पाप करणे वगैरे समजुती तत्कालीन भारतीय समाजात प्रचलीत असल्यामुळे भारतीयांनी परदेश प्रवास केल्याची उदाहरणे जवळजवळ आढळत नाहीत.

आधुनिक कालखंडात म्हणजे एकोणिसाव्या शतकापासून काही मंडळींनी प्रवास केल्याच्या नोंदी आढळतात. त्यात पंडिता रमाबाईंनी 'युनाईटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व प्रवासवृत्त' (१८८९) हे प्रवासाबद्दलचे लिहिलेले पुस्तक; पां. दा. गुणे यांनी लिहिलेले 'माझा युरोपचा प्रवास' अशी काही उदाहरणे सांगता येतात. बाबा पद्मनजी, दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांमध्येही प्रवासवर्णनाची काही एक झलक पाहावयास मिळते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात गोडसे भटजी यांनी रायगड जिल्ह्यातील त्यांच्या वरसई या गावापासून ते ग्वाल्हेर-मथुरा असा प्रवास केला होता. या प्रवासादरम्यान ते १८५७ च्या बंडात अडकले. पुढे त्यांनी ''माझा प्रवास' अथवा 'सन १८५७ च्या बंडाची हकिकत'' (१९०७) या नावाचे पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी संपूर्ण प्रवासाची साद्यंत नोंद केलेली आहे. 'माझा प्रवास' या पुस्तकाला १८५७ च्या बंडाची पार्श्वभूमी असल्याने ऐतिहासिकदृष्ट्या मराठीतील एक महत्त्वाचे प्रवासवर्णनपर पुस्तक आहे. प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने, मराठी साहित्य आणि समाज यांच्या दृष्टीने गोडसे भटजींच्या या प्रवासवर्णनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

पुढील काळात अनेक लेखकमंडळींनी प्रवासवर्णने लिहिलेली दिसतात. गोविंद चिमणाजी भाटे ('माझा अटकेपार प्रवास', 'माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास') अनंत काणेकर ('धुक्यातून लाल ताऱ्याकडे,' 'आमची

माती आमचे आकाश,' 'निळे डोंगर तांबडी माती'), काकासाहेब कालेलकर ('हिमालयातील प्रवास'), गोविंद हरी फडके ('माझी तीर्थयात्रा'), पु. ल. देशपांडे ('अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा'), गंगाधर गाडगीळ ('गोपुरांच्या प्रदेशात,' 'चीन एक अपूर्व अनुभव,' 'साता समुद्रापलीकडे,' 'हिममय अलास्का'), अत्रे ('केल्याने देशाटन', 'भ्रमंती', 'साहित्ययात्रा'), रा. भि. जोशी ('वाटचाल', 'उथव,' 'स्वर्गनगरी'), प्रभाकर पाध्ये ('तोकोनामा,' 'नवे जग, नवी क्षितिजे,' 'युगोस्लाविया'), मधुकर केचे ('एक भटकंती'), काकासाहेब गाडगीळ ('पाव आणि मिसळ'), व्यंकटेश माडगूळकर ('माडगूळ ते मेलबर्न'), अनिल अवचट ('अमेरिका'), आनंद पाटील ('पाटलाची लंडनवारी'), इत्यादी अनेक मान्यवर लेखकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. अलीकडच्या काळात मीना प्रभू यांनी युरोप, अमेरिका, इटली, ग्रीक, मेक्सिको आदीं विविध देशांतील केलेल्या प्रवासावर आधारित प्रवासवर्णनपर 'इजिप्तायन', 'ग्रीकांजली,' 'चिनी माती,' 'दक्षिणरंग,' 'मेक्सिकोपर्व,' 'तुर्कनामा' इत्यादी अनेक पुस्तके लिहून मराठी प्रवासवर्णनाचे दालन आपल्यापरीने समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अगदी अलीकडेच प्रकाशित झालेले 'तीन मुलांचे चार दिवस' हे प्रवासवर्णन उत्कंठापूर्ण आहे. आदर्श पाटील, विकास वाळके व श्रीकृष्ण शेवाळे या तीन तरुणांनी गडचिरोली, बिजापूर, चिंतलनार, बासागूड, दंतेवाड आदी नक्षलग्रस्त आदिवासी भागातून सायकलीने प्रवास केला होता. दरम्यान त्यांना नक्षलवादी लोकांनी पकडले आणि चार दिवस नजरकैदेत ठेवले. त्यांच्या या थरारक अनुभवांविषयी त्यांनी 'तीन मुलांचे चार दिवस' या पुस्तकात लिहिले आहे.

मराठीमध्ये गेल्या पन्नास-साठ वर्षांत अनेक लेखकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. जसजसे पर्यटनक्षेत्रांचा विकास होत आहे, नवनवीन सुविधा उपलब्ध होत आहेत, तसतसे प्रवास करणारांची आणि त्यासंदर्भात आपापल्यापरीने लिहिणाऱ्या लेखकांची संख्याही लक्षणीयरीत्या वाढत आहे.

### २.३ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा अल्प परिचय :

महाराष्ट्र ही समाजसुधारकांची आणि विचारकांची भूमी आहे. आधुनिक काळात महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, गंगारामभाऊ म्हस्के, राजर्षी शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर, बाबासाहेब आंबेडकर, गाडगेमहाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी इत्यादी विचाराने जाज्वल्य व कर्तृत्ववान अशा अनेकोत्तम महनीयांची समृद्ध परंपरा सांगता येईल. याच प्रभावळीतील एक कर्तृत्ववान आणि विद्वान व्यक्तिमत्त्व म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४) होय. विठ्ठल रामजी शिंदे यांना महर्षी आणि कर्मवीर या दोन्ही उपाधींनी गौरवले जाते. महर्षी शिंदे हे एक थोर द्रष्टे समाजसुधारक तर होतेच, त्याशिवाय ते एक महत्त्वाचे भाषातज्ज्ञ-प्राच्यविद्या-धर्म आणि संस्कृतीचे अभ्यासक-संशोधक, विचारवंत आणि लेखकही होते.

महर्षी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जमखिंडी (जि. विजापूर, कर्नाटक) या खेडेवजा गावात झाला. आर्थिकदृष्ट्या कौटुंबिक परिस्थिती गरिबीची, बेताचीच होती. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांचे सुरुवातीचे शिक्षण जमखिंडी येथे झाले. सर्व जातीधर्माच्या मुलांमध्ये त्यांचे बालपण गेले. त्यामुळे जातिधर्मनिरपेक्षतेचा एक अमिट संस्कार बालपणापासूनच त्यांच्या मनावर

रुजला. १८९१ साली ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. महर्षी शिंदे यांना शिक्षणाची ओढ प्रचंड होती, त्यामुळे गरिबीच्या स्थितीतही धडपड करून ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात १८९३ साली दाखल झाले. पुण्यातील वास्तव्याच्या या काळात त्यांचा प्रार्थना समाजाशी सबंध आला. प्रार्थना समाजाची तत्त्वे-धोरणे आणि विचार त्यांना पटले आणि त्यातूनच त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. पुण्यात शिकत असताना महर्षी शिंदे हे महादेव गोविंद रानडे, रा. गो. भांडारकर आदी विद्वतजणांच्याही संपर्कात आले. दरम्यान हलाखीच्या आर्थिक स्थितीला तोंड देत असताना त्यांनी शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नाला यश येऊन त्या काळातील प्रतिष्ठित वकील आणि डेक्कन मराठा एज्युकेशन संस्थेचे संस्थापक गंगारामभाऊ म्हस्के आणि बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिंदे यांना शिष्यवृत्ती दिली. पुढे त्यांना ब्राह्मो समाजाच्या वतीने तुलनात्मक धर्मशिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. १९०१ साली ते ऑक्सफर्डच्या मँचेस्टर महाविद्यालयात दाखल झाले. इंग्लंडमधील या धर्मशिक्षणाच्या अभ्यासासाठी ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनने त्यांना शिष्यवृत्ती दिली होती.

महर्षी शिंदे यांनी जसे वैचारिक, संशोधनपर स्वरूपाचे लेखन केले, तसेच ललित-आत्मपर स्वरूपाचेही लेखन केले. त्यांचे 'माझ्या आठवणी आणि अनुभव', 'प्रवासवर्णन' आणि 'रोजनिशी' आदी लेखन हे आत्मपर स्वरूपाचे आहे. तर 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', 'शिंदे लेखसंग्रह', 'धर्म, जीवन व तत्त्वज्ञान', आदी लेखन हे बहुश: वैचारिक-संशोधन-तत्त्वज्ञानपर या स्वरूपाचे आहे. महर्षी शिंदे यांची ही ग्रंथसंपदा विविध दृष्टिकोनातून पाहता मूलगामी अशीच आहे. तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, इतिहास, धर्म आदी विषयांमध्ये महर्षी शिंदे यांचा विशेष अभ्यास आणि व्यासंग होता.

अस्पृश्यता हा मानवी समाजाला लागलेला कलंक असून, या अस्पृश्येतेचे उच्चाटन केल्याशिवाय मानवीसमाजाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही, तसेच ज्या समाजात विषमता आहे, तिथे सामाजिक समताही रुजू शकणार नाही, याची महर्षी शिंदे यांना खात्री पटलेली होती. म्हणूनच त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ साली मुंबईमध्ये 'डिप्रेस्ड् क्लासेस मिशन' अर्थात 'भारतीय निराश्रीत साह्यकारी मंडळी' ही संस्था स्थापन करून अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला रचनात्मक कार्याचे स्वरूप प्राप्त करून दिले. पुढे या संस्थेची एक शाखा पुण्यामध्ये अहिल्याश्रम येथे स्थापना केली. डी. सी. मिशनच्या उभारणीसाठी महर्षींनी अविरत कष्ट घेतले. लोकांकडे जाऊन देणग्या मिळवल्या, संस्थेच्या विचारप्रसारासाठी जीवाची पर्वा न करता ध्येयवादीवृत्तीने ते रात्रंदिवस राबले.

आधुनिक काळात एकोणिसाव्या शतकात महर्षी शिंदे यांच्या आधी महात्मा जोतीराव फुले यांनी अस्पृश्येतेच्या प्रश्नाला वाचा फोडली होती. पुढे म. फुले यांच्यानंतर महर्षी शिंदे यांनी अस्पृश्येतेच्या उच्चाटनासाठी स्वत:चे सबंध आयुष्य पणाला लावले. एका अर्थाने महात्मा फुले यांनी जो जातिभेदविरहित समताभावी कार्याचा पाया घालून दिला होता, त्याचा विस्तार महर्षी शिंदे यांनी केला, असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भातील महर्षी शिंदे यांचे कार्य सबंध भारतीय पातळीवरील अतिव मोलाचे आणि भरीव स्वरूपाचे आहे. 'डिप्रेस्ड् क्लासेस मिशन' संस्थेच्या शाखा भारतभर स्थापन करून त्यांनी अस्पृश्यतेचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेऊन देशाचे व देशातील समाजधुरिणांचे

लक्ष या प्रश्नाकडे वेधून घ्यायला भाग पाडले. तसेच प्रस्थापित समाजाला यासंबंधी काही एक विचार करण्यास भाग पाडले. महर्षी शिंदे यांच्या सातत्यपूर्वक प्रयत्नांमुळेच १९१७ साली कलकत्ता येथे झालेल्या राष्ट्रीय सभेमध्ये अस्पृश्यता निवारणाचा ठराव संमत झाला. डॉ. ॲनी बेझंट ह्या सभेच्या अध्यक्ष होत्या. यासाठी महर्षी शिंदे यांनी अविरतपणे कष्ट करत देशभ्रमण केले होते. अनेक ठिकाणी अस्पृश्यता निवारक परिषदा भरवल्या. प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन या प्रश्नावर प्रबोधन केले. ''तत्कालीन महाराष्ट्रात ज्या ज्या समाज सुधारणेच्या चळवळी झाल्या, त्यात महर्षी शिंद्यांचे प्रामुख्याने अंग होते. परंतु त्यांच्या आयुष्यातील अत्यंत मौलिक कार्य म्हणजे अस्पृश्यांची त्यांनी केलेली महान सेवा. आपले सर्व जीवन त्यांनी या कार्यासाठी वेचले. जातिनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे कार्य सतत केले. तत्कालीन सरकारचीही या कार्यात त्यांनी सहानुभूती मिळवली. एवढेच नव्हे तर सतत प्रयत्न करून राष्ट्रीय सभेलाही हे कार्य हाती घेण्यास त्यांनी प्रवृत्त केले. या कार्याचा पुढे महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली प्रचंड वृक्ष फोफावला.'' अशा शब्दांत महर्षींच्या कार्याबद्दल महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि देशाचे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांनी उद्गार काढले होते.

महर्षी शिंदे हे केवळ बोलके वा लिहिते सुधारक नव्हते, तर ते कर्ते सुधारक होते. विचारांना कृतीची जोड देणे किंवा लिहिणे-बोलणे-वागणे यामध्ये फार अंतर असता कामा नये, याला त्यांनी कायम महत्त्व दिले. म्हणूनच ''त्यांची वैचारिक भूमिका अथवा जीवनदृष्टी, त्यांनी केलेले कार्य आणि त्यांची साहित्यनिर्मिती यामध्ये कमालीची एकरूपता आहे,'' असा निर्वाळा महर्षी शिंदे यांच्या जीवन आणि वाङ्मयाचे अभ्यासक गो. मा. पवार यांनी दिला आहे. सामाजिक सुधारणा करावयाच्या तर आपण स्वत: लोकांमध्ये जाऊन, त्यांच्यात राहून, त्यांच्या सुखदु:खाशी एकरूप होऊनच त्या केल्या पाहिजेत, असा मनोनिग्रह करून ते स्वत: आपल्या कुटुंबाला घेऊन दलित वस्तीमध्ये राहायला गेले. प्रत्यक्ष अस्पृश्यांच्या वस्तीमध्ये राहून त्यांनी अस्पृश्येतेविरुद्धच्या रचनात्मक चळवळीला प्रारंभ केला. सबंध आयुष्यभर भौतिक सुखवस्तू जीवनाचा त्याग करून महर्षी शिंदे स्वयंप्रेरणेने एका ऋषीप्रमाणे ध्येयवादी आयुष्य जगले. म्हणूनच 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' ही संत उक्ती महर्षी शिंदे यांच्याबाबतीत सत्य ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात आगमन होण्याआधी महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यतेच्या उच्चाटनाला रचनात्मक कार्याने सुरुवात केली होती, हे लक्षात घेतले पाहिजे.

कर्मवीर शिंदे यांनी केवळ भाषणांद्वारे किंवा लेखन-संशोधन करून समाजातील विविध प्रश्न मांडले, असे नव्हे तर संस्थात्मक कार्याचे महत्त्व ओळखून त्यादृष्टीने त्यांनी विचारपूर्वक कृती करण्यालाही प्राधान्य दिले. कोणतेही सामाजिक कार्य किंवा परिवर्तन करावयाचे असेल तर त्या कार्याला मूलभूत व रचनात्मक स्वरूपाचा पाया असणे आवश्यक असते. कारण व्यक्तीला आयुष्यमर्यादा, शारीरिक मर्यादा असते; संस्था मात्र वर्षांनुवर्षे, पिढ्यान् पिढ्या कार्यरत राहते. रचनात्मक कार्याचे हे महत्त्व कर्मवीर शिंदे यांना नीट उमजलेले होते. या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून 'डिप्रेस्ड् क्लासेस मिशन' या संस्थेव्यतिरिक्त महर्षी शिंदे यांनी आणखी दोन संस्था स्थापन केल्या. त्यात कौटुंबिक उपासना मंडळ (१९२४) आणि वाई (जि. सातारा) येथील ब्राह्मो समाज (१९३३) या संस्थांचा समावेश आहे. या माध्यमातून कर्मवीर शिंदे यांनी धर्म

आणि धर्मसुधारणा, अध्यात्म आदी मुद्द्यांवर नव्याने प्रकाश टाकला. समाजातील अंधश्रद्धा, कर्मठपणा, भेदभाव आदींच्या निर्मूलनासाठी या संस्थांच्या माध्यमातून कृतिकार्यक्रम राबवला. त्या अनुषंगाने त्यांनी देवदासींच्या प्रथेला विरोध केला. दारूमुळे अनेक कुटुंबे, संसार उद्ध्वस्त होतात. त्याचा गंभीर परिणाम कुटुंबातील स्त्रिया आणि मुलांना भोगावा लागतो, हे लक्षात घेऊन कर्मवीर शिंदे यांनी दारूबंदीसाठीही प्रयत्न केले. दारूच्या समाजातील दुष्परिणामांच्या संदर्भात लोकांमध्ये जागृती निर्माण केली. 'दारू की शिक्षण?' असा जळजळीत प्रश्न उपस्थित करून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी सदोदित विषद केले. अर्थात या सगळ्या सुधारणा व्हावयाच्या तर लोकांपर्यंत शिक्षण पोहोचवले पाहिजे. शिक्षणाने व्यक्तीमध्ये बऱ्या-वाईटाची जाण येते, शहाणीव येते, नवा सुधारणावादी दृष्टिकोन अंगी बाणतो. विज्ञान, गणित आदी शास्त्रांच्या अभ्यासामुळे व्यक्तीला चिकित्सक दृष्टी प्राप्त होते, म्हणून शिक्षण समाजाच्या सर्व थरांत गेले पाहिजे, लोकांनी शिकले पाहिजे, यावर कर्मवीर शिंदे यांनी सातत्याने भर दिला. यासाठी मुलांप्रमाणेच मुलींनाही शिक्षण सक्तीचे व मोफत केले पाहिजे, यावर ते ठाम होते. या तळमळीतूनच त्यांनी काही ठिकाणी शाळा आणि वसतिगृहे सुरू करून ती यशस्वीपणे चालवली.

कर्मवीर शिंदे यांच्या मनात अस्पृश्य, गोरगरिब, कष्टकरी, शेतकरी, स्त्रिया, दीनदुबळे आदींच्या बद्दल अपार करुणाभाव होता. शेती, शेतकरी आणि त्यांच्या समस्यांच्या अनुषंगाने महत्त्वाचे कार्य केलेले आहे. अस्पृश्यता निवारण परिषदांप्रमाणेच त्यांनी ठिकठिकाणच्या शेतकी परिषदांमधूनही हजेरी लावली. शेतकऱ्यांच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले. या परिषदांमधून त्यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांच्या एकंदर स्थितिगतीविषयी पोटतिडिकीने मार्गदर्शन केले. शेतीचा प्रश्न हा केवळ आर्थिक सिद्धान्तांच्या चौकटीत मांडून सुटणार नाही, तर तो सामाजिक शिक्षणाने आणि सामाजिक हितसंबंधांच्या सहकार्याने सुटू शकेल, असे तळमळीने ते सांगत असत. ब्रिटिश सरकारने वाढवलेल्या शेतसाऱ्याच्या विरोधात त्यांनी महाराष्ट्रातील अनेक गावात सभा घेऊन लोकमन जागृत केले.

महर्षी शिंदे यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातही आपले योगदान दिलेले आहे. १९३० साली काँग्रेसने पुकारलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत शिंदे यांनी सक्रिय सहभाग घेतला. याबद्दल ब्रिटिशांनी त्यांना सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

व्यक्तिगत जीवन असो, की समाजसुधारणा असो, की लेखन-संशोधन असो, संपूर्ण जीवनभर महर्षी शिंदे यांनी 'सत्याला' केंद्रवर्ती मानले. आपल्या हरेक कृती-उक्तीतून त्यांनी अविरतपणे केवळ सत्याचाच शोध घेण्याचा प्रयत्न केला. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियेले नाही बहुमता' या तुकारामांच्या अभंगाप्रमाणे महर्षी सत्याच्या प्रस्थापनेसाठी सतत कष्टत राहिले. त्यांनी सत्याशी प्रातारणा कधी केली नाही. महर्षी शिंदे यांच्या संपूर्ण वैचारिक लेखनाच्या आणि सामाजिक कार्याच्या मुळाशी एक ठोस असं 'सत्याचं' अधिष्ठान आहे आणि त्याला सुसूत्रबद्ध अभ्यासाची, व्यासंगाची, तत्त्वज्ञानाची, तर्कशास्त्राची शास्त्रीय बैठकही आहे. अनुभूती, त्याग, सत्य, अध्यात्मिकता, समता, नैतिकता आदी चिरंतन मूल्यांच्या पायावर महर्षी शिंदे यांचे संपूर्ण विचारकार्य आणि वाङ्मय उभे आहे. म्हणूनच त्यांच्या विचारांना व लेखनाला कालातीत असे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांनी आजन्म निष्ठेने या मूल्यांची जोपासना केली. एकांगीपणा, पूर्वग्रह, द्वेष,

दुराग्रह अशा गोष्टींना त्यांच्या लेखनात आणि जीवनातही स्थान नव्हते. व्यक्तिगत आशा-आकांक्षा आणि स्वार्थाला कटाक्षाने दूर ठेवत स्वत:चे संपूर्ण आयुष्यच त्यांनी समाजाच्या उद्धारासाठी वाहिले. समाजाच्या भल्याकरता नि:स्वार्थ बुद्धीने सहेतूक हस्तक्षेप करत राहणे, हा त्यांचा पिंड राहिला. अशा या थोर ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाची जीवनज्योत २ जानेवारी १९४४ रोजी मालवली. महर्षी शिंदे यांनी लिहिलेल्या वैविध्यपूर्ण वाङ्मयाच्या वाचनातून त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या अनन्यसाधारण कार्याची ओळख आपल्याला होते.

## २.४ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे लिखित 'प्रवासवर्णन', पार्श्वभूमी :

महर्षी वि. रा. शिंदे यांच्या समग्र वाङ्मयावर एक दृष्टिक्षेप टाकला असता त्यातील त्यांचे 'माझ्या आठवणी आणि अनुभव', 'प्रवासवर्णन' आणि 'रोजनिशी' हे आत्मपर लेखन अनेक दृष्टींनी लक्षवेधक व वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे लक्षात येते. लालित्यपूर्ण आविष्कार, विशाल व प्रांजळ जीवनदृष्टी, अनुभवातील नितळपणा, सूक्ष्म व तरल निरीक्षणदृष्टी, भाषेचा सहजस्वाभाविक व परिणामकारक वापर, अवास्तव आत्मस्तुती किंवा आत्मगौरवाला दिलेला फाटा, 'मी'चा संयतशील तरीही प्रभावी वावर, निवेदनातील तटस्थपणा, जे दिसते त्यापलीकडचे पाहणारी शोधक नजर, विविध अर्थ-अन्वयार्थ आणि तथ्यांची साधार उकल इत्यादी इत्यादी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. या आत्मपर लेखनातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि तितकेच महत्त्वाचे लेखन म्हणजेच 'प्रवासवर्णन' होय.

'माझ्या आठवणी आणि अनुभव' या आत्मपर ग्रंथामध्ये महर्षी शिंदे यांनी बालपणात, विद्यार्थी दशेत असताना मित्रांबरोबर गावाजवळच्या निसर्गरम्य ठिकाणी छोट्या छोट्या सहली काढल्याच्या काही आठवणी सांगितलेल्या आहेत. महाविद्यालयील जीवनातही त्यांनी पन्हाळगड, ज्योतिबा अशा विविध ठिकाणांच्या सहलींमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला होता. दैनंदिन दिनक्रमातील जाणवलेल्या विविध घडमोडींविषयीची निरीक्षणे आपल्या रोजनिशीमध्ये लिहून ठेवणे, हा त्यांचा नित्याचा परिपाठ असे. महर्षी शिंदे यांनी विद्यार्थी दशेतील, इंग्लंड, फर्ग्युसन कॉलेज, येरवडा कारागृहात असताना किंवा ब्राह्मसमाजाच्या निमित्ताने रोजनिशी लिहिलेली आहे. या रोजनिशींमधूनही प्रवासाबद्दलचे अनेक उल्लेख वाचायला मिळतात.

महर्षी वि. रा. शिंदे यांच्या सदर 'प्रवासवर्णन' या पुस्तकात एकंदर २२ लेख समाविष्ट केलेले आहेत. यापैकी काही लेख हे त्यावेळच्या 'सुबोधपत्रिका' आणि 'मासिक मनोरंजन' या नियतकालिकांमधून त्या त्या वेळी प्रकाशित झालेले होते. पुढे महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'धर्म, जीवन व तत्त्वज्ञान' (१९७९) ह्या ग्रंथात एकत्रितपणे समाविष्ट करण्यात आले. याशिवाय अगदी अलीकडेच महाराष्ट्र शासनाने हे लेखन स्वतंत्र पुस्तकरूपाने 'प्रवासवर्णन' ('महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय,' खंड दुसरा-आत्मपर लेखन, विभाग तिसरा, २०१६) या नावाने प्रकाशित केलेले आहे.

या पुस्तकामध्ये महर्षी वि. रा. शिंदे यांचे दोन टप्प्यांतील प्रवासवर्णनपर लेखन समाविष्ट केलेले आहे. त्यातील एक टप्पा म्हणजे - १ ते १६ या प्रकरणांमध्ये आलेले वर्णन हे परदेशातील अर्थात इंग्लंडमधील

प्रवासाचे आहे; तर दुसरा टप्पा – १७ ते २२ या प्रकरणांमधील वर्णन हे भारतात केलेल्या प्रवासाचे आहे. ते दोन टप्पे पुढीलप्रमाणे –

**प्रवासवर्णन – पहिला टप्पा :**

ब्राह्म समाजाच्या वतीने महर्षी शिंदे यांना तुलनात्मक धर्माच्या अभ्यासासाठी निवड झाली. ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनने महर्षी वि. रा. शिंदे यांना धर्मशिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना मंजूर केली होती. त्या योजनेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून त्यांना धर्माचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जावे लागणार होते. त्यासाठी २१ सप्टेंबर १९०१ साली ते मुंबई बंदरातून बोटीने इंग्लंडच्या दिशेने जलमार्गाद्वारे प्रवासाला निघाले आणि ऑक्सफर्डच्या मँचेस्टर महाविद्यालयात दाखल झाले. त्या संपूर्ण प्रवासाची हकीकत, निरिक्षणे, प्रवासात जाणवलेल्या–भावलेल्या गोष्टी, भेटलेली माणसे, निसर्ग, इंग्लंडमधील पाहिलेली स्थळे–प्रांत, भाषा, रीतिरिवाज–लोकजीवन, संस्कृती, आलेले विविध अनुभव इत्यादी विविधांगी गोष्टींच्या नोंदी त्यांनी करून ठेवलेल्या आहेत. त्यामध्ये मार्सेय, पॅरिस, लंडन आदी शहरे, ब्रिटिश म्युझियम, डेव्हेनपोर्ट येथील गुड फ्रायडे, मँचेस्टर कॉलेज, बर्टन गावातील शाळा, लंडन येथील बालहत्यानिवारक गृह इत्यादी विविध स्थळांची, तिथल्या अनुभवलेल्या गोष्टींचे प्रवासवृत्त महर्षी शिंदे यांनी मनापासून लिहिलेले आहे.

**प्रवासवर्णन – दुसरा टप्पा :**

महर्षी शिंदे यांच्या 'प्रवासवर्णन'मधील दुसरा टप्पा हा त्यांनी भारतात केलेल्या प्रवासाविषयीच्या सहा लेखांचा आहे. यामध्ये बंगळूर, मंगलोर, मद्रास इत्यादी दक्षिणेतील प्रांत; तसेच उत्तर व पूर्व भारतातील बंगाल, आसाम व कुचबिहार आदी प्रांतांचा दौरा केला होता. या दोन्ही दौऱ्यातून त्यांना निराळ्या भारताचे दर्शन घडले. यासंबंधीचे लालित्यपूर्ण भाषेत मर्मग्राही असे वर्णन त्यांनी केले आहे.

ब्राह्मसमाजाच्या संदर्भात प्रसार–प्रचाराच्या निमित्ताने शिंदे यांनी बंगाल–आसाम व कुचबिहार या प्रांतांमधील विविध व्यक्तींना–गावांना–शहरांना भेटी दिल्या होत्या. यासबंधीचे वर्णन 'बंगालची सफर' आणि 'शांतिनिकेतन' या दोन प्रकरणांतून वाचायला मिळते. तर 'बंगलूरच्या रस्त्यातील एक फेरी', 'मंगळूर येथील काही विशेष गोष्टी', 'सह्याद्रीवर्णन–१' व 'सह्याद्रीवर्णन–२' या लेखांमधून त्यांनी दक्षिण भारतातील सफरीविषयी लिहिलेले आहे. त्यात बंगळूर, मंगलोर, मद्रास, मुडबिद्री, कारकळ, सोमेश्वर, तीर्थहळ्ळी, शिमोगा, हरिहर इत्यादी गावांना भेटी देत त्या भागातील इतिहास, संस्कृती, उत्सव, जुनी व प्राचीन मंदिरे, चर्चेस, शिल्पकला अशा अनेक दृष्टींनी त्यावर लिहिलेले आहे.

एकंदर, 'प्रवासवर्णन' या पुस्तकात महर्षी शिंदे यांचे देश आणि परदेश अशा दोन भिन्न प्रदेशातील, देशांतील प्रवासाविषयीचे वैविध्यूपर्ण लेखन एकत्रितपणे वाचायला मिळते.

## २.४.१ महर्षी वि. रा. शिंदे लिखित 'प्रवासवर्णन', आशय :

महर्षी वि. रा. शिंदे लिखित 'प्रवासवर्णना'तील पहिला टप्पा आहे तो इंग्लंडच्या प्रवासाचा. हा सर्व प्रवास जलमार्गाद्वारे झाला. पर्शिया नावाच्या आगबोटीने महर्षी शिंदे इंग्लंडच्या दिशेने रवाना झाले.

आगबोटीने प्रवास करण्याची ही त्यांची पहिलीच वेळ होती. त्यामुळे आगबोट कशी असेल, समुद्रप्रवास कसा होईल, काय अनुभव येतात, काय प्रसंगांना तोंड द्यावे लागेल, आदींबद्दल त्यांच्या मनात काहीशी कुतूहलमिश्रीत भिती आणि जिज्ञासा होती. २१ सप्टेंबर १९०१ रोजी सकाळी ते आगबोटीमध्ये बसले. ''जेवण चालले असता आगबोट सुटून केव्हा चालू लागली होती हे काही वेळ कळलेच नाही. इंजिनाची धडधड लांबून किंचित ऐकू येत होती. ग्लासातील पाणीदेखील सहज दिसण्यासारखे हालत नव्हते.'' अशा शब्दांत त्यांनी बोट सुरू झाली त्यावेळचे वर्णन केले आहे. पुढे त्यांनी आगबोटीतील त्यांना मिळालेली बर्थ सिट, आगबोटीचे मजले, केबिन, सहप्रवासी, आगबोटीत पालन करायचे नियम, आगबोटीचे व्यवस्थापन, भोजनव्यवस्था, स्नानगृह, सलून, करमणूक, इत्यादी विविध गोष्टींबद्दल लिहिले आहे. दरम्यान प्रवासात लागणारा सुवेज कालवा, इतालीचा सामुद्रधुनी, एडन बंदर, पोर्ट सैद बंदर इत्यादी ठिकाणांबद्दलच्या अनेक नोंदी महर्षी शिंदे यांनी केल्या आहेत. रस्त्याच्या आजूबाजूला झाडी, घरे, डोंगर, नद्या वगैरे अनेक गोष्टी असतात. ते पाहताना प्रवासात पुष्कळ करमणूक होते. मात्र जलप्रवासात आजूबाजूला पाहणार तरी काय? सगळीकडे समुद्र पसरलेला. पाणीच पाणी. पण तरीही जलप्रवासाचा त्यांना कंटाळा जाणवला नाही. ते लिहितात, ''एखाद्या लहानशा खेड्यातल्याप्रमाणे अगर एखाद्या मोठ्या राजवाड्यातल्याप्रमाणे हे आमचे दोन आठवडे गेले.''

१४ दिवसांच्या जलप्रवासानंतर बोट मार्सेय बंदराला पोहोचली. मार्सेयला बारा तास थांबून मग पुढे लंडनच्या दिशेने बोट आगेकूच करणार होती. या दरम्यान बोटीतल्या काही प्रवाशांबरोबर शिंदे यांनीही मार्सेय शहर पाहायचा आनंद लुटला. त्यातल्या एका सहकाऱ्याला फ्रेंच भाषा येत होती. त्यामुळे मार्सेय गावात वावरताना त्यांना भाषेची अडचण आली नाही. मार्सेय शहरात फेरफटका मारून तिथले रस्ते, देवळे, महाल, निसर्ग अशा अनेक गोष्टी पाहिल्या. त्या प्रांतातील शेती पाहून ते खूश होऊन लिहितात, ''फ्रेंच लोकांची सौंदर्याभिरुची त्यांच्या शेतातूनही दृष्टीस पडते. ह्यांची शेते म्हणजे केवळ बागच!.. जागोजाग खेडी लागत, ती खेडी नव्हत, चित्रेच ती!.. इतर ठिकाणी राजा होण्यापेक्षा फ्रान्समध्ये शेतकरी होणे बरे.'' मार्सेय येथील 'नॉटर डेम द ला गार्ड' हे प्रसिद्ध देऊळ पाहून त्यांच्या मनात जी काही विचार वलये उमटली ती त्यांनी लिहून काढलेली आहेत. या देवळाचे वर्णन करताना त्यांना आपल्याकडील तुळजापूर, सौंदत्ती, महालक्ष्मी इत्यादी अनेक मंदिरांची आठवण होते.

शिंदे यांनी आपल्या भारतीय गावांच्या नावांच्या धर्तीवर पॅरीस शहराचे मजेशीर नामकरण केलेले आहे. ते पॅरीसला 'पॅरीसपुरी' असे गमतीने म्हणतात. पॅरीसमध्ये दि बिग व्हील नावाचे मोठे चक्र, एफे हा प्रसिद्ध मनोरा ते पाहतात.

नाताळाच्या सुट्टीमध्ये शिंदे लंडन शहर पाहायला जातात. ऑक्सफर्डच्या विद्यापीठाला ते 'थोरला आश्रम' म्हणतात. लंडन शहर म्हणजे 'आधुनिक सुधारणारूपी चिज तयार होण्याची मोठी वखार' वाटते. लंडन शहरातील आधुनिक सुधारणा आणि विकास पाहून ते विस्मयाचकित होतात. याबद्दल ते कौतुकाने लिहितात, ''एकंदरीत सौंदर्य, बुद्धी आणि नीती ह्या तीनही मुख्य तत्त्वांची समान सांगड घालून दीर्घोद्योग व

अचाट धाडस व निश्चळ श्रद्धा ह्यांच्या पायावर ह्या लोकांनी आपल्या व्यापारशास्त्राची इमारत उभारली आहे म्हणून लंडन शहरास हल्लीचे वैभव आले आहे.''

ब्रिटिश म्युझियम हे जगातील एक प्रसिद्ध आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणून गणले जाणारे म्युझियम आहे. या म्युझियमची खासियत आणि महत्त्व याबद्दल विस्ताराने लिहिताना पूर्व पाषाणयुग, उत्तर-पाषाणयुग, काशाचे युग, लोखंडी युग अशाप्रकारे प्रागैतिहासाची सफरच महर्षी शिंदे घडवून आणतात. यासाठी ते इतिहासातील कितीतरी दाखले, दुर्मिळ संदर्भ सांगतात. तिथल्या ग्रंथसंग्रहाबद्दलही ते अत्यंत आपुलकीने लिहितात. ज्या वाचकांनी म्युझियम पाहिले नाही, अशा वाचकांना ते पाहिल्याची अनुभूती मिळते. याचप्रमाणे लंडनमधील बालहत्यानिवारक गृहाबद्दलही ते अत्यंत तळमळीने लिहितात. या गृहाचा इतिहास, सद्यस्थितीही कथन करतात. गुड फ्रायडेच्या दिवशी तेथील ख्रिस्तीधर्मपंथाच्या देवळांमध्येही कशाप्रकारे धर्मभोळेपणा चालतो, याचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना होते. त्यावरून त्यांना आपल्याकडील सोमयाग आठवतो. यामधून महर्षींनी श्रद्धा-अंधश्रद्धा-धर्म आदींची तपशीलवार चर्चा केली आहे. आधुनिक, प्रगत समजल्या जाणाऱ्या देशांमध्येही धर्मभोळेपणा जपला जातो, याचा त्यांना विषाद वाटतो. 'बोअर युद्धाचा शेवट व ऑक्सफर्ड येथील उल्हास' या लेखातून महर्षींनी बोअर युद्ध संपल्याचा आनंद ऑक्सफर्ड शहरातील लोकांनी कशापद्धतीने साजरा केला याचे मासलेवाई उदाहरणे देऊन वर्णित केला आहे. बर्टनसारख्या एका छोट्याशा खेड्यातील वेगळेपण जपणाऱ्या शाळेची व्यवस्था पाहून महर्षी शिंदे यांना खूप नवल वाटले. या शाळेत जातिभेदाला थारा नव्हता. वह्या, पुस्तके, पेन, पाट्या असे सर्व शालेय साहित्य शाळा मोफत पुरवते. फीस नाही. मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते, इत्यादी इत्यादी. त्या काळात भारतातील शिक्षणाची अवस्था तशी खूप वाईट होती, या पार्श्वभूमीवर महर्षींच्या दृष्टींनी ही नवलाईच होती. त्या नवलातून ते शाळेबद्दल आस्थेने लिहितात.

जगप्रसिद्ध लेखक शेक्सपिअरच्या स्ट्रॅटफर्ड या गावाला महर्षी शिंदे भेट देतात. शेक्सपिअरसारख्या लेखकाबद्दल तिथल्या लोकांना खडान् खडा माहिती आहे, शेक्सपिअर ही त्या लोकांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे, इत्यादी अनेक निरीक्षणे ते नोंदवतात. त्याअनुषंगाने विभूतिपूजा म्हणजे काय, विभूतिपूजेचे माहात्म्य कसे असते, विभूतिपूजा आणि समाजमन यांचा संबंध कसा आहे, विभूतिपूजेचे वेगवेगळे दृष्टिकोन कसे आहेत आदींचा सांगोपांग विचार ते वाचकांसमोर ठेवतात. प्रसंगी कार्लाईलच्या 'विभूती आणि विभूतिपूजा' या पुस्तकाचा दाखलाही देतात. ज्या मँचेस्टर कॉलेजात महर्षी तुलनात्मक धर्माच्या शिक्षणासाठी दाखल झाले होते, त्या मँचेस्टर कॉलेजबद्दल त्यांनी एक स्वतंत्र लेख लिहिला आहे. कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळच त्यांना 'सत्य, स्वातंत्र्य व धर्म ह्यास वाहिलेले' असा शीलालेख दिसतो. कॉलेजचे प्रिन्सिपल ड्रमंड साहेब यांच्याबद्दल ते आदराने आणि आपुलकीने लिहितात. मँचेस्टर कॉलेजमध्ये वावरताना त्यांना दिसलेले कॉलेज, तिथला उदारमतवाद, सहाध्यायी, युनिव्हर्सिटी, शैक्षणिक धोरणे, तिथला धर्मशास्त्राचा अभ्यास, डॉ. जॉन टेलर, डॉ. मार्टिनो, प्रो. कार्पेंटर, प्रो. ॲपटन, आदी यांसारखे तिथले अभ्यासू व विद्वान अध्यापक, अशी विविध दृष्टींनी महर्षी मनापासून लिहितात. कॉलेजचे शैक्षणिक वातावरण खरोखरच स्वतंत्र आणि मनमोकळे आहे, 'सत्य' आणि 'धर्म' यांचा सुंदर मेळ कॉलेजात दिसतो, या

निकषावर ते येऊन थांबतात. शिंदे यांचा हा लेख मूळातून वाचला पाहिजे. मँचेस्टर शहरापासून जवळच असलेल्या एका खाणीला ते भेट देतात. 'पृथ्वीच्या पोटात ४४० यार्डांखाली' या लेखामध्ये शिंदे जमिनीच्या पोटात पाव मैल खोल असलेल्या कोळशाच्या खाणीची सफर घडवतात. खाणीच्या अनुषंगाने ते इतरही पूरक माहिती देतात. इंग्लंडच्या उत्तरभागी कंबर्लंडशायरमध्ये निसर्गरम्य अशा सरोवर प्रांताला शिंदे यांनी भेट दिली, याचे वर्णन 'जनातून वनात आणि परत' या लेखात केलेले आहे. अतिशय काव्यात्म आणि लालित्यपूर्ण शैलीमध्ये हा लेख लिहिलेला आहे. त्या नितांतसुंदर अशा स्थळी प्रसिद्ध कवी वर्डस्वर्थ यांचे वास्तव्य होते, त्याबद्दलची नोंद शिंदे यांनी फार मनापासून घेतली आहे.

दक्षिण भारतातील अनेक गावांतून शिंदे यांनी वेगवेगळ्या निमित्ताने प्रवास केलेला आहे. एखाद्या गावाच्या रस्त्यावरून जाताना त्या गावाचा समाज-इतिहास-भूगोल-संस्कृती आदी लोकजीवनातील बाबी सहज ध्यानात येतात. असाच काहीसा एक अनुभव शिंदे यांनी 'बंगलूरच्या रस्त्यावरील एक फेरी' या लेखात मांडला आहे. ब्राह्मसमाजाच्या एका सहकाऱ्यासमवेत बंगळूर शहरातील रस्त्यावरून सहज फेरी मारताना द्रविडी, आर्य, मुसलमानी, इंग्रजी अशा विविध प्रकारच्या वंशांची माणसे दिसली. तसेच रस्त्यांच्या आजूबाजूला दिसणाऱ्या मशीद, चर्च, मंदिर, विविध दुकाने, छोटेमोठे विक्रेते, अशा अनेक गोष्टींची सूक्ष्म निरीक्षणे मांडलेली आहेत. ब्राह्मसमाजाच्या निमित्ताने महर्षींनी मंगळूर शहराला भेट दिली होती. शहराला मंगळूर नाव कसे पडले हे दंतकथेच्या साहाय्याने सांगत महर्षी मंगळूर शहराची भौगोलिकता, तिथला ब्राह्मसमाज, निराश्रित साह्यकारी मंडळीची शाखा आदींबद्दल लिहितात.

याशिवाय ब्राह्मसमाजाच्या प्रसारार्थ महर्षी शिंदे यांनी जैन धर्मियांच्या मुडबिद्री, कारकळ आदी गावांना भेटी दिल्या. तसेच पुढे सोमेश्वर-आगंबे, तीर्थहळ्ळी, शिमोगा, हरिहर या गावांचाही त्यांनी दौरा केला. त्या भेटीचा वृत्तान्त त्यांनी 'सह्याद्रीवर्णन-१' व 'सह्याद्रीवर्णन-२' या लेखांमधून मांडला आहे. या प्रांतांतून फिरताना इथले लोकजीवन, जुनी मंदिरे, त्यांची स्थापत्यकला, इतिहास, संस्कृती, नावे आणि त्याची व्युत्पत्ती, अशी महत्त्वाची आणि उपयुक्त पुष्कळ माहिती ते सहजगत्या सांगतात.

ब्राह्मसमाजाच्या प्रसारार्थ महर्षी शिंदे यांनी उत्तर भारतातील व पूर्व भारतातील बंगाल, कुचबिहार, आसाम या प्रांतांचाही दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी बांकीपूर, मोंगीर, भागलपूर, काठीहार, पूर्णिया, मैमनसिंग, ढुब्री, फोरेड आदी ठिकाणांना भेटी दिल्या. ब्राह्मधर्माच्या संदर्भातील उपासना, उपासक, ब्राह्ममंदिर, ब्राह्मांचे कार्य, आदींची माहिती घेत घेत या भागातील ब्राह्मसमाजाच्या एकंदर स्थितीबरोबर स्त्रीशिक्षणाचाही आढावा ते घेतात. या शिवाय ते महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर यांच्या 'शांतिनिकेतन' आश्रमालाही आवर्जून भेट देतात. महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर यांच्या कार्यासंदर्भातील पुष्कळ माहिती शिंदे देतात.

एकंदरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी इंग्लंडचा प्रवास, तिथले वास्तव्य आणि भारतातील प्रवासात विविध ठिकाणांना दिलेल्या भेटी, तिथले लोकजीवन-संस्कृती-भाषा-रीतिरीवाज आदींच्या संदर्भातील कितीतरी घटना, प्रसंग, अनुभव, आठवणी, माहिती, आदींच्या नोंदी महर्षी शिंदे यांनी या प्रवासवर्णनामध्ये

केलेल्या आहेत. या लेखांमधील वर्णनातून महर्षींच्या ठायी असलेल्या अनेक गुणवैशिष्ट्यांचे दर्शन होते. चिकित्सक, जिज्ञासक, निरीक्षक असे विविध पैलू या प्रवासवर्णनातून दिसून येतात.

### २.५ महर्षी वि. रा. शिंदे लिखित 'प्रवासवर्णन', वैशिष्ट्ये :

महर्षी वि. रा. शिंदे यांच्या 'प्रवासवर्णन' या पुस्तकाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. यापैकी महत्त्वाच्या पाच वैशिष्ट्यांबद्दल जाणून घेऊ या.

#### २.५.१ प्रदेशाचे चित्रण :

प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचे हे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रदेशच नसेल तर ते कसले प्रवासवर्णन? एका अर्थाने कोणतेही प्रवासवर्णन हे प्रदेश या एका घटकाभोवती फिरताना दिसते. त्यामुळे प्रदेशाला आणि प्रदेशाच्या चित्रणाला प्रवासवर्णनात अत्यंत महत्त्व आहे.

या आधी म्हटल्याप्रमाणे महर्षी वि. रा. शिंदे यांचा हा प्रवास इंग्लंड आणि भारत या दोन देशातील प्रवास आहे. त्यामुळे आपसुकच दोन भिन्न प्रदेशांचे चित्रण या प्रवासवर्णनामध्ये येते. इंग्लंड जाण्यासाठी आगबोटीमध्ये बसल्यापासून ते मँचेस्टरला पोहोचेपर्यंत प्रवासातील कितीतरी प्रदेशांची, स्थळांची नोंद ते घेतात. दोन्ही ठिकाणच्या प्रदेशाचे वर्णन करताना शिंदे यांनी विपुल अशी पूरक माहितीही दिली आहे. त्या त्या प्रदेशाचे गुणवैशिष्ट्य सांगता सांगता तिथला भूगोल, त्यानुरूप तिथले लोकजीवन, संस्कृती आदींबद्दलही यथार्थ माहितीही दिली आहे. इंग्लंडच्या उत्तरभागात असलेल्या कंबर्लंडशायरमधील निसर्गरम्य सरोवर प्रांताविषयी तर ते खूप मनापासून लिहितात. तिथल्या निसर्गातील नितांत सुंदरतेचा अमीट अनुभव ते काव्यात्म ललितशैलीत कथन करतात. मार्सेय शहर आणि त्याच्या आजूबाजूच्या प्रदेश, तिथला निसर्ग, शेती पाहून ते विस्मयाचकित होतात. तिथला प्रदेश पाहताना मधूनमधून त्यांना भारतातील प्रदेशाचीही आठवण होत राहते. ते जरी इंग्लंडमध्ये असले तरी आपल्या मायभूमीला विसरत नाहीत.

भारतात फिरतानाही शिंदे इथल्या प्रदेशविशेषांवर विपुल लिहितात. बंगळूर, मंगळूर, सह्याद्रीवर्णन, कुचबिहार, बंगाल इत्यादी कोणताही प्रांत असो, त्या त्या प्रदेशावर ते बारकाईने लिहितात. भारतातील भौगोलिक वैविध्याची अभ्यासपूर्ण नोंद संपूर्ण प्रवासवर्णनात ठसठशीतपणे घेताना दिसतात. या भौगोलिक वैविध्यानुसार तिथल्या लोकसंस्कृतीचा, लोकजीवनाचा आणि रीतिभातींचाही परामर्श घेतात. खरंतर अभ्यासपूर्ण पद्धतीने प्रत्येक प्रवासाची यथामूल नोंद करणे, हे महर्षी शिंदे यांच्या लेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे. अभ्यासामुळे प्रवासवर्णनाला एक दर्जात्मक अशी खोली प्राप्त होते.

#### २.५.२ अनुभवाचे वेगळेपण :

'अनुभवाचे बोल' ही म्हण दैनंदिन जीवनात ज्येष्ठ व्यक्तींच्या तोंडून पुष्कळदा ऐकायला मिळते. कारण या ज्येष्ठत्वाला जसा वयाचा संदर्भ असतो, तसाच अनेक वर्षे जगलेल्या आयुष्यातील कटु-गोड अशा छोट्यामोठ्या अनेक अनुभवांचाही एक भक्कम आधार असतो. त्या कटु-गोड अनुभवातून एक शहाणपण आलेले असते. त्या विशिष्ट अनुभवातून काहीएक सत्य उमगलेले असते. पुष्कळदा असे अनुभव एका

पिढीकडून दुसऱ्या पिढीकडेही संक्रमित होत असतात. म्हणून 'अनुभवाचे बोल' महत्त्वाचे असतात. मानवी जीवनामध्ये अनुभवाला वा अनुभूतीला विशेष महत्त्व आहे. याचप्रमाणे कथा, कादंबरी किंवा कविता इत्यादी कोणताही सर्जनशील साहित्यप्रकार असो लेखनामध्ये लेखकाच्या अनुभवाच्या निराळेपणाला, रसरशितपणाला एक स्वाभाविक महत्त्व असते. व्यक्तिपरत्वे अनुभवाची प्रतीती निरनिराळी असू शकते. अनुभवाशिवाय कुठलेही लेखन वाचक मनाचा ठाव घेत नाहीत.

सदर 'प्रवासवर्णना'मधून महर्षी शिंदे यांच्या अनुभवाचे वेगळेपण पाहावयास मिळते. वास्तविक त्यांचा हा पहिलाच जलप्रवास असतो, त्यामुळे या अनुभवाला सामोरे जाण्यासाठी ते उत्सुक होते. आगबोटीमध्ये पाऊल ठेवल्यापासून ते मँचेस्टरला पाहोचेपर्यंतच्या प्रवासातील कितीतरी सूक्ष्म बारकावे शिंदे यांनी टिपलेले आहेत. प्रवासात त्यांनी पाहिलेली मार्सेय, पॅरीस यासारखी शहरे, तिथला निसर्ग, जनजीवन आणि त्यांचे वेगळेपण आदींची ते नोंद घेतात. याशिवाय इंग्लंडमध्ये फिरताना तिथली विविध गावे, शहरे, स्थळे पाहतात आणि स्वत:ला जी अनुभूती आली त्यानुरूप पाहिलेल्या स्थळांच्या नोंदी करतात. त्यांच्या या अनुभवात अतिरंजितपणा, अतिशयोक्ती या गोष्टींना स्थान नाही. जे दिसले ते मार्मिकपणे टिपणे, ते स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धीनुसार पारखणे, त्यातील सत्यासत्यता जोखणे आणि मगच लिहिणे हे शिंदे यांच्या या प्रवासपर लेखनाचे महत्त्वाचे विशेष दिसतात. बंगलूर रस्त्यावरून फेरी मारत असतानाचा स्वाभाविक अनुभव ते टिपतात, ''रस्त्यात जाणाऱ्या-येणाऱ्याकडे नुसते घटकाभर पाहिले तरी बस्स, मानवजातिशास्त्राचे एकदोन धडे सहज समजतात.'' (पृ.९८) त्यांच्या अनुभवाचा एक पैलू म्हणजे ते संदर्भ-इतिहास-संस्कृती आदी धाग्यादोऱ्यांची साधार उकल करतात. महर्षी शिंदे यांच्या सारखा हाडाचा अभ्यासक जेव्हा अशाप्रकारे अनुभवाची अभ्यासपूर्वक साधार उकल करतो तेव्हा त्याला एक चिंतनाची खोल डूब प्राप्त होते.

**२.५.३ ज्ञान व रंजन :**

प्रवासवर्णनपर या लेखनातून महर्षी शिंदे विविध विषयांवर प्रकाशझोत टाकतात. हा प्रकाशझोत म्हणजे एक प्रकारे ज्ञान आणि रंजनाची एक अनोखी सफर आहे. महर्षी शिंदे यांचे हे प्रवासवर्णन आपल्याला केवळ पाहिलेल्या गोष्टींचा वृत्तान्तच देते असे नव्हे, तर आपण केलेल्या प्रवासाबद्दल, तिथे पाहिलेल्या स्थळांबद्दलची माहिती देता देता वाचकांना माहीत नसलेली त्याबद्दलची पूरक व अज्ञात माहितीही देतात. ही माहिती म्हणजे जंत्री नव्हे, तर मूलभूत ज्ञानाची पुरवणीच आहे. काळानुरूप जलप्रवासामध्ये झालेल्या सुधारणांबद्दल किंवा आधुनिक पद्धतीने बनवलेल्या कॉमेट-सव्हाणा-कँपानिया-लुकानिया-केसर विल्हेल्मडर ग्रॉसी-डचमंड-सेल्टिक-पर्शिया इत्यादी आगबोटींबद्दल लिहिताना महर्षी शिंदे बोटींची रचना, वेग, वेळ, वजन वाहण्याची क्षमता, प्रवासी क्षमता, बोटीचे निराळेपण आदी कितीतरी प्रकारची तांत्रिक माहिती देऊन वाचकांच्या ज्ञानात महत्त्वाची भर घालतात. मार्सेय येथील नॉटर डेम द ला गार्ड देवळाच्या संदर्भात काही सूक्ष्म निरीक्षणे नोंदवली आहेत, त्यातून त्यांची मंदिरे, संस्कृती, देवीदेवता आदींबद्दल दृष्टी लक्षात येते. नॉटर डेम द ला गार्ड देवळाबद्दल, तसेच सोमयागाच्या वर्णनाबद्दल लिहिताना शिंदे यांनी आपल्याकडील तुळजापूरची भवानी, सौंदत्तीची यल्लमा देवी, कोल्हापूरची महालक्ष्मी इत्यादी देवस्थानांविषयीही लिहिले आहे. पुराण, दंतकथा, लोकसमज आदींच्या उदाहरणांतून त्यातील साम्य-भेद सांगितले आहेत. या सगळ्या

विवेचनातून ते संस्कृतीचीही एक प्रकारे चिकित्सा करतात. ब्रिटिश म्युझियमबद्दल लिहिताना तर ते प्रागैतिहासिक काळाबद्दल, चित्रकलेबद्दल, मर्मीबद्दल, ग्रंथसंग्रहाबद्दल कितीतरी उपयुक्त माहिती देऊन वाचकांच्या ज्ञानात भर घालतात. ''या जगातील एक अत्यंत मोठा ग्रंथसंग्रह'' या शब्दात ते या ब्रिटिश म्युझियमचे वर्णन करतात. डेव्हेनपोर्ट येथील गुड फ्रायडे, बर्टन खेड्यातील शाळा, खाणीबद्दलची निरीक्षणे, बोअर युद्धानंतर ऑक्सफर्डला साजरा झालेला आनंद, मँचेस्टर कॉलेजसंदर्भातील नोंदी, सह्याद्रीवर्णन इत्यादी त्यांचे लेख पाहता त्यांच्या अभ्यासू आणि चिकित्सकवृत्तीची साक्ष पटते. या सबंध प्रवासवर्णनातून शिंदे यांची एक ठोस निरक्षिरविवेकाची बुद्धिवादी भूमिका दिसून येते. विवेकी अध्यात्म आणि कसावर पारखून घेणारी विज्ञानदृष्टी या दोहोंतून महर्षी शिंदे एका अलक्षित ज्ञानाचे दरवाजे उघडतात.

**२.५.४ भाषेचा जिवंतपणा :**

महर्षी शिंदे हे केवळ समाजसुधारक नव्हे, तर एक विचक्षण असे सर्जनशील लेखकही आहेत. इतकेच नव्हे तर महर्षी शिंदे हे एक उत्तम भाषातज्ज्ञही आहेत. त्यामुळे भाषेच्या वापराबद्दल ते अधिक दक्ष आणि जागरूक असल्याचे त्यांच्या संपूर्ण लेखनातून दिसून येते. त्यामुळे कोणत्या प्रकारच्या लेखनामध्ये भाषेचे प्रयोजन कसे असायला हवे, याची त्यांच्या ठायी उत्तम व उच्चप्रतीची जाणीव दिसते. सदर प्रवासवर्णनातील त्यांची भाषाशैली स्वाभाविक आणि सहजसुंदर आहे. ती अलंकृत किंवा विशेषणांनी मढवलेली, भारलेली नाही. आपले लेखन प्रस्थापितांच्या, भाषाप्रभूंच्या नजरेत भरावे म्हणून तोडमोड करून जाणीवपूर्वक घडवलेली नाही. आवश्यकता नसताना किंवा अकारण जडजंबाल शब्दांचा वापरही ते करत नाहीत. अगदी सहज आणि नैसर्गिकपणे, जे आतून स्वाभाविकपणे आले त्याच शब्दांत ते लिहून जातात. त्यांची म्हणून स्वत:ची एक भाषाशैली दिसते. या शैलीला त्यांच्या निरीक्षणाची, अभ्यासाची आणि खोल चिंतनाची डूब असल्याने ती स्वाभाविकपणे अकृत्रिम, सहजभावी आणि जिवंत होते.

एखाद्या वाक्यातून महर्षी शिंदे सबंधित स्थळाचे, प्रसंगाचे मार्मिकपणे चित्र रेखाटतात. उदाहरणादाखल काही वाक्ये पाहता येतील. ''गुलहौशी पाश्चात्य लोकांनी सर्व जगभर-जमिनीवरच नव्हे तर पाण्यावरही आपले घर पसरून टाकिले आहे.'' (पृ. ७), ''सोबत्यास फ्रेंच भाषेत थोडीशी जीभ हलविता येत होती.'' (पृ. १५), ''आम्ही सर्व कान असलेले बहिरे आणि तोंड असलेले मुके झालो होतो.'' (पृ. १५) मार्सेय शहरातील पॅलेस डिला शांप येथील सौंदर्य पाहून ते सहज लिहून जातात - ''निसर्ग आणि मानवी कला ह्या जोडप्याचे हे जणू क्रीडास्थानच असावे.'' (पृ. १७) ''जागोजागी खेडी लागत, ती खेडी नव्हत, चित्रेच ती!'' (१८) ''इतर ठिकाणी राजा होण्यापेक्षा फ्रान्समध्ये शेतकरी होणे बरे..'' (पृ. १८). पॅरीस शहराला ते आपल्याकडील भारतीय धर्तीवर 'पॅरीसपुरी' म्हणतात. ''देवळात शिरलो, तेव्हा १२ चा अम्मल होता.'' (पृ. २१), ''वाघ्याचा पाग्या बनला तरी त्याचा येळकोट जात नाही'' (पृ. २३), ''नजर करणे'' (पृ. २८), ''बोट लागणे'' (पृ. ५) ''सगळी जमीन मधमाशांच्या पोळ्याप्रमाणे पोखरली आहे.'' (पृ. २६), ''ही ह्या सुधारणांची जणू प्रेतेच आहेत.'' (पृ. ३२), ''फॅशनदेवीचे नवस पुरवणेही इकडे फार जरुरीचे झाले आहे.'' (पृ. ९२), ''आपल्यास पोलिसाचे धरणेच आले.'' (पृ. १३४) इत्यादी इत्यादी वाक्यातून महर्षी शिंदे यांच्या ठायी असलेल्या विनोदबुद्धीचे, खिलाडुवृत्तीचे, सौंदर्यदृष्टीचे, चिंतनदृष्टीचे दर्शन घडते.

लिहिता लिहिता शिंदे विविध शब्दांची उकल करतात. त्या शब्दांचे अर्थ, अर्थांच्या छटा, शब्दांची व्युत्पत्तीही सांगतात. 'आनंत्य', 'बाबेलमांडेब', 'कुलझ्म', 'लेंट-लेनिटन', 'आगंबे', 'घुमटाराजा', 'गोमटेश्वर' अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्ती महर्षी शिंदे सहज सांगून जातात. महर्षी शिंदे यांच्या इतरही लेखनामध्ये शब्द, त्यांचे अर्थ, आशय, व्युत्पत्ती आदींबद्दलचे विपुल दाखले पाहायला मिळतात. शब्दांच्या व्युत्पत्ती बरोबरच ते त्या अनुषंगाने पुष्कळ सांस्कृतिक संदर्भही देतात. शिवाय 'आरामस्थाने', 'आदित्यवार', 'दीनोद्धार', 'छळणा', 'ठाणवया', 'सादिलवारी', 'यदृच्छा', असे कितीतरी तत्कालीन प्रचलनात असलेले शब्द शिंदे यांच्या लिखाणातून सहजपणे आढळतात.

**२.५.५ चिंतनशीलता :**

महर्षी शिंदे यांच्या सदर प्रवासवर्णनातून त्यांचे स्वत:चे म्हणून एक चिंतन सातत्याने प्रकट होताना दिसते. कधी हे चिंतन विषयाची आवश्यकता म्हणून येते, कधी मुद्द्याची पार्श्वभूमी म्हणून येते, कधी मूळ विचार अधिक स्पष्ट व्हावा म्हणून येते, कधी सौंदर्यानुभवातून येते, कधी विषयाला पूरक म्हणून येते, तर कधी त्याबद्दलच्या आस्थेमधून, तळमळीतून येते. आगबोट जेव्हा पोर्टसैद बंदरात येते तेव्हा त्यांना मोती बुलासा यांची आठवण येते. कारण धर्मशिक्षणासाठी जात असताना मोती बुलासा यांचा याच पोर्टसैद बंदरात अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्या आठवणीने ते विकल होतात. लंडन शहर पाहताना त्यांना मुलांच्या खेळण्याचे एक दुकान दिसते. त्याबद्दल ते विस्मयाने लिहितात, ''इंग्लंडातील लहान मुलांनी जर नुसती आपली खेळणी विकली तर हिंदुस्थानातील दुष्काळपिडीतांचे प्राण वाचतील.'' (पृ.२८) यातून भारत आणि इंग्लंड या दोन देशातील जगण्याच्या संदर्भातील मूलभूत दृष्टिकोन आणि वास्तवाकडे नकळतपणे निर्देष करत महर्षी शिंदे खूप काही सुचवून जातात. सामान्य लोकांच्याप्रती असलेल्या कळवळ्यातून एक मूलगर्भ चिंतन या वाक्यात दडलेले दिसते.

वास्तविक मुळात वि. रा. शिंदे यांच्या स्वभावाचा आणि मनाचा पिंड हाच मुळी चिंतनशील अभ्यासकाचा, संशोधकाचा आणि विचारकाचा आहे. केवळ हौस म्हणून, करमणूक म्हणून किंवा मनोरंजनासाठी त्यांनी लेखन केलेले नाही. लोकजागृती, समाजोद्धार आणि सत्यशोधन ही त्यांच्या विचारकार्याची आधारशीला आहे. ही आधारशीला त्यांच्या लेखनाच्या मुळाशीही दिसते. काही लेखकांमध्ये जाणते-अजाणतेपणी चिंतनातून उपदेशाचे डोस देण्याची वृत्ती दिसते. मात्र महर्षी शिंदे याला अपवाद आहेत. त्यांच्या लेखनातून प्रकटणाऱ्या चिंतनाला संशोधनातील चिकित्सेची एक ठाम बैठक आहे. संशोधन म्हटले की चिकित्सा आलीच आणि चिकित्सा ही विविध शास्त्रीय दृष्टिकोनातून केली जाते. शास्त्राच्या, विज्ञानाच्या, बुद्धीच्या, सिद्धान्ताच्या कसावर पारखून मगच आकळलेले सत्य मांडण्याकडे खऱ्या संशोधक-अभ्यासकाचा कल असतो. महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वावर या संशोधनशिस्तीचा प्रभाव असल्याने ते आपल्या विचारांना या शास्त्रीय कसोट्यांच्या कसावर पारखून घेऊन मगच लिहितात. अशाप्रकारच्या चिंतनाला एक अभिजातपणा प्राप्त होतो. म्हणूनच 'प्रवासवर्णन'मधून प्रकट झालेले शिंदे यांचे चिंतन हे समाजमनाला आणि लोकसंस्कृतीला पोषक तर आहेच, शिवाय एक नवा आयाम देणारे आहे.

## २.६ समारोप :

या घटकामधून आपण प्रवासवर्णनाची प्रेरणा, त्याचे स्वरूप आणि प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराची वाटचाल, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा अल्प परिचय, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाची पार्श्वभूमी आणि आशय, तसेच या प्रवासवर्णनाची काही वैशिष्ट्ये आदींचा थोडक्यात परिचय करून घेतला. एक गोष्ट इथे लक्षात घ्यायला हवी की, महर्षी शिंदे यांनी हा प्रवास मनोरंजन म्हणून अथवा पर्यटक म्हणून केलेला नाही; तर धर्म-अभ्यास, प्रार्थना समाज व ब्राह्मसमाजाच्या विचारकार्याच्या प्रसारार्थ त्यांना विविध प्रदेशांना, शहरांना, राज्यांना, देशांना भेटी देण्याची संधी मिळाली, त्यातून हा प्रवास घडला. महर्षींनी या संधीचा उत्तमरीतीने उपयोग करून विचारपरिप्लुत असे प्रवासवर्णन लिहिले. एक धर्म-अभ्यासक, उपासक, भाषातज्ज्ञ, संस्कृती अभ्यासक, समाजनिरिक्षक, समाजसुधारक प्रवासाकडे, सबंधित देश-प्रदेश आणि तिथल्या लोकजीवनाकडे कसे पाहतो, त्यासंबंधीचा कसा विचार करतो, याचा एक उत्तम वस्तुपाठ म्हणजे महर्षी शिंदे यांचे सदर 'प्रवासवर्णन' होय. त्यांच्या या प्रवासवर्णनाने मराठी प्रवासवर्णनाच्या प्रांतात वाङ्मयीन आणि वैचारिकदृष्ट्या एक निश्चितच महत्त्वाची भर घातली आहे. हे प्रवासवर्णन म्हणजे सांस्कृतिकदृष्ट्या एक दस्तऐवजच म्हणता येईल.

## २.७ शब्दार्थ :

**फडताळ** - आलमारी, कपाट, वस्तू ठेवण्यासाठी केलेली मांडणी

**उत्क्रमण** - येणे-जाणे (उदा. लाटांचे येणे-जाणे)

**आनंत्य** - शाश्वतपणा, अपरंपारपणा

**अदृष्टपूर्व** - पूर्वी कधीही न पाहिलेले

**आदित्यवार** - रविवार

**उष्णोदक** - गरम पाणी

**छानी** - डामडौल, दिमाख, ऐट, छानछोकी

**पौरस्त्य** -पूर्वेकडील, प्राच्य

**दीनोद्धार** - दीनदुबळ्यांचा उद्धार करणे

**यदृच्छेने** - सहजपणे, आकस्मिकपणे

**अनुतापी** - पश्चात्ताप झालेला

**मुमुक्षू** - मोक्षाची इच्छा करणारा

**छळणा** - छळ

**ठाणवया** –दिवा ठेवण्याकरिता केलेली मोठी घडवंची

**सादिलवारी** – नैमित्तिक, आगंतुक किंवा किरकोळ खर्च,

## २.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### २.८.१ वस्तुनिष्ठ प्रश्न :

अ) महर्षी शिंदे यांनी बंगालची सफर कोणत्या समाजाच्या विचारप्रसारार्थ केली?

१. प्रार्थना समाज, २. सत्यशोधक समाज,

३. आर्य समाज, ४. ब्राह्म समाज

आ) महर्षी शिंदे यांनी कोणत्या आगबोटीने जलप्रवास केला?

१. सव्हाणा, २. पर्शिया,

३. केसर विल्हेल्मडर ग्रॉसी, ४. कँपानिया

इ) कोणते शहर पाहिल्यानंतर महर्षी शिंदे यांनी 'ही शेते म्हणजे केवळ बागच!' हे वाक्य उच्चारले होते?

१. मार्सेय, २. लंडन, ३. पॅरीस, ४. शिमोगा

ई) म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'प्रवासवर्णनात' किती लेख आहेत?

१. २० २. २२ ३. २४ ४. २६

उ) महर्षी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड् क्लासेस मिशन' अर्थात 'भारतीय निराश्रीत साह्यकारी मंडळी'ची स्थापना केव्हा केली?

१. १८ ऑक्टोबर १९०६, २. १३ डिसेंबर १८९९,

३. २२ जानेवारी १९२०, ४. १ जुलै १९०८

**उत्तरे :** अ. ब्राह्म समाज आ. पर्शिया इ. मार्सेय ई. २२

उ. १८ ऑक्टोबर १९०६

## २.९ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

१. 'प्रवासवर्णन' म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. 'प्रवास करणे ही माणसाची फार जुनी उपजत व मूलभूत प्रेरणा आहे' तुमच्या शब्दांत विशद करा.

३. ‘महर्षी वि. रा. शिंदे हे केवळ बोलके वा लिहिते सुधारक नव्हते, तर ते कर्ते सुधारक होते.’ विशद करा.

४. महर्षी वि. रा. शिंदे यांच्या ‘प्रवासवर्णन’ या पुस्तकाची तुम्हाला जाणवलेली वैशिष्ट्ये कोणती व का? स्पष्ट करा.

५. ‘स्वातंत्र्य आणि मोकळेपणा हे कॉलेजचे ब्रीद केवळ शब्दांतच नाही तर करणीतही आहे’ असे महर्षी शिंदे मँचेस्टर कॉलेजबद्दल का लिहितात?

**ब) लघुत्तरी प्रश्न :**

१. बर्टन खेड्यातील शाळेची कोणती वैशिष्ट्ये महर्षी शिंदे सांगतात?

२. चिंतनशीलता हे शिंदे यांच्या प्रवासवर्णनाचे एक वैशिष्ट्य आहे, थोडक्यात स्पष्ट करा.

३. महर्षी शिंदे यांच्या ‘प्रवासवर्णन’ पुस्तकातून कोणत्याप्रकारचे ज्ञान वाचकांना मिळते?

४. प्रवासवर्णनामध्ये प्रदेशाच्या चित्रणाला महत्त्व का असते?

५. महर्षी शिंदे यांच्या लेखनाचा कोणता विशेष तुम्हाला भावला व का?

## २.१० उपक्रम :

१. महर्षी वि. रा. शिंदे यांच्या कर्नाटकातील जमखिंडी या जन्मगावाला भेट देऊन प्रवासवर्णनपर लेख लिहा.

२. तुमच्या जवळपास असलेल्या एखाद्या ऐतिहासिक स्थळाला भेट देऊन तपशीलवार वृत्तान्त लिहा.

३. मराठीतील प्रवासवर्णनपर पुस्तकांची सूची तयार करा.

४. तुम्हाला आवडलेल्या प्रवासवर्णनपर पुस्तकावर एखाद्या मासिकासाठी सविस्तर लेख लिहा.

## २.११ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. ‘माझ्या आठवणी व अनुभव’ : विठ्ठल रामजी शिंदे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०१६.

२. भारतीय साहित्याचे निर्माते - विठ्ठल रामजी शिंदे’ : गो. मा. पवार, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पुनर्मुद्रण २००६.

३. ‘केल्याने देशाटन’ : संपादक : डॉ. स. गं. मालशे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे-नागपूर, पुनर्मुद्रण १९७६.

४. ‘प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार’ : वसंत सावंत, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पहिली आवृत्ती १९८७.

५. ‘अमेरिका’ : अनिल अवचट, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २००६.

६. ‘तीन मुलांचे चार दिवस’ : आदर्श पाटील, विकास वाळके व श्रीकृष्ण शेवाळे, साधना प्रकाशन, पाचवी आवृत्ती २०२१.

७. ‘माझा प्रवास’ – विष्णुभट गोडसे वाईकर, संपादक : मृणालिणी शहा, राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २००८.

८. ‘त्यांनी पाहिलेला भारत’ – के. सी. खन्ना, अनुवाद : भा. रा. भागवत, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, पुनर्मुद्रण २०१५.

❑❑❑

# घटक ३
# चित्रलिपी

**वसंत आबाजी डहाके**

## ३.० उद्दिष्टे :

विद्यार्थी मित्रांनो प्रस्तुत घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

१) कविता या प्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये लक्षात येतील.

२) कवीचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या साहित्यकृती यातील परस्पर संबंध लक्षात येतील.

३) वसंत आबाजी डहाके यांच्या कवितालेखनाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

४) डहाके यांच्या 'चित्रलिपी' या कवितासंग्रहाची आशयसूत्रे लक्षात येतील.

५) 'चित्रलिपी'या कविता संग्रहातील प्रतिमाविश्व आणि भाषा यांची वैशिष्ट्ये समजतील.

## ३.१ प्रास्ताविक

मराठी कवितेला प्रदीर्घ अशी परंपरा आहे. मध्ययुगीन कालखंडापासून या कवितेचा प्रवाह पाहिल्यास या लेखनप्रकारात अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. मध्ययुगात संत कविता, पंडिती कविता आणि शाहिरी कविता हे स्वतंत्र असे बंध कवितेला लाभले. त्यातही संत कविता आणि बहुतांश शाहिरी कविता त्यातील आंतरिक सामर्थ्यामुळे कालातीत संदर्भ घेऊन आलेली दिसते. इंग्रजी कवितेच्या परिचयाने मराठी कवितेचे स्वरूप आधुनिकतेकडे वळले. नंतरच्या काळात बदलत गेलेल्या कालावकाशाच्या संदर्भाने या साहित्यप्रकाराच्या आशय अभिव्यक्तीमध्ये मोठी स्थित्यंतरे झालीत. साठोत्तर काळात स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या भ्रमनिरासाच्या जाणिवेने उद्विग्न झालेल्या संवेदनशील कवींनी काळाचा बंडखोरपणाने, समग्रतेने शोध आणि वेध आपल्या कवितेतून घेतला. शिक्षणामुळे जागृत झालेल्या पिढीने स्वतःचे चरित्र, सामाजिक विसंगती, विकृती आणि विषमतेची जाणीव अत्यंत भेदक स्वरूपात आपल्या कवितेतून व्यक्त करण्यास सुरुवात केली. त्यातून महानगरी, ग्रामीण, दलित, आदिवासी जाणवेची कविता मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. वसंत आबाजी डहाके हे या साठोत्तर कालखंडातील एक महत्त्वाचे कवी आहेत.

## ३.३ विषय विवेचन

प्रस्तुत अभ्यासात आपण लेखककेंद्री अभ्यासपद्धतीत लेखकाचे साहित्यकृतीतून व्यक्त झालेले जीवनानुभव, लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व, त्याचा समकाल, लेखकाच्या लेखनप्रवृत्ती, मूल्यविवेक, समकालीन वाङ्मयीन वातावरण, लेखकाचे वाङ्मयाच्या इतिहासातील स्थान इत्यादी गोष्टींची चिकित्सा अपेक्षित असते. या अनुषंगाने वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी'चा अभ्यास करता येईल.

### ३.३.१ लेखक परिचय

वसंत आबाजी डहाके हे मराठीतील एक नामावंत कवी, कादंबरीकार, समीक्षक, चित्रकार आहेत. त्यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील बेलोरा या गावी झाला असून प्राथमिक शिक्षण गावातच झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी चंद्रपूरमधून तर पदव्युत्तर शिक्षण नागपूर विद्यापीठातून घेतले. त्यानंतर खाजगी आणि शासकीय महाविद्यालयात मराठीचे अध्यापन केले. एलफिन्स्टंट महाविद्यालय, मुंबई येथून ते निवृत्त झाले. त्यांची पहिली कविता १९६० मध्ये 'सत्यकथा' या आघाडीच्या मासिकातून प्रसिद्ध झाली. 'योगभ्रष्ट' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर 'शुभवर्तमान' (१९८७), 'शून:शेप' (१९९६), 'चित्रलिपी' (२००६), 'रूपांतर' (२०१६), 'वाचाभंग' (२०१७) आणि 'सहा दीर्घ कविता' (२०१८) इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. 'अधोलोक' (१९७५) आणि 'प्रतिबद्ध आणि मर्त्य' (१९८१) या कादंबऱ्या डहाके यांनी लिहिल्या आहेत. डहाके यांनी केलेले समीक्षा लेखनही महत्त्वाचे आहे. कविता म्हणजे काय? (१९९१), 'कवितेविषयी' (१९९९), 'समकालीन साहित्य' (१९९२), 'निवडक सदानंद रेगे' (१९९६), उपयोजित समीक्षा (१९९२), नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य (२००१), मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती (२००५) मराठी समीक्षेची सद्य:स्थिती (२०११), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र (२००७), 'यात्रा-अंतर्यात्रा' (१९९९) हे प्रवासवर्णनपर ललितगद्य २००० आणि मालटेकडीवरून (२००९) हे ललितगद्य प्रसिद्ध झाले. याशिवाय त्यांनी शालेय मराठी शब्दकोश, 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश', 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश', 'कविता विसाव्या शतकाची' ही महत्त्वपूर्ण संपादने केली आहेत. डहाकेंच्या सर्व लेखनामागे विसाव्या शतकातील सांस्कृतिक आणि सामाजिक परात्मभावाचे दर्शन घडते. त्यांचे समग्र साहित्य हे समकालीन मानवी जीवनाची शोकात्मता अधोरेखित करणारे आहे. 'चित्रलिपी' या त्यांच्या कवितासंग्रहाला साहित्य अकादमी दिल्ली या संस्थेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

आपल्या कवितेची निर्मिती आणि आशयविश्वाविषयी ते म्हणतात. 'माझ्या काही आवडी आहेत. त्यात चित्र आहेत, चित्रपट आहेत, रोजची वर्तमानपत्र आणि समाचार साप्ताहिक आहेत, इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल विकली सारखी साप्ताहिक आहेत, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास यातलं लेखन आहे. बाकी इतर ललित साहित्य देशी आणि परदेशी आहेच. मला असं वाटतं की, शुभवर्तमानपासूनची माझी जी कविता आहे, तिच्या घडणीवर या गोष्टींचा परिणाम आहे. बाकी जे काही आपल्या मनात चाललेलं असतं अवतीभवती जे घडत असतं तेही आहेच. कविता या सगळ्या गोष्टी मधून येत असावी' (मुलाखत, 'खेळ' जानेवारी २००८, पृ. ११) या त्यांच्या उद्गारातून त्यांच्या कवितेचे स्वरूप लक्षात येते. समकालीन वर्तमानात ज्या घटना घडत असतात त्यांचे प्रतिबिंब आपल्या कवितेतून, कवीच्या संवेदनशील मनाच्या संस्कारातून व्यक्त व्हावं, वास्तव आणि कविता यामध्ये कोणत्याही प्रकारचे अंतर असू नये, अशी आपल्या कवितेच्या आशय-अभिव्यक्तीविषयी त्यांची धारणा आहे.

### ३.३.२ कवितेची आशयसूत्रे

### ३.३.२.१ सामान्य माणसाच्या जगण्यातील दुःख जाणीव

चित्रलिपीतील कविता दोन शतकांच्या संधीकाळातील कविता आहे. आधीच्या कोसळत्या शतकाने सामान्य माणसांसमोर विविध प्रकारचे प्रश्न उभे केले आणि सामान्य माणसांना जगण्याच्या प्रवासात अनेक प्रश्नही पडू लागलेत. ग्रामीण अवकाशापासून महानगरापर्यंतच सर्वत्रच मानवी मूल्यांचा ऱ्हास होत गेला. मानवाचे क्रयमूल्यात रूपांतर होत गेले. राजकीय अधिसत्ता मानवी अस्तित्वाच्या मुळाशी येऊ लागल्या. पर्यावरणाची अपरिमित हानी होऊ लागली. याअशा वास्तवामुळे सामान्य माणसाची असह्य घुसमट होऊ लागली. संगणकीय क्रांती होऊनही विसाव्या शतकातील समस्या, दुःखे नव्या शतकात संपली नाहीत. अशा वर्तमानाची चित्रलिपी प्रस्तुत संग्रहात डहाके यांनी साक्षात केली आहे. वर्तमानाचे हे चित्र सुखावह नाही. प्रश्न, काहीच नाहीचं गाणं, सुगी, दात, थांगपत्ता, वर्तमानाविषयी काही विचार, जिकडे पहावं तिकडे, फुंकर, दाद, वाट, पत्र इत्यादी अनेक कवितामधून शोकात्म भावनेचे दर्शन घडते. प्रश्न ही कविता समकालीन माणसाच्या मनातील व्यथांचे उपनिषद्‌च आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारणारे नागरिक नकोसे झाल्याचा हा काळ आहे.

'प्रश्न' ही कविता समकालीन माणसाच्या मनातील व्यथांचे उपनिषद आहे व्यवस्थेविषयीचे अनेक प्रश्न सामान्य माणसाला पडत असतात. मात्र ते उच्चारण्यासाठी तितके धैर्य त्याच्या ठिकाणी नसते. सत्तेचा दाब, दहशत आणि विरोध यामुळे असे प्रश्न मनात येऊनही मुकाट व्हावे लागते. समस्या असूनही भेदरलेपणाने जगावे लागणे, ही शोकात्म जाणीव या कवितेतून व्यक्त झाली आहे. प्रश्न उपस्थित केला की प्रतिवादाच्या हजार शक्यता कशा निर्माण केल्या जातात, याचे मार्मिक वर्णन कवीने प्रस्तुत कवितेत केले आहे.

प्रश्न विचारू? उत्तर मिळेल? मनमोकळेपणाने बोलतील? कोण देईल उत्तर? उत्तर देण्याची

जबाबदारी घेईल कुणी?

की वाटाण्याच्या अक्षता लावतील? पाठ फिरवतील? हात झटकतील? कसला प्रश्न विचार म्हणतील?

अंगावर धावून येतील? आस्था आहे? भले पण आहे? प्रश्न विचारला की उडवा उडव? टाळाटाळ करतील?

अविश्वास दाखवतील? दार बंद करून घेतील? अपमान करतील? मुद्दामपणे वागतील? अळमळम करतील? (४)

प्रश्न विचारण्याच्या अशा शक्यतामधून व्यवस्थेचा मग्रूरपणा, सत्तेचा उन्माद आणि सामान्य माणसाचा आवाज दाबून टाकण्याची सत्तेची वृत्ती या प्रश्नांमधून व्यक्त होते कवी पुढे म्हणतो–

बरं प्रश्न तरी काय आहे? अयोध्येविषयीचा आहे काय? मग विचारू नको.

गुजरात विषयीचा आहे काय मग विचारू नको दहशतवादा विषयीचा आहे काय? मग विचारू नको शेतकऱ्यांच्या आत्महत्या विषयीचा आहे काय? मग विचारू नको

दिवसेंदिवस वाढत चाललेल्या असुरक्षिततेविषयीचा आहे काय? मग विचारू नको सुशिक्षितांच्या बेकारीविषयीचा आहे काय? मग विचारू नको

पिण्याच्या पाण्याविषयीचा आहे काय? मग विचारू नको

सरकारी धोरणाविषयीचा आहे काय? मग विचारू नको

सार्वजनिक नीतिमत्तेविषयीचा आहे काय? मग विचारू नको

राजकारणाविषयीचा आहे काय? मग विचारू नको

आदिवासी बालकांच्या अपमृत्यूविषयीचा आहे काय? मग विचारू नको

विचारू नको विचारू नको विचारू नको विचारू नको विचारू नको विचारू नको (पृ. ५ )

अशा विपरीत परिस्थितीत कवितागत निवेदक 'मले प्रश्न इचाराचाच हाये' असे म्हणून निर्धाराने व्यक्त होतो. राष्ट्रीय नेत्यांना, व्यापाऱ्यांना, शोषकाना तो प्रश्नांकित करू पाहतो. धर्म, राजकारण, व्यापारी वृत्ती यांनी जागतिकीकरणाच्या काळात धारण केलेले मूल्यविहीन रूप कवितेतून अवघड करू पाहतो. प्रश्न हे व्यवस्थेला उघडे पडणारे धारदार असे शस्त्र आहे. तेच शस्त्र सामान्य माणसाकडून हिसकावून घेण्याच्या राजकीय प्रवृत्तीमागील दांभिकता प्रस्तुत कवितेत कवींनी उघड केली आहे. अशा विपरीत वास्तवात सगळेच लोक त्रस्त आहेत. अशी अनुभूती कवी व्यक्त करतो. बहुतांशाच्या दहशतीच्या वास्तवामुळे कोणीतरी मुस्कटदाबी करावी अशी स्थिती उत्पन्न झाली आहे. आपली ओळख हरवत चालली आहे. वैचारिक मूल्य पायदळी तुडवली जात आहेत. माणसांना विस्मरणाची व्याधी जडावी अशी मानसिकता, रोगग्रस्तता सतत तयार केली जात आहे. या अभद्रकाळाविषयी कवी म्हणतो-

नागवणूकीची शेतं विखरून उध्वस्त होऊन पडलेली करड्या काळसर उजेडात

बटबटीत डोळ्यांचं बुजगावणं पाहतं सगळी वणवण तनमनांची लाही लाही

वेगवेगळ्या रंगांच्या झेंड्या लहरद आहेत जाळलेल्या घरांच्या अवशेषावर

आता कुणाकुणाचा वेध घेत येणारे दिवस येत आहेत याचा आदमास काही नाही. (पृ.८)

अशा अनिश्चित काळाविषयीचं हे आक्रमण कवीने व्यक्त केले आहे. काळ सुगीचा आहे पण भ्रष्ट इच्छांचे अमाप पीक उगवलेले आहे. वर्तमानाचे गल्लीबोळ अंधारलेले आहेत.

रस्त्यावर टाकून दिलेल्या मुलासारखा

पडलेला हा सगळा देश,

त्याच्या आसपास विखुरलेली आहेत किडलेली सहानुभूतीची कणसं (पृ.९)

असे सार्वत्रिक पोरकेपण मानवी अस्तित्वाला बधिर करणारे आहे. 'सुगी' या कवितेत कवी वरील उद्गार काढताना दिसतो. दात या कवितेतही वास्तवाच्या शोकात्मतेची प्रखर जाणीव कवीने व्यक्त केली आहे.

मुठीत धरलेलं बी मुठीतच फुटून झालेले अंकुर राग होतात

चहुकडे पसरतो विनाशाचं वारं मनातल्या दिव्यांच्या ज्योती मंदावत जातात

परिस्थिती खास पालटणारची भाषा तोत्री होते

आणि जिभेवर जमतो हाताशीचा पांढरा गाळ (पृ.११)

असे विराट हातशपण वाट्याला यावे अशी कोंडी काळाने निर्माण केली आहे. जगण्यातले अंर्विरोध कसे दूर करावेत असा प्रश्न संवेदनशील म्हणाला सतत ग्रासत राहतो. या काळाची अभद्रता व्यक्त करताना कवीने काळाचे वर्णन समर्पक शब्दात केले आहे.

गव्हाणीतल्या कुत्र्याप्रमाणे वागणारा काळ, तोंडाला पाना पुसत जाणारा काळ, आत आत पेटलेला जाळ (पृ.१२) असे काळाच्या अभद्रतेचे वास्तववादी चित्रकवी रेखाटतो. असंख्य यातनाने भरलेल्या काळाची ही चित्रलिपी कवितेच्या पानोपानी उलगडत जाते. सरत्या शतकाने जगण्याचा पूर्ण भ्रमनिरास करावा, पराभव करावा अपेक्षाभंग करावा याची यातनामय जाणीव येथे व्यक्त होते. कवी म्हणतो

मी जेव्हा मागं वळून पाहतो

या मावळत चाललेल्या शतकाकडे

तेव्हा बाजारबुणग्या लोकांचे दंगे पचवून

सुन्न पडलेल्या राजवटींची वेटोळी दिसतात;

विध्वंसाची एकसारखी पिकं काढून

नापीक केलेली पृथ्वी दिसते

कसलं फुंकर टाकल्यासारखं हे शतक उगवलं म्हणणारी

या हातावर कमवून त्या बोटावर पोट भरणारी

माणसं दिसतात (पृ.२०)

यंत्रयुगाने आणलेल्या आधुनिकतेतही माणसाचे जीवन समृद्ध झाले नाही. आधुनिकतेचे प्रकल्प मानवी कृत्यामुळे फोल ठरत गेले. अशी उत्तर आधुनिकतेची जाणीव डहाके यांनी या कवितेत रेखाटलेली दिसते.

**३.३.२.२ जगण्यातील परात्मता आणि अर्थशून्यता**

जगण्याविषयीची परात्मता, तुटलेपण आणि जगण्यातील अर्थशून्यता ही प्रमुख आशयसूत्रे डहाकेंच्या कवितेतून व्यक्त झाली आहेत. या जाणिवा अस्तित्ववादी प्रवृत्तींची नाते सांगणाऱ्या आहेत. भोवतालच्या

जगात आपल्या जगण्याला कोणतेही मूल्य नसावे, जगणे शून्यवत व्हावे, म्हणूनच ते निरर्थक होत जावे ही जाणीव डहाके यांच्या कवितेत सातत्याने प्रगटते. ही कविता शोकभावातून जन्म घेताना दिसते. म्हणूनच जगण्याचा पराभव, अस्वस्थता, अपेक्षाभंग यातून आलेली निराशा ही या कवितेची भावकेंद्र आहेत. वास्तव संवेदनशील माणसाच्या विकासाला खिळ घालते. 'वास्तव' या कवितेत कवी म्हणतो-

समोर अक्राळ विक्राळ राक्षस

आणि मागे खोल खोल समुद्र

आता काय करायचं म्हणून

विचार करीत उभा राहिलो

तर ज्या वाळूवर मी उभा होतो

तीही पायाखालून सरकत चाललेली (पृ.३९)

अशा अस्थिर आणि असुरक्षित वास्तवात जगण्याची कुंठितता हतबल करत जाते.

आजकाल मी बाहेर येतच नाही

जमिनीच्या आतच घर करून बसून राहतो

तिथं मला सुरक्षित आणि स्वतंत्र वाटतं हे खरंच

जमिनीखाली असं पुरून घेण्याचं वास्तव (पृ.३९)

ही परात्मतेची तुटलेपणाची जाणीव कवितेचा एक महत्त्वाचा विशेष असलेला दिसतो.

परात्मकतेत संवेदनाशील मनाचा स्वशी संवाद होत राहतो. तो एक चिंतनगर्भ प्रवास असतो. बाहेरच्या विश्वातील संबंधशून्यता त्याला अंतर्मुख करते आणि मनातील कोलाहल तडफड यांना शोधलेला तो एक पर्याय उरतो 'उच्चार' या कवितेत कवी म्हणतो-

मी हळूहळू आपल्याशीच

गाणे गुणगुणतो

अन्यथा निभाव कसा लागणार

या कोलाहालात

मला हवा असतो एक आतला कोपरा (पृ.४०)

अंतर्मनातील संवादासाठीही कवीला भाषेचाच आधार हवा असतो. आपला तडफडता उच्चार ठेवता येईल असा एखादा तळहात कवीला हवा असतो. पण आपणच रचलेल्या एखाद्या वाक्याचा आधारही सापडत नाही अशी शोकात जाणीव कवितेतून साकारत जाते. 'क्रियापदे' या कवितेत तुटलेपणाचे, परात्म होण्याचे

संवेदन व्यक्त झाले आहे. आंतरिक असह्य तडफड आणि क्रियाशून्य होत जाण्याचा गोळीबंद अनुभव ही कविता देते. निराळे होताना डोळ्यात जाळे जमते, वेगळे करताना गळे आवळल्यासारखे होते. किंवा विभक्त होताना रक्त गोठते, अशा काव्यात्म विधानातून शोकात्मक भावच उजागर होताना दिसतो. 'चरित्राची साधनं' या कवितेत कवी अस्तित्वाची निरर्थकता, अर्थशून्यता सुचित केली आहे. मृत्यूनंतर कवीची केवळ राखच मागे उरेल असे कवी अत्यंत निराशाजनक उद्गार काढताना दिसतो.

### ३.३.२.३ महानगरीय जाणीवा

डहाके यांची कविता गाव ते महानगर असा विशाल अवकाश व्यापून राहिलेली दिसते. वर्तमान देशकाल परिस्थिती हे त्यांच्या कवितेचे संदर्भबिंदू असल्यामुळे देशाचा भौगोलिक पट तेथील विविध प्रकारच्या पर्यावरणीय आणि सांस्कृतिक संदर्भानी त्यांच्या कवितेत चित्रित झाला आहे. सामाजिक घटितांना आपल्या कवितेत सामावून घेताना विसंगत, विकृत आणि अमानवीय घटनाविषयी प्रतिवादाची भूमिका त्यांनी घेतली आहे. अशा घटनामागील वृत्तींचा उपहास उपरोधाच्या अंगाने ते प्रतिवाद करताना दिसतात. महानगर, घडण, संत्रस्त शहर पातं इत्यादी कवितांमधून नागरी जगण्यातील अस्वस्थता, तणावग्रस्तता ते व्यक्त करताना दिसतात. 'महानगर' या कवितेत महानगरातील रात्रीच्या लखलखत्या दुनियेतील व्यवहार आणि माणसांच्या मनातील असंख्य चिंता यातील विरोधाभास त्यांनी व्यक्त केले आहेत. महानगरातील यंत्रांचे विश्व, त्यांनी मानवी जीवनावर केलेले अतिक्रमण, दिवसभरांच्या यातना चिंतानी त्रस्त झालेली सामान्य जनता, एकाकीपण, हिंसा, चंगळवादीवृत्ती अशा माणसांच्या दृश्य अदृश्य व्यवहारावर ही कविता भाष्य करते. या कवितेतल्या काही ओळी महानगराचे महाकाय ऑक्टोपसी रूप उघड करणारे आहेत. उदा. वीज दिव्यांच्या झगमगत्या झुंबरासारखे महानगर लखलखून उठेल / पाखरे काही काळ संभ्रमात असतील रात्र झाली दिवस उगवला की काही / लोकल गाड्या गिळत जातील माणसांना आणि रस्ते स्वयंचलित वाहनांना / गजबजतील खानावळी उपहारगृहे मध्यालयांना कंठ फुटेल / समुद्र काठावर अजूनही कोणीतरी एकाकी बसून असेल (पृ.७) महानगरातील हे रात्रीचे विश्व सुखावह नाही. ते चिंता आणि चंगळवाद यांनी ग्रासलेले आहे. शुद्ध हरपलेले आहे. अर्धवट मृतप्राय झाल्यासारखे आहे. हे वास्तव आधुनिक काळाची अभद्रताच व्यक्त करताना दिसते. 'तुझं हे शहर' ही कविता मानवी अस्तित्वाची शूद्रता मूल्यहीनता उघड करणारी आहे. महानगराला सूक्ष्मदर्शकाखाली ठेवून त्यांच्या पेशीपेशीची नोंद घ्यावी तसे हे शहर कवीने आपल्या आस्तेच्या केंद्रावर ठेवले आहे. कवी प्रस्तुत कवितेत थेट वर्तमानाविषयी संवाद साधतो. शहरी व्यवस्थेविषयी आपला नकार नोंदवतो.

तुझी मैदाने गजबजलेली व्याधींनी
तुझे बागबगीचे खलबतं- कारस्थानांनी
तुझे रस्ते निर्दय आणि खुंशी डोळ्यांचे
तुझ्या शहरातले हे सूर्यांसारखे दिवस

कापत जातात माझं अस्तित्व

माझं जगणं तोंड चुकवत हिंडतं तुझ्या शहरातून

आणि तरीही अटळ अटळपणे पोहोचतात पावलं

रोज कत्तलीच्या जागेवर

तू बाजारपेठ आहेस, तू कत्तलखाना आहेस, तू नरक आहेस पृथ्वीवरचा

असं म्हणून मी तुला शाप देतो

आणि अधिकच गुंतत जातो तुझ्या जाळ्यात (पृ.४७)

महानगरी व्यवस्थेच्या अनुषंगाने कवीने वर्तमानाची क्रूरता, भीषणता, अभद्रता उघड केली आहे. मात्र कवी म्हणतो

तरीही मी स्वीकारले तुला कातडीवरील रोगाप्रमाणे

तुला नाकारून पाऊल ठेवावं अशी दुसरी जागाच नाही

तुझ्याशी माझं जगणं पण मरण निगडित आहे (पृ४८)

अशा कुंठीत मनोवस्थेचे चित्र येथे आले आहे. महानगरातल्या प्रत्येक घटकाला आलेली संत्रस्तता 'संत्रस्त शहर' या कवितेत कवीने व्यक्त केली आहे. महानगराचे हे कंटाळवाणे, दुखरे, अस्वस्थता देणारे, जगण्यातला आनंद हिरावून टाकणारे यंत्रवत जीवन कवी नाकारतो. पण त्यातून सुटता ही येत नाही, अशी खंत व्यक्त करतो. आधुनिकतेची केंद्र म्हणून विस्तारत केलेली ही महानगरी व्यवस्था मर्ढेकरानंतर अनेक कवींनी आपल्या आस्तेच्या केंद्रावर आणली. माणसा माणसातील संबंधशून्यता आणि जगण्यातील संदर्भशून्यता डहाके यांनी कवितेतून टिपली आहे. त्यांच्या कवितेत अशा अंतर्मुख आणि बहिर्मुख संदर्भामुळे ही कविता लक्षणीय ठरत जाते.

### ३.३.३.४ कवी कविता आणि काव्यनिर्मिती विषयीचे चिंतन

प्रस्तुत कवितासंग्रहात डहाके यांनी कवी, काव्य निर्मिती आणि काव्यानुभव याविषयीचे चिंतन मांडले आहे. जगणे आणि कविता निर्मिती करणे, अनुभव घेणे या गोष्टींना ते महत्त्व देतात. किंबहुना कविता लिहिणे हेच जगणे ही त्यांची निष्ठा असलेली दिसते. भक्ती, धूळमाती, रूपांतर, शब्द प्रतिशब्द, क्रियापदे, कवितेचा अर्थ, उच्चार, वाक्य जगण्याच्या प्रतिमा, लिहिणं, झाडाचे गाणे, बखर या कवितामधून डहाके यांनी कविता विषयक चिंतन मांडलेले दिसते. या कवितामधून उद्विग्नता, निराशा, उदासी इत्यादी भाव व्यक्त झालेले दिसतात. बखर या कवितेत ते म्हणतात–

कवितेची पट्टी बांधून जखम झाकणे

यमक प्रासांचा रुणझण नाद ऐकणे

भावना विकारांच्या तकलोपी शब्दांची कच्ची घरे बांधणे

आपल्या अस्तित्वाचा तुकड्या तुकड्यांचे काम करीत

भाषेच्या चढण्याचा आवाज ऐकणे

याशिवाय दुसरे काहीच नव्हते करण्यासारखे (पृ.१)

जगण्याला झालेली जखम झाकण्यासाठी कविता हाच पर्याय उरावा जगण्याचे अन्य मार्ग बंद व्हावेत याविषयीची निराशा येथे आली आहे. पाखरांच्या गाण्यातील सुरावट, मुक्तता, निरागसता आणि स्वभाविकता कवीला अपेक्षित होती. मात्र अपेक्षाभंगाने भरलेल्या या भवतालातून निराशेचे अमाप पीक उगवले. 'भुकटी' या कवितेत ही निराशा अतिशय टोकदारपणे आली आहे. ज्या शब्दांसाठी कधीकाळी आतडे जाळले होते, ते शब्द आता निसटून गेले असल्याची खंत कवी व्यक्त करतो.

शब्द फोडला की त्यातून

अर्था ऐवजी एखादा कीटक निघतो,

असे झाले सगळे शब्द कीटकांनी बुजबुजलेले आढळले

ट्रंकेच्या तळाशी जतन करून ठेवलेल्या वहीतले (पृ.१०८)

सामाजिक संवेदनशीलता जपण्यासाठी कविता, काव्यनिर्मिती यावर कितीही विश्वास असला तरी समकालीन वास्तवापुढे कलावंतांना पराभूत व्हावे लागते आहे. वास्तव इतके कठोर असल्याचा प्रत्यय हतबल करीत जातो, या दृष्टीने 'रूपांतर' ही कविता महत्त्वाची ठरते कवी म्हणतो–

मी कोणत्याही शब्दांनी करू शकत नाही

दगडी प्रत्यक्षाचं कोमल वास्तवात रूपांतर

काल आणि अवकाश यांच्या सीमांतून सुटून

मला जायचं होतं एका मोकळ्या प्रदेशात

जिथे सगळं सत्य फुलांसारखं कोमल असतं

आणि पहाटेच्या उजेडासारखं निर्मळ

पण वाट्याला आलेला जाळून काढणारा सूर्य

आणि भाजून काढणारी जमीन

मी स्वीकारलं हे प्रारब्ध स्वीकारावर तसं

शब्दांचे निखारे ओंजळीत घेऊन

मी केली परिक्रमा निरार्थक (१००)

शब्दांचे निखारे उधळीत घेऊन परिक्रमा केली तरी निरर्थक ठरल्याचा प्रत्यय कवीला येतो. कारण  वास्तव दगडी संवेदनहिन आणि पाशवी, तनमनाला भाजून काढणारे प्रखर आहे. असा प्रत्यय कवीला येतो. 'झाडाचं गाणं' या कवितेत समकाळाविषयी सृजनाच्या शक्यतांच्या आड येणाऱ्या वास्तवाचा निर्देश कवीने केला आहे.

झाडातून सळसळ आवाज होतोय

झाड अतिशय उंच स्वरात गातोय

मी कोंडून ठेवतोय झाडाचं गाणं माझ्या आत गच्च

अलीकडे सांपरात आज-काल सद्यस्थितीत (पृ.२)

जगण्यातली स्वाभाविकता हरवून जाते. वर्तमानकाळात संवेदनशून्यतेचा प्रवास करावा लागतो. यावर निसर्गाशी सम साधून जगण्यापलीकडे आपल्या हाती काहीच उरत नसल्याची खंत येथे व्यक्त होताना दिसते. 'जगण्याच्या प्रतिमा' या कवितेत कवी म्हणतो-

कवितेच्या साध्या किंवा अलंकृत

कोणत्याही शब्दांनी झाडाचं पान देखील हलत नाही

जेव्हा आपल्या सभोवतालचं जग आपल्याला

हळूहळू गिळून टाकत असतं (पृ. ३)

कवीचे अस्तित्व मिटून जाते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर या जगण्याच्या प्रतिमाही मिटून जातात. कवीचे डोळे वर्तमानाचा वेध घेतात. जगण्याची चित्रलिपी वाचत असतात. मात्र ते मिटले की केवळ अंधार उरतो, याची खंत कोणाला नसते. याविषयीची निराशा कवी तेथून व्यक्त झाली आहे. कवितेचा अर्थ आणि उच्चार या दोन कवितांमधून डहाके यांनी आशा निराशेचाच अनुभव साक्षात केला आहे. आपल्याला कोणताही शब्द कसला कसलाही आधार देऊ शकत नाही, असे विश्वाच्या कवितेचे अर्थनिर्णयन कवितागत निवेदक करताना दिसतो. आशा निराशाजनक वास्तवात स्वतःशीच गाणे गुणगुणल्याशिवाय कोणताच पर्याय उरत नाही कवी म्हणतो.

मी हळूहळू आपल्याशीच गाणे गुणगुणतो

अन्यथा निभाव कसा लागणार या कोलाहालात

मला हवा असतो एक आतला कोपरा

जिथे मला माझा एखादा शब्द हळुवारपणे जपता येईल (पृ.४०)

वास्तव हे कठोर होत जाते की आपला तडफडता उच्चार कोणाच्या तळहातावर ठेवता येत नाही आणि आपणच रचलेल्या वाक्याचा आधारही आपल्याला सापडत नाही, इतकी भणंगता वाटायला येते. या साऱ्या कविता कवी, शब्द, प्रतिमा, काव्यर्थ या विषयाच्या चिंतनातून डहाके समकाळाची शोकात्मता, संवेदनशील व्यक्तीच्या जगण्यातील निरर्थकता, हतबलता व्यक्त करताना दिसतात. कोसळत्या शतकाचा भाष्यकार ही डहाके यांची प्रतिमा येथेही प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसते. विचारवंतांना आलेली निराशा, कराल वास्तवासमोर सहन करावी लागणारी हतबलता, मुकेपणा याविषयीचे संयत शब्दात केलेले हे निवेदन, हा त्यांच्या कवितेचा गाभाभूत घटक आहे. कवी शब्दांशिवाय जगू शकत नाही आणि शब्दकवीला शाश्वत आधार देऊ शकत नाही, याविषयीची तणावग्रस्त अस्वस्थता व त्याविषयक अनुभव वरील कवितामधून कवीने व्यक्त केले आहेत.

**३.३.३.५ राजसत्ता, लोकशाही मूल्यांचे पतन**

डहाके यांच्या कवितेविषयी विलास सारंग यांनी असे लिहिले आहे की, 'डहाकेंच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे की त्यांच्या कवितेत सामाजिक व विशेषतः राजकीय वास्तवाचे भान सतत कार्यरत असते. शासनाची यंत्रणा व हुकूमशाही व्यवस्था कशा तऱ्हेने लोकांना वागवते याचे परिणामकारक चित्र डहाके यांनी अत्यंत कल्पनाशक्ती युक्त पद्धतीने करतात. त्यात रूढ पद्धतीचा शाळकरी वास्तववाद नसता' (सारंग विलास, अक्षरांचा श्रम केला, पृ. १२१) विलास सारंग म्हणतात, त्याप्रमाणे डहाके यांच्या कवितेत राजकीय वास्तवाचे भान नेमकेपणाने प्रगट झालेले दिसते. लोकशाहीचे हुकूमशाहीत रूपांतर झाले आहे काय, असा प्रश्न पडावा इतके विखारी राजकीय वास्तव डहाके रेखाटताना दिसतात. लोकशाहीच्या नावावर सुरू असणारी मुस्कटदाबी, राजकीय पद्धतीत तिला लागलेले हुकूमशाहीचे वळण, लोकशाही राज्यात पक्षांतर्गत बळावलेली हुकूमशाही आणि हे असे अनेक मानवतेला काळीमा असणारे पण खरे असणारे वर्तमानाचे चित्र 'चित्रलिपी'तल्या अनेक कवितांमधून रेखाटले गेले आहे. (खेळ, पृ.९८) प्रश्न, कार्यकर्ते, व्यवहार, मी नुसत्या येरझरा घालत राहतो, वास्तवाद, उमेदवार निवडीची बैठक इत्यादी कवितांमधून समकाळाचे विकृत राजकीय वास्तव रेखाटले गेले आहे. सामान्य माणसांना सत्ता साधा ब्र उच्चारू देत नाही, याचे सूचक वर्णन प्रश्न या कवितेत आले आहे. अयोध्या, गुजरात दंगल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेकारी, धार्मिक दंगली, हिंसा, सरकारी धोरणे इत्यादी इत्यादी विषयी प्रश्न विचारणाऱ्यालाच नामोहर केले जाते. कार्यकर्ता ही नवी जमात आधुनिक राजकीय व्यवस्थेची प्रस्तुती आहे. सामान्य माणसांसमोर मांजरासारखे गुरगुरणे आणि नेत्यांसमोर जिव्हा मोडल्यासारखे मूक राहून स्वार्थ साधू पहाणे अशी नवीन नीती आखली जाते. पण

अध्यक्ष बाहेर निघून जातो मुक्या गेंड्यासारखा
कार्यकर्त्यांचे गाठोडे आपल्यामागे ओढत
खोलीतल्या फरशीवर वळवळत असतात
कार्यकर्त्यांच्या जिभांचे तुकडे (पृ.२२)

प्रस्तुत ओळीमधून कार्यकर्त्यांना विविध आमिषे दाखवून आपल्यापाशी बांधून ठेवणे आणि त्यांनाही बोलायला न देण्याची मग्रुरी राजकीय नेतृत्वाकडे असलेली दिसते. नेता गेंड्याच्यासारखा संवेदन शून्य असतो तर कार्यकर्त्यांच्या जिभांचे तुकडे खोलीतल्या फरशीवर वळवळत असतात. कार्यकर्त्यांची तडफड, वळवळणे आणि प्राणहीन होणे अशी लोकशाहीतील मूल्यहीनता येते अधोरेखित होते. उलट भ्रष्ट आणि मग्रूर राजकारणी, त्यांची कार्यकर्त्यांना मिळणारी अमानुष वागणूक या कवितेतून चित्रित होताना दिसते. 'उमेदवार निवडीची बैठक' या कवितेत अशा राजकीय नेतृत्वाचा उपहास डहाके यांनी केला आहे. राजकीय व्यवस्थेत सामान्य माणूस क:पदार्थ आहे, नगण्य आहे. त्याचे प्रश्नही भिन्न महत्वाचे आहेत. मात्र राजकारणी व्यक्ती लोकशाहीच्या आडून त्यांच्याच आधारे आपली सत्तेची पोळी भाजून घेताना दिसतात. कवी म्हणतो

त्यांच्यासमोरचे प्रश्न बिकट आहेत
त्यांच्या समस्या जीव घेणे आहेत
तुमचं ठीक आहे तुम्ही कुठेही मिळू शकता
त्यांना हवी आहे बुड टेकायला एक लहानशी
शक्यतो कायमची
त्यावर ती बसतील आणि निश्चिंत मनाने तुमचाच विचार करतील
आता ते वाट पाहत आहेत
वरचा हा त्यांच्या माथ्यावरून फिरला
की ते तुमच्याकडे धाव घेतील (पृ.२६)

निवडणुकीचे तिकीट मिळण्यामागील राजकारण आणि वरिष्ठांची करावी लागणारी लाचारी याचे रेखाटन प्रस्तुत कवितेत आले आहे. एकदा निवडणुकीचे तिकीट मिळाले की सत्तापिपासूना सामान्य मतदार आवडू लागतात. अन्यथा त्यांच्या जीवनाशी त्यांची कोणतीच बांधिलकी नसते, याविषयीची खंत ही कविता उपस्थित करते. राजकारणाच्या अडून घृणा, हिंसा यांची बीजे पेरली जातात. वस्त्या उद्ध्वस्त केल्या जातात. भ्रष्टाचारांची पेरणी सतत केली जाते. अशा वास्तवाचे वास्तववादी चित्र या कवितेत रेखाटले गेले आहे. समकालीन राजकीय वास्तवाचे, राजकीय प्रवृत्तींचे हे चित्र डहाके यांच्या कवितेचा प्रमुख पैलू आहे. आधुनिक काळात समाजाच्या प्रत्येक घटकाचे जीवन राजकारणाने कसे प्रभावित केले आहे, लोकशाहीचे इतके अधिक पतन आधीच्या कोणत्याच काळात झाले नव्हते, संवेदनशील मनाला त्रस्त करणारी ही जाणीव प्रस्तुत संग्रहातील अनेक कवितांमधून डहाके आणि रेखाटली आहे

**आत्मगत जाणिवांचे प्रकटन**

आत्मनिष्ठता आणि आत्मनिवेदन हे डहाके यांच्या कवितेचे लक्षणीय पैलू आहेत. कवितेच्या संदर्भात आत्मनिष्ठता हा कवितेचा प्राणभूत घटक मानला जातो. भारतीय संत कवितेतही आत्मनिष्ठता संतांच्या

चरित्रात्मक तपशिलातून आणि भक्त या भाषिक चिन्हांच्या संदर्भातून व्यक्त झालेली दिसते. ज्ञानेश्वरांसारख्या तत्त्वप्रधान कवीलाही आत्मनिष्ठ जाणीव व्यक्त करणे टाळता आलेले नाही. डहाके यांच्या कवितेत गाव, शेत-शिवार, मनोविश्वात साठवून ठेवलेल्या व्यक्ती, प्रवासात भेटलेली गावे, क्षेत्रे, पाहिलेली स्थळे याविषयीचे खाजगी वाटावे तसे अनेक विषय चित्रित झाले आहेत. काही कवितांमधून कवी विश्व नियंत्याशी ही संवाद साधताना दिसतो. कसर, चारा, कोंडवाडा, बेवनाव, पालुपद, मूग, बचावाचा मुद्दा, आत्मगत, चिदंबरम एक, व दोन, बेलकुंड, मनोरा, सांभाळणारे हात, वानप्रस्थ, चक्रव्यूह, पाखरं, बैलांच्या डोळ्यात, टाटा मेमोरियल हॉस्पिटल मधून वावरताना, माळेश्वर, भोमाड, चक्कीवाला इत्यादी कवितामधून डहाके यांनी आत्मनिष्ठ जाणिवा व्यक्त केल्या आहेत. मनाची अस्वस्थता, निराशा, उद्विग्नता, हाताबलता, सामान्य माणसांच्या दुःखाने आलेल्या व्यथा इत्यादी मनोवस्थांचे प्रगटीकरण वरील कवितामधून झालेले दिसते. अतिताशी संवाद किंवा अतीताचा प्रत्ययही एक पैलू डहाके यांच्या आत्मनिष्ठ कवितेतून प्रत्ययाला येतो. आपल्या वाट्याला खरजेसारखा रोगग्रस्त वर्तमान आल्याची खंत ते कसर कविते व्यक्त करतात. म्हणतात

मला असायचं होतं / काचेसारखं पारदर्शक / उजेडाचं समृद्ध स्थळ /

पाण्यासारखं नितळ / तर होत जातो बोबडी वळलेल्या ओठासारखा (पृ. १०)

काळाने केलेल्या अपेक्षाभंगाचे दुःख ते येथे रेखाटताना दिसतात. आपण चरायला सोडलेली गुरे आहोत, आपल्याला केवळ आश्वासनांचा चारा खाऊ घातला जातो, विचारांचा श्रेष्ठ कडबा भरवला जातो, अशी अस्तित्वाची निरर्थकता ते 'चारा' या कवितेत व्यक्त करतात. लहान बालकांचे काळवंडलेले भावितव्य 'कोंडवाडा' कवितेत आले आहे. प्रस्तुत वर्तमानात आपली कोणतीही कृती अगदी निरर्थक आहे अशी खंत ते 'अकर्मण्यता' या कवितेत मांडतात. मी अगतिक आणि भयग्रस्त आपल्या इतरांच्या ऋणांच्या साखळ्यांनी जखडलेला (पृ.४४) अशा अवस्थेत आपण आपल्या वंशजाने काही देऊ शकत नाही, याची हतबलता ते पालुपद या कवितेत रेखाटतात. जगण्याच्या विळीवर रोज अनेकांचे जीव कापले जातात, त्यांच्या वेदना भाज्यांच्या रूपकातून विळी या कवितेतून त्यांनी मांडले आहेत. भोमाड, चिदंबरम, मारळेश्वर या स्थलवाचक कविता त्यांच्या आंतरिक कल्लोळाची जाणीव करून देतात. कोंबड्या बकऱ्यांचे बळी देणारी, जगण्याच्या तापाने फडफडलेली अंधश्रद्धाळू लोक, प्राण्यांचे आक्रोश जिथे तिथे ऐकू येतात अशा चिदंबरमचे वर्णन डहाके यांनी चिदंबरम या कवितेत केले आहे. डहाक्यांच्या काही कवितांमधून विश्व नियंत्याशी संवाद साधला आहे. मात्र ही जाणीव धर्मजाणिवेत परावर्तित होत नाही. येथे ईश्वराच्या अस्तित्वाविषयीची शंका आहे, वर्तमानाच्या विविध व्यापतापाचे गार्हाणे आहे, तर कधी ईश्वरी अस्तित्वाचा शंकास्पद अनुभव आहे. अशा विविध रूपात ही कविता आलेली दिसते. 'सांभाळणारे हात' या कवितेत ते म्हणतात

शतकांच्या ओसाडीतून

मी हिंडत आहे तुला हाक मारीत.

माथ्यावरचा झराळता सूर्य

माझ्या गळ्यापासून आतड्यापर्यंत
फिरवत आहे तीक्ष्ण सुरी
भूमीवर पोळत असलेली पावलं
तुझ्याच दिशेने पडत आहेत की नाहीत;
मस्तकातल्या झणझणाटात
ऐकू येत नाही काहीही
जळत असलेल्या बुबुळासमोर मृगजळ.
तुझा मागमूस लागत नाही कुठंही
तुझी एखादी खूण, पावलांचा ठसा, ओळखीचा शब्द
काहीही नाही, की हाच आहेस तू
हा सर्वांग वेढून टाकणारा खोल बेंबीपर्यंत पोहोचणारा जाळ?
भेंडाळलेले पाय देतील दगा
तेव्हा येतील अवचित या जळत्या पसाऱ्यातून तुझे सांभाळणारे हात? (पृ.६३)

जगण्यातली अगतिकता या कवितेत तीव्रतेने व्यक्त होताना दिसते. त्याचप्रमाणे ईश्वराच्या अस्तित्वाविषयीची शंकाही आहे. पण कदाचित त्याच्याच सांभाळणाऱ्या हातामधून आपल्याला दिलासाही मिळेल, अशी एक शंकास्पद जाणीवही व्यक्त होताना दिसते. मारळेश्वर या कवितेत कवी डोंगरातील निसर्गाचा अनुभवातच मारळेश्वराचे रूप पाहतो. तर 'भोमाड' या कवितेत वारूळालाच देवी मानलेल्या कोकणातल्या मंदिरात जाऊन आल्यावर हे विश्व भोमाड असल्याचा अनुभव येतो. कवी लिहितो

वाटेल, त्या अफाट वारुळात भोमाडात
वस्ती करून असलेली आम्ही मुंगी माणसं
आणि त्याच विसाव्यासाठी येणारा गगनघनभुजंग
मग भूमीला फुटणाऱ्या हजार जिभा
आणि वाटलं या अवाढव्य भूमाडात
आपण किती शूद्र आहोत तेव्हा जाणवलं
कोणत्यातरी अदृश्य जिभेचा स्पर्श माझ्या
कपाळाला होत आहे (पृ. ९५-९६)

विश्वातल्या अदृश्य शक्ती विषयीचे हे अनुभव आत्मनिष्ठ असले तरी एकूणच ईश्वरी धारणा व्यक्त करणारे आहेत. 'आई आणि तात्याजी' ही अत्यंत खाजगी अनुभवावर लिहिलेली कौटुंबिक जाणवेची कविता आहे. आई-वडिलांच्या वृद्धापकाळातल्या एकाकी आयुष्यावर ही कविता प्रकाश टाकते. 'चरित्राची साधनं' या या शेवटच्या कवितेत मरणोत्तर छापून येण्यासाठी काही शिल्लक ठेवले नाही, इच्छा, वासनाही नाहीत. केवळ हिंदू असल्यामुळे राख शिल्लक राहील, असे कवी उपहासाने म्हणतो. डहाके आत्मनिष्ठ अनुभवांना तटस्थपणे व्यक्त करताना दिसतात. अशा अनुभवांना काव्यरूप देताना कवितेचे कवितापणही जपतात प्रतीक प्रतिमांच्या वापराने तिचा रूपबंध अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. काळ आणि परिस्थितीचे वाचन हा त्यांच्या एकूणच अनुभूतीचा महत्त्वाचा पैलू असल्याचे जाणवते. त्याविषयीच्या अतिशय सूक्ष्म अशा तपशिलाने त्यांची कविता समृद्ध होताना दिसते.

**३.३.३.६ प्रतिमाविश्व, भाषा आणि रचनाविशेष**

डहाके यांची कविता प्रतीक प्रतिमांनी समृद्ध झालेली आहे. प्रतिमा म्हणजे कवीच्या इंद्रिय संवेदनांची खूण होय. म्हणजेच प्रतिमाना कवींनी दिलेले अर्थ असतात. नाद, स्पर्श, गंध अशा पंचेद्रियातून घेतलेल्या अनुभवावर तसेच निसर्ग, संस्कृती, अधिभौतिक वास्तव, साहित्यविश्व इत्यादीमधून कवीने कवितेच्या आशयाला समृद्ध करण्यासाठी प्रतिमांची निर्मिती केलेली असते. अशा अनेक प्रतिमा डहाकेंच्या भाषेतून आलेल्या दिसतात. जंतू, किडे, काळोख, झाड, समुद्र या पारंपरिक प्रतिमा असल्या तरी कवितेत नव्या अर्थाने आल्या आहेत. किडा ही प्रतिमा 'चित्रलिपी'मध्ये वारंवार योजली गेली आहे. शूद्र इच्छांचे शूद्र कीटक, तू म्हणजे महाकाय कीटक आहेस, काळोखात झोपी गेलेले छोटे कीटक, अनेक पायांचा किडा सरकत जावा आपल्या उखाणालेल्या जमिनीवरून तसा सूर्य या प्रतिमा जीवानाची शूद्रता व्यक्त करतात. गंजलेला समुद्र, कापलेल्या वनस्पतींच्या अवयवांसारखे दिवस, पाखरांची ओळ, कंटाळलेलं टेबल, शिणलेल्या खुर्च्या, जाळीत अडकून गुरगुरणारा पंखा, खर्जेसारखे वर्तमान, वर्तमानाचा क्षणभंगुर कागद, बोबडी वळलेले ओठ, माझ्या अस्तित्वाचा उकिरडा, भ्रष्ट विचारांचे तण, शतकांची पडीक भूमी, वास्तवाचा विस्तव, भयसूचक वर्तमान, विचारांचा शुष्क कडबा, आम्ही चरायला सोडलेली गुरे, काळोखाचे खिळे, कौलावर टेकलेले घुबड, शतकांचा कोंडवाडा, सूर्याचा गिधाडी डोळा, काळाच्या पंखांचा फडफडाट, काळाचे दात रुतलेले, वर्तमान केविलवाणी ज्वारी, हिरमुसलेले गहू, फीकट पडलेली बाजरी या साऱ्या प्रतीमातून वरील आशयसूत्रे व्यक्त होताना दिसतात.

चित्रलिपीमधील साऱ्याच कविता मुक्तछंदातील आहेत. अनेक कविता गद्यप्रायतेकडे झुकलेल्या आहेत. या आपल्या कवितेच्या रचनेविषयी डहाके म्हणतात की, 'चित्रलिपीतचं उदाहरण घेतलं तर रूढ पद्यात्मतेला नाकारत पद्यात्मता आणि काहीसा लिरिकल- अँटिलिरिकलपणा आलेला आहे. चित्रलिपीतल्या प्रश्न, महानगर, काही नाहीच गाणं, थांगपत्ता इत्यादी कवितामध्ये लिरिकल अँटिलिरिकलपणा घटक आढळतील. गझलचा फॉर्म वापरून त्या कविता गझल होणार नाहीत. म्हणजे न-गझल होतील. अशा काही रचना आहेत. मी पोएटिकनेस घालवीत नाही. लिरिकलिटी घालवतो. पण त्यात मी पूर्ण यशस्वी झालो नाही. मला रोजच्या बोलण्यापर्यंत यायचं आहे. ती रचना कविता आहे की ललित लेख आहे की कथा आहे

की कादंबरी आहे याचा संभ्रम व्हावा असं मला करायचं आहे. परंतु कवितेतली लयबद्धता आणि नादमयता यांच्यापासून माझी अद्याप सुटका झालेली नाही. हे चित्रलिपीतही दिसतं.' (मुलाखत, 'खेळ' जानेवारी २००८, पृ. ११) या त्यांच्या विवेचनाचा प्रत्यय या कवितांमधून सातत्याने येतो.

## ३.४ समारोप

निराशा, उदासी, विषण्णता, पराभव, आत्मनिर्भत्सना यांचे सूर आळवीत ही कविता समकालीन भीषण वास्तवाचे अमानवीयतेचे भ्रष्ट राजकारणाचे, मूल्यऱ्हासाचे, प्रखर भान देते. पण त्यातून बाहेर पडण्याचा, हे चक्रयूह भेदण्याचा मार्ग दाखवीत नाही. 'डोळे सताड उघडे ठेवून स्वतःला जागं ठेवणं कठीण होत जातं', असे म्हणणारा कवी आणि कविता लिहिणं, वाचणं ही एक राजकीय कृती आहे यांचे भान आपण बाळगले पाहिजे, तिच्यातली शक्ती व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणू शकते, ती अन्यायांना मुखरित करते, वेदनांना शब्द देते, शोषितांना धार देते आणि शोषकांच्या विरोधात आवाज उठवण्यास मदत करते, अशी धारणा असणारा कवी समकालीन वास्तवाच्या भीषण वणव्यातून बाहेर पडण्यासाठी तडफड करत नाही. उलट आता आपल्याला कोणताही शब्द कसलाही आधार देऊ शकत नाही हे कळणं, एवढाच या विश्वाच्या कवितेला अर्थ आहे, बाकी सगळं व्यर्थ, शब्दांचे निखारे उजळीत घेऊन मी केली परिक्रमा निरर्थक, असे उदासीनतेकडून उदासीनतेकडे जाणे पसंत करतो. वेदना, घुसमट, मुस्कटदाबीचे, लुटले जाणारे सामान्य माणसांचे जीवन उलगडून सांगण्याचा प्रयत्न करत राहतो. (खेळ पृ. १००) डहाकेंच्या कवितेविषयीचे प्राध्यापक अजय देशपांडे यांचे हे निरीक्षण आपल्याला मान्य करूनही डहाके यांच्या कवितेची महत्ता अधोरेखित करता येते. आपल्या काळाचा उभा आडवा छेद घेण्याचा प्रयत्न त्यांची प्रस्तुत संग्रहातील कविता करते. प्रस्तुत काळाने बाजाराच्या मार्गाने धर्म, राजकारण आणि सत्ता यांच्या आधारे सामान्य माणसाला इतके शेवटून हतबल करून ठेवले आहे की, त्याला त्याचा शब्दही आधार होऊ शकत नाही, ही अपरिहार्यता त्याच्या वाट्याला आली आहे. डहाके यांची कविता ही हतबलता, निराशा, एकाकीपण आणि काळासमोरचे मोडून पडणे व्यक्त करताना दिसतात. ही काळाची, कोसळत्या शतकाची चित्रलिपी आहे. म्हणून काळाविषयी सातत्याने अनेक प्रतिमातून कवी बोलत राहतो. डहाके यांच्या कवितेतला हा काळ दोन शतकांच्या सांध्यावरचा काळ आहे. संभ्रमाचा काळ आहे. सभोवतालचे वास्तव संवेदनशील माणसांना हताश आणि निराश करणारे आहे, याची प्रचिती प्रस्तुत कवितेतून दिली आहे.

## ३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### ३.५.१ बहुपर्यायी प्रश्न

१) डहाके यांनी कोणते प्रवासवर्णन लिहिले आहे?

अ) यात्रा-अंतर्यात्रा आ) मालटेकडीवरून

इ) जावे त्यांच्या देशा ई) गोपूरांच्या परदेशात

२) कोकणातल्या कोणत्या कवीच्या गावात गेल्यावर डहाके यांनी भोमाड कविता लिहिली?

अ) प्रवीण बांदेकर आ) सतीश काळसेकर

इ) वि. स. खांडेकर ई) श्री. ना. पेंडसे

३) झाड वाचताना माला तुझाही अर्थ उलगडत जातो असे कवीने कोणत्या कवितेत म्हट्ले आहे?

अ) कवितेचा अर्थ आ) चारा इ) झाड ई) पाखरं

४) प्राण्याचे बळी देणारे कोणते गाव डहाके यांनी चित्रलिपीतील संग्रहात रेखाटले आहे?

अ) काळसे आ) चिदंबरम इ) कोल्हापूर ई) सावंतवाडी

५) डोक्याला पांढर कफन बांधून कोण बसलेला असतो?

अ) चिदंबरम आ) शिगवाला इ) कोंबडे कापणारा ई) चक्कीवाला

## ३.६ सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) डहाके यांच्या चित्रलिपीतील आत्मनिष्ठ आणि महानगरी कवितांचे विशेष सांगा

२) चित्रलिपीतील कविताची आशयसूत्रे उदाहणासह विषाद करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१) डहाके यांच्या चित्रलिपीतील परात्मभावाचा प्रत्यय देणाऱ्या कवितांचे विशेष सांगा

२) चित्रलिपीतील राजकीय प्रवृत्ती दाखवणाऱ्या कवितांची उदाहणासह विशेषता सांगा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. डहाके वसंत आबाजी, 'सहस्त्र चंद्रदर्शन', २०२३.

२. शिंदे रणधीर, महाराष्ट्र फाऊंडेशन गौरव विशेषांक

३. देशपांडे अभिजित, 'निवडक वसंत आबाजी डहाके'

४. चित्रलिपी : एक प्रवास, महाराष्ट्र टाईम्स, १२ मे २०१५

५. सुधीर रसाळ, 'कविता आणि प्रतिमा' मौज प्रकाशन, १९८२

६. म. सु. पाटील, कवितारती

७. जाधव, रा. ग. – काव्यसमीक्षेतील धुळाक्षरे, स्नेहवर्धन


❑❑❑

## घटक ४
# पिवळा पिवळा पाचोळा

**अनिल साबळे**

### ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस पुढील गोष्टी समजतील.

- अनिल साबळे यांच्या पिवळा पिवळा पाचोळा या कथासंग्रहातील आशयसूत्रांचा परिचय होईल.
- ग्रामीण भागातील अस्सल जीवनानुभवाचा प्रत्यय घेता येईल.
- बालपणीच्या अनुभवविश्वात स्वत:ला तपासून घेता येईल.

### ४.१ प्रास्ताविक

मराठी साहित्याच्या विकासात्मक आलेखाचा विचार करताना साठोत्तरी कालखंड महत्त्वाचा मानला जातो. दलित, ग्रामीणादी साहित्य प्रवाहांचा उदय आणि १९८० नंतर या साहित्य प्रवाहांनी आपल्या स्वत:च्या विविधांगी लेखन वैशिष्ट्यांनी समृद्ध झालेल्या अवकाशाचा विशेष उल्लेख करावा लागतो. यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्य प्रकारांनी आपल्या लेखन प्रवासाला सशक्त बनवल्याचे निदर्शनास येते. वर्तमान वास्तव, भूतकाळाची जोड आणि भविष्याचा वेध अशा संयुक्त लेखन कौशल्याने साहित्य समृद्ध होताना दिसते. ग्रामीण कथेचा विचार करताना प्रामुख्याने भास्कर चंदनशिव, सखा कलाल, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, राजन गवस, कृष्णात खोत, किरण गुरव इत्यादी अनेक कथाकारांनी आपले लेखन या काळात प्रभावीपणे केले आहे. ग्रामीण भागातील जीवनानुभवांचे भावनिक, तटस्थ आणि तितकेच पारदर्शीपणे आपले अनुभव मांडण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे. या सर्व लेखकांबरोबरच एक विशेष नावाची नोंद घ्यावी लागते ती म्हणजे अनिल साबळे. त्यांच्या ‘पिवळा पिवळा पाचोळा’ या कथा संग्रहाचा अभ्यास आपणास करावयाचा आहे. त्यापूर्वी आपण त्यांचा स्थूल परिचय करून घेवू.

### ४.२ विषय विवेचन

अलीकडच्या दोन दशकातील एक महत्त्वाचे कलावंत लेखक म्हणून अनिल साबळे यांचा उल्लेख आग्रहाने केला जातो आहे. समकालीन मराठी कथेच्या परंपरेतील एक यशस्वी कथा म्हणून अनिल साबळे यांच्या कथेकडे पाहिले जाते. ग्रामीण जीवन आणि त्यातल्या त्यात शेतकरी आणि रानावनातील जीवन या सर्व गोष्टी अगदी पौगंडावस्थेमध्ये भूतकाळ आणि वर्तमान काळ यांच्या संयुक्त मांडणी कृतीने ही कथा अलगदपणे वाचकांच्या मनावर राज्य करताना दिसते.

कवी, चित्रकार, कार्यकर्ता म्हणून स्वतःची ओळख असणाऱ्या या लेखकाची कथा बालपणाच्या अनेक कृती-कार्यक्रमातून आपल्याला एका वेगळ्या विश्वात घेवून जाते. आपल्याला जे वाटलं, जे आठवलं ते अगदी सहजपणे कथेचा भाग झालेले अनिल साबळे यांचे लेखन बघताना डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, 'जगतोय गोष्ट सांगण्यासाठी आणि गोष्टी सांगण्याशिवाय आपल्याकडे दुसरं असतं तरी काय?' अशी त्याची भावना आहे. म्हणजेच आपल्या जगण्यातील विविध घटना प्रसंगाच्या इतक्या सुंदर कथा होऊ शकतात हे साबळेंनाही ज्ञात नाही मात्र गोष्टी सांगणे. कथा सलगपणे सांगत जाणे हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. कुठेही अभिनिवेश नाही की ओढाताण नाही. 'पिवळा पिवळा पाचोळा' या कथासंग्रहातून काही मध्यवर्ती आशयसुत्रे समोर येतात त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आपणास अभ्यासता येईल.

### ४.२.१ आशयसूत्रे

#### ४.२.१.१ सहज सुलभ गोष्टीरूपाचे अनोखे जग

गोष्ट सांगणे व ऐकणे हा माणसाचा मूळ स्वभाव आहे. एखादी घटना, प्रसंग, माहिती या सर्वांना माणूस आपल्या कथनशैलीने गोष्टीरूपात तिला बांधत असतो. मात्र व्यक्तिपरत्वे त्यांची सांगण्याची पद्धत ही वेगवेगळी असते. यांचा विचार करता अनिल साबळे यांच्या कथेचा पोत हा अत्यंत सहज, सुलभ आणि नकळतपणे वाचकाला त्या सर्व वातावरणामध्ये ओढून नेणारा आहे हे त्यांची प्रत्येक कथा वाचताना जाणवते म्हणजे त्यांच्या या संग्रहात एकूण आठ कथा आहेत, व या आठही कथा प्रत्येक वाचकाला कमी-अधिक प्रमाणात आपल्या बालपणात खेचून नेतात हे मात्र निश्चित, मग तो पोहण्याचा अनुभव असो, सरडा मारण्याचा असो अथवा मोहोळ काढण्याचा किंवा रान शिवारातील बेधुंद भटकण्याचा असो.

अनिल साबळे या कथा लिहिताना अगदी सहज भाषेत, दैनंदिन दिनक्रमातील ग्रामीण भागातील लोकांच्या जीवन व्यवहाराच्या सकाळपासून रात्रीपर्यंतचा किंवा ही रानातली माणसं कशा पद्धतीने जगतात हे अगदी सहजपणे लिहून जातात. त्या लिहिण्यामध्ये ना कुठे क्लिष्ट भाषा आहे ना कुठे ओढाताण आहे. अगदी सहज आणि सुलभ पद्धतीने ते आपल्या जीवनानुभवाचा पट उलघडताना दिसतात. व एका अनोख्या म्हणवणाऱ्या जगातील आपली ओळख प्रत्येक किशोरवयीन घडणाऱ्या आणि बालपणीच्या अगदी नकळतपणे होणाऱ्या चुकांचेसुद्धा अनुभव सहज सुलभ पद्धतीने मांडतात. कथा वाचताना आपण कथामय कधी झालो हेच समजत नाही. मी माझ्याच बालपणात शिरून पुन्हा एकदा मी माझे बालपण प्रत्यक्षरित्या अनुभवतोय की काय याचा पुन:पुन्हा प्रत्यय येत राहतो.

#### ४.२.१.२ किशोरवयीन मुलाच्या भूतकाळातील भावविश्वाच्या कथा

अनिल साबळे यांचा 'पिवळा पिवळा पाचोळा' हा पहिला क्थासंग्रह मात्र पहिल्याच प्रयत्नात ते यशस्वी झालेत. या यशस्वीतची अनेक कारणे आहेत मात्र या कथेतील जीवनावकाश जो आहे. तो त्यांच्या बालपणातील खोड्या काढणाऱ्या वयातला आहे हे त्यांनी स्वत:च एका मुलाखतीमध्ये सांगितले आहे त्यांनी सांगितले आहे की, 'माझ्या कथा या वेगळा असा काही विषय नसून मी इयत्ता ४ थी पासून दहावी पर्यंतचे

माझे अनुभव म्हणजे माझी कथा आहे' या त्यांच्या सांगण्यातील प्रामाणिकपणा आणि साधेपणा स्पष्टपणे दिसतो.

या संग्रहातील कथा या संपूर्णपणे अगदी किशोरवयातील आहेत. ज्या वयात कळतेपणा असतो पण तो इतक्या जागृत अवस्थेतही नसतो की ज्यामुळे गंभीरपणा आपल्याला स्पर्श होईल. म्हणजेच या वयात आपल्याकडून अशा काही गोष्टी बोलून आणि कृती करून जातात कि ज्याचं गांभीर्य आपणांस नंतर लक्षात येते. बालपण हे प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक प्रकारच्या आठवणी ठेवून जाणारं वय असतं. याच वयात आपल्याला विविध प्रकारच्या कल्पना सुचतात. याच वयात झालेल्या चुका थोरा मोठ्यांकडून माफ केल्या जातात. या संग्रहातही बहुतांशी कथा लेखकाच्या भावविश्वाला अधोरेखित करणाऱ्या आहेत. लेखकाचं एकाच वर्गात दोन वेळा बसणं, शाळेची किल्ली हरवणं, मोहोळ काढायला गेल्यावर मधमाशा चावणं, शाळा चुकवून मासे धरायला जाणं इत्यादी अनुभवांचा विचार करता किशोरवयीन कालावकाश जगण्याच्या विविध अवस्थांचा वेगळ्या पातळीवर जाऊन विचार करायला लावतात. बना आजी असो, मच्छा असो, मोठया आई असो, मधू असो, अंक्या असो किंवा अन्य सवंगडी असोत या सर्वासोबतच्या असणाऱ्या अनुभवांना लेखकाने एका भावुक धाग्याने विणलेले आहे. जो अनुभव वाचताना प्रत्येक वाचकाला त्याच्या भूतकाळात काही अंशी का असेना गेल्याचा अनुभव येतोच येतो हे मात्र नक्की आणि म्हणूनच या कथा वाचनीय ठरताना दिसतात.

### ४.२.१.३ रानशिवाराची अस्सल निसर्गजीवन कथन करणारी कथा

साठोत्तरी कथा वाङ्मयाचा विचार करताना विविध विचार प्रवाहांनी व्याप्त असणाऱ्या कथा म्हणून त्यांचा विचार होताना दिसतो. त्यामध्ये दलित ग्रामीण स्त्रीवादी आदिवासी इत्यादी अनेक विचार प्रवाहांचा कमीअधिक अंश असणाऱ्या कथा म्हणून त्यांचा विचार होताना दिसतो. ग्रामीण कथांच्या बाबतीत विचार करता ग्रामीण जगण्याशी निगडित अनेक प्रकारच्या जीवन प्रवासाचा विचार त्यातून समोर येतो. अगदी रा. रं. बोराडे यांच्या पासून ते आनंद यादव, राजन गवस, कृष्णात खोत यांच्या पर्यंत ही यादी विस्तारत जाते. मग यामध्ये ग्रामीण जीवन, राजकारण, शिक्षण, दारिद्र्य, कुटूंबव्यवस्था, स्त्री-पुरूष नातेसंबंध, वर्णव्यवस्था, जाती, धर्म, बलुतेदारी, बदललेले खेडे, वर्तमान अवस्थेतील खेडे, संस्कृती, परंपरा इत्यादी अनेक बाबी कमी-अधिक प्रमाणात कथेमधून डोकावत राहतात. मात्र पिवळा पिवळा पाचोळा हा कथासंग्रह यापैकी फार कमी गोष्टी किंवा या सर्वांपेक्षा वेगळा जीवनानुभव घेऊन येणारी कथा म्हणून पहावयास मिळतो. या कथासंग्रहामधील  कथांमध्ये अशा कोणत्याच गोष्टी नाहीत ज्या रूढार्थाने ग्रामीण कथांमध्ये येताना दिसतात. यातील कथांमध्ये रानशिवार येते, जंगलझडी येते, रानशिवारातील जीवन सृष्टी येते त्यातच लेखक रमताना दिसतो. त्यातलाच अनुभवांना तो जिवंत करताना दिसतो. डॉ. रणधीर शिंदे या कथांविषयी सांगतात, ''कथानायकाला रानशिवारातल्या प्राकृतिक जीवनाची अपरंपार ओढ आहे. समाज चौकटी शाळा, संस्थात्मक जीवनाऐवजी तो रानात रमतो त्याच्या असतेपणाचा घनदाट प्रत्यय रानावनात येतो.'' पुढे ते या कथेतील रानशिवारातील व निसर्गातील आलेल्या तपशिलांचे चित्रण करताना म्हणतात, ''सभोवतालच्या निसर्गाचे व मानवेत्तर जगाचे त्यांनी केलेले शब्द रंगकाम सर्जनशील आणि कलाशील आहे. फिरंगी बाभळी,

तरवडाच्या झुडपातील निळे भुंगे, भुरक्या रंगाचे नाकतोडे, थव्यांनी मस्त हिंडणारे मासे, जाभुळलेल्या चिंचा, तुरीतली वाळकं, शेळ्या-मेंढ्या, कोकरं, जनावरे, तांबडे होले, मोहळ, मधमाशा, माळावरल्या पांढऱ्या दुधाण्या, भूरकी ल्हावरे, खारी, भैरी ससाणे आणि पाखरांनी गजबजलेली चलसृष्टी या कथेत आहे. पिवळी धमक सूर्यफुलं, मोहरी फुलं, गव्हाच्या लोंबी, बाभळीचे रान, सराट्यांचे वेल, निवडुंगाची लालबुंद बेटं, आमराई, मळे, कुपाटी, खळगे अशा रान भूगोलाची सचित्र वर्णने कथेत आहेत.'' डॉ. रणधीर शिंदे यांनी कथेतील या घेतलेल्या सूक्ष्म नोंदीवरून आपल्या सहज लक्षात येते की, रूढार्थाने ग्रामीण कथा म्हणून या कथांकडे बघून चालत नाही तर रानाशिवारातील किडया, मुंग्या, जनावरांच्या जगण्यासोबत हिरवाई, पाखरं, मासे, मोहळ, माती, पिकं, हवा, पाणी इत्यादी सोबतचं खऱ्या अर्थाने रानाशिवारातील जगणे कसं असतं याचा सोदाहरण तपशील या संग्रहातील विविध कथांच्या माध्यमातून आपणांस लक्षात येतो. म्हणून रानाशिवाराची अस्सल निसर्ग जीवन जगणारी कथा म्हणून या संग्रहातील कथांचा व त्यातील जीवनानुभवांचा उल्लेख करावा लागतो. प्रमोद मुनघाटे म्हणतात, ''या सर्व कथांचे वेडे रान आणि जंगल शिवार हेच आहे. 'मच्छा' नावाची एक कथा व्यक्तिकेंद्रित आहे पण तिच्यातही जंगलातील झाडांवरचे मोहोळ काढण्याच्या विविध आठवणी अधिक आहेत. त्यानिमित्ताने जंगलातील जीवन हेच या कथेचे मूळ 'संभाषित' आहे.''

थोडक्यात रानशिवारातील जगण्याचा पट उलघडणारी कथा म्हणून या संग्रहातील सर्वच कथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**४.२.१.४ निरागसता व वात्सल्यभावाचे चित्रण करणाऱ्या कथा**

या संग्रहातील कथांच्या बाबतीत प्रत्यक्ष लेखकानेच स्पष्ट केल्याप्रमाणे या कथा लेखकाच्या बाल वयापासून ते इयत्ता दहावी पर्यंतच्या म्हणजे किशोरवयापर्यंतच्या आहेत. साहजिकच यातून येणारे बरेचसे अनुभव निरागसता आणि वात्सलभाव ओतप्रोत भरून राहिल्याचे आपणांस जाणवते. घोरपडीचा प्रसंग असो, आपल्या काकाचं नाव हातावर गोंदलेली मोठी आहे. या दुसऱ्या म्हाताऱ्या माणसांसोबत का राहते? या प्रश्नाच्या शोधात शेवटपर्यंत घडणारी कथा असो, आपल्या शाळेचा दोस्त मछयाच्या अनेक गोष्टी व त्याचा झालेला मृत्यू, त्याचे कपड्यात गुंडाळलेले प्रेत, त्याचे विस्कटलेले दप्तर, डोळ्यात चिक गेल्यावर आईने केलेला उपाय किंवा दप्तर झोपडीत ठेवून मासे पकडताना भावाला सापडणे, आणि शेवटच्या कथेतील नापास झाल्यानंतर घर सोडून मावशीकडे जाताना वडलांनी परत आणणे किंवा तो कुठे असेल म्हणून मोठा भाऊ सायकलने त्याचा लांबपर्यंत शोध घेणे. या सर्व घटना प्रसंगातून या कथेतील निरागसता, वात्सल्य, करूणा इत्यादी गुणचित्रण अगदी बेमालूमपणे विस्तारत जातात हे कथा वाचताना प्रत्येक वाचकाला लक्षात आल्यावाचून राहत नाही.

या संग्रहातील अनेक कथा लेखकाचा निरागस स्वभावविशेष पुन्हा पुन्हा स्पष्ट करताना दिसतात. मग तो मोठया आईला कि ज्या आईला मुलं नाहीत म्हणून भरपूर त्रास दिला गेला आहे आणि हाकलून दिले आहे. त्याच स्त्रीला तो तुझी मुलं कुठं आहेत म्हणून प्रश्न विचारतो, ते विचारून थांबत नाही तर अजून देवळातून घरी का आली नाहीत? तिथेच का झोपली? असे अनेक त्याचे निरागस प्रश्न मात्र मोठ्या आईला

अनंत यातना देणारे असतात. परंतु यासोबतच मोठी आई म्हणते, ''माझ्या कुशीत त्या दिवशी तू रात्रभर झोपला होतास म्हणून आजदेखील माझ्या कुशीतून तुझाच वास येतोय. एका रात्रीसाठी तरी मला आई झाल्यासारखं वाटले होते.'' या वाक्यातून भावनांचा बांध फुटताना दिसतो. त्याच पद्धतीने कथेतील विविध घटना प्रसंगातून लेखकाचा निरागस स्वभाव, करूणा, वात्सल्य ही भावसृष्टी निर्माण होताना दिसते. उदा. 'विहिरीत पोहून पोहून लालभडक झालेले मछ्याचे डोळे शवविच्छेदन करताना काढून घेतले होते. माझ्या गळ्यात गळा घालून रानभर हिंडणारे मछ्याचे हात आता पांढऱ्या पट्टीत गुंडाळले होते.' शेवटच्या कथेत नापास झाल्याने वडलांनी कोणतीच प्रतिक्रिया न देता मटणाचे जेवण करायला पाहिजे म्हणतात, त्यावेळी 'रात्री नंतर मी डोळे उघडे ठेवून पाण्यातल्या माशासारखा सावध झोपी गेलो' किंवा 'आज उद्या त्या सरड्यानं पाचोळ्यात अंडी घातली असती आपण त्या सरड्याला उगीचच मारलं असं वाटायला लागलं'' किंवा ''मी मात्र रोज शाळेत येता जाता पोलिस स्टेशनच्या छतावर पडलेली मछ्याची सायकल आणि त्याचं पिवळं धमक दप्तर लांबुनच पाहत असायचो.'' इत्यादी वाक्यातून या कथेतील अनेक जागा ह्या निरागसता आणि करूणा, वात्सल्य भावाने भरलेल्या आपणांस जागोजागी दिसतील.

**४.२.१.५ स्वत:च्या भावजीवनासोबतच सभोवताली जीवनसृष्टी**

अनिल साबळे यांनी या कथासंग्रहात स्वत:च्या बालपणातील, किशोरवयातील जीवनानुभवांचे संचित मांडले आहे. आपल्या मुलाखतीत त्यांनी आपल्या कथा निर्मितीसंबंधी सांगताना 'घोरपड' या नवअनुष्टुभ मधील कथा प्रकाशनानंतर नितीन रिंढे यांनी कथेकडे गंभीरपणे बघायला शिक हे सांगणे व त्यानंतर 'माझ्या कथा कल्पनारम्य नव्हत्या त्यामुळे वास्तव मांडायला नाही काय वाटलं' हे विधान लेखकाचा लेखनासंबंधी असणारा प्रामाणिक भाव आपल्या लक्षात येतो. जे वाटलं व जे जगलं ते अगदी सहजपणे लेखणीच्या माध्यमातून साबळे यांनी मांडले आहे हे त्यांच्या प्रत्येक कथा वाचताना आपणांस लक्षात येते. त्यांनी आपल्या बालपणीच्या व किशोरवयातील सर्व जीवनानुभवांना आपल्या कथेचा विषय बनवले आहे. म्हणूनच त्यांच्या कथेत गाव शिवार, निसर्ग, पशु-पक्षी, जंगल येत राहते कारण ते आयुष्य स्वत: ते जगले आहेत. एका विशिष्ट वयानंतर प्रत्येकाला आपले बालपण खुणावत असते. मात्र प्रत्येकजण तो अनुभव कथन अथवा लेखनबद्ध करतोच असे नाही मात्र लेखक अनिल साबळे यांनी या संग्रहातील कथांमधून आपले समृद्ध अनुभवांनी बद्ध असणारे बालपण आणि किशोरवयातील अनुभव प्रामाणिकपणे मांडले आहेत.

या संग्रहातील एक कथा अपवाद वगळता सर्व नायकप्रधान कथा आहे. 'एक घर एकटं' ही एक कथा सोडली तर लेखकांच्या स्वत:च्या आयुष्यात घडलेल्या सर्व घटना प्रसंगांची मालिका म्हणून हा कथासंग्रह नोंद घ्यावा असाच आहे. लेखकाने यामध्ये स्वत:चे भावजीवन विविध घटना प्रसंगांच्याद्वारे सांगितले आहेत. मग तो घोरपडीच्या पहिल्या प्रसंगापासून सुरू होतो व शेवटी नववी नापास झाल्यानंतर घरी निर्माण झालेल्या वातावरणापर्यंत येवून थांबतो. हे स्वानुभव सांगताना लेखक त्याची निरागसता कथाविषय सांगताना कुठेही ढळू देत नाही मग त्यामध्ये त्याला झालेल्या आनंद, त्रास, भय, जिज्ञासा, उत्साह, अपयश, यश, मैत्री, रानशिवार, पशू-पक्षी इत्यादी सर्वांचेच तो तपशिलवार चित्रण करताना दिसतो.

थोडक्यात लेखक स्वत:सोबत सभोवतालची जीवनसृष्टी सुद्धा आपल्या कथेतून आणतो. म्हणजे त्याचे गाव तिंगाव ता. संगमनेर, जि. अहमदनगर व गावाभोवतालचा परिसर तो कथेतून आणताना दिसतो. मग घोरपड कथेतील काकाचं वर्णन असो किंवा हिरव्या चुडयाआड बुडालेलं या कथेतील मोठ्या आईचं दु:ख असो, जिवलग मित्र मच्छा, त्याच्या सोबतच्या सवंगडी आठवणी व शेवटी त्याचा झालेला शेवट, मोहोळ कथेतील भाऊ, मित्रांसोबतचा मोहोळ काढण्याचे प्रसंग असो अथवा सरडा मारण्याचे प्रसंग असो तसेच पिवळा पिवळा पाचोळा कथेतील आपला नववी नापास झाल्याचा प्रसंग असो. या सर्वांच्या कथाशयामध्ये बरेच घटना, प्रसंग, व्यक्ती, निसर्ग येतात व त्यांचे जीवन येते. म्हणजेच लेखकाच्या जीवनासोबत या सर्वांची जीवनसृष्टी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे चित्रीत होताना दिसते मग यामध्ये आईचे कष्ट आहे, भाऊ बहिणींची अभ्यासू वृत्ती आहे. वडिलांची कष्टाळू वृत्ती आहे. विविध स्वभाव असणारी शिक्षक मंडळी आहे, मुसलमान, धनगर, भिल्ल इत्यादी मित्र मंडळी आहे, बनाआजी आहे इत्यादी अनेक माणसं त्यांच्या जगण्यासह येतात व लेखक त्यांना आपले स्वानुभव सांगता-सांगता या प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्त्वाचासुद्धा कमी-अधिक स्वरूपात एक पट उलघडून जाताना दिसतो. डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, ''गोल आंब्याच्या झाडाखाली अभ्यासाला बसणारा त्याचा समजुतदार भाऊ, त्याला मनस्वी जगू देणारे त्याचे आई वडील हे जीवनावर नितांत श्रद्धा असलेलं एक नितळ कुटूंब हा कथाकार या निमित्ताने साकारतो. अर्थात हे मी कल्पिलेले एक सलग कथानक आहे. वास्तविक प्रत्येक कथेत निवेदकाच्या आजुबाजूचे कुटूंबीय बदलतात. परंतु आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ आणि बहीण या व्यक्तिरेखा येतातच, मित्र येतात, नाना प्रवृत्तीचे शिक्षक येतात. शाळा, वसतिगृह, आदिवासी, धनगर अशा वस्त्या आणि जंगल झाडीतल्या वाटा वस्त्या येतात. अगदी मुंबई देखील येते. त्या अर्थाने ही अनेकविध पातळीवरचे सामान्य माणसाचे जगणे शोधणारी समृद्ध कथा आहे.'' डॉ. नंदकुमार मोरे यांच्या या विवेचनावरून आपणांस सहज लक्षात येते ते हे की या कथासंग्रहातील कथा या फक्त कथानायक, निवेदक अनिल साबळे यांच्याच जीवनानुभवानी फक्त समोर आणत नाही तर त्यांच्यासोबत ही अनेक जीवनमानाची, माणसांची, निसर्गाची, प्रदेशाची, पशू-पक्षांची जीवनसृष्टी आपणांस ज्ञात होते. त्या अर्थाने या कथा महत्त्वाच्या वाटतात. डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, ''कथाकार आजुबाजूचे वास्तव परखडपणे समोर ठेवल्याबरोबर आपल्या परिसराचा आत्मीय शोध घेतो. या कथेचा निवेदक ज्या आदिवासीबहुल प्रदेशाशी संलग्न जगतो. ते जगणं तो कौशल्यपूर्ण आणि नेमकेपणाने चित्र रीत पकडतो.''

थोडक्यात लेखकाचा नगर जिल्ह्यातील त्याचे गाव, गावालगतचा प्रदेश जंगल, निसर्ग आणि खूप सारी माणसं त्यांच्या जगण्यासह या कथेत येतात.

### ४.२.१.६ जगण्याचा अर्थ उलघडणारी कथा

प्रत्येक लेखकाची प्रत्येक कलाकृती एका विशिष्ट अर्थाने अर्थपूर्ण बनलेली असते. अर्थातच ती त्याची म्हणून स्वतंत्र कलाकृती असली तरी त्यामध्ये जीवनसन्मुख अनेक महत्त्वाच्या बाबी असतात आणि त्या लेखकाकडून कधी-कधी जाणीवपूर्वक तर कधी-कधी नकळतपणे त्या त्याच्या कलाकृतीतून झिरपत जातात. प्रत्येक कलाकृती ही मानव केंद्रित असते. मानवी जीवन व्यवहाराचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रतिबिंब म्हणूनही

तिच्याकडे बघितले जाते आणि म्हणून त्या अर्थाने अनिल साबळे यांची ही कलाकृती अत्यंत यशस्वी झाली आहे. आपल्या लहानपणाच्या आणि किशोरवयीन जरी आठवणी सांगितल्या असल्या तरी जगण्याचे विविध पदर या कलाकृतीतून सहजपणे आविष्कृत होत जातात हे आपणांस दिसून येते. या संग्रहात कुटूंब व्यवस्था आहे. शेत शिवार आणि त्यातील पशू-पक्षी आहेत. आपल्या वर्गातील मुलांसोबतच म्हातारी माणसंसुद्धा आहे. विविध जाती धर्माची माणसं आहेत. शाळा आणि शिक्षक आहेत इत्यादी सर्व चित्रणातून जगण्याचा विशिष्ट अर्थ उलघडणारी कथा म्हणून या कलाकृतीची ओळख होताना दिसते मग यामध्ये मुल न होणाऱ्या मोठया आईचं दु:ख आहे. तिला मूल होत नाही हा तिचा दोष नाही तरी सुद्धा तिला अव्हेरलं जातं. तिला माणूस म्हणून स्वीकारलं जात नाही. हा विचित्र मानवी स्वभाव यामध्ये येतो, प्रचंड कष्ट करणारे आई-वडील येतात, स्वत:चा सवंगडी, शाळेतला मित्र मच्छा मात्र त्याचा झालेला अपघाती मृत्यू, त्यावेळी पोलिसांचे वर्तन, मच्छाची सायकल आणि दप्तर बेवारस होणं, हे जीवन काय सांगत? हा प्रश्न या कथेत सतावतो. शाळा हा अत्यंत महत्त्वाचा भाग मात्र या शाळेतील शिक्षकांच्या तऱ्हा सांगून ही व्यवस्थासुद्धा आपणांस विचार करायला लावते. आपल्या आजीच्या वयाची बनाआजी मात्र तिला तिच्याच घरी व्यवस्थित खाणे-पिणे मिळत नाही, रानात रहायला असलेल्या म्हातारा-म्हातारीला चोर मारहाण करून निघून जातात त्यावेळी पंचनाम्याच्या निमित्ताने आलेले पोलिस त्यांनाच दोषी ठरवून त्यांचीच कोंबडी घेवून जातात, मोहोळ कथेतील छबुचा प्रसंग आपणांस चिंतन करायला लावतो.'' आजुबाजूचे रान पेटू नये म्हणून छबुनं पेटती गोवरी मातीत घोसाळून विझवून टाकली. मी छबू जवळ बसून गप्पा मारू लागलो तो म्हणाला, ''माझा मालक लई बाराबोड्याचा हाय. रोज मला शिळी भाकर आणि मिरचीचा गोळा देतोय. ह्या आडरानात असं त्वांड भाजतय कधी-कधी घोटभर पाणी मिळत नाही मला. म्हावळ दिसलं म्हणजे मी म्हावळाची पोळी भाकरीवाणी खातोय आणि मध पाणी पिऊन घेतोय. छबुनं खिशातून मिरची भाकरीचं लालभडक फडकं काढुन दाखवलं, ते फडके पाहून मला जोराचा ठसका आला.'' अशा प्रकारच्या जीवन पद्धतीचे चित्रण या कथा संग्रहातील जीवनाचा अर्थ शोधायला लावतात हे मात्र मान्य करावं लागतं.

दप्तर झोपडीत ठेवून मासे पकडायला गेल्यावर मोठा भावाला सापडल्यावर त्यानं घरी न सांगणं, डोळ्यात चिक गेल्यावर राग न करता आईने डोळ्यात शेळीचे दूध घालून स्वच्छ करणे, नववी नापास झाल्यावर गाव सोडून मावशीकडे जाताना रस्त्यात वडिलांनी घेवून येणं, काहीच न बोलणं, रागावणं तसेच मूल नसणाऱ्या मोठ्या आईला तुझी मुलं कुठायत म्हणून विचारल्यावर तिनं नं रागावणं, शाळेची चावी हरवल्यावर शिक्षकांनी न रागावणं इत्यादी अनेक जीवनानुभव या कथा संग्रहातील प्रत्येक कथेत जीवनाचा अर्थ उलघडून दाखवण्यासाठी खूप मदत करतात. निखिलेश चित्रे या कथांविषयी बोलताना म्हणतात, ''निवेदकाचं हे जग सुंदर आहे तसेच क्रूर आहे त्यात समाजशील आयुष्य जगणाऱ्या माणसांच्या शोकांतिका आहेत तसेच समाजाकडे पाठ फिरवून निसर्गाशी एकरूप होणारी माणसंही आहेत. निरागसता आहे आणि तिचा अंत ही आहे. मानवकेंद्री दृष्टीच्या पलीकडे जाऊन समस्त सजीव-निर्जीव घटकांना जगण्याच्या परीघात सामावणारी करूणा साबळे यांच्या कथांमध्ये सर्वत्र झिरपलेली जाणवते.'' चित्रे यांच्या या विवेचनावरून या संग्रहातील कथा जगण्याचा अर्थ उलघडून दाखवून जगण्याकडे एका विशिष्ट दृष्टीने

पहावयास लावतात हे लक्षात येते. अशा प्रकारे काही आशयसूत्रांच्या साह्याने अनिल साबळे यांच्या कथांकडे पाहता येईल. एक नवोदित कथाकार म्हणून नावारूपास येणाऱ्या साबळे यांच्या कथा या रानशिवारासोबतच माणसांच्या, लहानग्यांच्या, किशोरवयीनांच्या अनुभवसमृद्धीचा खजिना म्हणून ही कथा महत्त्वाची ठरते. एका विलक्षण आगळ्या वेगळ्या जगात घेवून जाणारी साबळे यांची कथा वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला लावते. एक वेगळे जग अगदी सहजपणे मांडणारा लेखक म्हणून अभ्यासकांनी त्यांची नोंद घेणे उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

### ४.२.२ आशय

अनिल साबळे हे अगदी अलीकडच्या काळातील प्रतिथयश असे कथालेखक म्हणून एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी पिवळा पिवळा पाचोळा हा कथासंग्रह लिहिला आहे. यामध्ये एकूण आठ अशा मोजक्याच पण दर्जेदार कथा लिहिलेल्या आहेत. या घटकामध्ये अनिल साबळे यांनी लिहिलेल्या पिवळा पिवळा पाचोळा या संग्रहातील कथांचा आशय अभ्यासणार आहोत. या दीर्घकथांचा हा संग्रह बालपणातील, किशोर वयातील जीवनानुभवाने समृद्ध झालेला आहे. हे या कथा वाचून लक्षात येते, रानशिवार, निसर्ग, रानातली माणसं, शाळा, मास्तर, कुटूंब, सवंगडी आणि बालपणीच्या करामती इत्यादी विषयांनी बांधलेल्या या सर्व कथा आपणांस लहानपण पुन्हा एकदा अनुभवायला देतात म्हणजेच या कथा आपल्याला लहानपणात घेवून जातात. या कथांचा आशय अगदी संक्षिप्त स्वरूपात क्रमश: पुढीलप्रमाणे आहे.

### ४.२.२.१ घोरपड

या संग्रहातील ही पहिली कथा शीर्षकाप्रमाणेच यामध्ये घोरपड पकडण्याचा तसेच तिला पकडून गावी नेवून खाण्यापर्यंतच्या गोष्टी आहेत. लेखक मावशीच्या गावाकडे गेला होता तेव्हा त्याचा काकाच्या सायकलवरून गावाकडे येताना आरखडीच्या कारावर काकाला घोरपड सळसळत जाताना दिसते. ती पकडण्यासाठी स्वत: लेखक व काका सायकल तिथंच टाकून घोरपडीच्या मागे माळावर पळू लागतात. घोरपड वाळलेल्या पिवळ्या गवतातून पळून एका बांधावर लपते. काका धापा टाकत एका दगडावर विडी पेटवून बसतात व त्यावेळी त्यांना एक युक्ती सुचते. ते बिडी पेटवून झाल्यावर त्या काडीने बांधावरचं गवतच पेटवून देतात. त्या आगीच्या धगीने घोरपड पळायला लागते व पुढे जावून एका बिळात तोंड खुपसून अर्ध अंग बाहेरच अशा अवस्थेत दिसते. तिला ओढून काढावं तर शेपूट मारणार या भितीपोटी काय करायचं म्हणत काका आजुबाजूचा पाचोळा गोळा करतात व तिच्या अंगावर टाकून पेटवून देतात. घोरपड भाजल्याने निपचित पडलेली दिसते. काका भितीपोटी तिला बिळातून ओढत नाहीत कारण त्यांच्या एका भिल्ल मित्राने सांगितले होते की घोरपडीने शेपूट मारली की माणूस पांगळा होतो म्हणुन लेखकच तिच्या शेपटीला धरून ओढतो त्यावेळी तिची कातडी हातात आली असे सांगून तशी अवस्था झालेल्या गावातील एका भाजलेल्या बाईची आठवण सांगतो.

घोरपड घरी न्यायची आणि मस्त मटण खायचं या विचारात घरी जातात. मात्र घोरपड कापण्याचं कौशल्य असणारा चुलत भाऊ सकाळीच बाहेरगावी गेलेला असतो व तो तिकडेच कामानिमित्त राहणार

असतो हे कळल्यावर लेखक नाराज होतो. मग घोरपड कापून कोण देणार म्हणून गावभर फिरतात, म्हत्तु चांभार कोंबडी कापतो; तो घोरपड कापत नाही हे लक्षात येते. नंतर सवंगडी लहाण्या धनगराकडे जातात पण तो घोडीवरून पडल्याने त्यालाच उठता बसता येत नसते. असं करीत करीत शेवटी तिला ठेवून तर चालणार नाही तिचा वास येईल, मरेल असा विचार येतानाच चुलत बहीण भिलहाटीत ती विकायला सांगते मन तयार होत नाही पण पर्याय नाही म्हणून ती घोरपड हणंता नाईक या भिल्लाला फक्त दीड रूपयाना विकली जाते.

अत्यंत भावस्पर्शी ही कथा असून यामध्ये विविध व्यक्ती आणि प्रसंग येतात. काकांच्या बिडीचा प्रसंग, धनगरी जगण्याची वैशिष्ट्ये, म्हतू चांभाराचे कोंबडी कापण्याचे वैशिष्ट्य, चुलतभावाचे घोरपड कापण्याचे कौशल्य, भिल्लाच्या वस्तीतील अंधार इत्यादी अनेक गोष्टींना या कथेतून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. यासोबतच बाबू धनगराच्या बोकडाकडे शेळी लावायला नेण्याचा प्रसंग व तो शाळेत न येण्याचं सांगितलेलं कारण व त्यावर राम्या कुंभारानं सुचवलेल्या खोटं बोलण्याचा उपाय इत्यादी अनेक छोट्या छोट्या गोष्टींनी भरलेली ही कथा आपल्या लहानपणीच्या अनुभवाला उजेडात आणते.

### ४.२.२.२ हिरव्या चुड्याआड बुडालेलं

या कथेत लेखकाने आपल्या मोठ्या चुलतीच्या जीवनाविषयीची माहिती सांगितली आहे. लेखक आपल्या चुलत्याला मोठा बाबा व चुलतीला मोठी आई म्हणतो. एकदा वडील त्याला मोठ्या आईकडे (वडाच्या झाडाखाली उभी असलेली) मावशीच्या गावाकडे जाण्यासाठी सांगतात. प्रारंभी लेखकाला प्रश्न पडतो की वडील हिला मोठी आई म्हणून का बोलताहेत मात्र नंतर सर्व प्रश्नांची उत्तरे मिळत जातात. मावशीच्या गावी जाताना मध्ये शेतामध्ये एक झोपडी असते तिथे ही मोठी आई एका म्हाताऱ्या माणसासोबत राहते हे लेखकाला लक्षात येते. 'रात्र झाली, आज इथच रहा रात्री आमरस करते' असं म्हटल्यावर लेखक राहायला तयार होतो. घरी गेल्यावर तो मोठ्या आईला आपल्या मुलांविषयी विचारतो त्यावेळी ती हरिपाठाला गेली आहेत हे सांगते. रात्री म्हातारा आंबे घेवून आल्यावर त्याच्यासोबत गप्पा मारतानाही मुलांचा विषय काढतो. म्हाताराही दोन मुलं एक मुलगी आहे म्हणून सांगतो, मुलींचं लग्न या अंब्याखाली मांडव टाकून केलं होतं हे सांगतो. सकाळ होते, लेखक पुन्हा अजूनही मुलं का आली नाहीत हे विचारतो. दुपारनंतर मावशीच्या घरी गेल्यावर मोठ्या आईला मुलं नाहीत हे मावशीच्या बोलण्यावरून समजते.

मावशीकडून घरी आल्यानंतर आई-वडिलांचा संवाद लेखकाच्या कानी पडतो. मोठी आई म्हणजे आपल्या मोठ्या बाबांची पहिली पत्नी तिला मुल होत नाही म्हणून मोठ्या बाबाने तिचा खूप छळ केलेला असतो. तिला नागवं करून तापलेल्या मातीत पुरून चाबकाचे आसूड मारलेले असतात, शेतावर जेवण घेवून यायला वेळ झाला म्हणून तिला नांगराला जुपले होते. मातीच्या ढेकळाला थडकून पडून उठून थकल्याने ज्यावेळी पाणी मागितलं त्यावेळी तिच्या तोंडावर लघवी केली होती, मुल व्हावे म्हणून मोठ्या आईने खूप उपास तपास केले होते. नंतर तर मोठ्या बाबानी दुसरे लग्न करून सवत आणली त्यावेळी पुन्हा त्रास वाढला त्या दुसऱ्या बाईच्या आईने मोठ्या आईला विष घातले होते मरता मरता वाचली होती. या सर्व त्रासाला

बघून मोठ्या आईच्या वडलांनी तिचे या म्हाताऱ्या माणसाशी दुसरे लग्न केले होते. हा म्हातारासुद्धा माणसात नसलेला माणूस म्हणून त्याची ओळख होती. त्याची बायको गावातल्या एका माणसाबरोबर पळून गेलेली असते.

रस्त्यातून येताना उन्हामुळे तहान लागली म्हणून एका विहिरीवर एका माणसाकडून पाणी पिताना मोठ्या आईने चुडा मागे घेतला त्यावेळी आणि आमरस खावून झाल्यावर तोंड हात पुसायला. पाणी मागताना जाणीवपूर्वक चुडा मागे सारून बघितलेल्या मोठया बाबाच्या नावाचं गोंदण लेखकाला सुन्न करून टाकते. एक विलक्षण हृदयस्पर्शी कथा म्हणजे हिरव्या चुड्याआड बुडालेलं ही आहे.

**४.२.२.३ मछया**

ह्या संग्रहातील ही अत्यंत भावनिक व्हायला लावणारी कथा आहे. मछया म्हणजे लेखकाचा बालमित्र इयत्ता चौथी पाचवीच्या दरम्यानच्या वयातील हे मित्र लेखकाच्या वडीलांची बदली झाल्यावर ते त्याचे मूळ गाव तिंगावली रहायला येतात त्यावेळी पहिल्याच दिवशी घराच्या मागे लेखक गेला त्यावेळी विहिरीत पोहताना मछया ही पहिली भेट नंतर गट्टी होते. तो घरी जातो आणि वडीलांकडून त्यांच्या मित्राच्या म्हणजे हणंता नाईकचा मुलगा म्हणजे मछया हे कळते.

मछया हा रंगाने प्रचंड काळा, मात्र खूप चपळ होता. उंचीवरून विहिरीत उडी मारणे व तळाचा गाळ काढणे, कोणत्याही उंच झाडावर सरसर चढणे, मोहोळ काढणे, गलोलीने शिकार करणे इ. बाबींत तो तरबेज होता. चौथी पास झाल्यानंतर लांब गावी शाळेला जायचे असल्याने माझे चालत जाणे त्रासाचे असल्याने वडिलांनी माझ्या एसटीचा पास काढला असे लेखक सांगतो. कारण मछयाचे वडील गरीब असल्याने ते पास काढणार नाहीत हे त्यांनी ओळखले होते. कालांतराने मछयाचे आई-वडील एका मोठ्या जमींदाराकडे कामानिमित्त राहायला गेले. त्यावेळी काकाजवळ राहणारा मछया लेखकासोबत शाळेला येऊ लागला. दिवाळीची सुट्टी मिळाल्यानंतर मछया आई वडीलांकडे गेला व येताना सायकल घेऊन आला. एकदा तो शाळेला त्याच्या काकासोबत येताना मागे कॅरेजवर बसला होता. इतक्यात भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने सायकलला धडक दिली. काका खड्डयात जाऊन पडले आणि मछयाच्या मांडीवर चाक गेले. रस्त्यावर रक्ताच्या थारोल्यात मछया ओरडत होता. पोलीसांनी पंचनामा केला. मछयाला दवाखान्यात नेले. ट्रक ड्रायव्हर आणि पोलिसात पैशांचा सौदा होऊन पोलिसांकडूनच ड्रायव्हर फरार जाण्याचे सांगण्यात आले. इकडे दवाखान्यात मछयाची बॉडी रक्ताने भिजली होती. दवाखान्यात सरपंच पोहचले मात्र मछयाच्या वडिलांनी आपल्याला मतदान केले नव्हते. या रागापोटी मछयाकडे लक्ष दिले नाही. मछयाचे रक्त वाहतच होते नंतर हळुहळू त्याने जीव सोडला. गावाकडे मछयाचे प्रेत आणले गेले. आई वडील आणि पै-पाहुणे यांनी रडून प्रचंड मोठा हंबरडा सोडला. अत्यंत चांगला मित्र आणि चपळ सवंगडी गेल्याचं दु:ख रोज जाणवत होतं. पोलिस स्टेशनसमोरून जाताना मछयाचं पिवळ दप्तर आणि मोडलेली सायकल एका चांगल्या मित्राची आठवण करून देत होती.

लहानपणीच्या वयामध्ये भरपूर मित्र कमावल्याचा आनंद असतो मात्र या वयात एक चांगला मित्र गमावल्याचे दु:ख काय असते याचे चित्रण या कथेतून लेखकाने अत्यंत चपखलपणे केले आहे.

**४.२.२.४ गळ**

'गळ' ही या संग्रहातील लहानपणी मासे पकडण्याच्या प्रकाराची माहिती देणारी कथा आहे. मासे पकडण्यासाठी लागणारा गळ, तो मिळवून मासे पकडण्याचे प्रसंग आणि गमती-जमती अत्यंत संवेदनशीलपणे लेखकाने या कथेत मांडले आहे. प्रत्येक कथेमध्ये लेखकाचे वेगवेगळे मित्र आहेत. या कथेत सुद्धा राजा, बबन्या यांनी गळ लावून मासे कसे पकडायचे हे लेखकाला सांगितल्याची ही कथा आहे. घराच्या पाठीमागे असणाऱ्या विहिरीमध्ये मासे टाकण्यासाठी म्हणून जिवंत मासे पकडण्यासाठी लेखक बाजारातून गळ घेऊन येतो. व प्रसंगी शाळा चुकवूनसुद्धा मासे धरण्याचा प्रयत्न करतो. प्रसंगी हरणाईच्या झोपडीत दप्तर ठेवून मासे पकडण्याचा प्रयत्न करतो. सुरूवातीला गळाला भाकरीचा तुकडा नंतर गव्हाचे पीठ व नंतर गांडूळ लावून मासे पकडण्यासाठीची बालपणातील हरकत लेखक मोठया बारीक-सारीक तपशीलासह चित्रित करताना दिसतो. मासे पकडण्याचा छंद सांगत असताना बनाजी, हरणाई या महिलांविषयी सुद्धा त्यांच्या जगण्याविषयी लेखक बोलून जातो. शाळा चुकवून मासे पकडताना मोठया भावाला जेव्हा सापडतो तेव्हा लेखक खूप घाबरतो. घरी दादानी सांगितले तर मार बसणार या भीतीपोटी हरणाईच्या झोपडीत ठेवलेले दप्तर घेऊन दादाच्या पाठीमागे चालू लागतो. दादा काहीच बोलत नाही. घरीसुद्धा तो मी शाळा चुकविलेले सांगत नाही. एकदा पाटलाच्या विहिरीवर दादासोबत मासे पकडताना रात्री झोपेत ''मासा आला आला, गळाला झटका मार'' असे ओरडत होतो. त्यावेळेपासून आई-वडीलांनी मासे धरायला जाऊ दिले नाही.

अशा प्रकारे लहानपणी अनेक गोष्टी छंद म्हणून आवड म्हणून किंवा सर्व मुले करतात म्हणून अगदी शाळा चुकवूनसुद्धा मासे पकडण्यासारखा गोष्टीचे चित्रण 'गळ' या कथेतून अत्यंत सुंदरपणे लेखकाने मांडले आहे.

**४.२.२.५ हिरव्यागार चिकाळ शेरावर**

अनिल साबळे यांनी या कथासंग्रहात लहानपणीच्या अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खेळाच्या गोष्टी यांचा संदर्भ घेतला आहे. प्रत्येक कथेमध्ये अशा गोष्टींचा संदर्भ येतोच. उदा. घोरपड पकडणे, तारेचा गळ लावून मासा पकडणे, दिसेल त्या ठिकाणी सरडा मारणे इ. गोष्टी भलेही हिंस्त्र वाटत असल्या तरीही न कळत्या वयात हे प्राणी मारल्यानंतर बऱ्याच फायद्याच्या गोष्टी आहेत. हा गैरसमज त्या वयात खरा वाटत असतो. उदा. घोरपडीच्या रक्ताचे तेल हात किंवा पाय मोडल्यावर लावतात, विहिरीतले मासे पकडून आपल्या विहिरीत नेणे म्हणजे पाणी स्वच्छ होते. सरड्याच्या बाबतीतसुद्धा अशाच काही फायद्याच्या गोष्टी आहेत. हे त्या वयातल्या मुलांनी सांगितलेले होते. अशाच प्रकारे मछया, अंक्या आणि लेखक एकदा लालतोंडया सरडा घरामागच्या शेराच्या कुपाटीवर मारण्याचा निश्चित करतात. मछया हा भिल्ल जातीचा असल्याने आपण जो पक्षी अथवा प्राणी खात नाही. त्याला गलोलीतून खडा मारायचा नाही असा नियम

असूनसुद्धा केवळ लेखकाच्या मैत्रीखातर मछया सरडयांवर खडे सोडत होता. शेराचा चीक त्रासदायक असतो. हे माहित असुनसुद्धा निव्वळ सरडा मारण्याच्या हट्टापायी हे तिघे त्या चिकाखाली वावरत होते. कपडे खराब होतात म्हणून अंक्या आणि मछया जास्त चिकाखाली येत नव्हते. मात्र लेखकाला सरडयाला मारायचेच होते म्हणून कपडयांवर, हातावर, पायावर सगळीकडे चीक पडलेला असतानासुद्धा तो सरडयाला शोधत होता. वरती बघताना लेखकाच्या डोळयात चीक जातो व तो ओरडायला लागतो. डोळयात पडलेला चीक पुसताना दंडावर सुद्धा शेराचे थेंब आधीच पडल्याने नंतर जास्त डोळा दुखू लागला व आग आग होऊ लागला. अंक्या डोळ्यात फुंकर घालू लागला तर मछयाने पाणी आणून लेखकाचे हात आणि चीक गेलेला डोळा धुवून काढला. लेखकाला भिती वाटायला लागली कारण लहानपणी डोळ्यात शेराचा चीक गेल्यामुळे आंधळा झालेला वाघ्या त्याला आठवायला लागला. मुलाच्या खांद्यावर हात ठेवून बाजारातून फिरताना त्याने बघितलेला त्याची बायको त्याला आंघोळ घालायची आणि मुलगा लांब शौचाला घेवून जायचा. पण मछयाने लेखकाला धीर दिला होता. घाबरू नकोस आपण तुझ्या डोळ्यात शेरडयांचं दूध टाकू म्हणजे सगळी घाण निघून जाईल असा धीर दिला होता.

हा उपाय करण्यासाठी लेखक मळ्यात बांधलेल्या शेळीकडे खूप वेळाने पोहोचले. आईला ही बातमी समजल्यानंतर आपल्या मांडीवर झोपून शेळीचे दूध डोळ्यात टाकते. त्यामुळे थोडी कळ आणि आग कमी होते हा या कथेचा आशय आहे. मात्र यासोबतच पायात मोडलेला काटा मछयाने भसकन ओढून काढून त्याचा चावा घेणे व बिबाचा रस त्यावर लावणे, तसेच दोर वाळण्यासाठी विहिरीत कापून ठेवलेले घायपात लक्षात न येता त्यात आंघोळ केल्यामुळे अंगाला सुटलेली खाज त्यावेळी मछयाने लिंबाचा पाला तोडून चोळून लावला होता. अशा छोट्या-छोट्या घटना प्रसंगानेसुद्धा ही कथा सशक्त बनताना दिसते. सुरूंगाचा ताईत पेटल्याने एक डोळा आणि बोट तुटलेला हरी, सुमनबाईचा विहिरीत पडलेला बैल, केरू चेअरमनच्या मुलाला लेखकाने मारलेला दगड इत्यादी प्रसंगसुद्धा या कथेत येतात.

पोटात अंडी असलेल्या सरडयाला मेलेला पाहून लेखकाच मन हळहळून गेलेले होत. हा कथेचा शेवट महत्त्वाचा वाटतो.

**४.२.२.६ मोहोळ**

या संग्रहातील मोहोळ ही कथा दीर्घकथा म्हणावी अशी आहे. सुमारे ३४ पृष्ठे असणारी ही कथा मधाचे मोहोळ काढण्याच्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा देते. आमराईत घराच्या आजुबाजूला बैलाच्या मळ्यात बाभळी आणि लिंबाच्या झाडात अशा विविध ठिकाणी मोहोळ काढण्याचे संदर्भ येताना दिसतात. मधु, रघु, चुलत भाऊ, विलास, संभा, छबू इ. सवंगडयांच्या सोबत मोहोळ काढतानाचा प्रसंग लेखकाने या कथेत सांगितला आहे. साध मोहोळ, चांभारी मोहोळ असे मोहोळचे प्रकार या कथेत भेटतात. मोहोळ काढताना सर्वांना चावलेल्या मधमाश्या, डोळे, अंग सुजलेले प्रसंगी बेशुद्ध पडलेल्या घटनासुद्धा लेखकाने या कथेत नमुद केलेल्या आहेत. छबुसारख्याचा अनुभव सांगताना लेखकाने अत्यंत भावनिक प्रसंग सांगितलेला आहे. छबुचा मालक त्याला शिळी भाकर आणि मिरचीचा गोळा द्यायचा. म्हणून छबु

आडरानात उन्हामुळे भरपूर तहान लागल्यामुळे पाणीसुद्धा मिळायचे नाही. अशा वेळी छबु पोळी भाकरीसारखी खातोय आणि मध पाण्यासारखा पितोय.

लहानपणीच्या आपल्या आवडीपोटी आणि छंदापोटी विविध ठिकाणी फिरून मोहोळ काढणे, मध खाणे हा भलेही लहानपणातला आवडीचा भाग असला तरी छबू आणि प्रकाश सारख्या लोकाचं पोट भरण्याचं साधन म्हणून मोहोळ आहे हे लेखकाने सांगितले आहे. प्रकाश हा ठाकर समाजाचा आहे व ठाकर समाजाची माणसं मध विकून त्यातून मिळालेल्या पैशातून आपले पोट भरतात हे वास्तव लेखकाने 'मोहोळ' या कथेतून सांगितली आहे. या कथेत झाडावरील, कुपाट्यातील, मळ्यातील मधमाश्यांचे मोहोळ झाडण्याचे वर्णन येते. व या निमित्ताने डोंगरदऱ्यात वसलेल्या गावातील रानावनातील मुलांचे भावविश्व निदर्शनास येते. हातात काहीही न घेता मोहोळ काढणे, आडकित्याने फांदी तोडून मोहोळ काढणे, डोक्याला व कानाला सदरा बांधून मोहोळ काढणे, धूर करून मोहोळ काढणे इ. प्रकारसुद्धा या कथेतून लक्षात येतात.

थोडक्यात रानावनातील समजला जाणारा मेवा म्हणून 'मोहोळ' हा लहानपणातल्या प्रत्येक मुलासाठी जसा भीतीचा आणि आकर्षणाचा भाग आहे. तसाच तो काहींच्या पोटाचा प्रश्न मिटवणाराही आहे. हा महत्त्वाचा आशय या कथेतून दृश्यमान होताना दिसतो.

**४.२.२.७ एक घर एकटं**

या संग्रहातील 'एक घर एकटं' ही कथा लेखकाने कल्पनेचा वापर करून त्याला स्वानुभवाची जोड दिली आहे. म्हणजे लेखकाने दिलेल्या मुलाखतीमध्ये एकूण आठ कथांपैकी ही कथा वगळता उर्वरित सात कथा ह्या आपल्या स्वानुभवावर आधारीत जीवनानुभवाच्या आहेत. या कथेचा आशय बघत असताना आजी व आजोबा रानातील घरात राहण्याचा प्रसंग दाखविलेला असून लेखकाचा वसतिगृह प्रवेश आणि सुट्टीच्या दिवशी गावी येणं. आजा-आजीला कडकडून मिठी मारणं आणि भूतकाळातील अनेक आठवणींना उजागर करण्याच्या गोष्टी येताना दिसतात. बकरी घेवून फिरल्याची काही ठिकाणं लक्षात येतात. घनदाट झाडीमध्ये असलेलं हे घर आणि गावातील घर अशा दोन गोष्टी सांगून घराच्या अवती-भवती चार कुत्री, मेंढ्या, शेळ्या, घरातील अन्नधान्य आणि निसर्गरम्य परिसरात आजा-आजी राहत असल्याचा प्रसंग या कथेतून चितारला आहे. घराकडे येत असताना जशी प्रचंड जंगल-झाडी दाखविली आहे. तसेच रस्त्यात एक वेडी म्हातारी भेटल्याचा प्रसंग सांगितला आहे. रात्री आजोबाशी गप्पा मारत असताना दूरवर लांब शेकोटी पेटल्याचं चित्र दिसतं. लेखक आजोबांना ते दृश्य पाहून वेड्या माणसांना थंडी वाजते का? ते शेकोटी पेटवतात का? अशी विचारणा केल्यानंतर ते चोर आहेत. मोटारीच्या केबल चोरतात असे आजोबा सांगतात. लेखक त्याचा चुलत भाऊ रामाच्या घरी झोपून जातो. त्याचवेळी रानातल्या घरात चोर घुसून आजी-आजोबांना मारल्याच लक्षात येतं. आजोबा सांगतात की विहिरीवर त्यांना जेव्हा जाळ दिसला. त्यावेळी भाला घेऊन गेल्यानंतर चोरांनी घरातल्या कोंबड्या कुत्र्यासमोर टाकून ते भुंकणार नाहीत याची तजवीज केली. म्हातारीच्या गळ्याला कोयता लावल्यामुळे आजोबाही काही करू शकले नाहीत. चोरांनी धान्याची

पोती फाडून त्यातले पैसे चोरले. बकऱ्याची मुंडकी कापून फेकून दिली. धान्य विसकटले. तोंड सुजेपर्यंत आजोबांना मार दिला व पहाटे जाताना खांद्यावर एक-एक शेळी उचलून नेली.

दुसऱ्या दिवशी पंचनामा करताना पोलिस आले तेव्हा उलट त्यांनीच घरच्यांवर आरडाओरड केली. रानात कशाला राहायला येता म्हणून डाफरले. जाताना पैसे आणि पिशवीतून कोंबडी घेऊन गेले. आजीला गावातल्या घरी घेऊन गेले मात्र आजोबांनी येण्यास नकार दिला. दुसऱ्या दिवशी आजोबांनी चारही कुत्र्यांना विष घालून मारून टाकले कारण आजोबांचे असे मत झाले होते की, कोंबड्यांच्या नादी लागून कुत्र्यांनी आपल्या घराचे रक्षण केले नव्हते. चोरीची बातमी कळल्यानंतर लेखकाचे वडील गावी येतात व रानातील सगळी जनावंर विकून टाकतात. नंतर घरातील राहिलेली प्रत्येक वस्तू चोरांनी अध्ये-मध्ये चोरून नेली. शिवाय रिकाम्या घराच्या भिंती लाथाने पाडून टाकल्या. लाकडी सामान चुलीसाठी मोडून नेलं शेवटी लेखक म्हणतो की, 'रानात बांधलेलं आमचं एकटं घर संपून गेलं.'

थोडक्यात रानशिवारात राहणाऱ्या माणसांना भलेही जनावरांपासून धोका नसला तरी चोर असणाऱ्या माणसांपासून निश्चितच त्यांना धोका असतो. ते एखाद्याचं घर उद्धवस्त करू शकतात. घराला एकटं पाडू शकतात. हा आशय या कथेतून अभिव्यक्त होताना दिसतो.

**४.२.२.८ पिवळा पिवळा पाचोळा**

या संग्रहातील ही शीर्षककथा लेखकाच्या अनुभवाचा सुंदर नमुना म्हणून पाहायला मिळते. या कथेमध्ये लेखक इयत्ता नववी नापास होतो. तो प्रसंग सांगितलेला आहे. त्या दिवशी सकाळपासूनच लेखक अस्वस्थ आहे. घरी सांगितलेले कामसुद्धा तो उद्या बघू असे सांगतो. निकालाचा दिवस आठवताना तो इयत्ता आठवीचा निकाल आठवतो. आठवीचे वर्गशिक्षक बी. बी. दिघे यांनी शाळा उघडल्यावर ज्यांना ज्यांना पास व्हायचे आहे त्यांनी विळ्याला धार लावून आमची ज्वारी, बाजरी कापून द्यायची असे सांगितले होते. भलेही त्यांनी पेपर कसाही लिहिला असला तरी हरकत नाही. त्यावेळी सरांनी पोरांच्या सगळ्या सोयी केल्या होत्या. हे आठवते शिवाय मुलांनी याला फक्त पाणी आणण्यासाठी ठेवले होते हेही आठवते. मात्र आज नववीचा निकाल असल्याने मनाची धुकधुक वाढली होती. रांगेतून हळूहळू पुढे जाताना मनातील भीती वाढली होती व शेवटी लाल भडक शेरे मारलेली पिवळे पुस्तक मांडवे सरांनी हातात दिले. ज्यावर नापास हा शेरा लिहिला होता. निकाल नीट पाहिल्यावर लक्षात आले की लेखक चार विषयात नापास झाला होता. त्याचवेळी लेखकाने हातातलं निकालपत्रक टराटरा फाडून सरांच्या पायाजवळ फेकलं. पिवळा-पिवळा पाचोळा हे शीर्षक या ठिकाणी स्पष्ट होते. नापास झाल्याचं दु:ख मनात घेऊन शाळेतून बाहेर पडल्यानंतर रस्त्यावरून जाणारी मुलं, मुली, लोक विचारतील म्हणून ओढयाकडच्या वाटेणे जाण्यास निघतो. परंतु घरी जाऊन सांगायचं काय? म्हणून तो एका लिंबाखाली बसतो. मग घरी जायचं नाही हे ठरवून असंच आजीच्या घरी पायी चालत जायचं का? की मावशीकडे जाऊ? नेमोनच्या मावशीकडे जावं तर तिथेही मुंबईहून आलेली मुलं विचारतील म्हणून सोनोशीच्या मावशीकडे जाण्याचे लेखक ठरवतो. मात्र मध्ये वडील काम करणारे पारेगाव हे लागते. पण तिथेही कोणी विचारलं तर मित्राकडे आलोय हे सांगून जायचे ठरवतो. मध्येच

मैदानावर क्रिकेट खेळणारी मुले दिसतात. लेखकालाही ती बोलवतात काही भेळ आणायला गेलेली आहेत. भेळ खाऊन जा असे सांगतात त्यावेळी दगड वेचतं लेखक थांबतो. कारण भूकही लागलेली असते. भेळ घेऊन मुले आल्यानंतर हा भेळ खाऊन तिथून निघतो. पारेगावला जाताना रस्त्यात सोमा पाटोळे हा गवंडीकाम करणारा लेखकाला आवाज देतो. जो सातवीत शाळा सोडलेला असतो. बाप दारूडा असल्याने बहिणीची लग्न राहिलीत असे कारण सांगून त्याने सातवीत शाळा सोडली होती. मात्र तो आता घर बांधू लागला होता. असच पुढं जात असताना वडिलांचा आवाज येतो. उन्हात रापलेला माझा चेहरा बघून वडील आपल्या डोक्याचा पांढरा रूमाल काढून माझ्या डोक्याला बांधतात. उन्हातान्हात कुठे चालताय हे विचारल्यावर मी नववी नापास झालोय हे सांगून टाकतो. व मी रडताच वडील जवळ येऊन सांगतात काळजी करू नकोस. मीसुद्धा एम. ए. पर्यंत शिकताना नापास झालो होतो. पण मी पास झालोय की नापास झालोय हे आजी-आजोबांना माहित नव्हते. नापास झाल्यामुळेच मी मुंबईला काम शोधायला गेलो. काम मिळेना म्हणून मी नुसतेच चणे खाऊन समुद्राच्या किनाऱ्यावर रडत बसायचो. मिळेल ते काम करून मी वर्षभर पैसे जमविले आणि पुन्हा गावी आलो आणि जिद्दीने परीक्षा देऊन पास झालो. वडिलांच्या या सांगण्याने लेखकाला धीर येतो. तिथेच एका घरातील मुलगीला मला खायला द्यायला सांगतात. गाडीवर बसवून घरी घेऊन जातात. तिकडे लेखकाला शोधण्यासाठी मोठा भाऊ सायकलवरून उन्हातान्हात वणवण फिरत असतो त्याला बघायला जातात.

घरी आल्यानंतर मोठया आवाजात सांगतात की, 'याला कुणी काहीच बोलू नका पास-नापास चालत राहतं? आज मी थकलोय तळेगावला जाऊन मटण घेऊन येतो. नाही तर घरातील एखादी कोंबडी कापा. या सर्व वातावरणाने लेखकाचे मन गलबलून येते. नापास झाल्यानंतरची मानसिकता आणि घरातील सर्वांचा आपल्यावरील जीव या विचाराने लेखकाचे मन भावूक होते व या कथेचा आशय या कथासंग्रहाची उंची गाठतो. अशा प्रकारे अनिल साबळे यांच्या पिवळा पिवळा पाचोळा या संग्रहातील सर्वच कथांचा आशय मनाला एका भावस्पर्शी अवस्थेत घेवून जातो. प्रत्येक कथा ही त्या लेखकाची न वाटता आपणच आपल्या लहानपणीच्या बऱ्यावाईट अनुभवामध्ये गुरफटून जातो असे वाटते. यातील बऱ्याच आठवणी आणि अनुभव विचाराच्या शृंखला विस्तारित करणाऱ्या आणि अनुभवक्षेत्र भव्य करणाऱ्या ठरतात. निसर्ग, रानशिवार, पशु पक्षी आणि मानवी मन:पोत याची विलक्षण सांधेजोड करणारा या कथेतील आशय या संग्रहाची महत्तता वाढवणारा आहे हे मात्र नक्की.

### ४.२.३ अभिव्यक्ती

प्रत्येक कथाकाराचे लेखक म्हणून स्वतंत्र असे वैशिष्ट्य असते. समकालीन कथाकारांमध्ये मांडणीतील सहजता घेवून येणारा लेखक म्हणून साबळे यांची ओळख महत्त्वाची ठरते. त्यांच्या कथेतून येणारी प्रसंग चित्रणे, व्यक्तिचित्रणे, निसर्ग इत्यादींमधून लेखक सर्व वाचकांना एका वेगळ्या अनुभवविश्वात घेवून जातो. जे विश्व नेहमीच सर्वांना भावते ते म्हणजे आपलं बालपण. पाचवी ते दहावी पर्यंतच्या बाल आणि किशोरवयात घडणाऱ्या घटना प्रसंगाची अनोखी अनुभव विश्वाची मालिका म्हणून या कथांचे वेगळेपण अधोरेखित होते. कोणतेही साहित्य वाचनीय ठरते ते त्या कलाकृतीच्या अभिव्यक्तिविशेषांमुळे हे अभिव्यक्ती

विशेष कलाकृतीला सशक्तपणा, सुटसुटीतपणा, रचना सौंदर्य प्राप्त करून देत असतात त्यानुषंगाने पिवळा पिवळा पाचोळा या कथा संग्रहाच्या अभिव्यक्तिचा आता विचार करू.

### ४.२.३.१ व्यक्तिरेखा

लेखकाने पिवळा पिवळा पाचोळा मधील रेखाटलेल्या व्यक्तिरेखा अत्यंत ठसठशीतपणे साकारल्या गेल्या आहेत. या संग्रहामध्ये एकूण आठ कथा आहेत. यामध्ये या व्यक्तिरेखा त्यांच्या मानसिक आणि शारीरिक व्यक्तिमत्वासह लेखकाच्या भाषाशैली मुळे वाचकांच्या नजरेसमोर अगदी हुबेहुब साकारल्या जातात. या कथासंग्रहामध्ये या व्यक्तिरेखा भरपूर प्रमाणात आल्या आहेत कारण लेखकाचे हे लहानपणाचे, कुमारवयाचे अनुभव कथन आहे. त्यामुळे आपल्या घरातील, बरीच मंडळी तसेच सर्व मित्र मछ्या आणि अनेक संवगडी, प्रसंगपरत्वे आलेल्या व्यक्ती यामध्ये मग सर्वच व्यक्तिरेखा येतात. कथानुभव स्पष्ट होताना काही व्यक्तिरेखा दीर्घकाळ रेंगाळतात तर काही अल्पावधीत पूर्ण होतात. यामध्ये काका, मोठी आई, मछ्या, गुरूजी, छबू, सोना पाटोळे, प्रकाश, विकास, मधू, संजू, राजा, दु:खी बना आई, भूताळीण हरणाई तसेच मंजा आई इत्यादी अनेक व्यक्तिरेखांनी समृद्ध असणारा कथाभाग या संग्रहातून प्रवाहित झाल्याचे आपणांस दिसून येते पैकी निवडक व्यक्तिरेखांचा आपण अभ्यास करू.

### ४.२.३.२ मोठ्या आई

लेखक अनिल साबळे यांनी पिवळा पिवळा पाचोळा या संग्रहातील सर्वच कथांमध्ये अनेकविध व्यक्तिचित्रणे रंगवली आहेत. मुळात लेखकच स्वत: या संग्रहात सर्वतोपरी व्यापून राहिला आहे कारण त्यांच्या सोबतच प्रत्यक्ष कथेतील घटना प्रसंग घडताहेत. म्हणून लेखक हा अनेकपदरी आपणास भेटून जातो. त्यासोबत अनेक व्यक्तिरेखा प्रकाशमान झाल्या आहेत त्यापैकी हिरव्या चुड्याआड बुडालेलं या कथेतील मोठ्या आई हे एक व्यक्तिचित्र. मोठ्या आई हे व्यक्तित्व म्हणजे लेखकाची मोठी चुलती, काकी या कथेत मोठ्या आईचे व्यक्तिमत्व एक मायाळू, कष्टकरी आणि शोषित असे चितारले आहे.

एकदा लेखकाचे वडील त्याला मोठ्या आईसोबत मावशीच्या घरी जायला सांगतात. मावशीचे घर मोठया आई जिथे राहते त्याच्या पुढे असते. तिथपासुनच ही मोठ्या आई कोण? असा प्रश्न लेखकाला पडतो परंतु उन्हात चालताना एका विहिरीवर पाणी पिताना मोठ्या आई तिच्या हाताचा हिरवा चुडा मागे सरकवून पाणी पिताना लेखकाला तिच्या हातावर मोठ्या बाबाचं नाव गोंदण केल्याचं दिसतं की जे नाव गावाकडे राहतो त्या दरवाज्यावर मोठ्या अक्षरात लिहिलंय पण गावी एक मोठी आई आहे. तिला पाच मुले आहेत. मग ही शेतात का राहते? अशा अनेक प्रश्नांच्या मालिकेतून लेखकाला मोठया आईचे आयुष्य समजते ते असे की मोठया आईला मूल होईना म्हणून खूप त्रास दिलेला असतो. मूल व्हावे म्हणून तिनेही खूप प्रयत्न केलेले असतात. उपास, तापास, व्रत वगैरे केलेले असतात परंतु तिला मूल होत नाही म्हणून खूप त्रास दिलेला असतो. एक वेळ नग्नावस्थेत तिला मातीत पुरले होते, चाबकाने आसूडाने मारले होते. एकदा रानात जेवण घेवून यायला उशीर झाला म्हणून नांगर ओढायला जुंपले होते. नांगर ओढताना ढेकळातून चालून थकल्यानंतर तिला तहान व पाणी मागितल्यावर तिच्या तोंडावर लघवी केली होती.

मूल होत नाही म्हणून मोठ्या बाबाने घरी सवत आणली परंतु मोठ्या आईवर होणारा त्रास थांबला नाही. एकदा तिच्या जेवणातून विषप्रयोग केला त्यावेळी तिला खूप त्रास झाला म्हणून तिच्या वडिलाने एका म्हाताऱ्याशी तिचे दुसरे लग्न करून दिले. ज्या म्हाताऱ्या सोबत ती शेतात एका झोपडीत राहते आहे. एवढा त्रास होऊनसुद्धा मोठ्या आईचं आमच्या घरावरील प्रेम कमी झालं नाही हे लेखक सांगतो. तो त्या दिवशी वस्ती राहतो कारण आमरस करून जेवायला घालायचं होतं म्हणून ती रात्रभर लेखकाला मिठीत घेवून झोपते. आंबे पिळून खाल्यानंतर हात कशाला पुसायचे म्हटल्यावर ती आपल्या लुगड्याला पुसायला सांगते व बोलून जाते ''माझ्या कुशीत तू त्या दिवशी रात्रभर झोपला होतास म्हणून अजून देखील माझ्या कुशीतून तुझाच वास येतोय. एका रात्रीसाठी तरी मला आई झाल्यासारखं वाटलं होतं.'' एका मायाळु स्त्रीचे हे उद्गार भावनिष्ठ करतात. हात पुसताना नखं वाढलेली दिसतात तेव्हा नखं काढून घे, नखातील घाणीने तू आजारी पडशील कारण ती घाण पोटात जाते असे सांगते. शकीलच्या शाळा सोडल्याचं सांगितल्यानंतर तू शाळा शिक शकीलसारखा विचार करू नकोस, वडिलासारखं नोकरीला लाग म्हणून सांगते. तुझी मुलं कुठं आहेत या प्रश्नावर मोठया आई व म्हातारा दोघेही खोटे बोलतात. ती देवळात पारायणाला गेली आहेत म्हणून सांगतात. तू एकटीच का राबतेस मुलांची लग्न का करत नाहीस असं म्हटल्यावर तेही टाळून तुझं लग्न करायचं का? असा प्रती प्रश्न करते. म्हातारा जेव्हा नसलेल्या मुलीची आठवण सांगतो त्यावेळी मोठया आई रडते व आपल्या मातृत्वाच्या भावना अश्रूच्या रूपाने बाहेर काढते.

जेव्हा लेखक मोठ्या आईला म्हणतो की मोठया बाबाने तुला इतका त्रास दिलाय तर त्याचं नाव तू का काढून टाकत नाही त्यावेळी मोठ्या आई कपाळावरील जखम दाखवते जिथं तिला मारलेलं होतं व त्याच ठिकाणी ती मोठासा कुंकू भरते मग नाव पुसणे लांबच.

थोडक्यात मोठ्या आई हे व्यक्तिचित्र या संग्रहामध्ये अत्यंत प्रभावीपणे लेखकाने चित्रित केले आहे. जे भावनिकतेच्या अत्यंत उच्च टोकापर्यत जाते. कष्टकरी, मायाळू मात्र एका नैसर्गिक आघाताने शापित असणारे दु:खी व्यक्तित्व म्हणून आपणांस भावनिक करून जाते.

### ४.२.३.३ मछ्या

या कथासंग्रहातील एका व्यक्तिमत्वाच्या भोवती फिरणारी कथा म्हणून मछ्या या कथेचा विचार महत्त्वाचा मानला जातो. म्हणजेच या संग्रहात महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणून लेखकाचा सवंगडी 'मछ्या' या व्यक्तिचित्राचे महत्त्व अधोरेखित होते. वडिलांची बदली झाल्यानंतर ज्यावेळी लेखकाचे कुटूंब गावी म्हणजे तिंगाव या ठिकाणी येते तेव्हा विहीरीत पोहणाऱ्या मछ्याची लेखकाला ओळख होते. हा लेखकाच्या वडिलांच्या लहानपणीच्या मित्राचा मुलगा. आदिवासी भिल्ल समाजाचा, दिसायला एकदम चपळ अंग कांती रंग काळा, डोळे लालभडक, गलोली नेहमी सोबत बाळगणारा तोही लेखकासोबत शाळेला असतो. मोहोळ काढणे, सरडा मारणे किंवा इतर लहानपणीच्या सर्वच उपक्रमामध्ये लेखकासोबत असणारा हा मछ्या स्वभावाने खूप चांगला असल्याचे लेखकाने चित्तारले आहे. घरी आला तर काही पण खायला दिले तर

लाजणाऱ्या असा मछ्या लेखकाला एक मित्र म्हणून नेहमी सहकार्य करणारा लेखकाने यात चित्रित केला आहे.

एकदा शाळेत शर्यत लागली असताना लेखकाच्या पायात काटा घुसतो त्यावेळी मछ्या थांबून लेखकाचा काटा उपसून काढतो, रूईचा चिक घालतो तसेच तो भाग बरा व्हावा म्हणून बिब्बाचा चटका देतो. एक वेळ डुक्करओढ्यात पोहताना अंगाला खूप खाज उठली होती तेव्हा लिंबाचा पाला मछ्याने चोळला होता त्यामुळे खाज कमी झाली होती. तसेच एक वेळ शेराचा चिक डोळ्यात गेला तेव्हा मछ्याने नाना तऱ्हेचे उपाय केले होते व घाबरू नको, काही नाही होत असा धीर देत. बकरीचे दूध डोळ्यात घातल्यावर तो बरा होतो हा उपायही मछ्याने केला होता. वडील गरीब असल्याने लांब गावी शाळेला पाठवणार नाहीत म्हणून लेखकाच्या वडलांनी त्याचा एस. टी. पास काढला होता व दोघे ये-जा करू लागले. मधल्या काळात मछ्याचे घरचे बाहेरगावी कामावर गेले. त्यानंतर घरच्यांनी त्याला एक जुनी सायकल दिली होती त्या सायकलवरून तो बरेच इकडे-तिकडे फिरायचा.

असेच एकदा सायकलवरून त्याच्या काकासोबत येताना तो मागे कॅरेजवर बसला होता त्यावेळी एका ट्रकने जोरदार धडक दिली आणि मछ्याच्या मांडीवरून त्या ट्रकचे चाक गेले. अगदी रक्ताच्या थारोळ्यात मछ्या मदतीची याचना करीत होता. मात्र उशीरा मछ्याला दवाखान्यात नेले. दवाखान्यातही त्याच्यावर लगेच उपचार झाले नाहीत. परिणामी प्रचंड रक्त वाहिल्याने मछ्याचा दवाखान्यात मृत्यू होतो. एका जिवलग मित्राचा मृत्यू लेखकाच्या जिव्हारी लागतो. रंगाने काळा असणारा, पण खूप चपळ असणारा, उंचीवरून विहिरीत उडी मारून तळाचा गाळ काढणारा, कोणत्याही उंच झाडावर सरसर चढणारा, मोहोळ काढण्यात व गलोलीने शिकार करण्यात तरबेज असणाऱ्या हरहुन्नरी मछ्याचा मृत्यू मन सुन्न करणारा होता असे लेखकाने मछ्याविषयीचे जीवनचित्रण रेखाटले आहे.

गरीबीने मछ्याला लहानपणीचे सुख मिळाले नाही आणि मोठा होतानाच अपघाताने त्याचा घात झाला हे दु:ख लेखक मछ्याची आठवण सांगताना ते व्यक्तिचित्र रेखाटतो.

### ४.२.३.४ छबू

रानावनातील सवंगडया सोबतच्या जीवनव्यवहाराचे चित्रण म्हणून लेखकाने या संग्रहातील कथा या उल्लेखनीय झालेल्या आहेत. बाल आणि किशोरवयातील जगणे मांडताना आपल्यासोबत आपल्या प्रवासात येणाऱ्या सवंगड्याचे जीवनचित्र लेखक नकळतपणे कसे मांडत गेला आहे हे त्याच्या लक्षातही नाही असे वाटते. असाच एक गरीबीने आणि परिस्थितीने गांजलेला छबू, सालगडी मेंढपाळ करणारा मुलगा एकदा मोहोळ काढताना लेखकाला हा भेटतो. पेटत्या रानशेणीचं खांड घेवून मधाचं पोळ अगदी सहजपणे त्याने काढले पण मधाच्या पोळीसहीत त्याने आधाशासारखे खावून टाकले. हे ज्यावेळी लेखकाने विचारले तेव्हा त्याने सांगितले की, मालक मला खायला फक्त मिरची ठेचा आणि शिळी भाकरी देतोय त्यामुळे अशा भर उन्हात मला पाणीही मिळत नाही म्हणून पाणी म्हणून मी मधच पितोय आणि पोळे भाकरी म्हणून खातोय. हे ऐकल्यावर लेखक सुन्न होतो हे बोलत असतानाच एक जुने मोठे मोहोळ दिसते. लेखक छबूला सांगतो की ते

चांभारी मोहोळ आहे, माशा खूप चावतात पण छबू गोवरीचे पेटती खोड घेऊन धुराच्या मदतीने ते मोहोळ काढतो. थोडा विस्तव भाजतो त्याला मात्र अगदी सहज तो मोहोळ काढतो खूप दिवसांनी जुनं मध अगदी मनसोक्तपणे लेखक पितो व मधाची एक धार छबूला भाजलेल्या हाताच्या ठिकाणी सोडतो.

तुला हे मोहोळ यापूर्वी दिसलं असेल ना? या लेखकाच्या प्रश्नावर छबू हो म्हणतो मात्र मालकाला सांगितलं तर तो सर्वच मोहोळ काढून नेतो मग मला अधेमध्ये भूक आणि तहान लागल्यावर काय खाणार या उत्तराने लेखक सद्गतीत होतो.

माणूस गरीबीमुळे किती वाईट अवस्थेत जगत असतो याचे उदाहरण म्हणून छबूचे व्यक्तिचित्र सर्वांनाच विचार करायला लावते.

**४.२.३.५ सोमा पाटोळे**

शाळेत शिकत असताना इयत्ता पाचवीमध्ये ज्याची भेट झाली तो म्हणजे सोमा पाटोळे. हा वर्गात खूप मोठा होता. अगदी शेवटच्या बाकावर बसायचा, तंबाखू खायचा. सोमा सातवीतूनच शाळा सोडलेला होता. लेखक नववी नापास झाल्यावर घरी कसे तोंड दाखवायचे म्हणून मावशीच्या पारेगावला जाताना मध्येच गवंडी काम करणाऱ्या सोमाने लेखकाला हाक मारली होती. बाप दारूड्या असल्याने आपणांस दोन बहिणी आहेत त्यांची लग्न कोण करणार? मी शाळा शिकत राहिलो तर बाप कुणासोबतही बहिणीची लग्न लावून देईल म्हणून दोन वर्षे गवंडयाच्या हाताखाली काम शिकलो व नंतर मीच गवंडी म्हणून आता काम करतोय. बहिणींना चांगल्या ठिकाणी लग्न लावून दिली आहेत व मीही सध्या व्यवस्थित आहे हे सोम्याचे सांगणे लेखकाला समाधान देते. हे सांगताना लेखकाचे एक वाक्य आहे तो म्हणतो की, 'वर्गात अगदी मागच्या बाकावर बसणारा, तंबाखू खाणारा सोमा चार भिंतीची घरे कशी बांधतो हे मला कोडचं वाटू लागले.'

अशाप्रकारे छोटया मोठया व्यक्तिरेखा मात्र आशयाच्या विविधांगी रूपांसह या संग्रहात येताना आपणांस दिसतात.

**४.२.४ प्रसंगचित्रण**

अनिल साबळे यांनी पिवळा पिवळा पाचोळा मधील कथांमध्ये आपल्या अनुभव विश्वातून वेधक प्रसंगचित्रांची निर्मिती केली आहे. स्वानुभवाला कलाकृतीची जोड देताना अगदी सहजपणे स्वत: आणि स्वत: भावेतीच्या संपूर्ण जगाला लेखकाने आपल्या लेखनीत पकडले आहे. काही प्रसंग चित्रांची उदाहरणे या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

**४.२.४.१ घोरपड**

रुईच्या आजूबाजूला खूप खोल बिळं होती. त्या बिळांमध्ये एकदा घोरपड घुसली म्हणजे तिला बिळ खोदून बाहेर काढणं खूपच अवघड झालं असतं. काकाने आजूबाजूचं गवत गोळा करून घोरपडीच्या अंगावर टाकलं आणि त्या गवताला भरकन काडी लावली. गवत जळून संपल्यावर मी गवताची राख काडीनं बाजूला केली आणि रुईच्या झुडपात पाहिलं तर घोरपड तशीच निमूट पडलेली होती. भाजलेल्या घोरपडीचा करपट

वास सुटला होता. घोरपड आपल्या पायाला शेपटी मारेल आणि आपण पांगळे होऊ ह्या भीतीनं काका घोरपडीची शेपटीच धरत नव्हता. मी अखेर पुढं जाऊन घोरपडीची शेपटी धरली आणि घोरपडीला बाहेर ओढू लागलो. घोरपडीनं रुईच्या मुळात आपल्या पुढच्या पायाच्या नख्या घट्ट अडकून धरल्या होत्या. मी सगळी ताकद लावून घोरपडीची शेपटी ओढली तेव्हा माझ्या हातात घोरपडीच्या शेपटीची जळालेली कातडीच निघून आली.

मला एकटयाला ही घोरपड रुईच्या झुडपातून बाहेर ओढता येणार नाही याचा अंदाज काकाला आला. मग त्याने पुढं होऊन घोरपडीची शेपटी धरून बाहेर ओढली. जळालेली घोरपड आपले पाय थरथर करत पडून राहिली. ती जळालेली घोरपड आमच्या गावातल्या एका बाईसारखी दिसत होती. ती जळालेली बाई चुलीत भाजलेल्या कांद्यासारखी दिसायची. मऊ मऊ लुगडयात गुंडाळून ठेवलेली ती बाई चमच्याने नुस्तं दूध पीत सगळ्या वेदना गिळत आपल्या घरात पडून होती. त्या बाईच्या तोंडात दूध साचू लागलं तेव्हा ती बाई मेल्याचं कळलं. अंगणात त्या बाईला अखेरची अंघोळ घालताना तिच्या अंगावरची कातडीच हातात यायला लागली होती.

**४.२.४.२ मछ्या**

मछ्याला घेऊन गेलेली जीप सरकारी दवाखान्याच्या अंगणात पोलीस येईपर्यंत थांबूनच होती. डॉक्टर नसल्यामुळे मछ्याच्या पायाला फक्त एक पांढरी पट्टी गुंडाळून टाकली. आमच्या गावातला सरपंच बिडी ओढता ओढता म्हणाला, ''हे भिलाचं प्वॉर बेवारस आहे. त्याला जगवून तरी काय करायचं.'' आपल्याला मछ्याच्या बापाने मत दिलं नव्हतं, हा राग त्या सरपंचाच्या मनात अजूनसुद्धा धुमसत होता. तोपर्यंत मछ्याच्या अंगातलं सगळं रक्त वाहून गेलं होतं. बेलांच्या मळ्यातली म्हातारी आपल्या बाळंतीण लेकीजवळ बसून सगळं पाहत होती. मछ्यावर उपचार करा म्हणून ती सगळ्यांना हात जोडून विनंती करत होती. आपण बेवारस आहोत हे मछ्यानं ऐकलंसुद्धा असेल, पण त्याला काहीच बोलता आलं नसेल. मछ्या बराच वेळ जीव धरून झोपला होता. नंतर त्याचे डोळे कायमचे झाकले गेले. मछ्याचे आई-वडील दवाखान्यात आले तेव्हा मछ्या पांढऱ्या चादरीत गुंडाळलेला होता. मछ्याचं शवविच्छेदन करणारी हत्यारं हाती धरलेली माणसं दारूसाठी पैसे मागत होती.

मी दिवसभर शाळेत सुन्नपणे बसून विचार करत होतो. आता मछ्याला घेऊन गेलेली जीप दवाखान्यात पोहचली असेल. मछ्याचा ट्रकखाली चिरडलेला पाय मांडीपासून कापून टाकला असेल. एक पाय असलेला मछ्या आता कसा दिसत असेल? आता तर एका पायाने मछ्या सायकलसुद्धा चालवू शकणार नाही. मछ्याला कुबडया घेऊनच शाळेत यावं लागेल. बगलेत कुबडया धरून मछ्या एवढया लांब शाळेत पायी येणार कसा? मछ्याला शाळेत येण्यासाठी पुन्हा पास काढावा लागेल. नाहीतर मछ्याचे वडील त्याला कायमचे शाळेतून काढून घ्यायला बसलेय. असेच विचार माझ्या मनात दिवसभर सुरू होते. मछ्या आपल्याला कायमचा सोडून गेला? ह्या प्रश्नाचं उत्तर मला त्याच रात्री मिळालं.

### ४.२.४.३ एक घर एकटं

आजी पहाटेच गावात पळत आली तेव्हा मी गावातला गलका ऐकून अपराध्यासारखा उठलो. सगळ्या गावासोबत मी आमच्या रानातल्या घराकडे धापा टाकत पळत गेलो. तेव्हा कापलेल्या बकऱ्यांची मुंडकी घराबाहेर पडली होती. सगळ्या घरात बाजरी–ज्वारीचं धान्य विखुरलेलं होतं. तोंड सुजलेले आजोबा डोक्याला हात लावून शांत बसले होते. नंतर त्यांनी डोळे पुसत सांगितलं, ''विहिरीवर जेव्हा मला जाळ दिसला तेव्हा मी हातात भाला घेऊन तिकडं गेलो. इकडं म्हातारी ओरडल्याचा आवाज आला. मी पळत आलो तर म्हातारीच्या गळ्याला कोयता लावून चोर उभे होते. त्यांनी माझ्या हातातला भाला दूर फेकून मला मेडीला घट्ट बांधलं. धान्याची पोती फोडून आतले पैसे चोरून नेले.''

आजोबांनी रात्री सोडलेली कुत्री चोरांवर अजिबात भुंकली नाहीत. कारण बाहेर झाकलेल्या कोंबडया फाडून चोरांनी कुत्र्यासमोर टाकल्या होत्या. कुत्रे भांडण करीत कोंबडया खात राहिले आणि चोर आजीच्या गळ्याला कोयता लावून आत घरात घुसले.

कुठले चोर असतील? कुठं गेले असतील? अशी चर्चा करत गावातली बरीच माणसं आजोबांच्या घराबाहेर बसली होती. पोलीस पाटलाने निरोप दिलेला पोलीस दुपारी पंचनामा करण्यासाठी आला. हातभर कागदावर पोलिसाने पंचनामा लिहिला. ''एवढ्या रानात कशाला झक मारायला म्हाताऱ्या तू राहतोस?' असं म्हणून आजोबांनाच तो पोलीस बोलू लागला. गावातलं कुणीतरी म्हणालं, 'सायेब, चोर सापडायला वासाचे कुत्रे कधी येणार आहे?'' तसा तो पोलीस उसळून म्हणाला, ''तुमच्या बापाची पेंड आहे का वासाचं कुत्रं आणायला? इथं रानात एवढ्या लांब आई घालायला राहत्याय'' त्या पोलिसाचं असं उत्तर ऐकून आपणच चोरी केल्यासारखी सगळ्या माणसांची तोंडं झाली.

या संग्रहातील अशी अनेक प्रसंग चित्रे वेगवेगळ्या अनुभव सृष्टीला दृष्यमान करताना दिसतात.

### ४.२.५ भाषाविशेष

पिवळा पिवळा पाचोळा या कथा संग्रहामधून अनिल साबळे यांच्या भाषेचे काही विशेष ठळकपणे जाणवतात. निवेदन पद्धती, गावाकडची भाषा, बोलीभाषेतील विविध शब्दप्रयोग, निसर्ग प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर करून त्यांनी आपल्या कथांना विशेष खोली प्राप्त करून दिली आहे. या संग्रहातील सर्वच कथा या दृष्टीने विचार करण्यासारख्या आहेत. त्यांच्या भाषा विशेषांचा सविस्तर विचार पुढीलप्रमाणे करू.

### ४.२.६ निवेदन पद्धती

पिवळा पिवळा पाचोळा या संग्रहातील एकूण आठ कथा ह्या प्रथमपुरूषी एकवचनी निवेदन पद्धतीचा वापर करून लिहिलेल्या कथा आहेत. त्यामध्ये गोष्टी रूपाचे आणि अनुभव कथनाचे प्रचंड मोठे भांडार असल्याने तिचे स्वरूप संवादी आणि गोष्टीवेल्हाळ स्वरूपाचे झाल्याचे आपणास दिसते. मी, आम्ही आणि आमच्या अशा सर्वनामाची भाषा म्हणूनसुद्धा ही महत्त्वाची वाटते. बालवयात आणि किशोरवयातील अनुभव

कथनाचे हे प्रारूप असलेने त्यांच्या कथेतून येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या अत्यंत सहजगत्या दृष्यमान होताना दिसतात.

निवेदन पद्धतीचे दुसरे वैशिष्टय असे की, यातील कथा वाचताना ह्यातील प्रत्येक व्यक्तिरेखा प्रसंग, घटना, गोष्टी या सर्वांचा आपण एक भाग होऊन बसतो म्हणजेच आपण त्याच्याशी इतके समरस होतो की आपल्या डोळ्यासमोर सर्व चित्रफलक अगदी स्पष्टपणे दृष्यमान होताना दिसतो. अतिरंजितपणा अथवा अतिशयोक्ती असा कोणताच प्रकार आढळत नाही. त्या वयातील निरागसपणा, अफाट कल्पनारम्यता, विचित्र कृतीकार्यक्रम या सर्व गोष्टी बऱ्याच वास्तव आणि कल्पनेच्या काही ठिकाणी जागा निर्माण करणाऱ्या अशा पद्धतीच्या दिसून येतात.

**४.२.७ निसर्ग प्रतिके**

पिवळा पिवळा पाचोळा या कथा संग्रहाचा दुसरा विशेष म्हणजे यामध्ये आलेली अनेकविध निसर्ग प्रतिके, प्रतिमा म्हणजे हा संपूर्ण कथा संग्रहच रानावनात शिवारात, शिवारातील अनेक गंमती-जमती, रानाशिवारातील पशु, पक्षी, प्राणी, पिके, शेती आणि माणसं याभोवतीच फिरताना दिसतो. डॉ. रणधीर शिंदे तर या कथा संग्रहाला 'रानविद्या सांगणारा' म्हणून महत्त्वाचा मानतात. काल यातील सर्वच कथा रानाशिवारातील जीवन व्यवहाराची साक्ष देताना दिसतात. घोरपड, मासे, सरडे, व्हले, पाखरं, शेळी, साप, सर्व प्रकारची झाडे, मोहोळ, शेती व शेतातील पिके, मधमाशी, गांडूळ इत्यादी शब्द सामर्थ्याने या संग्रहातील कथा सजलेली आहे. निसर्गातील या सर्वच पशू पक्ष्यांचा वापर करून कथासंग्रह सशक्त बनला आहे. उदा. 'तेव्हा उन्हात भाजलेल्या पाखरांसारखा माझा चेहरा पाहून वडील जवळ घेतात', किंवा 'नंतर मी डोळे उघडे ठेवून पाण्यातल्या माशासारखा सावध झोपी गेलो', 'खपाट्या पोटाची शेळी हिरवा सवेरा गपागपा खात होती, किंवा 'पाठीवर ऊन घेऊन लाल तोंडाचे माळ सरडे बाभळीच्या खोडावर मुंगळ्यांची रांग पाहत बसले होते' इत्यादी चित्रणांवरून आपल्या सहज लक्षात येते की, या संग्रहातील सर्वच कथा निसर्ग आणि त्या निसर्गात वावरणाऱ्या पशू-पक्षी आणि मानव संबंधीच्या कथा आहेत.

**४.२.८ भाषा**

या संग्रहातील भाषा ही ग्रामीण भाषा आहे. ती नगर जिल्ह्यातील प्रादेशिक भाषा असून तिला एक प्रादेशिकतेचे विशिष्ट असे महत्त्व आहे. बोलीभाषेचा वापर आणि बरेच त्या प्रदेशातील शब्द या कथेचे प्रादेशिक महत्त्व अधोरेखित करताना दिसतात. सहजता हे तिचे वैशिष्ट्य पदोपदी जाणवते व वाचकाला गुंतवून ठेवण्याची कमालीची ताकद या भाषेत आणि मांडणीमध्ये असल्याचे दिसून येते. डॉ. रणधीर शिंदे या संग्रहातील भाषेचे महत्त्व विशद करताना म्हणतात, ''रंग-गंध-नाद संवेदनाचा दाट प्राचुर्य प्रत्यय देणारी शब्द कळा कथेत आहे. वातावरण, स्थळ, भूगोल व भावीस्थितीचा भरगज्ज प्रत्यय देणारी ही भाषा आहे. प्रथम पुरूषी कथनाचा विलोभनीय आविष्कार त्यात आहे. कथेची भाषा ही सहज संवादी गावरान व्यक्तिबोली आहे.'' या विवेचनावरून कथेच्या भाषिक सौंदर्याचा आपणांस आवाका लक्षात येतो.

## ४.३ समारोप

अनिल साबळे यांच्या पिवळा पिवळा पाचोळा या प्रसिद्ध कथासंग्रहातील सर्वच कथांचा विचार करता त्यांची लिहिण्यातील सहजता आणि साधेपणा घटना आणि प्रसंग यांचे नेटके निरीक्षण, बोलीभाषा आणि भूतकाळातील अनुभवांना कवेत घेणारे कौशल्य या सर्वांचा विचार केल्यानंतर या संग्रहातील सर्वच कथा वाचकांना त्यांच्या बालवयात आणि किशोरवयात नेल्यावाचून राहत नाही. हा संग्रह आशय, अभिव्यक्ती, भाषा इत्यादी सर्वच बाबतीत निश्चितपणाने वर्तमानात प्रकाशित झालेल्या अनेक कथासंग्रहाच्या तुलनेत निश्चितच सरस आहे.

## ४.४ शब्दार्थ

- विलायती- एका झाडाचे नाव, निवडुंगासारखे छोटे झुडूप
- घायपात- ज्या वनस्पतीपासून झाडू करतात ती, पांदन
- खैस- भूताचा एक प्रकार
- शेराचा चिक- झाडांचे नाव, (ढेरीचा चिक)
- मोधाळा- पाण्याचा मोठा प्रवाह- मुशिंडा
- खटकाठी शिकार- खारूटीची, खारीची
- साबरीवरचे तांबडे होले- काटेरी निवडूंग, लांब लांब, कुपाटीला लावतात
- इरवाडाची टाहाळ- मूग, मटकी शेती (बाजरीतील आंतरपिक)
- मेमत होती- ओरडत होती

## ४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

१) अनेक सवंगड्यापैकी कोणत्या मित्रावर स्वतंत्र कथा आहे?

अ) अंक्या ब) मछया क) मधू ड) रामा

२) मोहोळ ही कथा किती पृष्ठांची आहे?

अ) तीस ब) चौतीस क) छत्तीस ड) बत्तीस

३) 'घोरपड' ही पहिली कथा प्रथम कोणत्या नियतकालिकातून प्रसिद्ध झाली होती?

अ) ललित ब) साधना क) नवअनुष्टुभ ड) नवाक्षर दर्शन

४) हिरव्या चुडाआड बुडालेलं या कथेत कुणाचं दुःख मांडले आहे?

अ) वडील ब) आई क) मावशी ड) मोठ्या आई

५) नापास झालेले गुणपत्रक लेखक काय करतो?

अ) लपवून ठेवतो ब) गुरूजींना देतो क) घरी देतो ड) फाडून टाकतो

उत्तरे- १) ब २) ब ३) क ४) ड ५) ड

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) लघुत्तरी प्रश्न

१) मछ्यासोबतच्या मैत्रीचे वर्णन करा.

२) 'एक घर एकटं' मधील चोरीच्या प्रसंगाचे वर्णन करा.

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१) पिवळा पिवळा पाचोळा या कथासंग्रहातील लेखकाचे बालपणीचे अनुभव तुमच्या शब्दात सांगा.

२) पिवळा पिवळा पाचोळा या कथासंग्रहातील निसर्गाचे व शेतशिवाराचे वर्णन करा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ

साबळे अनिल: पिवळा पिवळा पाचोळा, प पायरस प्रकाशन, कल्याण, २०२१ (आवृत्ती पहिली: ऑगस्ट २०२१)

## ४.८ उपक्रम

- लेखक संवाद / लेखक मुलाखत.
- कथासंग्रहाचे समूह अभिवाचन व चर्चा घडवून आणा.
- आपल्या लहानपणीच्या परिसराला भेट देवून निरीक्षण करा.

❑❑❑